भारत-गौरव-ग्रंथमाला-पुष्प ९५ वें.

# डॉक्टर भाऊ दाजी लाड

जी. जी. एम्. सी.

रित्र.

च
१६३

च १६३
ग्रंथ स्थानांक - ........
दाखल नं. ६६२६४
... - ९२८
किंमत - ...१....
दिनांक - ........
नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

—भगवान् श्रीकृष्ण.

लेखक

**श्रीनिवास नारायण कर्नाटकी,**


१. गुरुवर्य डॉ. सर रा. गो. भांडारकर यांचें चरित्र,

२. नामदार न्या. का. त्रिं. तेलंग यांचें चरित्र,

या पुस्तकांचा कर्ता.

---

कापडी बांधणी रु. १-०-० ] किंमत [ साधी बांधणी रु. ०-१२-०



जन्म १८२२] Bhau Daji [मृत्यु १८७४

प्रकाशक
मंगेश नारायण कुळकर्णी,
मालक,
भारत-गौरव-ग्रंथमाला,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकानें आपल्या
स्वाधीन ठेवले आहेत.

मुद्रक
मंगेश नारायण कुळकर्णी,
कर्नाटक प्रेस, ३१८ ए,
ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
088264

"मातापितृभ्यां नमः।"

—पुस्तककर्ता.




कै. श्रीमंत शांताराम नारायण ऊर्फ बाबासाहेब दाभोळकर.

जन्म १८६९ ]

[ मृत्यु १९३०

[library stamp]

कैलासवासी

## श्रीमंत शांताराम नारायण

ऊर्फ

## बाबासाहेब दाभोळकर

यांना डॉ. भाऊ दाजींविषयीं सदैव वाटत असलेला
अत्यंत आदर, त्यांनीं डॉ. भाऊंच्या चरित्रा-
विषयीं दाखविलेली उत्सुकता, व त्यांनीं
विद्याभिवृद्धयर्थ दिलेल्या अनेक देणग्या
या गोष्टींच्या स्मरणार्थ त्यांच्या
स्मृतीस हें पुस्तक परम आद-
रानें अर्पण करीत आहें.

— पुस्तककर्ता.

# अनुक्रमणिका.


| | | पृष्ठ. |
|---|---|---|
| प्रकरण | १ लें. उपोद्घात् ... .... ... | १ |
| ,, | २ रें. बालपण व शिक्षण .... .... | २ |
| ,, | ३ रें. ग्रँट मेडिकल कॉलेज ... ... | ७ |
| ,, | ४ थें. धंदा .... .... .... | १२ |
| ,, | ५ वें. नवीन शोध .... .... ... | १९ |
| ,, | ६ वें. वाङ्मय व संशोधन ... .... | २८ |
| ,, | ७ वें. शिलालेख, नाणीं वगैरे .... ... | ३७ |
| ,, | ८ वें. कालिदास आणि मुकुंदराज .... | ४७ |
| ,, | ९ वें. हेमाद्रि आणि हेमचंद्र .... .... | ५२ |
| ,, | १० वें. माधव व सायन ... .... | ५८ |
| ,, | ११ वें. इतर जुनी माहिती .... .... | ६१ |
| ,, | १२ वें. लोकशिक्षण .... .... ... | ७१ |
| ,, | १३ वें. राजकीय चळवळ ... ... | ७९ |
| ,, | १४ वें. इतर चळवळी .... ... | ८८ |
| ,, | १५ वें. अखेर .... .... ... | १०३ |
| ,, | १६ वें. गुणदोष ... ... ... | ११४ |
| ,, | १७ वें. कुटुंबासंबंधाची हकीकत ... ... | १२७ |

# पुस्तककर्त्यांचे चार शब्द.

हें माझें तिसरें पुस्तक आहे. माझ्या पहिल्या दोन पुस्तकांस महाराष्ट्रांतील वाचक वर्गांकडून अपेक्षेबाहेर आश्रय मिळाला ह्याबद्दल मी फार आभारी आहें. डॉ. भांडारकरांच्या चरित्राची एकही प्रत आतां शिल्लक नाहीं. न्या. तेलंगांच्या चरित्राच्या फारच थोड्या प्रति शिल्लक आहेत.

डॉ. भाऊ दाजी यांचें चरित्र मी हातीं घेण्याचें कारण फक्त रा. सा. गो. व्यं. पाणंदीकर यांची फार आग्रहाची सूचना हें येथें प्रथम सांगितलें पाहिजे. डॉ. भाऊ यांना परलोकवासी होऊनच आज सत्तावन वर्षें झालेलीं असल्यामुळें त्यांची मुंबईंत हल्लीं त्यांच्या नांवापलीकडे माहिती नव्हती. पण त्यांच्याविषयीं मुंबईंतील लोकांमध्यें जागृति उत्पन्न करून त्यांच्याबद्दलची स्मृति ताजी ठेवण्याचे गेल्या दोन चार वर्षांत मुंबईंत जे प्रयत्न करण्यांत आले आहेत त्यांचें सर्व श्रेय रा. सा. पाणंदीकर यांचेंच आहे. त्यांनीं मुंबईंतील सारस्वत ब्राह्मण समाजाकडून डॉ. भाऊ दाजींचा स्मृतिदिन साजरा करविण्याचा उपक्रम केला. त्यांनीं व रा. लक्ष्मीकांत दाभोळकर यांनीं एक लहानसा " भाऊ दाजी प्राइझ फंड " म्हणून उभा करण्याची खटपट चालविली आहे. प्रस्तुत चरित्रासंबंधांत रा. सा. पाणंदीकरांचा भाग किती होता याचा उल्लेख वर आलाच आहे. याविषयींचा व इतर कांहीं गोष्टींसंबंधाचा खुलासा रा. सा. पाणंदीकरांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंत विस्तृत रीतीनें आलाच आहे.

मी सन १९२९ सपटंबरमध्यें न्या. तेलंग यांच्या चरित्रविषयक कामांतून मोकळा होतांच, मी डॉ. भाऊ दाजींच्या चरित्राकरितां माहिती मिळविण्याच्या कामास लागलों. नवंबर ( १९२९ ) मध्यें एका मित्राच्या सूचनेवरून मी यवतला जाऊन डॉ. गोडबोले यांना भेटून आलों व नंतर नवंबर आणि डिसेंबर हे दोन महिने पुण्यास भांडारकर इन्स्टिट्यूटमध्यें जाऊन मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकाचे व्हॉल्यूम लक्षपूर्वक चाळून पाहिले. डॉ. भाऊ यांचा मूळगांव गोवें प्रांतांतील " पार्से. " तिकडे त्यांच्या बाळपणासंबंधीं कांहीं माहिती मिळेल कीं काय याची चौकशी केली. पण तशी माहिती मिळाली नाहीं. याशिवाय दुसरी माहिती मिळविण्याकरितां मग मला मुंबईस सुमारें पांच सात वेळां जावें लागलें. याप्रमाणें शक्य तेवढी माहिती गोळा करून चरित्रलेखनास सुरवात केली व गेल्या सपटंबर अखेर हस्तलेख तयार झाला. त्यांपैकीं कांहीं

भाग नंतर पुण्यांतील एका मित्रास व आक्टोबरमध्यें मुंबईस जाऊन रा. सा. पाणंदीकर व रा. लक्ष्मीकांत दाभोळकर यांना वाचून दाखविले.

रा. सा. पाणंदीकर यांच्याच सूचनेमुळें हें चरित्र लिहिलें गेल्यामुळें व त्यांना डॉ. भाऊ दाजींविषयींची प्रत्यक्ष माहिती असल्यामुळें त्यांनाच प्रस्तावना लिहिण्याविषयींची विनंति केली. त्यांनीं लिहिलेली प्रस्तावना या पुस्तकास जोडलीच आहे.

पुस्तक कै. वा. बाबासाहेब दाभोळकर यांनाच अर्पण करणें हें योग्य होतें. पण मध्यंतरीं चरित्रलेखनाचें काम चालू असतांनाच दुर्दैवानें बाबासाहेब यांचें कांहीं थोड्या दिवसांच्या आजारीपणानंतर देहावसान झालें. तरी त्यांच्याच स्मृतीस पुस्तक अर्पण केलें आहे.

चरित्र लिहिण्यास ज्या ज्या पुस्तकांचा उपयोग झाला त्यांचा इकडे उल्लेख केला पाहिजे.

१. रा. सा. पाणंदीकर यांच्या " आठवणी ".
२. मद्रासच्या नटेसनचें पुस्तक " Eminent Orientalists. "
३. मठस्थ गणेशशर्मा यांची " सारस्वत रत्नमाला ".
४. एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकाचे खंड.
५. Files of " Times of India. "
६. ,, ,, " Bombay Gazette. "
७. " मंडलिकांचें " नेटिव्ह ओपिनियन. "
८. " Lancet " Vol. 1855.
९. भांडारकरांचें " Vaishnavism, Shaivism. "
१०. मंडलिकांचें चरित्र; वगैरे वगैरे वगैरे.

डॉ. गोडबोले यांच्या नांवाचा उल्लेख वर आलाच आहे. परंतु कित्येक पुस्तकांतून व जुन्या वर्तमानपत्रांतून बरेच उतारे टाइप करून देण्याचें श्रमाचें काम रा. लक्ष्मीकांत दाभोळकर यांनीं केलें. त्याचप्रमाणें रा. हवालदारांनीं लिहिलेल्या रा. सा. मंडलिकांच्या चरित्राचा प्रस्तुत चरित्र लिहीत असतांना बराच उपयोग झाला. त्यामुळें त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतों.

पुस्तक मी लिहिलें खरें, पण त्याबद्दलचें बहुतेक सर्व श्रेय रा. सा. पाणंदीकर व पितापुत्र दाभोळकर यांचें आहे, हें मला सांगितलें पाहिजे.

रास्ते पेठ, पुणें,
१२ जानेवारी, १९३१

श्री. ना. कर्नाटकी

# प्रस्तावना.

—:०:—

सन १८६० पासून सन १८७४ पर्यंत डॉक्टर भाऊ दाजी लाड यांचें सबंध चारित्र्य अगदीं सूक्ष्म रीतीनें अवलोकन करण्याचे मला वेळोवेळीं इतके प्रसंग आले कीं, केवळ महाराष्ट्रांतच नव्हे तर अशेष हिंदुस्थानदेशांत गेल्या सुमारें शंभर सवाशें वर्षांत जे कांहीं अत्यंत विद्वान् व थोर पुरुष होऊन गेले त्यांत डॉ. भाऊंची गणना केली पाहिजे अशी माझ्या मनाची खात्री झाली. अशा थोर विभूतीचें चरित्र ते कालवश होतांच वास्तविक प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होतें. पण त्या जुन्या काळांत चरित्रलेखनाबद्दलची लोकांत उत्सुकता नसल्यामुळें डॉ. भाऊंचें चरित्र प्रसिद्ध होणें राहून गेलें तें गेलेंच. पुढें स्मृतिदिन साजरे करण्याची कल्पना निघाली व पुष्कळ मोठ्या मृत माणसांचे स्मृतिदिन साजरे करण्यांत येऊं लागले. तरी डॉ. भाऊ दाजींचें स्मरण कोणासच होईना! किंबहुना त्यांची स्मृति लुप्तप्राय होत चालली असें म्हणावयासही हरकत नाहीं. परंतु कै. शांताराम नारायण ऊर्फ बाबासाहेब दाभोळकर यांना डॉ. भाऊंची थोरवी केवढी होती याची चांगली कल्पना होती व त्यामुळें त्यांनीं "सारस्वत को-ऑपरेटिव्ह सोसायटी"च्या माटुंगा येथील वसाहतींतील पहिल्या इमारतीस थोड्या वर्षांपूर्वी भाऊ दाजींचें नांव देऊन त्यांची स्मृति ताजी केली. पुढें पुणें येथील चित्रशाळे-करितां मी जी वाचनपाठमाला लिहिली होती त्यांपैकीं एका पुस्तकांत लहान मुलांच्या माहितीकरितां मी मुंबई इलाख्यांतील कांहीं प्रसिद्ध पुरुषांचीं लहान लहान चरित्रें दिलीं होतीं. त्यांपैकीं डॉ. भाऊंच्या चरित्रावर मी असा शेरा मारला होता कीं, "निदान मुंबई येथील सारस्वत ब्राह्मण समाजानें तरी डॉ. भाऊ दाजींचा स्मृतिदिन साजरा करावा." त्याप्रमाणें वरील संस्थेकडून सन १९२८ च्या जूनमध्यें डॉ. भाऊ दाजींचा स्मृतिदिन प्रथमच साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं चालकांच्या सूचनेवरून मलाच भाषण करावें लागलें, व तें पुढें कांहीं मित्रांच्या सूचनेवरून व विशेषेंकरून माझे मित्र रा. लक्ष्मीकांत दाभोळकर यांच्या प्रोत्साहनामुळें पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध करण्यांत आलें. जमखंडी संस्थानचे माजी कारभारीसाहेब रा. ब. गोपाळ लक्ष्मण गजेंद्रगडकर यांना डॉ. भाऊ दाजींच्या खऱ्या योग्यतेची व अद्वितीय थोरपणाची मूळचीच माहिती होती. त्यांच्या हातांत माझें वरील पुस्तक पडतांच

त्यांनीं डॉ. भाऊ यांचें पद्धतशीर चरित्र जरूर झालें पाहिजे अशी मला आग्रहाची सूचना करून रा. कर्नाटकी यांजकडे बोट दाखविलें. परंतु डॉ. भाऊ दाजी हे दिवंगत होऊन आज अर्धशतकावर काळ लोटल्यामुळें त्यांचें चरित्र आतां तयार होणें मुष्किलीचें होय, असेंच बहुमत पडलें. परंतु सांगण्यास संतोष वाटतो कीं, माझे तरुण व उत्साही मित्र रा. लक्ष्मीकांत दाभोळकर यांनीं मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथसंग्रहालयांत जाऊन मोठ्या श्रमानें व काळजीपूर्वक इतकी माहिती मिळविली कीं, भाऊंचें चरित्र शक्य कोटींतलें वाटूं लागलें. त्याबरोबर मी लागलींच रा. कर्नाटकी यांना पत्र लिहून डॉ. भाऊंचें चरित्र हातीं घेण्यास विनंति केली. रा. कर्नाटकी यांनीं मग बरीच मेहनत घेऊन आणखी पुष्कळ माहिती मिळविली व डा. भाऊंचें हें सुंदर चरित्र तयार केलें. डॉ. भाऊ दाजी हे अनेक दृष्टींनीं अवतारी पुरुष होते. त्यांच्या चरित्राची माहिती करून घेण्याचें रा. कर्नाटकी यांनीं या चरित्राच्या रूपानें एक उत्तम साधन करून ठेवून मोठी मूल्यवान् कामगिरी केली आहे. व त्याबद्दल आम्ही सर्वांनीं त्यांचे आभार मानले पाहिजेत. त्याचप्रमाणें पहिला मार्ग खुला करून दिल्याबद्दल व नंतर लेखनाचें काम चालू असलेल्या मुदतींत वेळोवेळ रा. कर्नाटकींना शक्य ती मदत केल्याबद्दल रा. लक्ष्मीकांत यांचे जितके आभार मानावे व जितकें कौतुक करावें तितकें थोडेंच. एका गोष्टीचें मात्र दुःख वाटतें. कै. बाबासाहेब दाभोळकर कीं, ज्यांनीं चरित्रलेखनाचें काम चालू असतांना वरचेवर चौकशी करून आपली उत्सुकता इतकी व्यक्त केली होती, ते अकालीं निधन पावल्यामुळें हें डॉ. भाऊ दाजींचें चरित्र प्रसिद्ध झालेलें पहाण्यास ते राहिले नाहींत! ते हयात असते तर हें भाऊंचें चरित्र पाहून त्यांना फार फार आनंद झाला असता. असो. पण कै. बाबासाहेब यांनीं जी परवां एक उदार देणगी देऊन डॉ. भाऊंच्या विषयीं आपणास वाटत असलेला आदर व्यक्त केला, तिचा इकडे उल्लेख करणें जरूर आहे. डॉ. भाऊ दाजी हे मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे कित्येक वर्षें सभासद होते. इतकेंच नव्हे, तर ते पुढें कांहीं वर्षें तिचे उपाध्यक्ष होते. त्यांनीं अनेक विद्वत्ताप्रचुर लेख लिहून सदहू सोसायटीच्या त्रैमासिकाचे कित्येक खंड अलंकृत केलेले असल्यामुळें, डॉ. भाऊंनीं त्या संस्थेच्या कीर्तींत महत्वाची भर घातली, इतकेंच नसून ते—जस्टिस न्यूटन व डॉ. विल्सन यांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे—त्या संस्थेचें एक मोठें भूषण होऊन राहिले होते! अशा संस्थेंत डॉ. भाऊ दाजींची एकादी तसबीर किंवा चित्र नसावें ही

मोठी चमत्कारिक, किंबहुना सर्व मुंबईकरांस कमीपणा आणणारी गोष्ट तोही ! हें कै. बाबासाहेब दाभोळकर यांच्या लक्षांत येतांच, त्यांनीं कोणाची वाट न पहातां ८०० रु. खर्च करून एका उत्तम कारागिराकडून डॉ. भाऊ दाजींचें सुंदर चित्र तयार करविलें व तें सदर्हू संस्थेस नजर केलें ! त्या चित्राचा अनावरणसमारंभ गेल्या वर्षी डिसेंबरमध्यें मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांच्या हस्तें झालेला सर्वांस विश्रुतच आहे ! कै. बाबासाहेबांनीं शिक्षणाला उत्तजन देण्याकरितां अनेक देणग्या दिल्या आहेत. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्याकरितां तर त्यांनीं एक लाख रुपयांपेक्षांही अधिक रकमेचा ट्रस्ट करून ठेवलेला सर्वांस माहीतच आहे. पण वरील ८०० रुपयांची देणगी त्यांनीं ज्या स्फूर्तीनें दिली तिच्यामुळें तिचें महत्त्व त्यांच्या इतर देणग्यांपेक्षांही अधिक ठरतें. त्यासंबंधाची हकीकत अशी आहेः—एल्फिन्स्टन कॉलेजांतले संस्कृतचे अध्यापक प्रोफेसर गजेंद्रगडकर व विल्सन कॉलेजांतले प्रोफेसर वेलणकर–ह्या दोघांनाही युनिव्हर्सिटींतलें डॉ. भाऊ दाजींच्या नांवानें ठेवलेलें बक्षिस मिळालें होतें !—हे दोघे एके दिवशीं सकाळच्या प्रहरीं बाबासाहेबांच्या घरीं त्यांना भेटण्याकरितां गेले. बाबासाहेब त्या वेळीं देवपूजेस बसले होते. सबब ते रा. लक्ष्मीकांत यांजवळ त्यांच्या वडिलांकरितां निरोप ठेवून गेले. ते म्हणाले, "युरोपीयन लोकांनीं वर्गणी गोळा करून मॅकिंटॉश (Mackintosh)–हाच मुंबईच्या एशियाटिक सोसायटीचा मूळ संस्थापक होता–याची तसबीर सोसायटीस देण्याचें कबूल केलें आहे. तसेंच गुजराथी लोकांनीं भगवानलाल इंद्रजी यांची तसबीर देण्याचें ठरविलें आहे. आमचे दक्षिणी डॉ. भाऊ दाजी यांचा मात्र कोणी वाली नाहीं ! याकरितां डॉ. भाऊंच्या तसबिरीसाठीं आम्ही वर्गणी जमविण्याची खटपट करूं." बाबासाहेबांची देवपूजा आटोपतांच ते बाहेर आले आणि लागलींच लक्ष्मीकांत यांनीं सदर्हू प्रोफेसरद्वयांचा निरोप त्यांना कळविला. तो ऐकून बाबासाहेबांनीं असे उद्गार काढलेः—" अरे बाळ, असें पहा कीं, तुम्ही " भाऊ दाजी बक्षिस फंडा " करितां एकसारखे दीड वर्ष मोठी खटपट करीत आहां. तरी अजून एक हजार रुपयेसुद्धां जमले नाहींत. तसबिरीकरितां वर्गणी जमविण्यास निदान तीन वर्षें लागतील, आणि अवधि तर सारी तीन महिन्याची आहे. त्यापेक्षां असें पहा कीं, तुझ्या आजोबांचा भाऊंच्या ठिकाणीं अत्यंत आदर असे. त्यांच्याच पुण्याईनें आम्ही आज हे दिवस पाहिले आहेत. त्यांच्या पुढें ७००–८०० रुपयांची किंमत ती काय ? तूं त्या प्रोफेसर गृहस्थांना जाऊन कळव कीं, सर्व खर्च आम्हीच करूं. वर्गणीची जरूरी नाहीं. " हा खरा मनाचा थोरपणा !

आतां रा. ब. गजेंद्रगडकर यांनीं मजला एक सूचना केली आहे. ती मी आनंदानें–माझें कर्तव्य म्हणून–सर्व ( सारस्वत ब्राह्मण ) मंडळीपुढें ठेवतों. त्यांचा निरोप त्यांच्याच शब्दांत सांगतों:—

"For writing three lives of three Saraswat worthies he (Mr. Karnataki ) deserves a gold medal and I hope that your Bombay Saraswat Samuha does him the honour and honour itself."

( रा. कर्नाटकी यांनीं हल्लीं तीन सारस्वत श्रेष्ठांचीं तीन चरित्रें लिहून प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांचा गौरव करून आम्ही त्यांना सुवर्णपदक बक्षिस देणें अगदीं जरूर आहे. आणि हें काम मुंबईचा सारस्वत समाज हातीं घेईल अशी आशा आहे. ) याला मी माझी अशी पुरवणी जोडतों कीं, ज्या तीन सारस्वतांच्या चरित्रांचा रा. कर्नाटकी यांनीं आम्हांस लाभ करून दिला आहे, ते अशेष हिंदुस्थानांतील सारस्वत ब्राह्मण जातीला भूषणभूत झालेले असे हिरे होते! तरी रा. कर्नाटकी यांचा गौरव करण्याच्या कामीं हातभार लावणें हें सर्व सारस्वत ब्राह्मणांचें कर्तव्य आहे.

डॉ. भाऊंचें चरित्र हें बाबासाहेब दाभोळकर यांनाच अर्पण करावें हें योग्य होतें. त्याप्रमाणें रा. कर्नाटकी यांनीं केलेली योजना युक्तच आहे.

मुंबई,
१५–१०–३० } **गोपाळ व्यंकटेश पाणंदीकर.**

---

## रा. कर्नाटकी यांची सविनय विज्ञप्ति.

वरील माझ्यासंबंधाची सूचना वाचून मी गोंधळांत पडलों आहें. तो भाग कृपा करून गाळा अशी रा. सा. पाणंदीकर यांना मी अंतःकरणपूर्वक विनंति केली होती. पण त्यांनीं उत्तर लिहून कळविलें कीं, " please let my सूचना ( proposal ) stand as it is." त्यामुळें माझ्या मनाचा घोंटाळा झाला आहे. सबब मी रावसाहेबांपुढें माझ्या मनाची स्थिती काय झाली आहे हें इकडे

चार ओळी लिहून ठेवतों. त्यांचा त्यांनीं व इतरांनीं कृपा करून विचार करावा एवढीच विनंति आहे.

मी हल्लीं जीं तीन चरित्रें लिहिलीं आहेत तीं, चरित्रनायक हे केवळ सारस्वत ब्राह्मण जातीचे होते म्हणून लिहिलेलीं नाहींत. डॉ. भांडारकर, न्या. तेलंग व डॉ. भाऊ दाजी हीं माणसेंच अशीं होतीं कीं, तीं सारस्वत जातीस किंवा हिंदुस्थान देशासच काय, पण तीं कोणत्याही राष्ट्रास अलंकारभूत झालीं असतीं. त्यांनीं अपल्या विद्वत्तेनें व इतर गुणांनीं हिंदुस्थानच्या नांवास जगाच्या दृष्टीनें भूषण व अब्रू आणली आहे! अशा थोर पुरुषांचीं चरित्रें महाराष्ट्रांतील वाचाकांपुढें–विशेषेंकरून तरुण व होतकरू लोकांपुढें–नमुन्यादाखल ठेवणें हें एक अत्यंत आवश्यक असें कर्तव्य होतें, व तें कोणीतरी करावयास पाहिजे होतें. तें यथामति करण्याची मला संधि मिळाली ( एका चरित्राबद्दलची संधि तर रा. सा. पाणंदीकर यांनीं मला आणून दिली हें वर सांगितलेंच आहे. ) हें मी माझें सुदैव समजतों, व त्याबद्दल मी परमेश्वराचे उपकार मानतों, मी चरित्रनायकांच्या जातीचा आहें ही गोष्ट यदृच्छेनें घडलेली असून तिचें या ठिकाणीं महत्व मुळींच नाहीं.

तथापि वरील त्रिमूर्तीविषयीं सारस्वत ब्राह्मण जातीच्या लोकांना एक विशेष प्रकारचा आदर व अभिमान वाटावा हें अगदीं स्वाभाविक आहे. त्यामुळें त्यांचीं चरित्रें, बरीं वाईट कशींही असलीं तरी, मराठींत प्रसिद्ध झालेलीं पाहून कित्येकांस संतोष व समाधन वाटलेंही असेल. पण त्या गोष्टीचें कांहीं विशेष महत्व आहे असें मला वाटत नाहीं. माझे पूज्य मित्र रा. सा. पाणंदीकर व रा. ब. गजेंद्रगडकर यांना मजविषयीं एक प्रकारचें प्रेम वाटतें याची मला पूर्ण जाणीव आहे व त्याबद्दल मला कृतज्ञता वाटते. पण त्यांनीं केलेली सूचना वाचून माझ्या मनांत काय विचार आले हें इकडे सांगणें जरूर आहे. पहिली गोष्ट ही कीं, इतर पुष्कळ लोकांच्या प्रमाणें माझें निंमें आयुष्य–भरतारुण्याची ३१ पेक्षां अधिक वर्षें–सरकारी नोकरींत गेलीं. इतक्या दीर्घ कालांत माझ्या हातून कुटुंबपोषणापलीकडे देशाची किंवा जातीची कांहीं एक सेवा घडली नाहीं. दुसरें असें कीं, मी पेनशन घेऊन मोकळा झाल्यावर जरा सवड मिळतांच परमेश्वरानें बुद्धि दिली, म्हणून मी थोडेसे परिश्रम करून शक्य ती माहिती मिळविली व वरील तीन चरित्रें लिहिलीं. पण यांत मी कांहीं विशेष केलें आहे असें माझें मन मला सांगत नाहीं. चरित्रें प्रसिद्ध होतांच माझ्या मित्रांनीं व इतरांनीं तीं पुस्तकें घेतलीं, वाचलीं व कित्येकांस तीं आवडलीं

हें उघडच दिसतें. यांत माझ्या मतें वास्तविक माझ्या अल्प श्रमाबद्दल जें काय रास्त मिळावयाचें तें बक्षिस मिळून गेलें, व याबद्दल मी सर्वांचा आभारी आहें. यापेक्षां अधिकाला मी पात्र नाहीं. माझे पूज्य मित्र रा. सा. पाणंदीकर व तसेच माझे मित्र रा. ब. गजेंद्रगडकर हे उदार भावनेचे गृहस्थ आहेत. सबब त्यांनीं शुद्ध हेतूनें केलेल्या सूचनेचें महत्व मी कमी समजतों असें नाहीं. पण त्यांच्या इच्छेप्रमाणें माझें मन मला वागूं देत नाहीं त्याला माझा नाइलाज आहे. त्याबद्दल त्यांनीं मला क्षमा करावी. फक्त त्यांनीं व इतरांनीं मजवर कृपादृष्टि ठेवावी एवढेंच मागणें आहे. त्यांत सगळें येऊन गेलें.

पुणें, १२-१-३१. श्री. ना. कर्नाटकी.

# डॉक्टर भाऊ दाजी लाड

## यांचें चरित्र.

### प्रकरण पहिलें.

### उपोद्घात.

डॉक्टर रामकृष्ण विठ्ठल ऊर्फ भाऊ दाजी लाड हे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास मुंबई शहरांत एक मोठे विद्वान्, थोर व परोपकारी पुरुष होऊन गेले. ते एक प्रसिद्ध भिषग्वर्य—डॉक्टर—असून त्यांनीं रक्तपितीसारख्या, दुःसाध्य गण-लेल्या महारोगावर उपाययोजना शोधून काढण्याचा स्तुत्य प्रयत्न चालविला होता ! त्या कामांत पूर्ण यश येण्यापूर्वींच त्यांजवर काळाची झडप पडली ही दुर्दैवाची गोष्ट आहे. पण त्यांनीं जे पुष्कळ रोगी लोकांवर कित्येक वर्षें अविरत-पणें प्रयोग चालविले होते त्यांत त्यांना यश येऊन त्यांच्या हातून असंख्य रोगी बरे झाल्याचे दाखले आहेत !

पण डॉ. भाऊ दाजींची कामगिरी एवढयानेंच संपली नाहीं. ते एक खरेखुरे सरस्वतीभक्त असून त्यांनीं जुने हस्तलेख, प्राचीन ग्रंथ व शिलालेख यांसंबंधानें अत्यंत उपयुक्त माहिती उजेडांत आणून लोकांच्या ज्ञानांत महत्वाची भर घातली आहे ! या कामाकरितां त्यांनीं सर्व हिंदुस्थान देशाचा प्रवास केला, हजारों रुपये खर्च केले, पुष्कळ सहाय्यक मिळविले, अनेक शिष्य तयार केले आणि याप्रमाणें त्यांनीं आपल्या आयुष्याचीं–१८५२ ते १८७२–वीस बावीस वर्षें अत्यंत निरल-सपणें वाङ्मयसेवा करून सरस्वती मंदिरांत उच्च स्थान पटकाविलें आहे !

डॉ. भाऊ दाजी हे आपल्या वेळीं मुंबईंत एक प्रसिद्ध पुढारी होते. त्यामुळें त्यांचा " बोर्ड ऑफ एज्युकेशन," मुंबई युनिव्हर्सिटी, " बॉंबे असोसिएशन, "

"स्टु. लि. सा. सोसायटी," "नेटिव्ह जनरल लायब्ररी" इत्यादि अनेक संस्थांशीं संबंध असल्या कारणानें त्या वेळच्या सर्व सार्वजनिक कामांत त्यांचें प्रामुख्यानें अंग असे व त्यामुळें त्यांचें लोकांत व सरकारदरबारांत मोठें वजन होतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, ज्ञानलालसा व परोपकारबुद्धि हेच डॉ. भाऊ दाजींच्या ठिकाणीं विशेष गुण असल्यामुळें त्यांच्या हातून असंख्य लोकांचें कल्याण झालें व त्यामुळें लोक त्यांना "धर्मात्मा" म्हणत असत. अशा पुरुषाचें चरित्र अत्यंत वाचनीय व मननीय असावें यांत आश्चर्य नाहीं.

---

## प्रकरण दुसरें.

# बालपण व शिक्षण.

डॉ. भाऊ दाजी यांचा सन १८२२ सालीं गोवें प्रांतांतील मांजरें गांवांत जन्म झाला. त्यांचें जन्मनांव "रामकृष्ण" ठेविलें होतें. त्यांचे वडील त्यांना "भाऊ" म्हणून हांक मारीत असत. त्यामुळें त्यांनीं तेंच नांव पुढें चालू ठेविलें. त्याचप्रमाणें, भाऊंच्या वडिलांचें "विठ्ठल" असें नांव होतें, पण ते त्यांना "दाजी" म्हणत असत. तेंच नांव पुढें भाऊ आपल्या नांवास जोडूं लागले. याप्रमाणें ते मग "भाऊ दाजी" या नांवानें प्रसिद्धीस आले.

डॉ. भाऊ हे वारल्यासच मुळीं अर्ध शतकापेक्षां अधिक काळ लोटल्यामुळें त्यांच्या बालपणासंबंधीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. असें सांगतात कीं, भाऊंचे वडील अगदीं गरीब स्थितींत होते व ते आपल्या गांवीं मातीचीं चित्रें करून विकीत असत आणि आपला उदरनिर्वाह करीत असत. तथापि त्यांना विद्येची गोडी होती असें स्पष्ट दिसतें. त्यांना संस्कृत चांगलें येत असे, व एकदां त्या भाषेंत त्यांनीं चांगली कविता केल्यामुळें त्यांना बक्षिस मिळालें होतें असा दाखला मिळतो. ( Vide "Students Magazine," Grant Medical College, 1906, p. 258 ). असो. त्या दिवसांत मुंबईची तें एक उद्योगधंद्याचें ठिकाण म्हणून प्रसिद्धी होती. त्यामुळें तिकडे जाऊन आपल्या नशिबाची परीक्षा पाहावी अशी डॉ. भाऊंच्या वडिलांस सहज इच्छा झाली. त्याप्रमाणें ते आपलें सर्व कुटुंब बरोबर घेऊन सन १८३२ च्या सुमारास

मुंबईस आले. त्या वेळीं भाऊंचें दहा वर्षांचें वय होतें. त्यांच्या वडिलांनीं मुंबईस आपला मातीचीं चित्रें करून विकण्याचाच धंदा चालविला. पण पुढें त्यांना भाऊंच्या असामान्य बुद्धीच्या योगानें सहाय्य होऊं लागलें. भाऊंना त्यांच्या बालपणापासून बुद्धिबळें चांगलीं खेळतां येत असत! त्यांचें त्यांत चांगलें डोकें चालतें हें पाहून कित्येक शोकी लोक भाऊंना आपल्याबरोबर खेळण्याकरितां घेऊन जात असत व त्यांचें त्यांत कौशल्य पाहून फार कौतुक करीत असत. भाऊ कोठेंही गेले तरी त्यांची सरशी व्हावयाची हें ठरलेलेंच असे. त्यामुळें पुष्कळ सधन व शोकी लोक भाऊंना द्रव्यसहाय्य करीत असत, व त्यापासून भाऊंच्या वडिलांना संसाराच्या कामीं बरीच मदत होत असे. पुढें एकदां असें झालें कीं, मुंबईचे त्या वेळचे गव्हर्नर—Earl of Clare—यांना बुद्धिबळें खेळण्याचा फार नाद आहे असें भाऊंच्या वडिलांना समजलें. त्यांना मग सहजच वाटलें कीं आपल्या बुद्धिवान् मुलाची तेथपर्यंत दाद पोंचविण्याचा प्रयत्न करावा. त्यांनीं नंतर खटपट करून संधान बांधलें आणि त्यांत त्यांस यश आलें. गव्हर्नरसाहेबांस भाऊंची बुद्धिमत्ता पाहून मोठें कौतुक वाटलें व त्यांनीं त्यांना द्रव्यसहाय्य केलें. पण ते गव्हर्नरसाहेब एवढेंच करून थांबले नाहींत, त्यांनीं भाऊंच्या वडिलांना चार उपदेशाच्या गोष्टी सांगून म्हटलें कीं, तुम्ही आपल्या मुलास चांगलें शिक्षण द्या, म्हणजे तो पुढें नांवालौकिकास चढेल. बुद्धिबळें खेळण्यावरच थांबून तुम्ही त्याची बुद्धि फुकट जाऊं देऊं नका. गव्हर्नरसाहेबांनीं याप्रमाणें भाऊंच्या वडिलांस उपदेश करून त्यांना त्या कामीं मदतही केली.

पुढें भाऊ मुंबईच्या Marathi Central School नांवाच्या शाळेंत जाऊं लागले. त्या शाळेंत कोणी नारायण शास्त्री पुराणीक या नांवाचे भाऊंचे गुरु होते. भाऊ दाजी हे पुढें या आपल्या गुरुजींविषयीं नेहमीं आदरानें बोलत असत व हिंदु रिवाजाप्रमाणें कोणत्याही शुभ प्रसंगीं ते तो व्यक्त करीत असत. त्याच सुमारास मुंबईचे प्रसिद्ध कै. गोविंद नारायण माडगांवकर हे खासगी रीतीनें केवळ हौसेखातर कांहीं होतकरू मुलांस मराठी शिकवीत असत. त्यांत कांहींदिवस भाऊ दाजी होते. म्हणजे माडगांवकर हे देखील भाऊंचे गुरुच होते. त्याचप्रमाणें भाऊ दाजी यांच्या हुशारीमुळें प्रसिद्ध कै. बाळ शास्त्री जांभेकर यांचेंही त्यांच्याकडे लक्ष गेलें, व तसा संबंध जुळल्यापासून शास्त्रीबोवांच्या मरणकालपर्यंत भाऊंच्या कामांत त्यांचा पाठिंबा असे. असो. याप्रमाणें भाऊ दाजी यांचें मराठी शिक्षण पुरें होतांच ते "एल्फिन्स्टन इन्स्टिटयूट"मध्यें इंग्लिश शिकूं लागले. इंग्लिश शि-

क्षण जींत दिलें जात असे अशी त्या वेळीं मुंबईंत ती एकच शाळा होती. मुंबईंत पहिल्यानें सन १८२३ सालीं "Bombay Native Education Society" नांवाची एक शिक्षणसंस्था स्थापन झाली होती. तींत शिकविण्याकरितां म्हणून गव्हर्नर साहेब माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनीं इंग्लंडहून सन १८३३ मध्यें एक प्रोफेसर आणला व ह्या संस्थेला कॉलेजचें स्वरूप दिलें. पण ही व्यवस्था नीट चालेना, म्हणून सन १८४० मध्यें शाळा व कॉलेज हीं एकत्रित करून त्या संयुक्त संस्थेलाच "एल्फिन्स्टन इन्स्टिटयूट" हें नांव देण्यांत आलें. तशी संस्था मुंबईंत त्यावेळीं ती एकच होती हें वर सांगितलेंच आहे. त्या संस्थेंत शिक्षण घेऊन जी विद्यार्थ्यांची पहिली तुकडी प्रसिद्धीस येऊन लौकिकास चढली, त्यांतील तीन मुख्य नांवाचा मुंबईच्या टाइम्सनें सन १८५४ सालांतील एका लेखांत उल्लेख केला होता. डॉक्टर भाऊ दाजी, शेट नवरोजी फर्दुनजी व मिस्टर नारायण दिनानाथजी हींच तीं नांवें होत. त्यावेळीं एल. इन्स्टिटयूटमध्यें जे अध्यापक शिक्षणाचें काम करीत होते त्यांपैकीं हार्कनेस, बेल्ल, हेंडर्सन व ऑर्लेबर यांचीं नांवें प्रथम सांगितलीं पाहिजेत. हे शिक्षक फार विद्वान असून आपलें काम काळजीपूर्वक करीत असत. स्वतः भाऊ दाजी हे एक बुद्धिवान् विद्यार्थी होते. त्यामुळें ते आपला अभ्यास नीट लक्षपूर्वक करीत असत. परंतु वर सांगितलेले शिक्षकही फार उदारमनस्क असल्यामुळें ते आपलें अध्यापनाचें काम अगदीं अंतःकरणपूर्वक करीत असत व यामुळें तो गुरुशिष्यसंबंध उभयपक्षीं अत्यंत स्पृहणीय असा जुळून आला होता. या संबंधापासून भाऊ दाजी यांचा पुष्कळ फायदा व्हावा व त्यांनीं त्यामुळें आपल्या गुरुजींचें प्रेम संपादन करावें यांत आश्चर्य नाहीं. सदरील शिक्षकवर्गाविषयीं त्या वेळचे एक बडे अंमलदार नामदार मिस्टर गिब्स यांनीं एका प्रसंगीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले होतेः—" मुंबईस ज्यांनीं इंग्लिश शिक्षणाचा पाया घातला त्यांत हार्कनेस, ऑर्लेबर वगैरे मंडळीची आद्यस्थानीं गणना केली पाहिजे. ते विद्यार्थ्यांना नुसती पुस्तकी विद्या शिकविली म्हणजे आपलें काम झालें असें मानणारे शिक्षक नव्हते. त्यांना वाटे कीं, आपल्या हाताखालीं शिकलेल्या विद्यार्थ्यांनीं विद्वान् व्हावें, इतकेंच नव्हे तर त्यांनीं उत्तम नागरिक व्हावें व आपल्या देशाच्या राज्यकारभारांत भाग घेण्यास पात्र व्हावें." अशा उदारमनस्क गुरुजींच्या शिक्षणाचा भाऊ दाजी सारख्या बुद्धिवान् मुलाच्या मनावर इष्ट प्रकारचा परिणाम झाल्याशिवाय कसा राहील? असो. भाऊंचा शाळेंतील व कॉलेजांतील अभ्यासक्रम उत्तम प्रकारें चालला हें ओघानेंच प्राप्त

झालें. भाऊंना गणित व पदार्थविज्ञानशास्त्र या विषयांची फार आवड होती. व त्यांचा अभ्यासक्रम चालू होता त्या मुदतींत त्यांना नेहमीं स्कॉलर्शिपा मिळत असत. इतकेंच नव्हे, तर त्यांना एकदां सुवर्ण पदकही बक्षीस मिळालें होतें. भाऊ दाजींचें सन १८४० सालीं १८ वर्षांचें वय होतें, त्यावेळीं त्यांना दरमहा रु. ४० ची स्कालर्शिप होती असा ह्या सालच्या रिपोर्टांत उल्लेख आहे. सन १८४२ सालीं मुंबई सरकारनें काठेवाड व कच्छ या प्रांतांतील कांहीं जातींच्या लोकांत जी बालहत्येची ( Infanticide ची ) चाल फार दिवसांपासून चालत आली होती, त्यासंबंधीं निबंध मागवून त्याला रु. ६०० चें बक्षिस ठेविलें होतें. डॉ. भाऊ दाजींनीं, ते कॉलेजांत असतांनाच त्या विषयावर एक सुंदर निबंध ( इंग्रजींत व गुजराथींत ) लिहून तें सरकारी बक्षिस मिळविलें होतें. असो. पुढें त्यांचा अभ्यासक्रम पुरा होतांच त्याच इन्स्टिट्यूटमध्यें त्यांना शिक्षक नेमण्यांत आलें. त्याविषयीं " बोर्ड ऑफ एज्युकेशन "च्या सन १८४३ सालच्या रिपोर्टांत असा उल्लेख आहेः—

"Bhau Daji and Dhondu Janardan, who, throughout their attendance in the Institution as scholars, have on all occasions highly distinguished themselves, have been appointed Assistant Teachers in the Institution."

शिवाय भाऊ दाजी यांना दुसऱ्या एका कारणामुळें आलेली नोकरी पत्करणें भागच पडलें. ह्यांचे वडील त्याच सुमारास मुंबईच्या पूर्वेस खाडींत जवळच असलेल्या घारापुरीच्या डोंगरावर जाऊन वानप्रस्थ होऊन राहिले होते. यासंबंधानें एके * ठिकाणीं असा उल्लेख सांपडतोः—

"The father of Dr. Bhau Daji became an eremite at Elephanta."

व त्याच्या पुढें असा शेरा आहेः—"Bhau used to pay an annual visit to his father when he was at Elephanta."

अशा स्थितींत कुटुंबपोषणाचें काम भाऊंवरच येऊन पडल्यामुळें आलेली नोकरी पत्करणें त्यांना भागच होतें. असो. याप्रमाणें भाऊ दाजी हे " एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशन "मध्यें रसायनशास्त्र व तत्वज्ञान ( Chemistry and

---

* *Vide* "Bombay and Western India," by James Douglas, Vol. II, page 198.

Philosophy ) या विषयांचे शिक्षक झाले. तें काम करीत असतांनाच त्यांनीं खासगी रीतीनें संस्कृत भाषेचा अभ्यास केला.

याच सुमारास सर्व हिंदुस्थान देशभर फिरून प्राचीन इमारती, शिलालेख व इतर अवशेष भाग एकदां पाहून घ्यावे म्हणजे आपल्या देशाचा मागचा इतिहास समजण्यास मदत होईल अशी भाऊ दाजींच्या डोक्यांत कल्पना आली व त्याप्रमाणें प्रवास करण्याची त्यांना संधिही पण लागलीच मिळाली. सर अर्स्किन पेरी हे त्या वेळीं मुंबई हायकोर्टाचे चीफ जस्टिस होते. ते फार उदारमनस्क गृहस्थ असून सुशिक्षित लोकांशीं ते सहानुभूतीनें वागून त्यांना हरएक प्रकारें उत्तेजन देत असत. त्या साहेबांबरोबर भाऊ दाजींनीं सन १८४५ सालीं प्रवास करून अजंटा येथील गुंफा (Ajanta caves) पहिल्यानें पाहिल्या. त्याचप्रमाणें आणखी दोनतीन वेळां भाऊंनीं त्या साहेबांबरोबर प्रवास केला. त्या प्रवासाच्या योगानें भाऊ दाजींची अवलोकनशक्ति वाढली व पुढें जी त्यांची पुराण वस्तु-संशोधनाबद्दल व एक प्रकारच्या धडाडीबद्दल प्रसिद्धि झाली त्याचें बीजारोपण या प्रवासाच्या वेळींच झालें. ते प्रवासांत तासचे तास घोड्यावरून फिरत असत व त्यावेळीं पाहिलेल्या व अनुभवलेल्या कांहीं गमतीच्या गोष्टी ते मग केव्हां केव्हां आनंदानें सांगत असत. असो. अजंटा येथील लेणीं पाहण्याकरितां व त्यांतील लेखांच्या नकला घेण्याकरितां तदनंतर देखील भाऊ दाजींना कांहीं वर्षांनीं दोन तीन वेळां जावें लागलें होतें. पण त्यासंबंधानें व त्यांनीं लावलेल्या शोधांविषयीं पुढें एकाद्या प्रकरणांत विवेचन करूं.

त्यावेळीं मुंबईचे प्रसिद्ध रेव्हरंड डॉ. विल्सन यांचा तरुण विद्यार्थी लोकांकरितां सभा, व्याख्यानें, संमेलनें वगैरे जुळवून आणण्याचा क्रम चालत असे. त्यांपैकीं बहुतेक सर्व प्रसंगीं डॉ. भाऊ दाजी हजर राहात असत व त्यांत शक्य तेवढा भाग घेत असत. त्याचप्रमाणें टाऊन हॉलमध्यें किंवा इतरत्र व्याख्यानें देण्याचे किंवा भाषणें करण्याचे डॉ. भाऊंना वरचेवर प्रसंग येत असत असें डॉ. विल्सन सांगतात. असो.

आपल्याला ज्ञानप्राप्ति होऊन त्यापासून कांहीं तरी लोकांस उपयोग व्हावा अशी उपजतच जणूं भाऊ दाजींची बुद्धि होती. त्याप्रमाणें आपली मनीषा तृप्त होण्याचा त्यावेळीं एक नवीन मार्ग दिसूं लागतांच त्या दिशेनें त्यांचें मन वळलें यांत आश्चर्य नाहीं.

## प्रकरण तिसरें.

# ग्रँट मेडिकल कॉलेज.

वस्तुतः या देशांत इंग्लिश शिक्षणाची सुरवात होतांच त्या शिक्षणाच्या निरनिराळ्या–शिल्प (Engineer), कायदा (Law), वैद्यक (Medicine) वगैरे–शाखांचा इकडे प्रसार व्हावा असें त्या त्या शाखांच्या अभिमानी अधिकाऱ्यांना वाटावें व त्यांनीं तत्संबंधानें खटपट करावी यांत आश्चर्य नाहीं. पण शिल्प व कायदा या शाखांच्या शिक्षणाबाबतचें बी या भूमींत कांहीं कालपर्यंत तरी निदान रुजलें नाहीं हें खरें. कारण शिल्प (Engineer) शिक्षणाची सुरू असलेली शाळा तर सन १८४७-४८ मध्येंच बंद पडली ! व कायद्याकडे विद्यार्थी लोकांचें लक्ष अद्यापि आकर्षिलें गेलें नव्हतें ! अशा स्थितींत वैद्यकाच्या शिक्षणासंबंधानें मात्र सुदैवानें शुभ चिन्हें दिसूं लागलीं. त्या शिक्षणाची कांहींतरी मुंबईस विशेष सोय असणें जरूर आहे अशी सन १८३५ मध्यें त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट यांच्या डोक्यांत प्रथम कल्पना आली, व त्यांनीं तशी सूचना पुढें ठेवितांच सरकारी अधिकारी लोकांमध्यें तत्संबंधानें चर्चा सुरू झाली. पुढें सन १८३८ सालीं ग्रँटसाहेब परलोकवासी झाले. परंतु त्यांच्या स्मारकाकरितां म्हणून सन १७३८ च्या जुलै २८ रोजीं मुंबईच्या नागरिक लोकांची जी सभा भरविण्यांत आली होती त्यांत मुंबईस एक वैद्यकीय (Medical) कॉलेज स्थापन करावें व त्यास "ग्रट मेडिकल कॉलेज" (Grant Medical College) असें नांव द्यावें असें ठरलें. त्याप्रमाणें मग प्रकरण व्यवस्थेस लागून सन १८४५ च्या आक्टोबरमध्यें सदर्हू गव्हर्नरसाहेबांनीं (दहा वर्षांपूर्वी) काढलेल्या कल्पनेला मूर्तस्वरूप प्राप्त झालें व ग्रँट मेडिकल कॉलेजची स्थापना झाली. पण पुढें दुसरीच अडचण उत्पन्न झाली. पाश्चात्य वैद्यकाची कल्पना त्यावेळीं इकडे अगदींच नवीन होती. त्यासंबंधाचें शिक्षण चालू असतां त्यांत शारीरशास्त्र (Anatomy), जीवनशास्त्र (Science of life) या विषयांचें सप्रयोगशिक्षण व मनुष्यांच्या प्रेतांची कापाकाप हे भाग आल्याशिवाय राहावयाचे नाहींत हें स्पष्ट दिसतच होतें. अशा स्थितींत त्या नवीन स्थापन झालेल्या कॉलेजांत त्या वेळच्या लोकसमजुतीप्रमाणें हिंदु विद्यार्थी जाण्यास कसे धजतील ? सर्व हिंदु समाज विरुद्ध असतांना त्या कॉलेजांत जाण्या-

करितां प्रवृत्त होण्यास विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं निःसंशय असामान्य धैर्य असणें जरूर होतें हें उघड आहे. पण संतोषाची किंबहुना अभिमानाची गोष्ट ही कीं, असे तीन हिंदु विद्यार्थी त्यावेळीं धैर्यानें पुढें आले व त्यांनीं सदहू कॉलेजांत जाऊन आपलीं नांवें नोंदविलीं ! त्यांत पहिलें नांव भाऊ दाजींचें होतें ! दुसरे दोन विद्यार्थी म्हणजे अनंत चंद्रोबा डुकले व आत्माराम पांडुरंग हे होत ! पहिल्या वर्षी कॉलेजांत फक्त बारा विद्यार्थी होते. त्यांपैकीं सात पगारी विद्यार्थी होते व पांच बिनपगारी होते. असो. डॉ. विल्सन एके ठिकाणीं म्हणतात कीं, भाऊ दाजी हे मेडिकल कॉलेजांत शिकूं लागले तरी त्यांच्या अवलोकनशक्तींत व शोधक बुद्धीच्या विकासांत खंड पडला नाहीं. तीं जास्तच तीव्र झालीं.

भाऊ दाजींना–ते सरकारी नोकरीवर असतांना नवीन–निघालेल्या मेडिकल कॉलेजांत जाण्याची एकदम बुद्धि कशी झाली याची नामदार मिस्टर गिब्स यांनीं एका प्रसंगीं अशी कारणमीमांसा केली होती. ते म्हणाले, " भाऊंना तसें करण्यास प्रवृत्त करण्याला कारण फक्त त्यांचें सुसंकृत मन व त्यांची दयाशील वृत्ति ! भाऊंना पक्कें वाटलें असावें कीं, त्या नवीन ( वैद्यकीय ) शिक्षणाच्या योगानें आपल्या शोधक बुद्धीच्या विकासाला वाव मिळेल व पाश्चात्य वैद्यकाचें व शस्त्रक्रियेचें जें ज्ञान होईल त्याचा आपल्या देशबांधवांच्या हितार्थ उपयोग करण्याचा मार्ग आपणांस खुला होईल. " त्यामुळें मेडिकल कॉलेजांतील भाऊ दाजींची अभ्यासाची रीत, एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशनमध्यें होती तशीच उत्तम प्रकारची होती. त्यांच्या हुशारीबद्दल त्यावेळचे कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. मोरहेड ( Dr. Morehead ) व इतर प्रोफेसर यांचें उत्तम मत असे. थोड्याच दिवसांनीं कॉलेजांत भाऊ दाजी यांना स्कॉलर्शिपा मिळूं लागल्या. इतकेंच नव्हे, तर पुढें पुढें कॉलेजांतील कांहीं सरकारी कामही त्यांच्यावर पडूं लागलें. पण त्याबद्दल त्यांना वेतन मिळत असे. कांहीं दिवसांनीं भाऊ दाजी यांना कॉलेजांतले लायब्रेरियन नेमण्यांत आलें. असो. याप्रमाणें भाऊंना जरी कॉलेजांत काम करावें लागत असे तरी त्यांचें आपल्या अभ्यासाकडे दुर्लक्ष कधींच होत नसे.

मेडिकल कॉलेजांत भाऊ दाजी यांचा अभ्यासक्रम चालू असतांना त्यांच्या ठिकाणीं असलेला दुसरा एक गुण स्पष्ट दिसून आला. तो " निःस्वार्थपणा " हा होय. म्हणजे भाऊ दाजी यांनीं पुढें जी अनेक क्षेत्रांतून आपल्या देशाची निरपेक्षबुद्धीनें अत्यंत महत्वाची कामगिरी केली तिचें बीजारोपण ते कॉलेजांत असतां-

नाच त्यांचे ठिकाणीं झालें होतें असें म्हणण्यासही हरकत नाहीं. एकदां असें झालें. भाऊंना कॉलेजांत दररोज कांहीं वेळ सरकारी काम करावें लागत असे व त्याबद्दल त्यांना वेतन मिळत असे हें वर सांगितलेंच आहे. पण पुढें एकदां कॉलेजांत एका–Farish Scholarship–स्कॉलर्शिप करितां होणाऱ्या विशेष परीक्षेस बसण्याची त्यांना संधि आली. ती त्यांनीं व्यर्थ दवडली नाहीं. भाऊ परीक्षेस बसले. त्यांचा वर नंबर आला व त्यांना स्कालर्शिप मिळाली! परंतु भाऊ दाजी यांनीं कॉलेजच्या अधिकाऱ्यांना असें सांगितलें कीं, "मी पूर्वीच सरकारी वेतन घेत असल्यामुळें स्कालर्शिपचे पैसे मला नकोत. ते दुसऱ्या विद्यार्थ्यांस द्या. परीक्षेंत नंबर वर आला एवढें समाधान मला बस्स आहे!" यासंबंधाचा मेडिकल कॉलेजच्या सन १८४६–४७ सालच्या रिपोर्टांत असा उल्लेख आहे:—

"Bhawoo Dajee is not only a free student, but holds a salaried office in the College, and considering the extent to which his time is taken up in the duties of his office, to have successfully competed for the Farish Scholarship is considered highly creditable to him; but in consequence of holding this office, Bhawoo Dajee was desirous of foregoing the pecuniary advantages of the scholarship, satisfied with the honorary distinction which its award conferred on him."

भाऊंच्या अंगीं वसत असलेल्या या सद्गुणांचे व त्यांच्या हुशारीबद्दलचे कॉलेजच्या–ते तेथें विद्यार्थी असलेल्या मुदतींतील–बहुतेक सर्व रिपोर्टांतून दाखले मिळतात.

याप्रमाणें भाऊंचा सदहू कॉलेजांतील अभ्यासक्रम पुरा होऊन सन १८५१ मध्यें त्यांची शेवटची परीक्षा झाली. त्यांत ते चांगल्या रीतीनें पास झाले. त्या सालीं एकंदर आठ वैद्यकीय पदवीधर ( Graduates ) झाले. त्यांत तीन हिंदु होते, तीन ख्रिश्चन व दोन पारशी होते. हिंदु पदवीधर म्हणजे डॉ. भाऊ दाजी, डॉ. अनंत चंद्रोबा व डॉ. आत्माराम पांडुरंग हेच होत. असो. पण त्यावेळीं पदव्या देणारी यूनिव्हर्सिटी नव्हती! यूनिव्हर्सिटीचें–किंबहुना सर्व शिक्षणखात्याचें–काम करणारी "बोर्ड ऑफ एज्युकेशन" ही संस्था होती. तिचे, त्यावेळचे हाय कोर्टचे चीफ जस्टिस सर अर्स्किन पेरी हे अध्यक्ष होते. त्याच पेरी साहेबांच्या अध्यक्षतेखालीं सदरील संस्थेची ता. १५ एप्रिल सन १८५१ रोजीं सभा भरविण्यांत येऊन त्या

प्रसंगीं पूर्वोक्त आठ उमेदवारांना अध्यक्षांच्या हस्तें "जी. जी. एम्. सी." ही पदवी देण्यांत आली. ते मुंबई इलाख्यांतून पहिलेच वैद्यकीय पदवीधर असल्यामुळें त्या प्रसंगीं सर्वांनाच आनंद व्हावा यांत आश्चर्य नाहीं. त्यामुळें इकडील लोकांत पाश्चात्य वैद्यक यशस्वी होईल कीं नाहीं याविषयीं अधिकारी लोकांस आतां शंकाच राहिली नाहीं. यासंबंधानें सदहू प्रसंगीं प्रिन्सिपॉल डॉ. मोरहेड यांनीं जो रिपोर्ट वाचून दाखविला त्यांत खालीलप्रमाणें उल्लेख होताः–"पाश्चात्य वैद्यकीय शिक्षणापासून जे फायदे आहेत त्यांचा या पश्चिम हिंदुस्थानकडील लोकांस लाभ व्हावा याच हेतूनें या कॉलेजाची मूळ स्थापना करण्यांत आली. सरकारनें या कामीं जें ध्येय पुढें ठेविलें होतें तें प्रशंसनीय व महत्वाचें होतें. पण तें गांठण्याच्या मार्गांत पुष्कळ अडचणी आहेत असें म्हणणारे आक्षेपकही पण बरेच होते. त्यांच्या मतें इकडील लोकांचा ग्रह सामान्यतः पाश्चात्य वैद्यकाच्या विरुद्ध होता व हें नवीन शिक्षण घेऊन तयार होण्याइतकी पात्रता तरी इकडील तरुण मंडळींत असेल किंवा नाहीं याविषयींही त्यांना शंकाच होती." पण या सर्व शंका निरस्त झाल्या हें वरील पदवीदान समारंभाच्या योगानें सहजच सिद्ध झालें! म्हणूनच विलायतेंतील "लॅन्सेट" (Lancet) या नांवाच्या वजनदार नियतकालिक पत्रानें आपल्या (January 1855) एका लेखांत कलकत्ता व मद्रास येथील वैद्यकीय शिक्षणाबद्दलच्या व्यवस्थेचा उल्लेख करून मुंबईच्याच पद्धतीला वरचा नंबर दिला आहे. तो प्रकार असा,

"Without drawing any invidious comparisons, it will, we think, be allowed that whatever the merits of Calcutta or Madras, Bombay surpassed both in the perfection of its arrangements, the distinction of its professors, the accomplishments of its pupils, and its general efficiency altogether * * * * an illustration of the eminent hopefulness of our medical seminaries in the East, and the perfect and thorough success of the earliest exertions of the youngest amongst them, the Grant Medical College."

ग्रँट मेडिकल कॉलेज स्थापन करून मुंबई सरकारनें वैद्यकीय शिक्षणाची सोय केलीच, पण त्या पहिल्या पदवीधरांच्या ज्ञानाचा लोक कितीसा फायदा घेतील ही शंका राहिलीच. ती अडचण दूर करण्याच्या हेतूनें सरकारनें कांहीं नवीन "सब

असिस्टंट सर्जन" (Sub–Assistant Surgeons) च्या जागा निर्माण केल्या व त्या वैद्यकीय पदवीधरांना देण्याचा उपक्रम केला. यासंबंधानें सदरील "लॅन्सेट" मासिक पुस्तकाचे पुढीलप्रमाणें उद्गार होते—

"The medical profession ........... was at this time so new in Bombay, that it seemed very doubtful whether, by their own exertions, the first graduates could command a sufficiency of practice to secure an attendance at the College and further crops of pupils, as each one came in succession to be reaped ; and Government, at the suggestion of the Medical Board, very wisely resolved to create a set of Sub-Assistant Surgeoncies, sufficient in number to provide for all the earlier pupils of the College."

याप्रमाणें त्या नवीन जागांवर पहिल्या सात पदवीधरांच्या नेमणुका केल्या. त्यांत डॉ. भाऊ दाजी हे एक होते. सब असिस्टंट सर्जन या नात्यानें काम करतांना डॉ. भाऊ यांना ग्रँट मेडिकल कॉलेजांत असिस्टंट प्रोफेसरचें काम करावें लागत असे.

सन १८५१ मध्यें जसे डॉ. भाऊ दाजी हे वैद्यकीय पदवीधर झाले तसेच त्याच्या पुढच्याच वर्षी ( १८५२ मध्यें ) त्यांचे बंधु डॉ. नारायण दाजी हेहि ग्रँट मेडिकल कॉलेजचे पदवीधर झाले ! हे जे पहिले पदवीधर झाले त्यांनीं वद्यकीय शिक्षणप्रसाराच्या कामीं फार महत्वाचें सहाय केलें. इंग्लिश वैद्यकाला लोकमत विरुद्ध होतें हें मागें सांगितलेंच आहे. अर्थात् नवीन शिक्षण घेण्याला विद्यार्थी मिळणें हें प्रथम कांहीं वर्षे फार कठीण काम होतें. पुढें कांहीं दिवसांनीं सरकारी कामाकरितां वगैरे हॉस्पिटल असिस्टंट लोकांची (Hospital Assistants ची) गरज भासूं लागली. त्यांच्या शिक्षणाची सोय करण्याकरितां म्हणून सन १८६४ सालीं एक मेडिकल क्लास मुंबईच्या कॉलेजास जोडण्यांत आला. या क्लासाला देखील विद्यार्थी मिळणें त्या वेळीं फार मुष्किलीचें काम होतें. यासाठीं विद्यार्थ्यांना स्कॉलर्शिपांच्या रूपानें वगैरे आमिष दाखविण्यांत येत असे. अशा रीतीनें केव्हां विद्यार्थी मिळत असत, केव्हां मिळत नसत. असा प्रकार कांहीं वर्षी चालला. मग सन १८७९–८० च्या सुमारास सदहू मेडिकल क्लास पुण्यास नेण्यांत आला. तेंच हल्लींचें पुण्याचें मेडिकल स्कूल होय. असो. तेव्हां

ज्या वेळीं वैद्यकीय शिक्षणाकरितां विद्यार्थी मिळत नसत, त्यावेळीं त्यांना चार उपदेशाच्या गोष्टी सांगून त्यांचीं सदर्हू शिक्षण घेण्याकडे मनें वळविण्याचें काम पहिले पदवीधर करीत असत. त्यांत डॉ. भाऊ दाजी व डॉ. नारायण दाजी यांचा बराच महत्वाचा भाग असे. तशा विद्यार्थ्यांपैकीं एक त्यावेळीं सन १८६९–७२ शिकून तयार झालेले डॉ. बाळाजी बाबाजी गोडबोले हे कांहीं वर्षांपूर्वी पुण्यास डॉक्टरीचा धंदा करीत असत. ते हल्लीं यवत येथें असतात. त्यांचें हल्लीं ८१ वर्षांचें वय आहे. त्यांच्या कडून जी माहिती मिळाली त्यावरून पाहिलें म्हणजे सुमारें पाऊण शतकापूर्वी वैद्यकीय शिक्षणप्रसाराच्या कामीं पहिल्या–भाऊ दाजी व नारायण दाजी यांजसारख्या पदवीधरांनीं किती महत्वाची मदत केली याची कल्पना होतें व त्यांजबद्दल आदर वाटतो. गोडबोले यांच्या वेळीं मेडिकल क्लासांत शिकविणारे जे प्रोफेसर होते त्यांत मुख्य डॉ. नारायण दाजी, डॉ. शांताराम विठ्ठल, डॉ. गोपाळ शिवराम व डॉ. सखाराम अर्जुन हेच होते. त्या वेळीं वैद्यकीय शिक्षणाला जरूर तेवढें विद्यार्थ्यांचें इंग्लिशभाषेचें ज्ञान नसे. त्यामुळें वैद्यकावरील कांहीं पुस्तकें मराठींत तयार करावीं लागत. सारांश, तशा अडचणीच्या वेळीं वैद्यकीय शिक्षणाची लोकांत अभिरुचि उत्पन्न करण्याच्या कामीं डॉ. भाऊ दाजी प्रभृति आद्यपदवीधरांचा फार फार उपयोग झाला हें कबूल केलें पाहिजे.

---

## प्रकरण चवथें.

# धंदा.

—*—

डॉ. भाऊ दाजी यांची "जी. जी. एम्. सी." ( G. G. M. C. ) ची परीक्षा झाल्याबरोबर त्यांना सरकारी नोकरी मिळाली व ते सब-असिस्टंट सर्जन झाले हें मागें सांगितलेंच. पण पुढें सरकारी नोकरींत न राहतां आपण स्वतंत्र धंदा करावा असें त्यांना वाटलें. त्याप्रमाणें त्यांनीं मग थोड्याच दिवसांनीं सरकारी नोकरी सोडली आणि डॉक्टरीचा स्वतंत्र धंदा सुरू केला. यासंबंधानें प्रसिद्ध डॉ. विल्सन यांनीं एका प्रसंगीं जे उद्गार काढले ते अगदीं अक्षरशः खरे होते. ते असेः—"डॉ. भाऊ दाजी यांना नोकरीचें बंधन वाटूं लागलें. त्यामुळें त्यांनीं तें

बंधन तोडून टाकून वैद्यक व वाङ्मय या दोन विस्तीर्ण क्षेत्रांत आपल्या मनाप्रमाणें संचार करण्यास मिळावा म्हणून त्यांनीं स्वतंत्र धंदा आरंभिला." दुसरें असें कीं, स्वतंत्र धंदा आरंभिला म्हणजे त्यावर मुख्यतः आपला चरितार्थ अवलंबून आहे असें माणसास वाटत असतें व त्यांत आपलें डोकें चालवावें, अधिक ज्ञान मिळवावें, अंगची कांहीं कर्तबगारी दाखवावी असें सहज त्याला वाटूं लागतें. आणि त्यायोगें त्याच्या बुद्धीची वाढ होण्यास सवड मिळते व त्याच्या हातून कांहीं नवीन युक्त्या निघण्याचा किंवा नवे नवे शोध लागण्याचा संभव असतो. सरकारी नोकरींत शिरलें म्हणजे मनुष्याचें महिन्याचें उत्पन्न ठरलेलें असल्यामुळें त्याच्यांत आळस शिरतो, अंतःप्रेरक शक्तीचा जोर कमी होतो व त्याच्या ज्ञानवृद्धीचा मार्ग बंद होतो! हे विचार नामदार मिस्टर गिब्स यांनीं व्हाइस चॅन्सेलर या नात्यानें एका पदवीदानसमारंभाचे वेळीं केलेल्या आपल्या भाषणांत अति सुंदर रीतीनें ग्रथित केले आहेत. ते असेः—

"Those who enter on the liberal professions and have to earn their bread by their skill are obliged, in some degree, to keep pace with the times; but those who enter the service of the state, are too apt to rest content with their lot, and find in their daily office routine sufficient for them. Let me warn all against leading such lazy lives."

तात्पर्य, डॉ. भाऊ दाजी यांना नोकरीचें बंधन आवडलें नाहीं व त्यामुळें त्यांनीं ती सोडून आपल्या धंद्यास सुरवात केली. वस्तुतः त्यांचा धंदा गोरगरीब लोकांत कॉलेज सोडण्यापूर्वीच चालला होता. अर्थात् नोकरी सोडून उघडपणें धंद्यास सुरवात करतांच डॉ. भाऊ यांची त्यांत भरभराट व्हावी यांत आश्चर्य नाहीं. डॉ. भाऊ दाजी यांचे ठिकाणीं त्यांच्या धंद्याला अत्यंत जरूर असे कांहीं उत्तमोत्तम गुण होते. त्यांचें धंद्यांमधलें कसब किंवा कौशल्य हें तर प्रसिद्धच होतें, पण त्याहीपेक्षां महत्वाची गोष्ट म्हणजे मनाचा थोरपणा, सदाचारसंपन्नता व गरिबांविषयीं भूतदया या शंभर नंबरी गुणांचें त्यांच्यामध्यें वास्तव्य होतें. त्यामुळें त्यांच्या धंद्याची लवकरच भरभराट झाली व त्यांची सत्कीर्ति वाढली. यासंबंधांत आमच्या मतें, विलायतेंतील "लॅन्सेट" पत्राच्या अभिप्रायापेक्षां दुसरें अधिकारयुक्त सर्टिफिकेट असणें शक्य नाहीं. त्या पत्राच्या सन १८५५ जानेवारीच्या अंकांत डॉ. भाऊ दाजी यांचें एक अत्यंत गौरवपर त्रोटक चरित्र प्रसिद्ध झालेलें आहे. त्यांत त्यांच्या धंद्यासंबंधानें पुढीलप्रमाणें उल्लेख आहेः—

"His career has been one of such prosperity and success as probably none of our first English physicians could boast in any part of the first ten years of their professional lives, and he now (1855) enjoys an amount of practice which, notwithstanding the novelty of regular professional men, and fees among the natives, and their aversion to pay for anything intellectual, a medical man of his age in England would be proud of. He has been singularly learned and well skilled as a physician. He has been eminently fortunate in his practice as a surgeon, and has performed, with almost uniform success, a vast number of the most difficult operations, such as lithotomy, cataract, removal of tumours and midwifery operations."

सारांश, डॉ. भाऊ दाजींचें सुरवातीपासूनच आपल्या धंद्यांत एकसारखें पुढें पुढेंच पाऊल पडत चाललें. तें इतकें कीं, तसा धंदा खुद्द इंग्लिश डॉक्टरांचा इकडे दहा वर्षांच्या अनुभवानंतरही चालला नसता ! डॉ. भाऊ यांचें वैद्यकीय ज्ञान व शस्त्रक्रियेंतलें कौशल्य हीं अप्रतिम होतीं. मूतखडा अगर मोतीबिंदु काढणें अशा शस्त्रक्रिया म्हणजे त्यांना हातचा मळ वाटत असत ! अशीं कामें किंवा शरीरावर वाढलेल्या गांठी (tumours) काढणें अगर प्रसूतीच्या वेळीं अडलेल्या स्त्रियांची सुटका करणें हीं कामें डॉ. भाऊंच्या हातून किती झालीं यांचा हिशोबच नाहीं. " नेटिव्ह ओपिनियन " मध्यें ( ७-६-७४ ) असें नमूद झालेलें आहे कीं, शस्त्रक्रियेनें काढलेल्या मूतखड्यांनीं डॉ. भाऊ दाजींची एक भली थोरली पेटी भरली होती व ती ते केव्हां केव्हां आपल्या वैद्यकीय कौशल्याचीं विजयचिन्हें म्हणून अभिमानानें दाखवीत असत ! त्या खड्यांची किंमत त्यांना हिऱ्यामाणकांच्या—कारण तेही खडेच होत !—किंमतीपेक्षां अधिक वाटत असे. असो. याप्रमाणें डॉ. भाऊंची धंद्याच्या दृष्टीनें अखेरपर्यंत चढती कमान होती !

डॉ. भाऊ दाजी यांच्या वैद्यकीय कौशल्याच्या दर्शक अशा कांहीं गोष्टी समजल्या, त्यांपैकीं एक दोन इकडे देणें जरूर आहे. एकदां परलोकवासी सर फेरोजशहा मेथा हे सात वर्षांचे असतांना (सन १८५२ मध्यें) दूषित तापानें आजारी होते. कित्येक दिवसपर्यंत ते बेशुद्ध स्थितींत होते व ते ह्या दुखण्यांतून वांचतील अशी कोणालाच आशा वाटत नव्हती ! डॉ. भाऊ दाजी यांची एक

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

उत्तम डॉक्टर म्हणून, त्या वेळीं प्रसिद्धि होतीच. त्यांनीं फेरोजशहाची प्रकृति तपासून असें सांगितलें कीं, "या मुलाचा मेंदू फार तरतरीत व चंचल असल्यामुळें त्याला हा ताप आला आहे. यांतून हा मुलगा बरा झाला तर पुढें हा फार योग्यतेस चढेल!" यासंबंधानें सर फेरोजशहा यांचा चरित्रकर्ता (Mr. H. P. Modi) आपल्या पुस्तकांत (पृ. २) असें म्हणतोः—

"When he (Sir P. M. Mehta) was about seven years old, Pherozeshah was taken seriously ill from a malignant fever. For days together, he lay unconscious and his life was despaired of. Dr. Bhau Daji, the celebrated physician, attributed the particular nature of the child's malady to his quick and restless brain, and remarked that if he recovered, he would turn out to be a great man."

हें डॉ. भाऊंनीं केलेलें भविष्य पुढें अक्षरशः खरें ठरलें!

त्याच सुमारास दुसरी एक गोष्ट घडली. ही ज्या बटलरचा त्यांत संबंध होता त्याच्याकडून कै. रा. ब. शिवराम सीताराम नाडकर्णी, माजी शिक्षणखात्यांतील डायरेक्टरचे असिस्टंट, यांस समजली व शिवराम भाऊंकडून ज्यांना समजली अशा एका मित्रांनीं ती आम्हांस थोड्या दिवसांपूर्वीं सांगितली. भाऊ दाजींच्या अगदीं भरभराटीच्या वेळीं मुंबईंत एक वडा युरोपियन अधिकारी होता. त्यांची बायको प्रसूतीकरितां इंग्लंडला जाण्याच्या तयारींत होती. अशा मडमा आपल्या प्रसूतीची वेळ यावयाच्या पूर्वीं सुमारें एक महिना आधीं इंग्लंडला जाण्याकरितां इकडून निघत असतात हें सर्वश्रुत आहे. पण सदर्हू साहेबाच्या मडमेचा अजमास चुकला व विलायतेची बोट निघण्यास चार दिवसांचा अवकाश होता, इतक्यांत त्या बाईला प्रसूतिवेदना होऊं लागल्या! ते साहेब एक बडे अम्मलदार होते. त्यांनीं एक डॉक्टर बोलाविला, दुसरा बोलाविला, पण कोणाच्याच हातून नीट उपाययोजना होईना! इकडे बाईच्या वेदना कांहीं केल्या कमी होईनात व साहेबांच्या तोंडचें पाणी पळालें आणि ते अगदीं सचिंत बसले! इतक्यांत त्याचा बटलर एक गोव्याचा ख्रिश्चन होता. आपला धनी अगदीं निराश होऊन चिन्ताक्रांत बसला आहे असें पाहून त्या बटलरला वाईट वाटलें व त्यानें येऊन हळूच आपल्या धन्यास म्हटलें, "तुम्ही पुष्कळ उपाय केलेत. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. मी एक उपाय सांगतों. तो करून पाहा. उपयोग झाला तर ठीकच आहे

न झाला तर आणखी एक उपाय निरुपयोगी ठरला इतकेंच होईल!" त्याच्या धन्यास तें पटलें व त्यानें बटलरला त्याचा उपाय सांगण्याकरितां सुचविलें. तो बटलर गोव्याचाच राहणारा असल्यामुळें त्याला कांहीं कारणानें डॉ. भाऊ दाजींची ओळख झाली होती. त्यानें मग धन्याच्या परवानगीनें डॉ. भाऊ दाजींना बोलाविलें. भाऊंनीं येऊन त्या बाईला तपासून पाहिलें व त्यांनीं त्या साहेबाला, "कांहीं भिण्याचें कारण नाहीं" असा धीर देऊन त्या बाईला एका अर्ध्या तासांत मोठ्या विलक्षण रीतीनें मोकळें केलें! बाई सुखरूपणें प्रसूत झाली व साहेब मजकूर यांनीं आपल्या बायकोला जीवदान दिल्याबद्दल डॉ. भाऊंचे कृतज्ञतापूर्वक आभार मानले! डॉक्टर निघून गेल्यावर साहेबांनीं आपल्या बटलरला म्हटलें, "तूं आज या डॉक्टरच्या रूपानें प्रत्यक्ष देवालाच आणलेंस. म्हणून मी या संकटांतून पार पडलों!"

असो. डॉ. भाऊंचा धंदा याप्रमाणें उत्तम प्रकारानें चालला. त्यांची सर्वत्र कीर्ति पसरली. त्यांतूनही त्यांच्या सदाचारसंपन्नतेची सर्व ठिकाणीं प्रसिद्धि असल्यामुळें चांगल्या चांगल्या प्रतिष्ठित घराण्यांतील स्त्रियांना देखील डॉ. भाऊंकडून रोगचिकित्सा करवून घेण्यास संकोच वाटत नसे. त्यामुळें मोठमोठ्या राजेरजवाड्यांकडून त्यांना बोलावणीं येऊं लागलीं व हजारों रुपयांची प्राप्ति होऊं लागली. यवतचे डॉ. गोडबोले सांगतात कीं, डॉ. भाऊ दाजी हे मेण्यांतून किंवा पालखींतून—त्यावेळीं रेल्वेची सोय नसल्यामुळें--त्या वेळीं लांबचा प्रवास करीत असत. ते एकदां मुंबईहून निघाले म्हणजे पुण्यावरून सातारा, कऱ्हाड, कोल्हापुरापर्यंत फिरून येत असत व परत येतांना निदान पांच सात हजार रुपये घेऊन येत असत.

सन १८८७-८८ सालीं कै. जव्हेरीलाल उमियाशंकर याज्ञिक यांनीं पंडित भगवानलाल इंद्रजी यांच्या संबंधानें एक सुंदर चरित्रात्मक निबंध लिहून मुंबईच्या एशियाटिक सोसायटींत वाचला. त्यांत डॉ. भाऊ दाजींसंबंधानें स्तुतिपर व आदरपूर्ण असे ठिकठिकाणीं उल्लेख आले आहेत. जव्हेरीलाल भाई आपल्या निबंधांत डॉ. भाऊंविषयीं, त्यांच्या धंद्याच्या दृष्टीनें, असे उद्गार काढतातः—

"He (Dr. Bhau Daji) was one of the busiest men of his day. He enjoyed a high reputation for medical and surgical skill. In fact, he was looked up to as the first and foremost

amongst the earliest batch of native medical practitioners that the Grant Medical College turned out. He enjoyed a most extensive and lucrative practice amongst all classes of the native community in Bombay."

सारांश, डॉ. भाऊंच्या वेळीं मुंबईंत त्यांच्या इतका उद्योगी बहुतेक कोणीच नव्हता. वैद्यक व शस्त्रक्रिया यांत त्यांचा हातखंडा असे. किंबहुना ग्रँट मेडिकल कॉलेजांतून जे पहिले डॉक्टर होऊन बाहेर पडले त्यांत हरएक दृष्टीनें अग्रेसरत्वाचा मान डॉ. भाऊ यांचाच होता. त्यांचा धंदा मुंबईतील सर्व जातींच्या व धर्माच्या लोकांत उत्तम रीतीनें चालला असून त्यांची प्राप्तिही मोठी होती.

पण डॉक्टरीच्या धंद्यांतील डॉ. भाऊ दाजींच्या हातून झालेल्या कामगिरीच्या दुसऱ्या एका महत्वाच्या अंगाविषयीं चार शब्द लिहिले पाहिजेत. एका सधन पारशी मित्राच्या सहाय्यानें डॉ. भाऊ यांनीं मुंबईच्या भरवस्तींत एक "नागदेवी धर्मार्थ दवाखाना" उघडून तो उत्तम रीतीनें चालविला होता. या धर्माच्या कामांत मग भाऊंना त्यांचे बंधु डॉ. नारायण दाजी हेही मदत करूं लागले. या डॉ. भाऊ दाजींच्या धर्मकार्याबद्दल त्या वेळच्या एका बड्या युरोपीयन गृहस्थांनींच एका प्रसंगीं काढलेले उद्गार इकडे देतों. नामदार मिस्टर गिब्स म्हणतातः—

"He (Dr. Bhau) commenced a practice............which soon made him famous as one whose wisdom and experience rendered him the best adviser for the ailments of all classes from the prince to the peasant, from the chief to the coolie, and while his opinion was courted by his rich fellow country-men, he, to his great credit "never turned away his face from the poor man" but, aided in every way by his hardly less able brother, Dr. Narayan Daji, administered to the medical wants of large numbers of the poor at their dispensary in this city."

विलायतेंत "लॅन्सेट" पत्रानेंही डॉ. भाऊंच्या या धर्मकार्याबद्दल असेच प्रशंसापर उद्गार काढलेले असून त्यांनीं एका वर्षांत दहा हजार गरीब लोकांना आपल्या धर्मार्थ दवाखान्यांतून औषधोपचार केले असें नमूद केलें आहे! या धर्मार्थ दवाखान्याची पुढें प्रसिद्धि इतकी वाढली कीं, लोक शेंकडो कोसांवरून औषधाकरितां त्या दवाखान्यांत येऊं लागले असें "नेटिव्ह ओपिनियन" मध्यें

( ७-६-७४ ) नमूद झालेलें आहे. त्यावरून सदर्हू दोन बंधूंच्या या पुण्यकृतीबद्दल मंडलिकांच्या चरित्रकर्त्यानें जें " हे दोघे म्हणजे आमच्यांतील अश्विनीकुमारच होत!" असें म्हटलें आहे तें अगदीं सत्य आहे. फार काय, पण डॉ. भाऊ दाजी हे यूनिव्हर्सिटींतील "एम्. डी." सारख्या उच्च पदव्या धारण करणाऱ्या लोकांच्याही गुरुस्थानीं असून त्यांच्या वैद्यकशास्त्राच्या मर्मज्ञानास्तव व परोपकारास्तव त्यांना भाटवडेकरादि (डॉ. भालचंद्र) देखील धन्वंतरीची उपमा देत असत! (गुंजीकरकृत "भ्रमनिरास" पृ. १६५).

डॉ. भाऊ यांची परोपकारबुद्धि सदैव जागृत असे. त्यामुळें तिची तृप्ति करण्याचेंच एक साधन या दृष्टीनें ते मुख्यतः आपल्या धंद्याकडे पाहात असत. " नेटिव्ह ओपिनियन " पत्रानें एके ठिकाणीं लिहिलें आहे की, डॉ. भाऊ आपल्या धंद्यांत इतके तत्पर असत कीं, त्यांना कोणी मध्यरात्रीं देखील बोलावूं आल्यास ते आनंदानें जात असत! डॉ. भाऊंचें दळण वळण बहुधा मोठ्या लोकांशीं असल्यामुळें, त्यांची ते रोग्याच्या घरीं गेल्यास प्रथमपासूनच दहा रुपये फी असे. पण ते एकाद्या सारस्वत ब्राह्मणाच्या घरीं गेल्यास फी घेत नसत! इतकेंच नव्हे, तर तो मनुष्य फार गरीब आहे असें आढळून आल्यास ते त्याला द्रव्यसहाय्यही करीत असत. पण डॉ. भाऊंची ही उदारबुद्धि आपल्या जातीपुरतीच नव्हती. ते आपल्या मातृशाळेला–Elphinstone Institution ला–कधीं विसरले नाहींत. त्या शाळेंतील विद्यार्थ्यांना ते फुकट औषध देत असत. फार काय, पण एकदां सर जेमशेटजी जिजीभाई यांनीं म्हटल्याप्रमाणें,

" To the poor and needy his ( Dr. Bhau's ) advice was gratis, and in many cases it was advice combined with assistance."

डॉ. भाऊ हे सामान्यतः सर्व गरीब लोकांना फुकट औषध देत असत. इतकेंच नव्हे, तर पुष्कळांस ते फुकट औषध देऊन देखील द्रव्यसहाय्य करीत असत.

डॉ. भाऊ दाजी हे रा. सा. मंडलीक, सर नसरवानजी चोकशी वगैरे थोर, मोठ्या कुटुंबांचे " family doctor " ( घरचे वैद्य ) होते. व याप्रमाणें एकंदरींत डॉ. भाऊंचा उत्कर्ष झालेला पाहून सर्वांनाच आनंद होत असे.

---

## प्रकरण पांचवें.

# नवीन शोध.

डॉ. भाऊ दाजी हे नुसते भिषग्वर्यच होते असें नव्हे, तर वैद्यकाच्या आनुषंगिक अशा दुसऱ्या शास्त्रीय शाखांकडेही त्यांचें लक्ष असे. तें इतकें कीं, त्यांनीं वनस्पतिशास्त्र ( Botany ), रसायनशास्त्र ( Chemistry ), खनिजशास्त्र ( Mineralogy ) इत्यादि भौतिकशास्त्रांसंबंधीं महत्त्वाचे शोध चालविले होते. एकदां नामदार गिब्ससाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें "डॉ. भाऊ दाजी यांनीं आपले प्राचीन आर्यवैद्यकीय संस्कृत ग्रंथ लक्षपूर्वक वाचले होते व त्या दृष्टीनें ते प्रत्येक वनस्पतींचा व औषधींचा गुणधर्म तपासपूर्वक पाहात असत. या तपासावरूनच त्यांना पुढें रक्तपितीवरील उपाययोजनेची कल्पना सुचली." असो. या दिशेनें डॉ. भाऊ यांचा इतका दांडगा उद्योग चालत असे व ते इतक्या निरनिराळ्या ठिकाणांहून मित्रांमार्फत निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पति व इतर जिनसा भागवीत असत कीं, तो सर्व प्रकार पाहिला म्हणजे मन थक्क होऊन जात असे! त्यांपैकीं इकडे मासल्याकरितां कांहीं गोष्टी नमूद करतों.

रा. सा. मंडलीक हे नोकरीवर कच्छ प्रांतांत भूज येथें होते, तेव्हां डॉ. भाऊ दाजी यांनीं तिकडील कांहीं जिन्नस व माहिती मागविली होती. भाऊंच्या एका पत्रांत असा मजकूर होताः—"मला गुग्गुळाच्या झाडाचा रोपा पाहिजे. गुग्गुळाची ताजी खांदी, फळें व फुलें यांसुद्धां मिळाली तर, जरूर पाठवा. नाहीं तर जेकबसाहेबाचा चितारी **जुमा** हा तिकडे असल्यास त्याजकडून त्या वृक्षाच्या खांदीचें–फुलें व फळें असलेल्या खांदीचें–चित्र काढून पाठवा. झाड कोठें उत्पन्न होतें तें, ज्या प्रकारच्या जमिनींत उत्पन्न होतें तिचें वर्णन, त्याचप्रमाणें गुग्गुळ कसा तयार करतात व लोक त्याचा कसा उपयोग करतात याविषयीं माहिती पाठवा."

डॉ. भाऊंकरितां मंडलीक यांनीं कुलाबा जिल्ह्यांतील एका तलाठ्याकडून कांहीं माहिती मागविली होती. त्यानें आपल्या उत्तरांत असें लिहिलें होतें:— "तीन फांद्यांचा ताड मिळत नाहीं. अलिबागेस एका माडास फांदी फुटली होती. पण ती मालकानें तोडली. त्याची खूण आहे. तीन फांद्यांच्या पोफळीचा नक्काशा पाठविला आहे."

सन १८५८ मध्यें कै. माधवराव बर्वे हे रत्नागिरीस होते, त्या वेळीं मंडलीकांनीं त्यांना डॉ. भाऊंकरितां मिऱ्याच्या डोंगरावरील कांही दिव्य औषधींचे नमुने पाठविण्याविषयीं लिहिलें होतें. तेथील श्रीकरुणेश्वराच्या देवळांत कांहीं कोरीव लेख आहेत. त्यांच्या नकला बरवे यांनीं भाऊंकडे पाठविल्या होत्या.

" बीटल " ( beetle ) नांवाचा एक कीटक आहे. तो शेणांचे गोळे करून त्यांत अंडीं घालतो. अंड्याचें कवच फोडून प्राणी निपजला म्हणजे तो त्या शेणाचे गोळे आंतून पोखरून खातो. त्यामुळें ते गोळे अगदीं पोकळ होतात. मग तो प्राणी आंतून निघून बाहेर जातो. डॉ. भाऊ दाजी यांनीं याविषयीं कांहीं शोध चालविला होता.

सन १८५९ सालीं डॉ. भाऊ व मंडलीक यांनीं खंडाळ्यास जाऊन कांहीं वनस्पतींचा शोध करण्याचें ठरविलें होतें. तिकडे त्यांचे मित्र वासुदेव बापूजी कानिटकर, इंजिनीयर, यांनीं त्यांना आमंत्रण केलें होतें.

निरनिराळ्या प्रकारच्या औषधी वनस्पति मिळविण्याविषयींची व त्यांचा उपयोग करून पाहण्याविषयींची डॉ. भाऊ यांची हांव व उत्सुकता दिवसेंदिवस वाढत चालली होती. एकदां डॉ. भाऊ व डॉ. नारायण दाजी असे उभयतां कारवार जिल्ह्यांतील अंकोल्यास अर्धांगवायूवरील उपयोगी पडणाऱ्या वनस्पतींचा तपास करण्याकरितां गेले होते व ती माहिती असणाऱ्या एका कुळंबी मनुष्याला त्यांनीं ५०० रुपये देऊं केले होते असें आम्हांस हल्लींच समजलें. मंडलिकांचे वडील नानासाहेब यांनीं एकदां कोंकणांतील निरनिराळ्या अशा वीस वनस्पतींचे चीक काढून ते बाटल्यांत भरून डॉ. भाऊंकरितां मुंबईस पाठवून दिले होते. तसेंच रा. सा. मंडलीक हे कुड्याची साल व काजऱ्याच्या बिया बर्व्यांकडून मागवीत असत. मंडलीक हे ठाणें जिल्ह्यांत होते तेव्हां ते सातविणीच्या सालीचीं ओझीं, सोनामुखीच्या पाल्याचे भारे, व कुचल्यांच्या बियांचीं पोतीं, डॉ. भाऊंकरितां पाठवीत असत. डॉ. भाऊ यांनीं कांहीं अपूर्व वनस्पतींचीं रंगीत चित्रें देखील काढविलीं होतीं.

सदहू माहिती फक्त मासल्याकरितां म्हणून इकडे दिली आहे. विस्तार करीत बसल्यास एकादा ग्रंथ होईल! " भाऊंचें प्रशंसार्ह शोध लावण्याचें काम चाललें असतां त्यांच्या मित्रांच्या प्रेमास ऊत येत असे," अशा अर्थाचे जे मंडलीकांच्या चरित्रकर्त्यांनें अगदीं यथार्थ उद्गार काढले आहेत, त्यांचेंच प्रत्य-

तर वरील हकीकतींत मिळतें. असो. डॉ. भाऊंनीं पुष्कळ वनस्पतींचे नमुने, अपूर्व वस्तु, कांहीं नाणीं यांचा संग्रह केला होता, व ती सर्व माहिती प्रसिद्ध करण्याचा त्यांचा बेत होता. परंतु तसा योग पुढें जुळून आला नाहीं. डॉ. भाऊ दाजींनीं आपल्या घराभोंवतीं एक सुंदर बाग तयार केली होती. फार काय, पण त्यांच्याच खटपटीमुळें सन १८५८ मध्यें मुंबईंतील राणीच्या बागेची व पदार्थ-संग्रहालयाची (Victoria Botanical and Zoological gardens and Albert Museum ची) स्थापना झाली ! असो. याप्रमाणें डॉ. भाऊ दाजी यांचे अनेक शोध चालले होते. त्यांत त्यांनीं दोन अगदीं अपूर्व वनस्पतींचा शोध लावल्याचें यवतचे डॉ. गोडबोले सांगतात. त्या वनस्पति नवीन असल्या-मुळें त्यांना नांवें देण्यास सांपडेनात ! तेव्हां त्या वनस्पतींचा डॉ. भाऊ दाजीं-च्याच नांवानें—म्हणजे Bhau Dajiana म्हणून—"Book of Widrow's on Indian Drugs or Pharmacopia India, by Dr. Waring," या नांवाच्या वैद्यकीय ग्रंथांत उल्लेख झालेला आहे असें सदहू डॉ. गोडबोले सांगतात.

डॉ. भाऊ दाजी व डॉ. नारायण दाजी हे दोघेही बंधु आपल्या काळीं शास्त्रीय शोध लावण्याच्या कामीं मुंबई शहरांत अग्रेसर असून त्यांनीं अनेक अश्रुतपूर्व वनस्पतींचा शोध लाविलेला होता. त्यांपैकीं कांहीं उदाहरणें वर दिलींच आहेत. त्यावद्दलचा आणखी एक दाखला देतों. कै. डॉ. के. आर. कीर्तिकर हे स्वतः एक प्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ ( botanist ) होते हें विश्रुतच आहे. त्यांनीं आपल्या एका याच संबंधाच्या निबंधांत डॉ. भाऊ दाजी व डॉ. नारायण दाजी या दोघांही संबंधानें गौरवयुक्त उल्लेख केला आहे. ते म्हणतातः—

"The brother doctors Bhau Daji and Narayan Daji have done much to advance the progress of botany in Bombay. Dr. Bhau was, in his younger days, a great traveller in pursuit of botanical specimens. He was the scrutinizer of an original Gujarathi work on Indian Plants, published by Kata Bhat of Kathiyawad, to which Dr. Bhau Daji contributed the Latin and English synonyms of the plants described in the work of Kata Bhat. Dr. Narayan Daji was a fond collector of Indian plants. His paper on the *Ailanthus excelsa* (Mah-rukh) is published in the Transactions of the Grant Medical College.

Society. It is of importance to note here that Mr. Herbert M. Birdwood did not know of this great tree "Mah-rukh" ( महारुख ) till it was pointed out to him in the jungle below Chowk plateau of Matheran by "his faithful friend Vithu" about 1897. Many years before that however, Dr. Narayan Daji had described the tree and its medicinal properties in the Grant Medical College Society's Journal."

डॉ. भाऊ दाजी व डॉ. नारायण दाजी यांनीं वनस्पतिशास्त्रज्ञानाचा मुंबईंत प्रसार करण्याच्या कामीं फार सहाय केलें आहे. डॉ. भाऊंनीं तर आपल्या तरुण वयांत देशभर प्रवास करून निरनिराळ्या वनस्पतींचे नमुने मिळविले होते. त्याचप्रमाणें त्यांनीं एक गुजराथी भाषेंतील वनस्पतिशास्त्रविषयक ग्रंथ तपासून पाहून त्यांत वर्णन केलेल्या वनस्पतींचे लॅटिन व इंग्लिश या भाषांतील पर्यायशब्द काढून कर्त्याला दिले होते. डॉ. नारायण दाजींनींही एका "महारुख" नांवाच्या नवीन वनस्पतीचा शोध लावला होता. मिस्टर हर्बर्ट बर्डवुड याला त्या वनस्पतीची माहितीही नव्हती. ती त्याला सन १८९७ च्या सुमारास त्याच्या विठू नांवाच्या नोकराकडून मिळाली. पण त्याच्याही कैक वर्षें पूर्वीं डॉ. नारायण दाजींनीं त्या वनस्पतीचा शोध लावून तिचें व तिच्या गुणधर्मांचें कॉलेजच्या त्रैमासिकांत वर्णन केलें होतें. असो.

पण डॉ. भाऊ दाजी यांनीं "रक्तपिती" ( leprosy ) सारख्या महारोगावर औषध शोधून काढण्याच्या कामीं जो उद्योग चालविला होता त्याचें महत्व फार मोठें आहे. त्यायोगानें डॉ. भाऊ दाजी यांचें नांव वैद्यकशास्त्राच्या इतिहासांत कायमचें नमूद होऊन राहील असे जे रेव्ह. डॉ. विल्सन यांनीं एका प्रसंगीं उद्गार काढले ते अगदीं सत्य आहेत ! भाऊ वारल्यावर मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटींत जो ठराव पास झाला त्यांत या महारोगावरील उपाययोजनेसंबंधानें असा उल्लेख आहेः--

"They recognize his (Dr. Bhau Daji's) genuine philanthropy...........in his long continued and expensive exertions to mitigate and remove human suffering, especially in connection with the dreadful disease of leprosy, by which so many in this land have for ages been grievously afflicted."

असो. या उपाययोजनेंत डॉ. भाऊ हे मुख्यतः देशी औषधींचाच उपयोग करीत असत. त्यांनीं कांहीं "Leprosy" वरील इंग्रजी ग्रंथही मिळविले होते. हा शोध त्यांनीं कित्येक वर्षें चालविला होता. त्याकरितां त्यांनीं ठिकठिकाणाहून अनेक प्रकारच्या वनस्पति व कृमिकीटक मिळविले होते. बैरागी, गोसावी, फकीर वगैरे लोकांकडून ते शक्य तितकी माहिती मिळवीत असत. डॉ. भाऊ दाजींच्या घराच्या आवारांत जिकडे तिकडे नेहमीं सरडे दिसत असत. कोणी म्हणत कीं, भाऊ त्यांच्या तेलाचा आपल्या औषधांत उपयोग करीत असत. डॉ. भाऊ दाजी हे त्या महारोगावरील औषधांत चौल मोगऱ्याच्या तेलाचा उपयोग करीत असत असें मुंबईतील एक प्रसिद्ध वैद्य डॉ. सर तेमुलजी नरीमन हे सांगतात. रक्तपीतीनें पीडित झालेल्या रोग्यांना—त्यांच्या भयंकर जखमा व सडलेले अवयव पाहून—सामान्य लोक टाळतात व त्यांच्यापासून दूर दूर राहातात हें प्रसिद्ध आहे. पण डॉ. भाऊ दाजी यांनीं प्रस्तुतविषयक आपले प्रयोग अगदीं पद्धतशीर रीतीनें चालविले होते. ते त्या कामांत गुंतलेले असत तेव्हां त्या रोगानें ग्रस्त झालेल्या लोकांचे अवयव काळजीपूर्वक तपाशीत असत व जखमा धुवीत असत ! तशा कामीं डॉ. भाऊ केव्हांही कंटाळा करीत नसत. असो. ह्यांनीं सुमारें सन १८६५-६६ सालीं रक्तपितीवर औषध देण्यास सुरवात केली. त्यांनीं अनेक रोगी बरे केले. त्यामुळें त्यांची कीर्ति इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, आस्ट्रिया या देशांपर्यंत पोहोंचली. डॉ. भाऊ दाजी यांनीं रोगी लोकांचे-त्यांना हातीं धरण्याच्या पूर्वींचे-ते रुग्णावस्थेंत असल्या वेळचे व ते बरे झाल्यानंतरचे असे निरनिराळ्या स्थितीचे दर्शक फोटो घेऊन विलायतेंत त्या वेळचे सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया, ड्यूक ऑफ आर्गाइल ( Duke of Argyle ) यांजकडे पाठविले व त्यांची आपल्या नवीन शोधाबद्दल खात्री केली. त्यांवरून त्या बड्या साहेबांनीं डॉ. भाऊ यांचें पत्रद्वारा योग्य स्तुति करून अभिनंदन केलें. डॉ. भाऊ दाजी यांनीं जे रोगी बरे केले त्यांत कांहीं युरोपियन देखील होते. त्यांपैकीं एका युरोपियन मनुष्यास त्या वेळचे ग्रँट मेडिकल कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. हंटर ( Dr. Hunter ) हे औषध देत होते. पण त्या औषधानें तो बरा न होतां तो डॉ. भाऊंचें औषध घेऊन बरा झाला हें जेव्हां त्या प्रिन्सिपॉलसाहेबांस समजलें तेव्हां ती गोष्ट त्यांना सहन झाली नाहीं ! परंतु त्याला उपाय काय ? उलट, हंटर साहेबांचा आपणांवर घुस्सा झाला आहे असें कळतांच डॉ. भाऊंनीं आपलें औषध काय आहे हें तुम्हांस सांगण्यास मी तयार आहें असा त्यांना निरोप सांगून पाठविला ! असो.

याप्रमाणें महारोगावरील औषधामुळें डॉ. भाऊंची जगभर प्रसिद्धि झाल्याबरोबर लांबलांबच्या देशांतून युरोपखंडांतील देशांतून देखील रोगीलोक डॉ. भाऊंच्या दवाखान्यांत औषधाकरितां येऊं लागले असें सांगतात. भाऊंच्या औषधानें बरे झालेल्या अनेक लोकांचे दाखले आहेत. अशा रोग्यांचीं स्वदस्तुरचीं कांहीं पत्रें सन १८६८, १८७१ व १८७२ या सालच्या "नेटिव्ह ओपिनियन" मध्यें प्रसिद्ध झालीं होतीं. सन १८६८ च्या सेप्टंबरच्या वि. ज्ञा. विस्ताराच्या अंकांत "रक्तपितीवर औषध" या मथळ्याखालीं पुढील मजकूर प्रसिद्ध झाला होता:–"रा. बाळशास्त्री देव व विष्णुपंत करमरकर वगैरे गृहस्थांनीं आपापल्या हककती सर्व लोकांस कळविण्याकरितां वर्तमानपत्रद्वारा प्रसिद्ध केल्या आहेत. रोगाची स्थिति, औषध घेण्याची रीत, व तें घेतल्यापासून कसकसा गुण पडत जातो हें त्यांनीं इत्थंभूत रीतीनें कळविलें आहे. विष्णुपंतांनीं तर दुसऱ्या १४–१५ रोग्यांच्या हकीकती दिल्या आहेत. इतकेंच नव्हे तर त्या रोग्यांचे, रोग अंगांत असल्यावेळचे फोटो व ते बरे झाल्यानंतरचे फोटो देऊन त्यांच्या प्रकृतींत कसा फरक पडला हें दाखविलें आहे. त्यांपैकीं कित्येकांचे रोग दहा दहा, पंधरा पंधरा वर्षांचे जुने होते असें लिहिलें असून त्यांना बरें होण्याची बिलकूल आशा नव्हती. पण शेवटीं ते डॉ. भाऊ यांच्या औषधानें बरे होऊन आज सुखांत आहेत असें म्हटलें आहे."

त्याचप्रमाणें एका युरोपियन मनुष्यानें–डॉ. भाऊंच्या मरणानंतर–एक युरेशियन त्यांच्या औषधानें बरा झाल्याचें कलकत्त्याचे "इंडियन डेली न्यूज" (Indian Daily News) मध्यें "on Leprosy" या मथळ्याखालीं पत्रद्वारा प्रसिद्ध केलें होतें. तेंच पत्र ता. ३–८–७४ च्या "टाइम्स ऑफ इंडिया" मध्यें पुन्हां छापलें होतें. तें असें:—

"I hasten to offer a few words, in testimony of what I have seen in the hope that suffering humanity may benefit thereby.

During my stay in this city, I have also known a respectable Eurasian on whom symptoms of the disease had just begun its work. I remember very well seeing him from day to day, in excruciating pains, fever etc. His medical adviser for the time being, adopted a course of treatment, which was ill-calculated to arrest the progress of the disease, or mitigate

पाने १२६
८८२६४
क्र. ९६३५१



his sufferings. He was at last reduced to a helpless state, so much so, that he was obliged to retire from business and pass his days at home. During the period he came to know of Dr. Bhau Daji and he resolved to visit Bombay. I have seen him since his return, and what a marvellous change has come over him! He sleeps well, eats well, takes plenty of exercise, and without fatigue. In short, it is not too much to say, that he has wonderfully improved and this is doubtless owing to Dr. Bhau Daji. He is still continuing the treatment, having obtained a supply of medicines from Bombay. The treatment is simple, the greatest attention being paid to diet. The doctor, I am told, left the secret of his success with his brother..........."

दुसरें एक गोव्याच्या ख्रिश्चन मनुष्याचें पत्र त्याच सुमारास पसिद्ध झालें होतें. त्यावरून डॉ. भाऊ दाजी यांचा देशाभिमान, व त्यांची भूतदयायुक्त धर्मबुद्धि व्यक्त होते. तें पत्र असें:—

"He (Dr. Bhau Daji) was always proud of his birth-place, and showed every kindness to his country-men. I had the good fortune to be his friend, and can therefore support what I say. As for his generosity and kind feelings towards his country-men, I would put before the public the following fact.

A compatriot of mine, of poor means, was attacked by leprosy. Being informed that Dr. Bhau Daji cured this horrible malady, he came down to Bombay and desired me to introduce him to the Doctor. I did so. The Doctor, after examining the sufferer, told him that it would at least take three years to get rid of the malady. I had the consolation of hearing of his recovery, which was pronounced by other physicians to be impossible. The man was unable to pay the doctor. But what was our surprise to hear the Doctor say! "Don't fear. I don't want from you a pie; I see that you are my countryman; I will support you." The sufferer, in recognition of this, knelt down and tried to kiss his (Doctor's) feet,

but was not allowed. From that very date, he gave him the medicines, and continued doing so for three years. The result was that the man recovered perfectly, and is at present in the service of His Highness the Gaikwad of Baroda."

*A Goanese.*

यापेक्षां डॉ. भाऊ दाजींच्या औषधानें बरे झालेल्या रोग्यांचे आणखी दुसरे दाखले देण्याचें कारणच नाहीं. खुद्द डॉ. भाऊंनींच सन १८६७ सालीं विलायतेस जेकब साहेबांस लिहिलेल्या पत्रांतून मंडलीकचरित्रकर्त्यानें एक उतारा दिला आहे. त्याचा असा आशय आहे, "माझ्या औषधानें हातांत धरलेले रोगी बरे होत आहेत. परंतु ते सर्व गरीब असल्यामुळें औषध फुकट द्यावें लागतें." यावरून स्वतःच्या औषधाच्या अमोघत्वाविषयीं डॉ. भाऊ दाजी यांची पक्की खात्री झाली होती, असें स्पष्ट दिसतें. त्याचप्रमाणें असले महत्वाचे शोध लावण्याचें डॉ. भाऊ यांचे ठिकाणीं सामर्थ्य होतें, अशी लोकांचीही भावना होती. सन १८६८ जानेवारींतलें जेकबसाहेबांचें रा. सा. मंडलीक यांना जें पत्र आलें होतें, त्यांत डॉ. भाऊंसंबंधानें असा मजकूर होताः—" डोकें विलक्षण आहे. त्यांच्या चातुर्याबद्दल मी त्यांची वाहवा करतों. त्यांनीं आणखी कांहीं अजब शोध लावले असल्यास कळवा." पण कित्येकांचा डॉ. भाऊ दाजींसंबंधानें असा आक्षेप असे कीं, ते आपलें औषध प्रसिद्ध करीत नसत. ते तें गुप्त ठेवीत असत. पण आमच्या मतें यांत थोडीशी अतिशयोक्ति असावी व थोडीशी गैरसमजूत असावी. अतिशयोक्ति हीच कीं, डॉ. भाऊ जर आपलें औषध अनेक रोग्यांना देत असत तर तें ते चोरून ठेवीत असत असें कसें म्हणावयाचें? गैरसमजूत म्हणजे असें कीं, औषध प्रसिद्ध न करण्यांतला डॉ. भाऊंचा हेतु आपला केवळ फायदा व्हावा अगर त्याचा लोकांना उपयोग होऊं नये, असा नसून तें रक्तपितीवर रामबाण औषध होऊं शकतें, अशी प्रयोगद्वारा आपल्या मनाची पक्की खात्री झाल्याशिवाय तत्संबंधाचा निर्णय जगापुढें अगर वैद्यकांतले तज्ज्ञ लोक यांजपुढें ठेवणें त्यांना बरोबर वाटत नव्हतें. यासंबंधांत त्या वेळचे एक प्रसिद्ध व बडे अंमलदार नामदार मिस्टर गिब्स यांनीं जे एका प्रसंगीं उद्गार काढले होते ते असे होतेः—

"Much has been written and said about his secret. I think it is right to say that the medicine is no secret. I know that it is known to many, and the treatment is still carried on

by his (Dr. Bhau's) brother. But what Dr. Bhau Daji felt was that in this matter it was not wise to publish the results until those results showed, as far as human eye could see, a certainty in grappling with the disease. I was present on one occasion with some of the leading medical and scientific men of this city, when Dr. Bhau Daji showed us drugs and photographs of patients in the different stages, and also living instances of the power, the medicine had had for good and he then explained that he still held back from placing the treatment before the profession and the public, until he could conscientiously say, 'Here is a cure.' In the meanwhile, he was accumulating the necessary facts and having the illustrations prepared for the work. But his sad illness and death have prevented its completion."

यापेक्षां जास्त अधिकारयुक्त असें पूर्वोक्त आक्षेपाचें निरसन असणें शक्य नाहीं. डॉ. भाऊंचें औषध पुष्कळांस माहीत होतें व एका प्रसंगीं डॉ. भाऊ हे त्या औषधाविषयींचे प्रयोग करीत असतांना आपण स्वतः व मुंबईतल्या त्या वेळचे कांहीं धंदेवाले डॉक्टर व तज्ज्ञ लोक हजर होते, असें गिब्ससाहेब स्पष्ट म्हणतात. तेव्हां डॉ. भाऊंनीं औषध गुपित ठेविलें हें म्हणणें अगदीं निराधार! त्यांनीं आपले प्रयोग चालविले होते, व तें औषध रामबाण असल्याची आपल्या मनाची खात्री झाल्यावर त्याची प्रसिद्धी करण्याचा त्यांचा निश्चय ठरला होता. पण त्यांचें अखेरचें दुखणें व मृत्यु हीं आड आलीं व तें काम पुरें व्हावयाचें राहिलें. तें आजवर तसेंच राहिलें आहे! दुर्दैव आमच्या देशाचें व वैद्यकशास्त्राचें! दुसरें काय? डॉ. भाऊंचे बंधु डॉ. नारायण दाजी यांनीं भाऊंचें अपुरें राहिलेलें काम पुढें चालविलें होतें, पण तेही पुढील वर्षी (१८७५) स्वर्गस्थ झाले. त्यानंतर तें काम कोणीच हातीं घेतलें नाहीं. आम्ही परवांच मुंबईतील एका प्रसिद्ध व शस्त्रक्रियाविशारद अशा डॉक्टरांना यासंबंधानें विचारलें. त्यांनीं सांगितलें कीं, आपल्या माहितीप्रमाणें रक्तपितीसंबंधाच्या डॉ. भाऊ दाजींनीं चालविलेल्या शोधाची मजल पुढें गेलीच नाहीं. भाऊ गेले तेव्हां जी स्थिति होती तीच आजही आहे. एवढ्या एकाच गोष्टीवरून डॉ. भाऊंच्या अकाल मरणानें वैद्यकशास्त्राचें व आमच्या देशाचें केवढें नुकसान झालें, याची कोणासही कल्पना होऊं शकेल! त्या वेळच्या मानानें हल्लीं मेडिकल ग्रॅजुएटस् शेंकड्यांनीं दरसाल पास होत आहेत.

कांहीं तर इंग्लिश युनिव्हर्सिट्यांचे पदवीधर होऊन येत असतात. पण डॉ. भाऊ दाजींची शोधकबुद्धि, उद्योगप्रियता व चिकाटी हीं अंशतः तरी किती जणांमध्यें आढळतात ? यांपैकीं कांहींना तरी निदान परमेश्वरानें तशी सद्बुद्धी द्यावी, एवढीच प्रार्थना आहे.

---

प्रकरण सहावें.

## वाङ्मय व संशोधन.

डॉ. भाऊ दाजी यांनीं धंद्याच्या दृष्टीनें केलेल्या कामगिरीविषयीं व मिळविलेल्या लौकिकाविषयीं मागील प्रकरणांत लिहिलेंच आहे. आतां त्यांच्या वाङ्मयक्षेत्रांतील कामगिरीसंबंधानें लिहावयाचें आहे. डॉ. भाऊ यांचें या क्षेत्रांतील ध्येय फार उच्च होतें. जस्टिस वेस्ट्रॉप यांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे डॉ. भाऊ हे अगदीं निरिच्छपणें वाङ्मयसेवा करीत होते. त्यांत त्यांची कोणत्याही प्रकारें स्वार्थदृष्टि नसे.

"He never thought that he could educate himself sufficiently............He loved learning and science for their own sakes, and cultivated them ardently and steadily and with marked success."

ही आपली हौस पुरविण्याकरितां डॉ. भाऊ दाजींनीं सन १८६३ ते १८६६ पर्यंत सर्व हिंदुस्थानचा प्रवास केला. कांहीं स्वतः केला, तर कांहीं सर अर्स्किन पेरी, जस्टिस न्यूटन, सर ॲलेग्झँडर ग्रँट, प्रो. वर्डस्वर्थ, कामा, मूस वगैरे मित्रांबरोबर केला. डॉ. भाऊ काश्मिरकडे जाण्यास निघाले होते, त्या वेळीं जेकबसाहेबांनीं मंडलिकांस लिहिलेल्या (ता. ११–३–६३) पत्रांत असा मजकूर होताः– "डॉ. भाऊ हे काश्मीरकडे म्हणजे आर्य लोकांच्या मूळ आवास भूमीकडे जात आहेत ! तेथूनच तुमचे पूर्वज पर्वताग्रावरून सपाट भूमीवर उतरले व त्यांनीं अनार्य लोकांस पिटाळून लावलें. त्यानंतर पुष्कळच काळ लोटला आहे, हें खरें. परंतु जे तुमचे पूर्वज मनुस्मृतीसारखें सर्वांगपूर्ण कायद्याचें शास्त्र ज्या काळीं लिहीत होते व ताऱ्यांच्या गतीचें निरीक्षण करीत होते, व इकडे ज्या काळीं पाश्चात्य लोकांचे पूर्वज आपल्या देवांस नरबलि अर्पण करीत असत व पशूंप्रमाणें

रानावनांत हिंडत असत; त्या कालाचें त्यांनीं ( तुमच्या पूर्वजांनीं ) फक्त एकादें दुर्मिळ नाणें किंवा एकादा अलभ्य ताम्रपट याशिवाय दुसरीं कोणतींच इतिहासाचीं साधनें ठेवूं नयेत आणि नंतर इतक्या पिढया जाऊं द्याव्यात हें संभवतें कसें ?" याबद्दलच्याच शोधाच्या उद्योगांत डॉ. भाऊ गुंतले होते, असें जेकबसाहेबांनीं सूचित केलें, तें बरोबर होतें. असो. ह्याच प्रवासांत डॉ. भाऊ मद्रास, कलकत्ता, बरद्वान, पाटलीपुत्र, प्रयाग वगैरे ठिकाणीं जाऊन आले. मद्रास व कलकत्ता येथें गेले तेव्हां तिकडील गव्हर्नरांच्या त्यांनीं गांठी घेतल्या. डॉ. भाऊंची सर्व हिंदुस्थानभर प्रसिद्धी पूर्वींच झाली होती. अर्थात् ते गेलेल्या ठिकाणीं त्यांचें सन्मानपूर्वक स्वागत झालें तें ठीकच झालें. डॉ. भाऊ कलकत्त्यास गेले तेव्हां त्यांनीं तेथील रॉयल एशियाटिक सोसायटीपुढें एक विद्वत्वपूर्ण निबंध वाचला. त्याचप्रमाणें त्यांनीं तेथील बेथून सोसायटीपुढें एक सुंदर व्याख्यान देऊन आपल्या वंगदेशीय बंधूंना स्त्रीशिक्षणा-कडे जास्त लक्ष देण्याविषयीं विनंति केली. असो. कित्येक प्रांतांत डॉ. भाऊंनीं आपल्या पदरीं ठेवलेले पंडित पाठवून आपलीं कामें करून घेतलीं. सर बार्टल फ्रेअर हे जेव्हां गव्हर्नर होऊन मुंबईस आले, तेव्हां त्यांनीं डॉ. भाऊंना पहिल्याच भेटींत सुचविलें कीं, मध्य हिंदुस्थानांतील जसलमीर येथें जुन्या लेखांचें नुसतें प्रचंड भांडार आहे व तें लक्षपूर्वक धुंडाळून पाहिल्यास पुष्कळच उपयुक्त माहिती मिळेल. लागलीच डॉ. भाऊंनीं वरील सूचनेप्रमाणें सन १८६३ च्या सुमारास पंडित भगवानलाल व पांडुरंग पाध्ये यांना जसलमीर येथें पाठविलें. त्यांनीं भाऊंच्या इच्छेप्रमाणें भांडार तपासण्याचें काम केलें. पण तिकडील वाईट हवेमध्यें काम करावें लागल्यामुळें दोघेही विषमज्वरानें आजारी पडले. ते बावीस दिवस-पर्यंत बिछान्यावर पडून होते. पण ते बरे झाल्यावर सन १८६४ मध्यें मुंबईस परत आले. असो. डॉ. भाऊ दाजींनीं आपल्याला प्रवासांत आलेला अनुभव मुंबईंत रॉ. ए. सोसायटीपुढें निवेदन केलाः—

"My travels in various parts in India have enabled me to examine and copy many valuable inscriptions on stones and rocks, and I am convinced that every one of the inscriptions on rocks and almost every copper-plate grant published years ago, require thorough revision, whilst I know hundreds, if not thousands of inscriptions on temples etc., which, if carefully examined by a competent person like Bhagwanlal, a flood of light could be thrown on the history and antiquities of

ग्रं. ७५३ २३-५-५७

India, beyond the expectations of the most zealous Orientalists, who do not conceal their disappointment at the results of Indian historical researches."

याचा तात्पर्यार्थ इतकाच कीं, पूर्वीच्या पंडितांनीं (युरोपियन लोकांनीं) जीं शिलालेखांचीं, आणि ताम्रपटांचीं भाषांतरें प्रसिद्ध केलीं होतीं, तीं पुष्कळ ठिकाणीं चुकलेलीं असल्यामुळें तें नकलांचें व भाषांतराचें काम फिरून एकदां चांगल्या लायक माणसाकडून–पंडित भगवानलालसारख्यांकडून–करवून घेतलें पाहिजे. तरच त्या लेखांचा इतिहासाच्या कामीं चांगला उपयोग होईल. असो. याप्रमाणें डॉ. भाऊंनीं सर्व देशभर स्वतः जाऊन अगर आपलीं लायक माणसें पाठवून जुने हस्तलेख, संस्कृत ग्रंथ वगैरे मिळविण्याच्या कामीं परिश्रम करण्याची शिकस्त केली. यासंबंधानें डॉ. भांडारकरांनीं एका प्रसंगीं असे उद्गार काढले होतेः—

"He (Dr. Bhau Daji) devoted much time and attention to the collection of rare Sanskrit verses, himself went to places where he could find them, and when he could not go, employed agents to look for them and got them copied ; until there was almost no part of India which had not an agent of Dr. Bhau's."

म्हणजे हिंदुस्थानचा असा एकही महत्वाचा भाग उरला नाहीं कीं जिकडे डॉ. भाऊ स्वतः गेले नाहींत किंवा दुर्मिळ हस्तलेख मिळविण्याकरितां त्यांनीं आपलीं माणसें पाठविलीं नाहींत ! एकंदरींत डॉ. भाऊंनीं सर्व प्रांतांतून काळजीपूर्वक तपास करवून व हजारों रुपये खर्च करून असंख्य शिलालेख, जुने हस्तलेख, ताम्रपत्र लेख मिळविले यांत शंका नाहीं. जुनी माहिती मिळविण्याच्या कामीं भाऊ दाजींची विलक्षण उत्सुकता असे. त्यांनीं एकदां सन १८६० मध्यें देशभर जाहिराती प्रसिद्ध करून **कालिदास** व त्याचा आश्रयदाता **विक्रमादित्य** यांविषयीं विश्वसनीय माहिती देणाराला मोठें बक्षिस देऊं केलें होतें ! तसेंच त्यांनीं **वराहमिहिर** याच्या जन्मभूमीचा, त्याच्या कालाचा व त्याच्या "रमणिक सिद्धांत" वगैरे ग्रंथांचा शोध चालविला होता. गुजराथ, काठेवाड, राजपुताना, काश्मीर, म्हैसूर वगैरे प्रांतांतून डॉ. भाऊंनीं संस्कृत, मागधी, पाली, आरबी वगैरे भाषांतील हस्तलेख मिळविले. अहमदाबाद, खंबायत, पट्टण, जोधपूर, जसलमीर वगैरे प्रांतांतून त्यांनीं जैनवाङ्मयात्मक कांहीं हस्तलेख मिळविले. बहार, बंगाल,

ओरिसा येथून त्यांनीं अनेक शिलालेख, हस्तलेख मिळविले. त्यामुळें संशोधन-कार्यांत गुंतलेले दुसरे विद्वान् लोक—बर्जेस, फ्लीट यांसारखे—यांना जुन्या माहितीकरितां किंवा जुन्या लेखांच्या नकलांकरितां डॉ. भाऊ दाजींकडे धांव घ्यावी लागत असे, हें तर झालेंच, पण डॉ. भाऊ दाजींच्या या अचाट उद्योगामुळें प्राचीन हस्तलेख, शिलालेखांच्या नकला वगैरेंचा त्यांच्याजवळ इतका प्रचंड संग्रह जमला कीं, तसा संग्रह त्या वेळीं दुसऱ्या कोणाजवळच नव्हता! सन १८६६ मध्यें प्रवास करून परत येतांना डॉ. भाऊ दाजींनीं बरोबर अनेक दुर्मिळ वस्तु आणल्या होत्या. त्यांत सुंदर चित्रें, शिल्पकाराचें कौशल्य दाखविणारे पुतळे, शस्त्रें, यंत्रें, शिलालेख वगैरे जिन्नस होते. त्याचप्रमाणें त्यांनीं दक्षिण हैदराबाद-नजीकच्या डोंगराळ प्रदेशांत राहणाऱ्या रानटी लोकांच्या भाषेंतील शब्दांचा व म्हणींचाही संग्रह केला होता. तात्पर्य, जुन्या माहितीबद्दल व लेखांबद्दल डॉ. भाऊ-दाजींची कीर्ति या देशांत तर प्रसृत झालीच होती. पण ती युरोप-अमेरिका खंडापर्यंतही पोंचली होती! त्यामुळें तिकडील पंडितांना कांहींहि माहिती लाग-ल्यास त्यांची दृष्टि प्रथम डॉ. भाऊ दाजींकडे जात असे. व भाऊंकडून त्यांची सहसा निराशा होत नसे यासंबंधानें मुंबईच्या रॉ. ए. सोसायटीच्या सन १८७५ सालच्या त्रैमासिकांत एके ठिकाणीं असा उल्लेख केलेला सांपडतोः—

"It is well-known that Dr. Bhau Daji had brought together a considerable collection of Oriental books and manuscripts. Sanskrit scholars in Europe were seldom disappointed when appealing to him for the loan of manuscripts which were in his possession or for his assistance in procuring copies of such as were within his reach."

असो. डॉ. भाऊंची याप्रमाणें त्यांच्या विद्वत्तेबद्दल व संशोधनकार्याबद्दल जिकडे तिकडे मोठमोठ्या लोकांमध्यें मानमान्यता वाढावी व कांहीं विशेष प्रसंगीं त्यांच्या मार्गदर्शकत्वाची गरज भासूं लागावी यांत आश्चर्य नाहीं. सन १८६९ सालीं जेव्हां राज्ञीपुत्र ड्यूक ऑफ एडिंबरो हे हिंदुस्थानांत फिरण्याकरितां आले, तेव्हां ते मुंबईजवळचीं घारापुरीचीं लेणीं पहावयास गेले होते. त्याप्रसंगीं राज्ञीपुत्राबरोबर डॉ. भाऊ दाजींची योजना झाली होती! त्याचप्रमाणें सन १८७२ मध्यें दक्षिण हैदराबाद येथील सर सालर जंग यांच्या आमंत्रणावरून त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड नार्थब्रुक हे जेव्हां वेरूळजवळचीं लेणीं पाहण्याकरितां गेले, तेव्हां त्यांनीं आपल्याबरोबर डॉ. भाऊ दाजींनाच घेतलें होतें!

डॉ. भाऊ दाजींनीं परिश्रमपूर्वक जुन्या माहितीचा व लेखांचा इतका संग्रह केला; त्याचा त्यांनीं उपयोगही पण चांगल्याच प्रकारें केला. त्यांनीं निरनिराळ्या विषयांवर अनेक विद्वत्ताप्रचुर निबंध लिहिले. कांहीं निबंध त्यांनीं युरोप-अमेरिका खंडांतील विद्वत्सभांपुढें वाचण्याकरितां पाठविले. कांहीं त्यांनीं या देशांतील संस्थांपुढें वाचले. त्यांनीं मुंबई येथील "मेकॅनिक्स इन्स्टिटयूट" पुढें अनेक प्रसंगीं व्याख्यानें दिलीं. टाउन हॉलमध्यें पुष्कळ वेळां व्याख्यानें दिलीं, भाषणें केलीं. पण मुंबईंत त्यांनीं निबंधवाचनाचें काम मुख्यत्वेंकरून रॉयल एशियाटिक सोसायटीपुढेंच केलें. त्या संस्थेंत त्यांनीं एकंदरींत महत्त्वाच्या विषयांवर असे बारा निबंध वाचले. त्याशिवाय त्यांनीं अनेक विषयांवर लहानमोठीं टिपणें वाचलीं, तीं निराळींच. मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे ते सन १८५२ मध्यें सभासद झाले. त्याच्यापूर्वीं त्या संस्थेंत बरींच वर्षें हिंदी लोकांना मज्जाव असे. फक्त कै. बाळशास्त्री जांभेकर यांनीं कांहीं शिलालेख व ताम्रपत्रलेख यांवर सुमारें पांच सात निबंध त्या संस्थेंत वाचल्याचें सन १८४२ ते १८४६ सालांतल्या त्रैमासिकांवरून दिसून येतें, इतकेंच कायतें. पण पुढें जेव्हां त्या संस्थेचीं द्वारें सन १८४० सालापासून खुलीं करण्यांत आलीं, तेव्हां आमचे विद्वान लोक आंत शिरले. त्यांत डॉ. भाऊ दाजी हेच मुख्य होते. सन १९०५ मध्यें सेक्रेटरी डॉ. स्कॉट यांनीं सदरहू सोसायटीचा जो इतिहास प्रसिद्ध केला त्यांत असें नमूद आहेः—

"One of the first Hindu scholars was Dr. Bhau Daji, who wrote many papers on Sanskrit literature, and on inscriptions and history. The Bhau Daji collection of manuscripts is one of our treasured possessions."

---

पुढें मग डॉ. भाऊ हे त्या संस्थेंतील मॅनेजिंग कमिटीचे (सन १८५९) सभासद झाले. व सन १८६४ मध्यें ते तिचे उपाध्यक्ष झाले. डॉ. भाऊ दाजींचें सोसायटींत कसें वजन वाढत चाललें होतें हें त्यांना उपाध्यक्ष निवडते वेळीं डॉ. विल्सन यांनीं जें भाषण केलें त्यावरून स्पष्ट रीतीनें दिसून येतें. ते म्हणाले, "डॉ. भाऊ दाजी हे आमच्या संस्थेला भूषणभूत होऊन राहिले आहेत. त्यांच्या विद्वत्तेबद्दल त्यांची या देशांत तशी युरोपखंडांत देखील यापूर्वींच प्रसिद्धि झाली आहे. आमच्या संस्थेच्या उत्कर्षाकरितां झटण्याची त्यांची फार इच्छा आहे, व तसें करण्याला जरूर इतकें सामर्थ्यही पण त्यांचे ठिकाणीं आहे." याप्रमाणें डॉ. भाऊंची

त्यांच्या विद्वत्तेबद्दल जसजशी प्रसिद्धि होऊं लागली, तसतसें त्यांना या देशांतील व परकीय देशांतील विद्वत्सभांकडून देखील मान मिळूं लागला. त्यांना कांहीं दिवसांनीं मग मुंबईच्या "जिऑग्रफिकल सोसायटी"चे सेक्रेटरी निवडण्यांत आलें. कलकत्त्याच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे ते सन्मान्य सभासद झाले. तसेंच ते लंडन, पॅरिस, बर्लिन, न्यूयार्क इत्यादि ठिकाणच्या विद्वत्सभांचे सन्मान्य सभासद झाले.

सन १८६५ मध्यें सर बार्टल फ्रेअर हे मुंबईचे गव्हर्नर होते. त्यांची इच्छा होती कीं, पश्चिम हिंदुस्थानांत जितक्या जुन्या इमारती, किंवा अवशिष्ट भाग असतील त्यांचें काळजीपूर्वक निरीक्षण करून त्यांचे फोटो काढून ते सर्व एके ठिकाणीं लोकांस पाहावयास मिळतील अशी व्यवस्था करावी. व या कामाकरितां सदरहू गव्हर्नरसाहेबांनीं एक पंधरा जणांची कमिटी नेमली. त्यांत डॉ. भाऊ दाजी होते. या कमिटीकडून या इलाख्यांतील सुंदर इमारतींचे फोटो घेऊन त्यांचे मोठमोठे असे तीन खंड (व्हॉल्यूम) प्रसिद्ध करण्यांत आले. पहिला गुजराथेंतील इमारतींचा, दुसरा धारवाड व म्हैसूर या प्रांतांतील इमारतींचा व तिसरा विजापूर येथील लहानमोठ्या इमारतींचा असे तीन खंड प्रसिद्ध झाले, त्यांत डॉ. भाऊ दाजी यांची बरीच मदत झालेली होती.

डॉ. भाऊ यांनीं केलेल्या वाङ्मयात्मक कामगिरीचे ठोकळ मानानें तीन भाग पडतात. १. शिलालेख, ताम्रपत्रलेख, लेणीं, नाणीं, वगैरे साधनांवरून ऐतिहासिक माहिती मिळविणें, २. ग्रंथकार व त्यांचे ग्रंथ यांचे--निबंध, टिपणें वगैरे लिहून—काल ठरविणें, व ३. दुर्मिळ असे जुने लेख मिळवून नवीन माहिती उजेडांत आणणें. यासंबंधानें जरा विस्तारानें विवेचन पुढील प्रकरणांत येईलच. पण या सर्व मार्गांनीं परिश्रमपूर्वक माहिती मिळवून व तत्संबंधानें निबंध, टिपणें लिहून डॉ. भाऊ दाजी यांनीं जगाच्या ज्ञानांत महत्वाची भर घातली यांत शंका नाहीं! याविषयीं मॅक्स मुल्लर यांनीं असें नमूद करून ठेवलें आहे:—

"I always look upon Bhau Daji as a man, who has done excellent work in his life—and though he has written little, the little he has written is worth thousands of pages written by others."

म्हणजे डॉ. भाऊंनीं आपल्या संबंध आयुष्यांत उत्तमच काम केलें आहे. त्यांचें लिखाण कदाचित् दिसण्यास थोडें असेल. पण त्या थोड्याचीच किंमत इतरांनीं हजारों पृष्ठें लिहिल्यापेक्षां जास्त आहे.

दुसरा दाखला खुद्द डॉ. सर रामकृष्ण भांडारकरांचा. ता. १ आगष्ट सन १८७४ रोजीं मुंबईच्या टाउन हॉलमध्यें डॉ. भाऊ दाजींच्या स्मारकाकरितां म्हणून एक जंगी जाहीरसभा भरविण्यांत आली होती. त्या प्रसंगीं पुष्कळ युरोपियन व हिंदी गृहस्थांचीं भाषणें झालीं. त्यांत प्रो. ( नंतरचे डॉक्टर सर ) भांडारकर यांचें फार महत्त्वाचें भाषण झालें. त्यांत ते डॉ. भाऊ दाजींसंबंधानें असें म्हणालेः—

" विद्वत्ता व संशोधनकार्य या बाबतींत डॉ. भाऊ दाजी यांचें स्थान फार फार उच्च आहे, व त्यामुळें त्यांची कीर्ति युरोप–अमेरिका खंडांपर्यंत पोंचली आहे. डॉ. भाऊ यांनीं पुष्कळ शोध लावले. पण त्यांपैकीं मी एक दोन शोधांचा उल्लेख करतों. कोरीव लेण्यांतील संस्कृत संख्यावाचक शब्दांचा ( numerals ) अगर आंकड्यांचा कित्येकांस प्रथम अर्थ समजत नसे. या कामांतले अत्यंत अनुभविक " तज्ञ " (expert असें प्रिन्सेप ( Prinsep ) साहेब त्यांना देखील तो अर्थ लागेना. हल्लीं जशी ती किंमत आंकडेमांडणीवर अवलंबून असते तशी ती पूर्वी नव्हती. उदाहरणार्थ, हल्लीं आपण १ याचा " एकं " असा अर्थ करतों. त्यावर दुसरा आंकडा ठेवला कीं त्या दोन आंकड्यांना दश ी ( दहं ) किंमत येते. त्यावर आणखी एक आंकडा मांडला कीं त्याची " ६ " अशी किंमत होते. प्राचीन संस्कृत संख्यावाचक शब्दांचा अगर आंकड्यांचा तसा अर्थ होत नसे. त्यांची मांडणी कशीही असली तरी किंमत कायम असे. कांहीं ताम्र-पटांवरील दान पत्रकांत एक " ग " अशी खूण ( mark ) असे व त्याच्या शेजारीं " three hundred " ( तीनशें ) असे शब्द असत. प्रिन्सेप वगैरे विद्वान् लोक त्याचा सर्व ठिकाणीं एकच–३००–असा अर्थ घेत असत. परंतु पुढें असें आढळून आलें कीं, सुमारें अठरा वीस राजांनीं पाडलेल्या नाण्यांवर तशीच खूण होती. अर्थात् एका ाकांत इतक्या राजांनीं राज्य केलें काय ? असा विद्वान् लोकांपुढें प्रश्न येऊन ला ! पुढें टॉमस Thomas) या नांवाच्या पंडिताच्या लक्षांत आलें कीं, त्या खुणेच्या उजव्या बाजूस लहान फांटे (strokes) असतात. इतकेंच नव्हे, तर त्या फांट्यांचे आकार व संख्या हीं निरनिराळ्या नाण्यांवर निरनिराळीं असतात. त्यावरून त्या फांट्याच्या योगानें किंमतींत फरक पडत असला पाहिजे, अस टॉमस याच्या ध्यानांत आलें suspected ). पण

तो फरक कसा पडतो हें मात्र त्याला समजलें नाहीं. पुढें त्या किंमती डॉ. भाऊ दाजींनीं ठरविल्या व त्या सर्वमान्य झाल्या. त्यांनीं नाशीक, कार्ले, कान्हेरी, व जुन्नर येथील लेण्यांतील लेखांवरील संख्यांचें बारीक निरीक्षण केलें; त्यांची एक-मेकांशीं तुलना केली; त्यांवरून त्यांना असें आढळलें कीं, उजव्या बाजूच्या फांट्यांशिवाय सदहूं खूण " ៣ " असेल तेथें तिची शंभर ( १०० ) अशी किंमत होते. तिला उजव्या बाजूस एक फांटा " ៣ " असला तर तिचा " दोनशें " असा अर्थ होतो. दोन फांटे " ៣= " असले तर तिचा " तीनशें " असा अर्थ होतो. आणि त्या खुणेच्या खालीं " चार " व " पांच " हे आंकडे असले म्हणजे त्याचा "चारशें" व "पांचशें" असा अर्थ होतो. याप्रमाणें डॉ. भाऊ दाजी यांनीं पुष्कळच संख्यावाचक खुणांच्या किंमती ठरविल्या. असो. पण डॉ. भाऊंनीं हा एकच शोध लावला असें नाहीं. त्यांनीं दुसरेही लावले आहेत. प्राचीन काळीं आपल्या देशांत " गुप्त " नांवाचा एक राजवंश होता. पहिला चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, दुसरा चंद्रगुप्त, कुमारगुप्त, व स्कंदगुप्त हे त्या वंशांतील प्रसिद्ध राजे होते. त्या वंशांतील कित्येक राजांनीं खडकांवर कोरविलेल्या कांहीं लेखांत कालदर्शक आंकडे आढळले. एका लेखांत ९३ आंकडा होता. दुसऱ्यांत १६५ आंकडा होता. पण ते आंकडे कोणत्या शकाचे–ख्रिस्ती कीं विक्रम कीं, शालिवाहन शकाचे–दर्शक समजावयाचे हें कोणासच समजेना ! निरनिराळ्या पंडितांनीं निरनिराळे शक सुचविले. पण त्यायोगानें गुप्तराजांच्या कालामध्यें कित्येक शतकांचा फरक पडूं लागला ! वरील राजवंशांतील एका राजाचा जुनागड येथील खडकावर कोरलेला लेख आहे. त्याची नक्कल करून विलायतेंत प्रिन्सेपकडे पाठविण्यांत आली. पण त्याला त्याचा उलगडा होईना ! मग तो प्रश्न डॉ. भाऊ दाजी यांनीं हातांत घेतला. त्यांनीं त्या लेखाची नक्कल घेतली, त्याचें भाषांतर केलें आणि तो प्रश्न कायमचा सोडविल्याचें श्रेय मिळविलें ! त्या लेखांत तीन ठिकाणीं कालदर्शक आंकडे असल्याचें व त्याच्याच पुढें " गुप्तकालस्य " ( in the era of the Guptas) म्हणजे " गुप्त शकाचे " असे सूचक शब्द असल्याचें डॉ. भाऊ दाजींना आढळून आलें. त्यावरून गुप्तवंशांतले राजे आपला शक वापरीत असत असें स्पष्ट दिसून आलें ! या शकाचा आरंभ इसवी सन ३१९ सालीं होतो हें एका आरबी ग्रंथकारांच्या ( Alberuni) लेखावरून व कित्येक शिलालेखांवरून सिद्ध झालेंच आहे.

त्याचप्रमाणें "साह" ( Sah )—क्षत्रप—नांवाचा एक राजवंश होता. त्या वंशांतील राजांचीं नांवें कांहीं नाण्यांवरून ठरविण्यांत आलीं आहेत. या राजांचे

दोन शिलालेख आहेत. त्यांपैकीं एक जुनागडच्याच खडकावर कोरलेला आहे. त्या लेखाचें प्रिन्सेपनें पूर्वी भाषांतर केलें होतें. पण पुढें तें काम डॉ. भाऊ दाजींनीं हातांत घेतलें; त्या लेखाचें त्यांनीं फिरून भाषांतर केलें; व प्रिन्सेपनें केलेल्या चुका दाखविल्या. त्या लेखांत सांगितलेला "रुद्रदाम" राजा हा "चष्टन"-चा मुलगा होता असें प्रिन्सेपला वाटलें होतें. पण डॉ. भाऊ दाजींनीं रुद्रदाम हा त्याचा मुलगा नसून नातू होता असें दाखविलें ! त्या लेखाच्या ज्या भागावर "रुद्रदाम" च्या बापाचें नांव होतें तो खडकाचा भाग फुटून उडून गेला असल्यामुळें त्या ( रिकाम्या ) जागीं असलेल्या मूळ मजकुराचा अर्थ लावतां येणें शक्य नव्हतें. परंतु त्या सर्व गोष्टींचा खुलासा डॉ. भाऊ दाजी यांनीं केला. त्यांनीं काठेवाडांतील 'जसदन्' (Jasdan) येथील एका खांबावर कोरलेल्या लेखाचें भाषांतर केलें, व त्यायोगानें त्यांनीं वर सांगितलेला खुलासा करून शिवाय सदहू "साह" ( क्षत्रप ) वंशांतील "चष्टन, जयदाम, रुद्रदाम, रुद्रसिंह, रुद्रसेन" अशीं दुसऱ्या चारपांच राजांचीं नांवें उजेडांत आणलीं ! असो. × × डॉ. भाऊ हे अजंटा येथील लेणीं पाहण्याकरितां किती वेळां तरी गेले होते. तेथील कोरीव लेखांचीं त्यांनीं भाषांतरें केलीं व त्यांचा अर्थ लावून दिला. त्यांनीं अशाच आणखी पुष्कळ गोष्टी केल्या व अनेक लेख लिहिले. × × × प्राचीन गोष्टींचा तपास करण्यांत व शिलालेखांच्या वगैरे नकला घेण्यांत डॉ. भाऊ हे आपल्या श्रमांची शिकस्त करीत असत. गेल्या दोन हजार वर्षांतील कोणत्याही संशोधनात्मक विषयावर ज्याला लेख लिहावयाचा असेल त्याला डॉ. भाऊ दाजींच्या लेखांचा आधार घेतल्याशिवाय बहुधा लेखच लिहितां येणार नाहीं."

एकंदरींत डॉ. भाऊ दाजींनीं ज्ञान संपादन केलें, इतकेंच नव्हे तर आपल्या संशोधनात्मक कामांत लागणारे धीटपणा, क्षुद्र गोष्टींविषयीं तिटकारा व श्रमांची शिकस्त करण्याची संवय हे अत्यंत आवश्यक गुणही त्यांनीं संपादन केले होते. जस्टिस वेस्ट यांनीं एकदां डॉ. भाऊंसंबंधानें अशाच अर्थाचे उद्गार काढले होते.

"He not only acquired learning, but manliness, a contempt for all tinsel pretences and a love for thoroughness of work which was essential in his future career."

डॉ. भाऊ दाजींनीं वाङ्मयात्मक कामें केलीं त्यांत हे त्यांचे गुण सहज दृष्टोत्पत्तीस येतात.

---

प्रकरण सातवें.

# शिलालेख, नाणीं वगैरे

आपल्या हिंदुस्थान देशाचा प्राचीन काळचा इतिहास समजण्यास विश्वसनीय अशीं साधनें म्हटलीं म्हणजे शिलालेख, ताम्रपत्रलेख, नाणीं व परकीय प्रवाशांनीं लिहून ठेविलेली माहिती हींच होत. त्यामुळें यांचें ऐतिहासिक दृष्टीनें फार मोठें महत्व आहे. डॉ. भाऊ दाजी यांनीं जें संशोधनात्मक काम केलें आहे त्यांपैकीं बराच भाग शिलालेख, नाणीं इत्यादि साधनांचा अर्थ लावण्यासंबंधानेंच होता. शिलालेखांच्या नकला करणें, त्यांची लिपि समजून घेणें, त्यांचें भाषांतर करणें, व त्यांवरून त्या लेखाचा अर्थ लावून त्याचा एकंदरींत निष्कर्ष काढणें हीं फार श्रमाचीं, खर्चाचीं व डोक्याचीं कामें असतात. पण तीं ज्ञानप्रसारासारख्या महत्कार्याचीं उपांगें असल्यामुळें तीं केलींच पाहिजेत. अशीं संशोधनात्मक कामें करण्यांत डॉ. भाऊ दाजींनीं आपला किती वेळ व पैसा खर्च केला, किती परिश्रम केले याचा विचार केला म्हणजे मन थक्क होतें व त्यांच्याबद्दल खरोखर अत्यंत आदर वाटतो. यासंबंधानें उत्तम दाखला मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मासिकांतून ( खंड ७ ते १२ ) मिळतो. त्याविषयींची इकडे थोडक्यांत माहिती देतों.

अजंटा येथील लेणीं पाहण्याकरितां डॉ. भाऊ दाजी हे दोन तीन वेळां गेले होते. पण तेवढ्यानें काम समाधानकारक रीतीनें झालें नाहीं, म्हणून त्यांनीं नंतर पंडित भगवान् लाल इंद्रजी यांस त्यांचे बरोबर एक "ड्राफ्टस्मन" देऊन पाठविलें व तें काम पुरें केलें. यासंबंधानें डॉ. भाऊ आपल्या निबंधांत पुढील आशयाचे उद्गार काढतातः—

मी त्या गुंफा ( caves ) पाहण्याकरितां मागील ( १८६३ ) फेब्रुवारींत गेलों होतों. तिकडे मी चार दिवस राहिलों. त्या मुदतींत मी दररोज सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचा वेळ तिकडील शिलालेखाच्या नकला घेण्यांत घालवीत असें. तें काम सोपें नव्हतें. कांहीं लेख खडकाच्या फार उंच ठिकाणीं होते. त्यांच्या नकला घेण्याकरितां जाण्याच्या वाटेंत तुटलेला कडा होता. त्याला संभाळून फार जपून जावें लागत असे. कांहीं लेख कोरलेले नसून ते, रंगाच्या व कुचल्याच्या

सहायानें लिहिलेले होते. त्यांच्या नकला माझा "ड्राफ्टस्मन" बाबुल यानें घेतल्या. तरी देखील नकलांचें काम मनाजोगें झालें नाहीं. म्हणून मी नंतर मे महिन्यांत एका तरुण ब्राह्मण पंडिताला (भगवानलाल याला) पाठविलें. त्याला तशा लेखांच्या लिपीची माहिती होती. त्याजबरोबर माझा " ड्राफ्टस्मन " दिला. आणि त्यांनीं त्या लेखाच्या काळजीपूर्वक घेतलेल्या नकला मजकडे मुंबईस पाठवाव्या व मी तपासून त्या परत पाठवीपर्यंत त्यांनीं तेथेंच (लेखांजवळ) राहावें व माझ्या सूचनांच्या दृष्टीनें त्या नकला अस्सलाशीं पुन्हां ताडून पाहून जरूर तेथें दुरुस्त्या कराव्या अशी व्यवस्था केली होती." इतकी काळजी घेतल्यावर त्या नकला बरोबर निघाव्या यांत मुळींच आश्चर्य नाहीं.

त्याच शिलालेखांच्या नकला घेण्याकरितां पूर्वीं एकदां मुंबई सरकारकडून मुद्दाम व्यवस्था करण्यांत आली होती. पण त्यापासून काम बरोबर झालें नाहीं. याविषयीं डॉ. भाऊ आपल्या निबंधांत लिहितातः—

" The Government of Bombay was liberal enough to employ Lieut. W. F. Brett to copy the cave inscriptions. His copies of the Ajunta inscriptions were sent, I believe, to England, but judging of their character from two or three duplicates in the possession of our Society, they appear to be carelessly and inaccurately taken. It is, indeed, not possible for any person ignorant of the cave characters to take correct copies of these inscriptions."

लिपीची माहिती नसतांना अगर जरूर तेवढें अर्थ लावण्याचें ज्ञान नसल्यास अखेर अर्थाचा अनर्थ कसा होतो याचें कै. जव्हेरिलाल याज्ञिक यांनीं आपल्या एका निबंधांत उदाहरण दिलें आहे. एका लेखांत अशीं नुसतीं अक्षरें होतीं—

**क क अ ज म र ग य च्छ क क कट च्छ**

याचा एका पंडितानें असा अर्थ केला,
काका आज मरी गया च्छे काकी कूटे च्छे,
( काका आज वारले व काकी दुःख करते ).
पण त्या अक्षरसमूहाचा खरा अर्थ असा होता;
काका अजमर गया च्छे काकी कोटे च्छे.
( काका अजमिरला गेले आहेत व काकी कोटेलाच आहे. )

असो. वर दिलेल्या हकीकतीवरून डॉ. भाऊ दाजींची अशा कामीं दिसून येणारी कार्यक्षमता व परिश्रम करण्याची तयारी हे गुण सहज व्यक्त होतात. त्यांनीं घेतलेल्या सर्व शिलालेखांच्या नकलांच्या बाबतींत असेच परिश्रम व खर्च केलेला होता.

डॉ. भाऊंनीं शिलालेखासंबंधानें जे निबंध लिहिले आहेत, त्यांत अजंटा येथील लेण्यासंबंधानें लिहिलेला निबंध व जुनागड जवळील गिरनारच्या शिलालेखांसंबंधीं लिहिलेले निबंध हेच फार महत्वाचे आहेत. कारण या निबंधांच्या योगानें हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास समजण्यास मदत झाली आहे. अजंटा येथील शिलालेखांतील–हे एकंदर २३ होते–माहिती इतर ठिकाणीं–म्हणजे ताम्रपट, पुराणें वगैरे ठिकाणीं–मिळालेल्या माहितीशीं ताडून पाहून डॉ. भाऊ दाजींनीं असा सिद्धांत काढला आहे कीं, मध्य हिंदुस्थानांत एका कालीं एका यवन वंशांतील राजे राज्य करीत असून ते वैदिक धर्मीय यज्ञयागविधींमध्यें व बौद्ध धर्माचा प्रसार करण्याच्या कामीं मनःपूर्वक झटत असत. त्या राजवंशाचें "वाकाटक" हें नांव असून त्याच्या मूळ पुरुषापासून चार पांच पिढ्यांपर्यंतचा वंशवृक्ष असा लागतोः— विंध्यशक्ति, प्रवरसेन, रुद्रसेन, पृथिवीसेन, रुद्रसेन, प्रवरसेन. या वंशांतील राजांचा कुंतल, अवंती, कलिंग, कोसल, त्रिकुट, आंध्र या देशांशीं कांहीं संबंध असावा असें दिसतें. सदरील ( नं. १६ च्या ) लेखांतील श्लोकांत ज्या अर्थीं "हरिविक्रम प्रताप" असा उल्लेख सांपडतो, त्या अर्थीं ह्या वंशांतील एकाद्या राजानें सदहू देश जिंकले असले पाहिजेत. तो लेख ग्रीक लोकांचा असावा असें वाटतें.

त्याच ठिकाणच्या दुसऱ्या ( नं. १७ च्या ) लेखांत आणखी एका राजवंशाचा उल्लेख असून त्यांतील धृतराष्ट्र, हरिसांब, सौरीसांब, रविसांब या राजांचा नामनिर्देश केलेला आढळतो. पण त्यांचीं राज्यें कोठें होतीं किंवा त्यांच्या राजधान्या कोठें होत्या याचा मात्र बोध होत नाहीं. तिसऱ्या ( नं. २५ च्या ) एका लेखांत "अश्मक राज" नावाच्या राजाचा व त्याच्या मंत्र्याचा उल्लेख आहे. अश्मक देश कोठें आहे हें सांगतां येत नाहीं. पण वराह संहितेमध्यें द्रविड, विदेह, आंध्र या देशांबरोबरच "अश्मक" याचाही उल्लेख आहे. असो. सदरहू सर्व शिलालेख ख्रिस्तीशकाच्या सहाव्या किंवा सातव्या शतकापेक्षां जुने नसावेत.

डॉ. भाऊ दाजींनीं जुनागड येथील रुद्रदाम ( ख्रि. श. १५० ) व स्कंद गुप्त ( ख्रि. श. ४५४ ) या राजांच्या शिलालेखांवरून व काठेवाडांतील जस्दन

(Jasdan) येथील रूद्रसेन (ख्रि. श. २०५) राजाच्या शिलालेखावरून महत्वाची माहिती उजेडांत आणली असून त्यायोगें आमच्या देशाच्या प्राचीन इतिहासावर बराच नवीन प्रकाश पडला आहे. किंबहुना जे शिलालेख पूर्वी मुकेच राहिलेले होते त्यांना डॉ. भाऊंचा हस्तस्पर्श होतांच वाचा फुटली असें म्हणण्यासही हरकत नाहीं. सदर्हू लेखावरून असें स्पष्ट रीतीनें सिद्ध झालें आहे कीं, ख्रिस्तपूर्व ३२२ पासून ख्रिस्तोत्तर ४५५ पर्यंत म्हणजे जवळ जवळ ८०० वर्षांच्या कालांत काठेवाडांत प्रथम मौर्य वंशीय राजांनीं राज्य केलें; नंतर क्षत्रप (शक) वंशीय राजांनीं राज्य केलें; व अखेर गुप्त राजांनीं राज्य केलें. याला सबळ पुरावा म्हणजे जुनागड जवळील "सुदर्शन" नामक तलावाला दुरुस्ती केल्याचा मिळतो! तो तलाव ख्रिस्त पूर्व चवथ्या शतकांत मौर्यवंशीय चंद्रगुप्त राजानें आपल्या "पुष्पगुप्त" नांवाच्या कामगाराकडून बांधविला होता. त्याची पुढें सुमारें पाऊणशें वर्षांनीं ख्रि. पू. तिसऱ्या शतकांत त्या राजाच्या नातवानें म्हणजे अशोक राजानें दुरुस्ती केली. तदनंतर सुमारें चारशें वर्षांनीं म्हणजे ख्रिस्तोत्तर १५० सालीं त्या तळ्याचा बांध फुटला. तेव्हां राजा रुद्रदाम राज्य करीत होता. त्यानें त्या तलावाची दुरुस्ती केली. तसेंच तो तलाव जेव्हां पांचव्या शतकांत पुन्हां नादुरुस्त झाला, तेव्हां स्कंदगुप्त राजानें सन ४५४ मध्यें त्याची दुरुस्ती केली. हा सर्व खुलासा सदरील तीन शिलालेखांवरून होतो. यासंबंधाचे डॉ. भाऊ दाजींचे निबंध एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकांत (खंड ७) दाखल झालेले आहेत.

सन १८६५ च्या सुमारास सरकारतर्फे धारवाड व म्हैसूर या प्रांतांतील काहीं शिलालेखांचे फोटो घेऊन प्रसिद्ध करण्यांत आले होते. यासंबंधानें डॉ. भाऊ दाजींनीं लिहिलेला निबंध पूर्वोक्त त्रैमासिकाच्या ९ व्या खंडांत प्रसिद्ध झाला आहे. फोटोसंबंधानें डॉ. भाऊंनीं एक सामान्य अर्थाचा असा शेरा मारला आहे:—

"कांहीं फोटो स्पष्ट नाहींत. फोटोंचा शिलालेखांचा अर्थ लावण्याच्या कामीं जरी कांहींसा उपयोग होत असला, तरी त्यांना जागच्या जागीं काळजीपूर्वक तज्ञ मनुष्यानें घेतलेल्या नकलेची सर येत नाहीं. फोटो घेतले तरी ते मूळ लेखाच्या जागीं जाऊन पुन्हा तपासून पाहिले पाहिजेत." सदर्हू शिलालेखांपैकीं एक "ऐहोल" (Aihole) हा लेख सातव्या शतकांत राजा पुलकेशी यानें कोरविलेला असून दुसरा मंगलीश राजानें बदामी जवळील गुंफेंत बांधलेल्या विष्णूच्या देव-

ळांत कोरविलेला आहे. डॉ. भाऊ म्हणतात कीं, सदहूं सर्व शिलालेख चालुक्य, यादव, कुलचुरी, कदंब, गुप्त, रठ्ठ व सिंध या वंशांतील राजांचे आहेत. त्यांपैकीं कांहींच्या योगें गुप्त राजांच्या इतिहासावर नवीन प्रकाश पडत आहे. एका सहाव्या शतकांतील लेखांत "कालिदास," व "भारवि" यांचा उल्लेख आढळतो, त्यावरून त्या कवींची सहाव्या शतकांत चांगलीच कीर्ति झाली होती हें सिद्ध होतें. डॉ. भाऊंनीं आपल्या निबंधांत आणखी कांहीं लेखांचा उल्लेख केलेला असून ते सव शिलालेख ख्रिस्ती शकाच्या सहाव्या शतकापासून चवदाव्या शतकापर्यंतचे आहेत असें लिहिलें आहे.

त्याच खंडांत डॉ. भाऊ दाजींनीं कल्याण जवळील अंबरनाथ येथें मिळालेल्या एका शिलालेखासंबंधानें लिहिलेला एक निबंध प्रसिद्ध झाला असून दहाव्या खंडांत अनाकोंडा येथील रुद्रदेवाच्या शिलालेखाचें भाषांतर व नकल दिली आहे.

त्याच खंडांत डॉ. भाऊंचा "भीतरी" येथील खांबावर कोरलेल्या लेखासंबंधानें लिहिलेला निबंध प्रसिद्ध झाला आहे. "भीतरी" हें ठिकाण संयुक्त प्रांतांतील गाजीपूर जिल्ह्यांत असून तिकडे पांचव्या शतकांत स्कंदगुप्त राजानें विष्णूच्या (शार्ङ्गिन्) मूर्तीची स्थापना केली असून त्या देवतेच्या पूजेप्रीत्यर्थ एक गांव सोडला आहे. स्वतः तो राजा एक विष्णुभक्त (भागवत) असून त्यानें तीं कृत्यें आपल्या वडिलांच्या नांवानें केलीं आहेत.

त्याच खंडांत डॉ. भाऊ दाजींनीं दिल्ली येथील "कुतुब मिनार" जवळच उभा असलेल्या लोह स्तंभावर कोरलेल्या लेखाविषयींचा एक निबंध लिहून प्रसिद्ध केला आहे. तो स्तंभ चंद्रगुप्त राजानें विष्णुदेवतेला अर्पण केला असून तो राजा सार्वभौम होता व मोठा विष्णुभक्त होता असेंही त्या लेखांत म्हटलें आहे. तो राजा बहुधा दुसरा चंद्रगुप्त असावा. म्हणजे सदहूं लेख चवथ्या शतकाच्या उत्तरार्धांतील किंवा पांचव्या शतकाच्या पूर्वार्धांतील असावा असें दिसतें.

दुसरी एक गोष्ट अशी समजते कीं, पाटण गांवांत भवानीच्या देवळांत एका शिळेवर चंगदेवाचा एक लेख आहे. त्या लेखांतील संस्कृत श्लोक प्रथम डॉ. भाऊ दाजी यांनीं शोधून लावले.*

डॉ. भाऊ दाजींनीं (cave numerals) शिलालेखांतील संख्यावाचक शब्दांविषयीं किंवा आंकड्यांविषयीं एक लेख लिहून पूर्वोक्त त्रैमासिकांत

---

*पांगारकर कृत "श्री ज्ञानेश्वर चरित्र पृ. १४.

( खंड ८ ) प्रसिद्ध केला आहे. पण त्यासंबंधाचा खुलासा मागील प्रकरणांत येऊन गेल्यामुळें त्याची इकडे पुनरुक्ति करीत नाहीं. परंतु यासंबंधांत डॉ. बुल्हर यांनीं एकदां काढलेल्या आक्षेपाविषयीं दोन शब्द लिहावे हें योग्य दिसतें. मद्रासच्या मिस्टर नटेसन या गृहस्थांनीं प्रसिद्ध केलेल्या ( Eminent Orientalists ) "प्राच्य भाषा पंडितां"च्या चरित्रमालेंत डॉ. भाऊ दाजींचें त्रोटक चरित्र आलें आहे. त्यांत डॉ. बुल्हर यांनीं पुढीलप्रमाणें आक्षेप घेतल्याचा उल्लेख आहेः—

" In the interest of truth I cannot suppress the remark that Pandit Bhagvanlal's name ought to have been mentioned by Bhau Daji in his article on "the Cave numerals." I have strong reasons for the belief that at least a considerable share of the results at which Dr. Bhau Daji arrived is due to Pandit Bhagwanlal's industry and ingenuity."

शिलालेखांतील संख्यावाचक शब्दांच्या अर्थांविषयींचा डॉ. भाऊ यांनीं जो शोध लावला त्याचें बरेंचसें श्रेय पंडित भगवानलालचें होतें व त्यामुळें त्यांचें नांव डॉ. भाऊंनीं आपल्या निबंधांत दाखल करावयाचें होतें असें डॉ. बुल्हर म्हणतात. यांत बुल्हर साहेबांची कांहीं तरी गरसमजूत झालेली दिसते. मूळ डॉ. बुल्हर या बाबतींत आपली तशी समजूत ( belief ) आहे असें लिहितात. खात्री असल्याचें सांगत नाहींत. दुसरे, डॉ. भाऊ दाजींनीं पंडित भगवानलालशीं जें अथपासून इतिपर्यंत प्रेमळपणाचें वर्तन ठेविलें होतें त्यावरून डॉ. भाऊ हे वरील शोध लावल्याचें खरें श्रेय भगवानलालचें असतां तें आपणांला घेतील हें संभवनीय दिसत नाहीं. तिसरी गोष्ट अशी कीं, डॉ. भांडारकरांनीं जें एका सार्वजनिक प्रसंगीं ( ता. १–८–७४ ) या विषयावर भाषण केलें त्यांत पंडित भगवानलालच्या नांवाचा उल्लेख नाहीं. चवथें कारण, सन १८८८ सालीं कै. जव्हेरिलाल याज्ञिक यांनीं जो पंडित भगवानलाल यांच्यासंबधानें एक माहितीनें भरलेला असा चरित्रात्मक सुंदर निबंध वाचला त्यांत डॉ. भाऊ दाजींविषयींच्या कांहीं बारीक सारीक गोष्टींचा देखील उल्लेख आलेला आहे. पण त्यांत डॉ. बुल्हर यांनीं वर दाखविलेल्या डॉ. भाऊंच्या अनुदार कृतींचें नुसतें नांवही नाहीं! पांचवें कारण, जस्टिस वेस्टसारखे मोठे गृहस्थ डॉ. भाऊंच्या प्रामाणिकपणाविषयीं व उदारमनस्कतेविषयीं जर पुढीलप्रमाणें उद्गार काढतात—

"He ( Dr. Bhau ) gained an ideal of the man of learning, which kept him through life independent, firm in integrity, in openness of mind and kindliness of heart."

तर डॉ. बुल्हरसाहेबांचीच प्रस्तुत बाबतींत कांहीं तरी गैरसमजूत झाली असली पाहिजे हेंच अधिक संभवनीय नव्हे काय? यापेक्षां इकडे या मुद्यावर जास्त लिहिण्याचें कारण नाहीं.

वर सांगितलेल्या निबंधांशिवाय डॉ. भाऊ दाजींनीं दुसरा एक "A brief survey of Indian Chronology from 1st to 12th century of Christian era" या मथळ्याखालीं विस्तृत निबंध लिहिला आहे. त्यांत त्यांनीं (आपल्या वेळेपर्यंत) शिलालेख, ताम्रपत्र लेख वगैरे साधनांच्या योगें उपलब्ध झालेल्या माहितीच्या दृष्टीनें ख्रिस्ती शकाच्या पहिल्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंतच्या हिंदुस्तानच्या इतिहासाचें थोडक्यांत सिंहावलोकन केलें आहे. पण पुढें चाळीस वर्षांनंतर सन १९०४ मध्यें डॉ. भांडारकरांनीं ह्याच विषयावर लिहिलेला "Elucidation of Indian History by the study of Inscriptions" हा निबंध मुंबईच्या रॉ. ए. सोसायटीच्या शतसांवत्सरिक स्मारक ग्रंथांत प्रसिद्ध झाला आहे. डॉ. भांडारकरांच्या निबंधांतला विशेष हाच कीं, त्यांत भाऊ दाजी वारल्यानंतर सुमारें तीस वर्षांच्या संशोधनात्मक बाहेर पडलेल्या माहितीचा उपयोग करण्यांत आला आहे. दोन्ही निबंध विद्वत्वसूचकच आहेत. पण त्यांतील विषय फार व्यापक स्वरूपाचा असल्यामुळें व ते दोन्ही निबंध बरेच विस्तृत असल्यामुळें त्यासंबंधानें इकडे विशेष विस्तार करतां येणें शक्य नाहीं. आम्ही फक्त त्या दोन्ही निबंधांत सांगितल्याप्रमाणें आपल्या देशाच्या कोणत्या भागांत, कोणत्या कोणत्या वंशांतील राजांनीं त्या दीर्घकालांत राज्य केलें इतक्याचाच अगदीं थोडक्यांत निर्देश करतों.

ख्रिस्तपूर्व चवथ्या शतकापासून ख्रिस्तोत्तर पांचव्या शतकापर्यंत काठेवाडांत कोणकोणत्या राजांनीं राज्य केलें हें वर सांगितलेंच आहे. पांचव्या शतकाच्या अखेरीस गुप्तराजांकडून काठेवाडांत वल्लभवंशीय सेनापति भट्टार्क याची नेमणूक झाली. परंतु पुढें हूण लोकांनीं जेव्हां गुप्तवंशाचा नाश केला तेव्हां हे वल्लभी राजे स्वतंत्र झाले व त्यांनीं काठेवाडांत पुढें सुमारें दोनशें वर्षें राज्य केलें. त्यांपैकीं धरसेन, शिलादित्य, द्रोणसिंह व ध्रुवसेन या (वल्लभवंशीय) राजांचीं नांवें त्यांनीं केलेल्या दानपत्रांवरून प्रसिद्ध आहेत.

खुद्द महाराष्ट्रांत कोणत्या काळीं कोण राजे राज्य करीत होते, हें नाशीक, कार्लें, नानाघाट, कान्हेरी, भाजें, जुन्नर, कुडा येथील लेण्यांवरून स्पष्ट रीतीनें दिसून येतें. ख्रि. पू. पहिल्या शतकापासून ख्रि. उ. पहिल्या शतकाच्या अखेरी-पर्यंत महाराष्ट्रांत शातवाहन वंशांतील राजे राज्य करीत होते. त्या वंशांतील "कृष्णराज" याचें नांव प्रसिद्ध आहे. तदनंतर क्षहारात नहपान हा शकवंशीय राजा झाला. डॉ. भांडारकरांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे—

"The Satavāhans established their sovereignty over Maharashtra in the first century before Christ; but they were displaced about the end of the first century after by a prince of the name of Kshaharata Nahapana.......... This Nahapan is called Mahakshatrapa and appears to have belonged......to the Saka race." या शकांना पुन्हां शातवाहन राजांनीं दुसऱ्या शतकांत घालवून दिलें. The Sakas were driven out about 133 A. D. by the Satavahans." शातवाहन या वंशांतील गोतमी पुत्र शातकर्णी याचें नांव प्रसिद्ध आहे. या वंशांतील राजांनीं दुसऱ्या शतकाच्या शेवटपर्यंत महाराष्ट्रांत राज्य केलें; "कथा सरित्सागर" ग्रंथावरून असें दिसतें कीं पाटलीपुत्र येथें "नंद" राजे राज्य करीत होते. तेव्हां पैठण येथें एक शातवाहन राजा राज्य करीत होता; त्या राजाच्या (ख्रि. पू. चवथ्या शतकांत) दरबारांतील कवि "गुणाढ्य" यानें पैशाच भाषेंतील कांहीं गोष्टी एकत्र जमविल्या; त्याच पुढें क्षेमेंद्रानें कथासरित्सागराच्या रूपानें प्रसिद्ध केल्या. असो. शातवाहन राजांनाच पुराणांत आंध्रभृत्य म्हटलेलें आहे. त्यांच्या पाठीमागून सुमारें दोनशें वर्षें त्रैकूटक वंशांतील राजांनीं महाराष्ट्रांत राज्य केलें. या वंशांतील "दर्हसेन" नांवाचा राजा त्यानें दिलेल्या एका ताम्रपत्र-दानावरून प्रसिद्ध आहे. यांच्या पाठीमागून ( म्हणजे ख्रिस्ती शकाच्या सहाव्या शतकाच्या आरंभापासून ) महाराष्ट्रांत पूर्वचालुक्य वंशांतील राजांनीं राज्य केलें. या राजांनीं सुमारें साडे तीनशें वर्षें राज्य केलें. या वंशांतील पुलकेशी, जयसिंह, मंगलीश या राजांचीं नांवें त्यांनीं करून दिलेल्या दानपत्रांवरून प्रसिद्ध आहेत. या चालुक्य वंशांच्याच एका शाखेचे राजे गुजराथेंत राज्य करीत असून त्यांची नवसारी येथें राजधानी होती. यांतील शिलादित्य, बुद्धवर्ष, आदित्यवर्म, विनया-दित्य या राजांचीं नांवें ताम्रपत्रांवरून प्रसिद्ध आहेत. पूर्वचालुक्यांच्या पाठीमागून महाराष्ट्रांत राष्ट्रकूट राजांनीं सुमारें दोनशें वर्षें राज्य केलें. यांतील दंतीदुर्ग, दुसरा कृष्ण, तिसरा कृष्ण, कक्कल या राजांचीं नांवें प्रसिद्ध असून कांहींनीं केलेलीं

दानपत्रें सांगली, वर्ध्याजवळील देवळी, खारेपाटण इत्यादि ठिकाणीं मिळालीं आहेत. याच राष्ट्रकूट वंशाच्या एका शाखेंतील राजे गुजराथेंत देखील राज्य करीत होते. त्यांपैकीं पहिला कर्क या राजाचें दानपत्र प्रसिद्ध झालें आहे. राष्ट्रकूट यांच्या पाठीमागून उत्तर चालुक्य वंशांतील राजांनीं राज्य केलें. नंतर कलचुरी वंशांतील राजे झाले व त्यांच्या मागून यादववंशीय राजे झाले. पुढें तेराव्या शतकांत मुसलमान लोक महाराष्ट्रांत आले हें प्रसिद्धच आहे. असो.

वरील त्रोटक हकीकतींत कांहीं लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी आहेत. महाराष्ट्रांत जे–उपलब्ध साधनांवरून पहिले राजे झाले ते शातवाहन होत. त्यांची पैठण ही राजधानी होती. तदनंतर राजपद पावलेल्या पूर्व चालुक्यांची बदामी ही राजधानी होती. राष्ट्रकूटांची राजधानी "मालखेड" ही होती. उत्तर चालुक्यांची कल्याण ही राजधानी होती व यादवांची देवगिरी ही राजधानी होती. पण वरीलपैकीं सर्व गांवें–फक्त एक बदामी सोडून–प्रस्तुत निजाम हैदराबाद संस्थानांत आहेत! दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे वरील सर्व राजांच्या कारकीर्दींत महाराष्ट्र व कर्नाटक यांचा राजकीय दृष्ट्या संबंध येत असे, व तिसरी महत्वाची गोष्ट ही कीं, वरीलपैकीं दोन राजवंशांचा–पूर्वचालुक्य व राष्ट्रकूट यांचा अंमल गुजराथेंतदेखील पोंचला होता.

वर सांगितलेल्या राजवंशांशिवाय महाराष्ट्रांत कांहीं मांडलिक राजेही होऊन गेले. त्यांचा आतां थोडक्यांत उल्लेख केला पाहिजे. त्यांपैकीं शिलाहार राजांच्या तीन शाखा होत्या असें दिसतें. एका शाखेचा कोल्हापूर, मिरज, कराड इकडे अंमल होता. दुसरीचा सालसेट–माहोली–वांद्रें वगैरे ठिकाणीं म्हणजे उत्तर कोंकणांत होता. आणि तिसरीचा खारेपाटण म्हणजे दक्षिण कोंकणांत होता.

बाराव्या शतकात गोंवें, कानडा, या बाजूस कदंब राजांचा अंमल असून वनवासी—कानडा जिल्हा—ही त्यांची राजधानी होती. पुढें विजयनगरचें राज्य झालें. त्या राज्याचा मूळ पुरुष बुकराज हा असून तो व हरिहर व कृष्णराय हे प्रसिद्ध राजे होऊन गेले. हरिहर यानें आपला मंत्री माधव याला जयंतीपूर—बनवासी—येथें राजप्रतिनिधि नेमला होता. माधव यानें तिकडील आपल्या कारकीर्दींत गोव्याला वेढा देऊन तुर्क—मुसलमान—लोकांना हांकून लाविलें! माधव हा उपनिषत्प्रणीत धर्माचा पुरस्कर्ता असून तो "आचार्य" पद पावला होता. याच माधवानें वेंगुर्ल्याजवळील कोचरें (माधवपूर) हा गांव २५ ब्राह्मणांना अग्रहार करून दिल्याची सनद प्रसिद्ध आहे. सनदेची तारीख सन १३९०

असून त्या वेळीं विजयनगरच्या राज्याचा वेंगुर्लें—मालवणपर्यंत अंमल पोंचला होता, असें स्पष्ट दिसतें. दोनशें वर्षांच्या राज्योपभोगानंतर त्या राजवंशांचा मुसलमान लोकांनीं सन १५६४ मध्यें नाश केल्याचें प्रसिद्धच आहे. असो.

अलाहाबाद येथील स्तंभावर समुद्रगुप्त राजाचा ( सन ४०० ) जो लेख आहे त्यांत त्या काळच्या कांहीं राजांचा ( सुमारें दहा ) उल्लेख आहे. पण तीं राज्यें कोठें होतीं याचा निश्चय अद्याप झालेला नाहीं. फक्त आर्यावर्त व दक्षिणापथ असे देशाचे दोन भाग असल्याचें समजत असून त्यांतील एकदोन राज्यांची कांहींशी कल्पना प्रस्तुत काळीं होऊं शकेल. कोसल देशाचा महेंद्र राजा व कांचीचा विष्णुशापावमुक्तराजा ! यापेक्षां त्या लेखावरून जास्त बोध होत नाहीं.

मुंबईतील रॉ. ए. सोसायटीच्या त्रैमासिकांत असें नमूद झालेलें आहेः—

"At Bombay Mr. Burgess and Dr. Bhau Daji have carried on their investigations, the latter having undertaken to revise the Western Buddhist inscriptions including that of Girnar."

डॉ. भाऊ दाजी हे नाण्यांच्या साधनानें देखील ऐतिहासिक माहिती मिळवीत असत असें मागें सांगितलेंच आहे. पूर्वीच्या प्रकरणांत क्षत्रपवंशांतील कांहीं राजांचीं नांवें नाण्यांवरून ठरविलीं गेल्याचें निर्दिष्ट केलें आहे. पुढें डॉ. भाऊंनीं बागलाण तालुक्यांतील एका खेड्यांत ८३ चांदीचीं नाणीं मिळविलीं. त्यांवरील अक्षरें कुमार गुप्ताच्या वेळच्या अक्षरांसारखीं दिसत होतीं. त्या नाण्यांवर "राजा परम माहेश्वर; मानसनृप देवध्यान श्री कस?" अशीं अक्षरें होतीं. हा मानसनृप कोण राजा होता याचा बोध झाला नाहीं. पण दक्षिण हिंदुस्थानांतील तो एक राजा असून तीं नाणीं चवथ्या शतकांतलीं असावींत असें डॉ. भाऊंचें मत होतें. ते म्हणाले,

"In my opinion, the coins belong to a king, probably of the Deccan, about the end of the fourth century of the Christian era."

मिस्टर ए. एम्. टी. जॅकसन यांनीं आपल्या एका निबंधांत असें लिहिलें आहे,

"The coins of Krishnaraja, who is commonly held to have been an early member of the Rashtrakuta house, were first described by Dr. Bhau Daji from a find in Nasik district."

नगर वाचनालय सातारा
४७
संगणकीकृत


प्रकरण आठवें.

# कालिदास आणि मुकुंदराज.

आपल्या हिंदुस्थान देशांतील प्रसिद्ध महाकवि कालिदास याविषयीं सर्वांस माहिती आहे. पण त्याच्या कालाविषयीं अगर त्याच्या चरित्राविषयीं अद्याप निश्चित असें कांहींच सांगतां येण्यासारखें नाहीं. याचें मुख्य कारण म्हणजे आम्हां हिंदुलोकांमधील ऐतिहासिक दृष्टीचा अभाव हेंच होय. एकादा लेख अगर एकादा ग्रंथ लिहिला तर त्याखालीं लागलीच आपली सही-निदान आपल्या नांवाचीं प्रथमाक्षरें-व तारीख लिहावयाची हें जसें पाश्चात्य लोकांच्या अगदीं अंगवळणीं पडलेलें आहे, तसें आमचें झालें नाहीं. हा सामान्य दोष आमचा आजकालचा नसून फार प्राचीन काळापासून चालत आला आहे. पण त्यापासून आमचें फार नुकसान झालें आहे. आमचें राष्ट्र फार जुन्यांत जुनें. त्यांत प्राचीन काळापासून अनेक राज्यक्रांत्या अगर धर्मक्रांत्या झालेल्या आहेत हें अगदीं सर्वश्रुत आहे. पण एकाद्या गोष्टीविषयीं अगर महापुरुषाविषयीं कालानुक्रमानें माहिती मिळविण्याचा कोणी प्रयत्न आरंभिल्यास त्याला मात्र त्या कामांत यश येणें फार कठीण झालें आहे. फार प्राचीन काळाची गोष्ट असो. अर्वाचीन काळासंबंधानें देखील तोच प्रकार. प्रसिद्ध भगवद्भक्त नामदेव याची जन्मतिथि आम्हांस माहीत नाहीं; तुकारामाची निश्चयानें सांगतां येत नाहीं. शिवाजीच्या जन्मकालाविषयीं वाद तर अद्याप चालूच आहे! असो. तथापि युरोपियन लोक आमचे या कामांत मार्गदर्शक झाले आहेत. कोणी पाश्चात्य पंडित आज वैदिक वाङ्मयावर परिश्रम करीत आहेत. कोणी षड्दर्शनांचा अभ्यास करीत आहेत. तिसरे कोणी बौद्ध वाङ्मयाचें परिशीलन करीत आहेत. तर कोणी संस्कृत काव्य, नाटकें वगैरे संबंधानें शोध करीत आहेत. तात्पर्य, याप्रमाणें पाश्चात्य पंडितांनीं गेल्या दीडशें वर्षांत परिश्रमपूर्वक आमच्या प्राचीन वाङ्मयाचा चिकित्सकदृष्टीनें अभ्यास करून जें इंग्रजींत व इतर युरोपीयन भाषांत त्यांसंबंधाचें वाङ्मय तयार केलें आहे, त्याच्या योगानें आम्हांस कांहीं संशयात्मक गोष्टींचा खुलासा करण्याच्या कामीं बरीच महत्त्वाची मदत झाली आहे. इतकेंच नव्हे तर त्या पाश्चात्य पंडितांचें अनुकरण करून आमच्याचपैकीं कांहीं विद्वान् मंडळीनीं त्या दिशेनें कामगिरी केली आहे. वस्तुतः आमच्या संस्कृत वाङ्मयाचें परिशीलन करणें हें

आमचें काम. परंतु तिकडे आमच्या लोकांचें दुर्लक्ष झालें होतें. पुढें जेव्हां वर सांगितल्याप्रमाणें युरोपियन पंडितांनीं संस्कृत भाषेचा अभ्यास करून आमच्या वाङ्मयाचें चिकित्सकदृष्टीनें आलोडन करून त्यांतील एकामागून एक अशीं कित्येक अनर्घ्यरत्नें जगास सादर केलीं तेव्हां आमच्यापैकीं नवीन पद्धतीनें शिकून तयार झालेल्या कांहीं विद्वान् लोकांचें लक्ष साहजिकच त्या दिशेनें वळलें व त्यांनीं संशोधनकार्यास महत्त्वाची मदत केली. अशी जी सुशिक्षित मंडळी गेल्या शतकांत वाङ्मयक्षेत्रांत काम करण्याकरितां पुढें आली त्यांत—मुंबई इलाख्यापुरतें बोलावयाचें म्हटल्यास—कै. बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांचें नांव प्रथम सांगितलें पाहिजे. त्यांनीं लिहिलेले संशोधनात्मक—शिलालेख, ताम्रपत्रलेख या-संबंधाचे–कित्येक लेख मुंबई रॉयल एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकांत ( सन १८४२ ते १८४७ पर्यंत ) प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या पाठीमागून डॉ. भाऊ दाजी यांनीं त्या क्षेत्रांत महत्वाची कामगिरी केलेली असून त्यांनीं अनेक प्राचीन ग्रंथांचें, ग्रंथकारांचे व महापुरुषांचे काल ठरविण्याचा यत्न केला आहे. त्यांनीं कविचरित्रांत " शंकराचार्यांचा काल ठरविण्याचा प्रयत्न केला असून त्या कविच-चरित्राचा व डॉ. भाऊंनीं ठरविलेल्या कालाचा न्या. तेलंगांनीं देखील आपल्या शंकराचार्यांवरील अनेक निबंधांत उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणें डॉ. भाऊंनीं कालिदास, हेमाद्रि, माधव, सायन, मुकुंदराज यांचेही काल ठरविण्याचा यत्न केला आहे. यासंबंधानें थोडासा विस्तार पुढें येईलच. एकदां महाभारताच्या काला-विषयीं बोलण्याचा प्रसंग आला तेव्हां तो ग्रंथ शिकंदरच्या वेळीं अस्तित्वांत होता असें डॉ. भाऊ दाजी यांनीं स्पष्ट सांगितलें. ते म्हणाले,

"He believed that it could be shown that the Máhábhárát existed as long ago as Alexander the Great and that he believed this could be proved."

असो. या रीतीनें चिकित्सकदृष्टीनें डॉ. भाऊ दाजींनीं परिश्रमपूर्वक लिहिलेला पहिला निबंध कालिदासासंबंधाचाच होय. तो त्यांनीं एशियाटिक सोसायटीपुढें सन १८६० सालीं वाचला असून तो त्या संस्थेच्या त्रैमासिकांत ( खंड ६ ) प्रसिद्ध झाला आहे.

कालिदासाच्या कालासंबंधानें आपल्यापूर्वी होऊन गेलेल्या युरोपीयन पंडि-तांच्या मतांचा प्रथम उल्लेख करून नंतर डॉ. भाऊंनीं आपला मुद्दा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. भाऊंचा निबंध बराच विस्तृत असून त्यांनीं

आपलें विवेचन साधार व सोदाहरण केलें आहे. आम्हीं त्यासंबंधाचा इकडे विशेष विस्तार न करतां प्रमुख युरोपीयन पंडितांचीं कालिदासाच्या कालाविषयीं काय मतें होतीं याचा अगदीं थोडक्यांत उल्लेख करून अखेर डॉ. भाऊ दाजींनीं काय ठरविलें इतकेंच दाखविणार आहों. असो. युरोपीयन राष्ट्रांचीं मतें आमच्या इकडील प्राचीन संस्कृत वाङ्मयाकडे ओढलीं जाण्यास पहिलें कारण म्हणजे सर विल्यम जोन्स यानें सन १७८९ मध्यें केलेलें कालिदासाच्या शाकुंतल नाटकाचें इंग्रजी भाषांतर होय! त्यानंतर त्या नाटकाचीं—किंबहुना—कालिदासाच्या इतर ग्रंथांचीं सुद्धां युरोपांतील कांहीं भाषांतून भाषांतरें झालीं. तीं इतकीं कीं डॉ. भाऊंच्या वेळेपूर्वींच्या सुमारें ७०–७५ वर्षांत कालिदासाच्या ग्रंथांचीं इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, डॅनिश, व इटॅलियन इतक्या भाषांतून भाषांतरें झालीं असून तशीं हिंदुस्थानांतील भाषांतून देखील भाषांतरें झालीं होतीं. दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ही कीं, कालिदासाच्या काव्याची गोडी हिंदुस्थानांतील लोकांपेक्षां युरोपांतील लोकांना जास्त लागली होती! अर्थात् कांहीं युरोपीयन पंडितांनीं जगांतील कविश्रेष्ठांमध्यें कालिदासाला अति उच्च स्थान द्यावें यांत आश्चर्य नाहीं. ॲलेक्झँडर व्हॉन हंबोल्ट यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहेः—

"Tenderness in the expression of feeling and richness of creative fancy have assigned to him (Kalidas) his lofty place among the poets of all nations."

लासन म्हणतो कीं "हिंदुस्थानांतील कविमंडळांत कालिदासच अत्यंत देदिप्यमान असा तारा (Brightest star) होय" सर विल्यम जोन्सनें तर कालिदासास "हिंदुस्थानचा शेक्सपीयर" म्हटलें आहे! पण दुःखाची गोष्ट इतकीच कीं, इतक्या प्रसिद्ध व पूर्णतेस पोहोंचलेल्या कवीच्या कालाविषयीं अगर चरित्राविषयीं निश्चित अशी कांहींच माहिती मिळत नाहीं. प्रसिद्ध टीकाकार मल्लिनाथ हा चवदाव्या शतकांत केव्हां तरी झाला असावा असें कित्येकांचें मत आहे. पण त्याच्या कालिदासाच्या काव्यांवरील टीकेंत देखील खुद्द कालिदासाविषयीं कांहींच माहिती मिळत नाहीं.

दंतकथा मात्र अशी आहे कीं, कालिदास हा उज्जयनीस राहात असून तो विक्रमादित्य राजाच्या दरबारांतील नवरत्नांपैकीं एक होता. परंतु विक्रमादित्य म्हणजे विक्रमाचा आदित्य–शूरत्वामध्यें किंवा तेजस्वीपणामध्यें सूर्य–असा खरा अर्थ होत असल्यामुळें तें नांव इतर पुष्कळ राजांनीं आपल्या नांवास जोडलेलें

आहे. अर्थात् विक्रमादित्यदेखील बरेच होऊन गेले आहेत. त्यामुळें कोणत्या विक्रमादित्याच्या दरबारांत कालिदास होता याविषयीं विद्वान् लोकांत मतभेद आहे. सर विल्यम् जोन्स म्हणतो कीं, कालिदास हा ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत झाला असून तो Horace ( होरेस ) व Virgil ( व्हर्जिल ) यांचा समकालीन होता. बेंटले म्हणतो कीं, कालिदास अकराव्या शतकांत झाला. विल्फर्ड व प्रिन्सेप हे तो कवि पांचव्या शतकांत झाला असें म्हणतात. लासन म्हणतो कीं, तो दुसऱ्या शतकांत झाला. याप्रमाणें पंडितांमध्यें मतभेद आहे.

राजतरंगिणीच्या आधारावर विल्सन म्हणतो कीं, मातृगुप्ताला ज्या विक्रमादित्यानें काश्मीरच्या गादीवर बसविलें, त्या विक्रमाच्या दरबारांत कालिदास झाला व तो विक्रमादित्य पांचव्या (इ. स. ४४१) शतकांत राज्य करीत होता. पण त्या विक्रमादित्यानें शंभर वर्षें राज्य करून तो इ. स. ५४१ मध्यें निधन पावला असेंही म्हणतात. परंतु शत्रुंजय महात्म्यांतील हकीकतीचा विचार केल्यास इ. स. ४४७ मध्यें शिलादित्य राजा राज्य करीत होता, असें स्पष्ट दिसतें. या सगळ्यांसंबंधानें डॉ. भाऊ दाजी म्हणतात कीं:—

"The Siladityas have become as grave a source of confusion in Indian Chronology as the virious Vikramadityas and Chandraguptas."

म्हणजे विक्रमादित्य व चंद्रगुप्त यांच्याप्रमाणें शिलादित्यही इतके झाले आहेत कीं, त्यांनीं आमच्या इतिहासांतील कालानुक्रमांमध्यें नुसता घोंटाळा केला आहे!

शेवटीं डॉ. भाऊ म्हणतात कीं,

"Lastly, we would observe that if the identity of Matrigupta and Kalidas be established, the exact age of the great Sanskrit poet, who is now rising into universal celebrity would be fixed in the middle of the six century of the Christian era; while the fact would be of no less importance to the history of Sanskrit literature than to the credit of humanity. In as much as the prince of India's Poets would be proved to have been distinguished as much for his fine feelings

पाने १२६
८८२६४
५१
१९६३
१६.५५



and purity of conduct as for the highest learning and poetical talent."

म्हणजे डॉ. भाऊ दाजींच्या मतें कालिदास हा ख्रिस्ती शकाच्या सहाव्या शतकाच्या मध्यास झाला हें उघड आहे. डॉ. भाऊंच्या या निबंधासंबंधानें एका चरित्रलेखकानें असा शेरा मारला आहेः—

"In the field of Sanskrit literature, he tried to estimate the age of the Sanskrit poet, Kalidas, and exhibited such a wealth of learning for the time in which he carried on his investigation, that all the advance that has since been made only heightens our admiration for his penetrating insight and sound critical acumen."

डॉ. भाऊ दाजींनीं अनेक बाबींसंबंधानें जुनी माहिती उजेडांत आणण्याच्या हेतूनें एशियाटिक सोसायटीमध्यें वेळोवेळ कांहीं टिपणें वाचलीं असून तीं त्या संस्थेच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध झालीं आहेत. तसें एक टिपण त्यांनीं आमचा मराठी भाषेंतील आद्यकवि मुकुंदराज यांच्या कालासंबंधानें व ग्रंथांसंबंधानें वाचलेलें खंड ९ मध्यें प्रसिद्ध झालें आहे. त्याचा तात्पर्यार्थ इकडे थोडक्यांत देतों.

मुकुंदराज यांचे तीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत; १ विवेकसिंधु, २. परमामृत व ३ मूलस्तंभ. त्यांपैकीं पहिले दोन हे परमार्थपर आहेत, व तिसऱ्यांत कर्त्यानें शिवाची स्तुति व पराक्रम यांचें वर्णन केलें आहे. मुकुंदराजानें "विवेकसिंधू"च्या अकराव्या अध्यायांत आपली गुरुपरंपरा दिली आहे. ती अशीः—आदिनाथ, हरिनाथ व रघुनाथ. हरिनाथ याचा अहमदनगर येथें बाणगंगेच्या तीरावरील एका गांवांत जन्म झाला. हेंच बाणगंगेवरील "जोगाईचें आंबें" म्हणतात तें असावें. ही बाणगंगा नदी पुढें गोदावरीला जाऊन मिळाली आहे. हरिनाथ हा माध्यंदिनशाखीय ब्राह्मण असून त्याचें कुटुंबनांव "चंपे गोरत" (Champe Gorata) असें होतें. त्याच्या वडिलांनीं त्याच्याकडून वेद व शास्त्रें यांचें अध्ययन करविलें होतें. त्यानें बारा वर्षांच्या वयावर "पाशुपतव्रत" आचरून शिवाला प्रसन्न करून घेतलें होतें. त्यानें गौतमीच्या (गोदावरीच्या) तीरावर दत्तात्रय, मुनीश्वर व गुरुशंकर यांनाही प्रसन्न करून घेतलें होतें. एकदां होमहवन चाललें असतां त्याला प्रत्यक्ष शिवाचें दर्शन झालें होतें, असें मुकुंदराज सांगतात. हरिनाथला शिवानें असा वर दिला कीं, जो कोणी त्याचें शिष्यत्व पतकरून

उपदेश घेईल तो " ध्यानी " होईल. हरिनाथचे सुरेंद्रभारतीसारखे पुष्कळ शिष्य होते. त्यांच्या अग्रस्थानीं " रामचंद्र " हा होता. हरिनाथ यानें आणखी पुष्कळ शिष्य तयार केले, त्यांत मुकुंदराज होते.

विवेकसिंधु ग्रंथांत मुकुंदराजानें जीव-शिव यांचें ऐक्य वर्णन केलें आहे. त्यांत त्यांनीं सांख्यशास्त्राचा उल्लेख केला आहे. त्या ग्रंथांत हल्लीं फक्त ( महाराष्ट्राच्या ) कांहीं भागांत आढळून येणारे शब्द आलेले आहेत. उदाहरणार्थ, " वचव " ( may go ) हा शब्द गोवें प्रांतांत प्रचारांत आहे. तो विवेकसिंधूंत आहे. असो. मुकुंदराज हे राजयोगाचा अभ्यास करीत असत. विवेकसिंधूच्या मध्यभागीं पुढील ओंवी आहे—

" नृसिंहाचा बल्लाळ ॥ त्याचा कुमर जैतपाळ ॥
त्यानें करविला हा खेळ ॥ ग्रंथरचनेचा ॥ १ ॥ "

म्हणजे नृसिंहाचा मुलगा बल्लाळ, त्याचा मुलगा जैतपाळ, ह्यानें हा ग्रंथ लिहविला. बल्लाळ तोच बिल्हण ( Bhilam ) आणि जैतपाळ तोच जैत्रपाळ हें उघड आहे. मुकुंदराज व जैत्रपाळ यांच्यासंबंधीं पुष्कळ कथा प्रचारांत आहेत. मुकुंदराज हे ख्रिस्ती शकाच्या बाराव्या शतकाच्या अखेरीस झाले.

डॉ. भाऊ दाजींनीं मुकुंदराजांपेक्षांही प्राचीन मराठी ग्रंथ मिळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्यांत त्यांस यश आलें नाहीं.

---

## प्रकरण नववें.

# हेमाद्रि आणि हेमचंद्र

डॉ. भाऊ दाजी यांनीं मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीपुढें " हेमाद्रि " व " हेमचंद्र " यांसंबंधानें वाचलेलीं दोन टिपणें त्या संस्थेच्या त्रैमासिकांत ( खंड ९ ) प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांतून थोडीशी माहिती सारांशरूपानें इकडे देतों.

हेमाद्रि हा यादव वंशीय राजा महादेव याच्या दरबारांत मंत्री होता. तो जातीनें शुक्ल यजुर्वेदान्तर्गत माध्यंदिन शाखीय ब्राह्मण होता. हेमाद्रीचा दौलताबाद प्रांतांत

जन्म झाला. त्या प्रांतांत माध्यंदिन शाखेचे ब्राम्हण प्रस्तुत काळीं देखील पुष्कळ आढळून येतात. हेमाद्रीनें लिहिलेले तीन ग्रंथ डॉ. भाऊंच्या संग्रहांत होते. १ चतुर्वर्ग चिंतामणि, २ मुक्ताफल व ३. आयुर्वेद रसायन, नांवाची वाग्भटावरील टीका. "चतुर्वर्ग चिंतामणि" या ग्रंथांत १. आचार ( custom and practice ); २. व्यवहार (civil and criminal law); ३. प्रायश्चित्त (penance); ४. इष्ट ( essential ceremonies ); ५. पूर्त ( acts of pious liberality ) व ६ अध्यात्मविद्या ( ontology ), इतके विषय आले आहेत. त्यापैकीं सदरील ग्रंथांत इष्ट–पूर्त–कर्म यांसंबंधानें सूक्ष्म दृष्टीनें विवेचन केलें आहे. व्यवहाराविषयींचें थोडक्यांत विवेचन केलें आहे. संस्कृत वाङ्मयांत श्रुति, स्मृति, व पुराणें याचे अर्थ विषद करण्याकरितां दुसरे बरेच ग्रंथ लिहिलेले आज उपलब्ध आहेत. परंतु त्यांपैकीं कोणताही ग्रंथ विद्वत्ता किंवा विस्तार या दृष्टीनें हेमाद्रीच्या ग्रंथांच्या योग्यतेचा होईल असें वाटत नाहीं. " चतुर्वर्गचिंतामणि " हा ग्रंथ आतां पूर्ण स्वरूपांत मिळत नाहीं. त्याचे पांच खंड आहेत; व्रतखंड, दानखंड, तीर्थखंड, मोक्षखंड व परिशेषखंड. यांपैकीं डॉ. भाऊ दाजींच्या संग्रहांतील हस्तलेखांत फक्त तीन खंड होते; दुसरे दोन नव्हते. पण यांसंबंधाचे दुसऱ्या प्रतींत उल्लेख होते.

" व्रतखंडांत " निरनिराळ्या व्रतांविषयीं व धर्मविधींविषयीं विचार केलेला आहे. त्याला हेमाद्रीनें पुराणाचे–मुख्यतः भविष्य पुराणाचे–आधार दिले आहेत.

"दानखंडा"ची डॉ. भाऊंच्याजवळ असलेली प्रत सन १५६१ सालची होती. त्यांत निरनिराळ्या प्रकारच्या दानांविषयीं व तत्संबंधाच्या धर्मविधींविषयीं विवेचन केलें आहे.

" तीर्थखंड " व " मोक्षखंड " हे भाग डॉ. भाऊंना मिळाले नाहींत.

" परिशेषखंड " हा भाग दुसऱ्या दोन उपलब्ध भागांपेक्षां मोठा आहे. यांत निरनिराळ्या प्रकारच्या श्राद्धांविषयीं व त्यांच्या कालाविषयीं विवेचन आलें आहे.

असो. याप्रमाणें सदहू ग्रंथांत धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांविषयींच विचार केलेला असल्यामुळें त्यास " चतुर्वर्ग चिंतामणि " हें नांव दिलें आहे. हेमाद्रीचें नांव जुन्या पंडितांमध्यें प्रसिद्ध आहे, व त्याची माधवाच्या इतकीच मान्यता आहे. हेमाद्रि व माधव या दोघांनाही धर्मशास्त्राचे मुख्य आधार-

स्तंभ मानण्यांत येत असतें. इतकेंच कीं, माधवाची भाषा हेमाद्रीच्यापेक्षां जास्त प्रौढ व मधुर आहे. पूर्वमीमांसेचा ज्यांनीं अभ्यास केला असेल त्यांना हेमाद्रीचे ग्रंथ समजण्यास कठीण पडणार नाहीं. पण असे अभ्यास केलेले लोक तरी हल्लीं कोठें आणि कितीसे आहेत? यामुळें हेमाद्रीच्या ग्रंथांची कमी अधिक प्रमाणांत उपेक्षाच होत आहे. दुसरी एक गोष्ट हेमाद्रीच्या नांवाला बाधक अशी आहे. हल्लींचे ग्रंथकार हे हेमाद्रीला धर्मशास्त्रावर प्रमाणभूत मानतात. तसे ते त्याला व्यवहारावर मानीत नाहींत.

वाग्भटावर हेमाद्रीची टीका आहे. वाग्भटाच्या वैद्यक ग्रंथाचें "अष्टांग हृदय" असें नांव आहे. त्यावरच हेमाद्रीची टीका आहे.

हेमाद्रीनें लिहिलेला "मुक्ताफल" हा एक ग्रंथ आहे. त्यांत त्यानें "नऊ रस" व "भक्ति" याचें स्पष्टीकरण करण्याकरितां भागवतांतून बरेच उतारे दिलेले आहेत. आरंभींच्या संकल्पावरून व समाप्तिदर्शक श्लोकावरून "मुक्ताफल" हा ग्रंथ "चतुर्वर्ग चिंतामणि" नंतर लिहिला गेला असावा असें वाटतें. त्या ग्रंथाच्या प्रत्येक प्रकरणाच्या शेवटीं "इतिबोपदेवविरचिते" असे शब्द आढळतात. त्यावरून त्याचा बोपदेव हा कर्ता होता असें सिद्ध होतें. बोपदेव हा हेमाद्रीचा एक आश्रित होता अशी दंतकथा आहे. त्यानें लिहिलेले कांहीं ग्रंथ हेमाद्रीनें ( out of compliment ) बहुमानार्थ प्रसिद्ध केले असतील.

बोपदेव नांवाच्या पंडितानें भागवत पुराण लिहिलें अशीही एक दंतकथा आहे. परंतु तो बोपदेव हेमाद्रीच्या वेळेपूर्वी होऊन गेला असला पाहिजे.

एका शिलालेखावरून व ताम्रपत्रलेखावरून असें नक्की ठरलें आहे कीं, चंद्रवंशांतर्गत यदुवंशांत—भिल्लम, जैत्रपाल, सिंधण, कृष्ण, महादेव (कृष्णाचा भाऊ), व रामदेव ( कृष्णाचा मुलगा ) असे राजे झाले. शेवटच्या राजानेंच तेलंगण, गुर्जर व माळवा येथील राजांचा पराभव केला. त्याला "राय नारायण", "राय पितामह", "द्वारावतीपरिवृद्ध" अशा पदव्या होत्या. त्यांचा हेमाद्रि हा मंत्री होता. त्या राजाला पुढें मुसलमानीसत्तेपुढें मान वांकवावी लागली. त्याची "सेटुना देश" ( दौलताबाद ) ही राजधानी होती.

हेमाद्रीनें आपली वंशावळ अशी दिली आहे. वामन, वसुदेव, कामदेव, हेमाद्रि. त्याचें गोत्र वत्स होतें. हेमाद्रि हा ख्रि. श. बाराव्या शतकाच्या अखेरीस किंवा तेराव्याच्या सुरवातीस झाला.

हें टिपण वाचल्यावर एशियाटिक सोसायटी तर्फे सभेंत डॉ. भाऊ दाजी यांचे आभार मानण्याबाबतचा ठराव डॉ. बुल्हर यांनीं पुढें आणला. त्याला अनुमोदन देतांना रा. सा. मंडलिक म्हणालेः—

"I have much pleasure in seconding the proposition of Dr. Buhler that the Society offers its best thanks to Dr. Bhau Daji for the very able and interesting paper he has favoured us with to-day. The words of Hemadri are not cited as authorities on the Vyavahar (or civil law) as enforced in the Courts of this presidency; but they are in great repute amongst the people and their publication will serve greatly in setting doubtful and contested paints of law as observed by the various schools in India.........The present communication by Dr. Bhau Daji I take to be merely an earnest of what he has in store for our Society—a small instalment of what is due to us from the learned Vice-President."

## हेमचंद्र.

डॉ. भाऊ दाजी यांच्या दुसऱ्या एका टिपणावरून पुढीलप्रमाणें हेमचंद्राचें अगदीं संक्षिप्त चरित्र देतों.

हेमचंद्र हा अकराव्या–बाराव्या शतकांत एक जैन धर्मीय विद्वान् मनुष्य होऊन गेला. त्याच्या बापाचें "चाचीग" (Chachiga) असें नांव असून आईचें "चाहिनी" अगर "पाहिनी" असें नांव होतें. चाचीग हा धंडुका येथें मोध-जातीचा (Modha Vanias) एक शेट (श्रेष्ठीः merchant) असून त्याच्या पोटीं हेमचंद्र हा सन १०८८ मध्यें जन्मला. त्यावेळीं अशी आकाशवाणी झाली कीं, हा मुलगा पुढें "जिनाप्रमाणेंच" जैन धर्माचा मोठा पुरस्कर्ता होईल. चाचीग यानें त्या प्रसंगीं चांगला पुत्रजन्मोत्सव करून मुलाचें "चांगदेव" असें नांव ठेविलें. मुलगा पांच वर्षांचा झाला त्या वेळीं एके दिवशीं देवेंद्र नांवाचा एक जैन पंडित आपली मंडळी (संघ) बरोबर घेऊन चाचीगच्या घरीं आला. तेव्हां खुद्द चाचीग घरीं नव्हता. परंतु त्याच्या बायकोनें आलेल्या पाहुण्यांचें चांगल्या रीतीनें आदरातिथ्य केलें. संघांतील मंडळींनीं चाहिनी बाईला म्हटलें, "तुम्ही आपल्या मुलाला यतिवेष धारण करून धर्मप्रसार करूं द्या." बाईला मोठें कोडें पडलें.

"होय" म्हणावें तर यजमान घरीं नव्हते. "नाहीं" म्हणावें तर संघांतील मंडळींचा अपमान केल्यासारखें होतें. तरी तिनें पूर्ण विचारांतीं मुलास जाऊं देण्याचें ठरविलें आणि त्याला गुरु देवेंद्र सुरी यांच्या पायावर आणून घातलें! मुलास काय? त्याला "तूं येतोस काय?" असें संघानें विचारतांच, तो "होय" म्हणाला व तो त्यांच्या बरोबर निघाला. संघांतल्या मंडळींनीं मुलास बरोबर घेऊन आपल्या तीर्थयात्रा केल्या, व अखेर त्यांनीं त्यास (Karnavati) कर्णावतीस आणलें. तिकडे देवेंद्र यानें मुलास "उदयन" मंत्री यांच्या घरीं ठेवलें.

तिकडे चाचीग घरीं आल्यावर त्याला मुलाविषयींची सर्व हकीकत समजली. पण त्यानें मुलाला पाहिल्याशिवाय अन्न ग्रहण करणार नाहीं असा निश्चय केला. तो मग कर्णावतीस गुरुदेवेंद्र सुरी यांचे जवळ आला. तिकडे गुरुजींचा धर्मोपदेश ऐकून त्याच्या मनाचें समाधान झालें व मग त्यानें उदयन मंत्री याचे घरीं भोजन केलें. उदयन यानें चांगदेवास (मुलास) चाचीगच्या मांडीवर बसविलें व त्यानें त्याला (चाचीगला) तीन महावस्त्रें व तीन लक्ष द्रव्य अर्पण केलें. चाचीग आनंदभरित होऊन म्हणाला, "तुम्ही तीन लाख दिले तें तुमच्या औदार्याला अनुरूपच आहे. परंतु तुमची अनन्य भक्ति हेंच माझ्या मुलाबद्दलचें मी बक्षिस समजतों. मी त्याला कोणत्याही मोबदल्याशिवाय आनंदानें देण्यास तयार आहें." हें ऐकून उदयनला फार संतोष झाला व त्यानें त्याला म्हटलें, "तुम्ही मुलास गुरुजींच्या स्वाधीन केल्यास तो पुढें सन्मान्य पद पावेल. आतां तुम्हांस योग्य दिसेल तसें करा." चाचीगनें लागलीच संमति दिली आणि चांगदेवाला गुरुजींच्या स्वाधीन करण्यांत आलें. चांगदेवास मग दीक्षा देण्यांत आली. उदयननें ह्या प्रसंगीं मोठा उत्सव केला. चांगदेवचें "सोमदेवमुनि" असें नांव ठेवण्यांत आलें.

गुरुजींनीं मुलांकडून—सोमदेव मुनीकडून—एका कोळशाच्या राशीला स्पर्श करविला तों त्या राशीचा सोन्याचा ढीग बनला! तो प्रकार पाहतांच सर्वांस आश्चर्य वाटलें व तेव्हांपासून सोमदेवाचें "हेमचंद्र" हें नांव पडलें. खरें पाहिल्यास तो त्या नावानेंच प्रसिद्ध आहे.

सदर्हू प्रकारांत डॉ. भाऊ दाजींना बरीच अतिशयोक्ति दिसली, आणि ते म्हणाले कीं, याप्रमाणें शब्दार्थाचे श्लेष काढून अतिशयोक्तीनें रचलेल्या पुष्कळ गोष्टी जैन ग्रंथांत भरल्या आहेत. असो. त्या सुमारास गुजराथेंत "अन्हिलपुर

पट्टन"( Anahilpura Pattan ) येथें चालुक्य वंशांतला "कुमार पाल" नांवाचा राजा राज्य करीत होता. त्या राजाच्या कारकीर्दीत हेमचंद्र याची फार मानमान्यता वाढली. राजा आपणांस हेमचंद्राचा शिष्य समजत असे. कुमारपाळ राजानें हेमचंद्राच्याच आज्ञेवरून जैन धर्माच्या प्रसारास उत्तेजन दिलें व आपल्या राज्यांत त्यानें प्राणिहिंसा व मांसाशन हीं बंद केलीं. गुजराथेंत अगदीं खालच्या वर्गांतील लोक देखील निवृत्तमांस असतात हें प्रसिद्ध आहे. तो प्रकार बहुधा कुमारपाल राजाच्या वेळेपासूनच चालू झाला असावा असें दिसतें.

राजा कुमारपाल यानें १४०० विहार बांधविले. हेमचंद्र यास आपल्या आश्रयदात्याला संतुष्ट कसें राखावयाचें हें चांगलेंच माहीत होतें. जरी त्याचें लक्ष मुख्यतः जैन धर्माच्या प्रसाराकडे असे तरी तो राजाच्या किंवा राजाजवळ वजन पाडणाऱ्या ब्राह्मण लोकांच्या मनाचा कल पाहून केव्हां केव्हां वागत असे. असो. हेमचंद्रानें धातुपारायण, सिद्ध हैम शब्दानुशासन, प्राकृत शब्दानुशासन, अभिधान चिंतामणि, त्रिषष्टिशलाका पुरुषचरित्र वगैरे संस्कृत व प्राकृत असे अनेक ग्रंथ लिहिले आहेत. डॉ. भाऊ म्हणतात कीं, डॉ. बुल्हरजवळ "हेमचंद्राचा निघंटु" म्हणून एक ग्रंथ होता. त्यांत कर्त्यानें अनेक वनस्पतींविषयीं माहिती दिलेली होती.

जैन लोक हे आपल्यांत पुष्कळ विद्वान् व धर्मनिष्ठ असे साधु होऊन गेले असें सांगतात, पण त्या सर्व मालिकेंत हेमचंद्र हाच खरा हिरा शोभेल !

कुमारपालप्रबंध; कुमारपालचरित्र; ऋषिमंडलवृत्ति; व प्रबंधचिंतामणि या ग्रंथांत कुमारपाल व हेमचंद्र यांच्यासंबंधाच्या बऱ्याच अतिशयोक्तीनें भरलेल्या गोष्टी व वर्णनें आहेत. पण त्यांतून विश्वसनीय म्हणतां येईल असें हें–वर दिलेलें– हेमचंद्राचें जीवनचरित्र डॉ. भाऊ दाजींनीं रेखाटलें आहे.

हेमचंद्राचा सन १०८८ सालीं जन्म झाला. त्यानें सन १०९७ मध्यें यतिदीक्षा घेतली; सन ११०९ मध्यें त्याला " सुरी " ( विद्वान् ) ही पदवी मिळाली; व सन ११७२ मध्यें म्हणजे ८४ वयावर त्यानें समाधि घेतली.

---

प्रकरण दहावें.

## माधव व सायन.

डॉ. भाऊ दाजींनीं "माधव व सायन" या दोघां बंधूंच्या संबंधानें मुंबईच्या रॉ. ए. सोसायटींत वाचलेलीं टिपणें त्या संस्थेच्या त्रैमासिकांत-खंड ९-प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांच्या आधारानें पुढील कांहीं ओळी लिहितों.

माधव व सायन यांची पाश्चात्य पंडितांना पूर्वीच माहिती झालेली होती. सुमारें पन्नास-साठ वर्षांपूर्वी ( १८६७ ) प्रो. मॅक्स मुल्लर यांनीं ऋग्वेद संहितेची एक भली जाडी आवृत्ति प्रसिद्ध केली होती. त्या संहितेवरील भाष्यकार म्हणून सहहूं दोन महापुरुषांची पाश्चात्य मंडळीस माहिती झाली होती. माधव याला "माधवार्य," "माधवाचार्य," किंवा "माधवामात्य" अशींही नांवें होतीं. माधव हा ख्रिस्ती शकाच्या चवदाव्या शतकांत झाला. तो कर्नाटक प्रांतांत तुंगभद्रेच्या कांठावरील विजयनगर येथें होऊन गेला. तो भारद्वाज गोत्री यजुः-शाखीय ब्राह्मण असून त्याचें बौद्धायन सूत्र होतें. त्याच्या बापाचें नांव "मायन" ( Mayana ) असून आईचें "श्रीमती" असें नांव होतें. त्याचे दोन सहोदर ( uterine ) बंधु असून "सायन" व "भोगनाथ" अशीं त्यांचीं नांवें होतीं. असो. विजयनगर येथें यदुवंशांतला श्रीबुक्कराजा राज्य करीत होता. माधव हा त्या राजाचा मंत्री असून कुलगुरुही पण होता. माधवाच्या विद्वत्तेमुळेंच त्याला "माधवार्य" वगैरे संज्ञा प्राप्त झाल्या होत्या. त्यानें लिहिलेले पुष्कळ ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं कांहीं ग्रंथ त्यानें आपला भाऊ सायन याच्या सहाय्यानें लिहिले आहेत. ऋग्वेदावरील भाष्य, ऐतरेय ब्राह्मणावरील भाष्य व तैत्तिरीय संहितेवरील भाष्य हे ग्रंथ दोघांनीं मिळून लिहिले आहेत. हे सर्व "माधवकृत वेदार्थप्रकाश" या नांवानें प्रसिद्ध आहेत. संहितेवरील भाष्याच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं "इति सायनाचार्यविरचिते माधवीये वेदार्थप्रकाशे" असे समाप्तिदर्शक शब्द आढळतात. फक्त ऐतरेय ब्राह्मणावरील भाष्याशिवाय बाकी सर्व पूर्वोक्त ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत.

माधवाची पराशर स्मृतींवरही एक टीका आहे. पराशर हा कलियुगांत धर्म-शास्त्र विषयावर सर्वमान्य ग्रंथ गणलेला आहे हें विश्रुतच आहे. माधवाची टीका ही नंदपंडिताच्या टीकेपेक्षां पुष्कळच सरस आहे.

माधवाचा " जैमिनीय न्यायरत्नाधिकरण माला " नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध आहे, व त्यावर त्याचीच एक टीका आहे. तिची जैमिनीय पूर्वमीमांसा समजण्याच्या कामीं मदत व्हावी हा हेतु आहे. त्याचप्रमाणें उत्तर मीमांसेवर देखील माधवाचा एक सटीक ग्रंथ आहे. त्याचें " वेदांताधिकरण रत्नमाला " असें नांव आहे. यांत व्याससूत्रांचाच अनुक्रम राखण्यांत आला आहे.

माधवाची भाषा विद्वत्ताद्योतक व गंभीर असली तरी साधी व मनोरम आहे. माधवाचें " शंकरविजय " हें पुस्तक काव्य या दृष्टीनें उत्तमच आहे. त्यांत शंकराचार्यांच्या विजयाचें वर्णन आहे. पण आचार्यांचें चरित्र या दृष्टीनें तें फारसें विश्वसनीय मानतां येणार नाहीं. त्याचें नांव "शंकरविजयडिंडिनी " असें आहे. त्यांत माधवानें आपणास " अभिनव कालिदास " असें म्हटलें आहे. पण ती पदवी अगदींच अनुचित आहे असें म्हणतां येणार नाहीं. माधवाचें " काल-माधव " या नांवाचें एक " हिंदु पंचांगपद्धती " वर पुस्तक आहे. त्याचप्रमाणें ब्राम्हणांच्या आचारासंबंधानें " आचार माधव " नांवाचेंही त्याचें एक पुस्तक आहे. " व्यवहार माधव " यांत कायद्याचें विवरण केलेलें आहे. " धातुवृत्ति " हा व्याकरणावरील ग्रंथ आहे. पण त्याची प्रत डॉ. भाऊ दाजींच्या जवळ नव्हती व त्याचा कर्ता कोणता " माधव " हेंही त्यांनीं स्पष्ट सांगितलें नाहीं. भट्टोजी दीक्षित व अन्य वैय्याकरण हे नेहमीं माधवाचे म्हणून उतारे देत असतात. ते बहुधा धातुवृत्तींतलेच असावेत. माधवाचा एक " सर्वदर्शनसंग्रह " नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांत त्यानें हिंदुधर्मांतील निरनिराळ्या संप्रदायांचीं मतें दिलेलीं असून त्यासंबंधीं विवरण केलें आहे. संहितेवरील भाष्याच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं पुढील लांबलचक असें एक वाक्य असतें. "इति श्री राजाधिराज परमेश्वर मार्गप्रवर्तक श्रीवीर बुक्कराजस्याज्ञापालकेन माधवामात्येण विरचिते वेदार्थ प्रकाशे." यावरून या पुस्तकाच्या बाबतींत सायनाची मदत नसावी असें दिसतें. त्याच प्रमाणें " कालमाधव, " " आचार माधव," " व्यवहार माधव," हे ग्रंथ केवळ माधवानेंच लिहिलेले दिसतात. " यज्ञतंत्र सुधानिधि " हा ग्रंथ मात्र सायनाचा दिसतो.

" सर्वदर्शनसंग्रह " या ग्रंथांत माधवानें आपल्या गुरुजींचें "सर्वज्ञ विष्णु" असें नांव दिलें आहे. त्या ग्रंथाच्या शेवटीं " सायन माधव " असें म्हटलेलें असल्यामुळें तो ग्रंथ दोघांनीं लिहिला होता असें दिसतें. असो. पण " काल-

माधव " व इतर ग्रंथ यांवरून पाहतां माधवाच्या गुरुजींचें नांव " विद्यातीर्थ " अगर " भारतीतीर्थ " असें होतें असें दिसतें.

कर्नाटक प्रांतांत तुंगभद्रेच्या कांठावर " विरूपाक्ष " किंवा " हंपी विरूपाक्ष" या नांवाचें देऊळ आहे. त्याच्याजवळच "विजया" ही राजधानी होती. तेथें मूळ यादव वंशांतील श्री संगम राजा राज्य करीत होता. त्याच्या पाठीमागून श्री बुकराज व नंतर त्याचा मुलगा हरिहर असे राजे राज्य करीत होते. हरिहराच्या हुकुमावरून माधव हा जयंतीपूर येथें अधिकार चालवीत होता. माधवानें त्याच वेळीं गोव्यांतून मुसलमान लोकांना घालविल्याचें मागील एका प्रकरणांत सांगितलेंच आहे. याच माधवानें गोव्यांत श्रीसप्तनाथाच्या ( सप्त काटीश्वराच्या ) मूर्तीची स्थापना केली. माधवाच्या मृत्यूनंतर नरहरि हा जयंतीपूरचा कारभार चालवूं लागला असो.

हेमचंद्र, माधव, सायन वगैरे ग्रंथकारांच्या संबंधीं नवीन माहिती आपल्या टिपणांच्याद्वारें डॉ. भाऊ दाजींनीं सभेपुढें सादर केल्यामुळें सभासदांना इतका आनंद झाला व अशी अधिक माहिती मिळावी ही त्यांची इच्छा इतकी उत्कट रीतीनें दिसून आली कीं, एशियाटिक सोसायटीच्या अध्यक्षांनींच ती सर्वांच्या तर्फे एका सभेच्या वेळीं स्पष्टपणें बोलून दाखविली. सन १८६९ जानेवारी ता. १२ रोजीं मुंबईच्या एशियाटिक सोसायटीची सभा होती. त्या वेळीं अध्यक्ष मिस्टर जस्टिस न्यूटन पुढीलप्रमाणें बोलले:—

"The meeting were much indebted to Dr. Bhau Daji for these interesting notes. He was a member, whose zeal and erudition had for many years been reflecting honour on the Society. The result of his researches on many subjects of prominent historical interest in connection with the more ancient times of India were already to some extent recorded in our journal and the President trusted that the fruits of other inquiries in the same direction which had, he believed, already been gathered in, would be presented through the Society to the student of Indian history. Mr. Bhau Daji was adding to our obligation to him by ihs inquiries into the times and surroundings of men who in more modern days had given

direction to the mind and thought of this country or otherwise left their mark on it and it was a subject of congratulation that one so qualified had taken this work in hand with respect to those especially who had arisen in our own presidency and chiefly influenced it by their lives and writings."

अध्यक्षांच्या भाषणांतील शेवटचा उल्लेख मुकुंदराजासंबंधानें होता हें उघड आहे.

---

## प्रकरण अकरावें.

# इतर जुनी माहिती.

डॉ. भाऊ दाजींचा जुने हस्तलेख, जुनी माहिती मिळविण्याचा सपाटा नेहमीं चालू असे हें मागें सांगितलेंच आहे. पण ज्या माहितीविषयीं त्यांनीं निबंध अगर टिपण लिहिलें त्यांपैकींच कांहींचा इकडे थोडक्यांत उल्लेख करतों.

सन १८७१ च्या सुमारास त्यांना काश्मीरमध्यें बाणकृत हर्षचरिताच्या हस्तलेखाची एक पूर्ण प्रत मिळाली. तो लेख भाऊंच्या एका पंडितानें मिळविला. तो काश्मीरांत जाऊन कोठें कोठें लायब्ऱ्या आहेत याचा तपास करीत होता व कांहीं अश्रुतपूर्व हस्तलेख मिळाले म्हणजे त्याच्या नकला घेत होता. सदरहू हर्षचरिताच्या मूळ हस्तलेखाची तारीख शके ९७७ चैत्र शुद्ध १४ ही होती. हा हस्तलेख मिळाला तो अगदीं पूर्ण स्थितींत होता हें वर आलेंच आहे. त्याचे आठ उछ्वास आहेत. आठवा उछ्वास पूर्ण आहे, हाच या लेखाचा विशेष आहे. आठवा उछ्वास अपूर्णच राहिला आहे, तो पूर्ण करण्यास बाण जिवंतच राहिला नाहीं असा सामान्य समज होता. पण तो निराधार होता. हर्षचरितावर एक "हर्षचरितसंकेत" नांवाची टीका आहे. ती पुण्यकरसुत शंकरपंडित याची आहे.

डॉ. भाऊ दाजी यांनीं आपल्या प्रवासांत बऱ्याच जैन लायब्ऱ्या धुंडाळल्या होत्या. त्यायोगानें यांनीं कांहीं नवीन गोष्टी उजेडांत आणल्या. ख्रिस्ती शकाच्या आरंभास व पूर्वीं शक लोकांनीं हिंदुस्थानच्या कांहीं प्रांतांवर स्वाऱ्या केल्याचें इतिहास सांगतो. पण ते शक लोक कोण होते व कोठून आले याचा बरोबर पत्ता नव्हता. यासंबंधानें "कालकाचार्या"ची गोष्ट म्हणून एक लेख डॉ. भाऊंना सांपडला

होता. तें पुस्तक त्यांनीं मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीपुढें सादर केलें. तेवढयानें शक लोकांच्या उत्पत्तीचा अगर उगमस्थानाचा कायमचा निकाल लागला असें नाहीं, पण त्यासंबंधीं अनेक पंडितांनीं अनेक कल्पना सुचविल्या. त्यांत ही एक कालकाचार्यांची गोष्ट आहे. पण ती प्रकाशांत आणल्याचें श्रेय मात्र डॉ. भाऊ दाजींचें आहे. डॉ. भाऊंचा एक चरित्रकर्त्ता म्हणतोः—

"It was he (Dr. Bhau Daji) that was responsible for the bringing out of the Jain story of Kalakacharya in connection with the Saka invasions—a problem that remains still unsolved."

"कालकाचार्य कथा" नांवाचें तें दहा पानी पुस्तक होतें. त्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें थोडक्यांत कथा आहेः "धरावास" नांवाच्या गांवांत वज्रसिंह नामक एक राजा होता. त्याची सुरासुंदरी नांवाची राणी होती. त्यांना एक मुलगा होता. त्याचें नांव "कालकसुरी" व एक मुलगी होती. तिचें नांव सरस्वती. "कालक" यानें गुणसुंदर सुरीपासून जैनधर्माचा उपदेश घेतला होता. व सरस्वतीनें कालकपासून उपदेश घेतला होता. कालक व सरस्वती हीं दोन्ही माणसें मिळून एकदां (माळवा प्रांतांतील) अवंतीला गेलीं होतीं. सरस्वती ही इतर ब्रह्मचारिणी स्त्रियांबरोबर (Nuns) फिरत असतां उज्जयनीचा राजा गर्दभिल्ल याची तिजकडे नजर गेली व तो तिच्या सौंदर्यानें मोहित झाला. त्यानें मग तिला आपल्या अंतःपुरांत—जनानखान्यांत—बळजबरीनें नेऊन ठेवविलें. कालकाचार्यांनें राजाला जाऊन विनयपूर्वक सांगितलें कीं, सरस्वतीनें आमरण यतिधर्मानें (ब्रह्मचर्यव्रतानें) राहण्याचा संकल्प केलेला असल्यामुळें राजानें तिला सोडून द्यावें ! शिवाय राज्यांत कोणावर बलात्कार व अन्याय झाला असेल तर त्याचें संरक्षण करणें हें राजाचें पहिलें कर्तव्य होय. पण राजानें तें त्याचें म्हणणें ऐकलें नाहीं ! कालकाचार्यानें मग याबद्दल आपल्या संघाकडे तक्रार नेली. संघानें राजाची कानउघाडणी करण्याची खटपट केली, पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं ! कालकाचार्यानें मग राजावर सूड घेण्याचा बेत करून त्याला राजपदावरून भ्रष्ट करण्याच्या तो उद्योगास लागला. कालकाचार्यानें वेडेपणाचें सोंग घेतलें, अंगास राख फांसली आणि तो उज्जयनी शहरांतून इतस्ततः भटकूं लागला. राज्यांतील जुन्या मंत्री लोकांनीं सरस्वतीला सोडून देण्याविषयीं राजाची पुष्कळ विनवणी केली, पण त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं व राजानें आपला वर्तनक्रम सोडला नाहीं.

पुढें कांहीं दिवसांनीं कालकाचार्य सिंधु नदीच्या पश्चिम कांठाच्या बाजूनें गेला. तिकडे "साही" ( Sahi ) राजे राज्य करीत होते. "कालक" हा तिकडे जाऊन एका मोठ्या साहीच्या घरीं राहूं लागला. कालकाला फल ज्योतिषाची चांगली माहिती होती. त्याच्या जोरावर त्यानें मोठ्या कुशलतेनें थोड्याच दिवसांत त्या साहीवर आपली छाप बसविली. एके दिवशीं तो साही उदास होऊन दुर्मुखलेला असा बसलेला कालकनें पाहिला. व त्यानें लागलीच साहीला "असें आज कां ? " असें विचारलें त्यानें सांगितलें कीं, " आमच्या राजानें ( साहीन साही यानें ) माझें डोकें उडवून तें एकदम आपणाकडे पाठविण्यास सांगितलें आहे. व आणखी अशाच ९५ राजांना—मुख्य साहींना—असाच हुकूम फर्माविण्यांत आला आहे." त्यावर कालकनें सांगितलें कीं, " तुम्ही सगळे ( साही मुख्य) मिळून सैन्य एकत्र करा आणि हिंदुस्थान देशावर स्वारी करा." तो कालकाचार्यांचा सल्ला त्याला पटला. त्याप्रमाणें त्या सर्व साही राजांनीं आपापलीं सैन्यें एकत्र जमविलीं आणि ते सिंधु नदी उतरून अलीकडे आले. ते सौराष्ट्र देशांत येतांच पावसाळा जवळ आल्यामुळें सगळे तिकडेच तळ देऊन राहिले. ते सर्व साही राजे कालकाचार्याला आपला गुरु मानीत असत व त्याची आज्ञा शिरसा मान्य करीत असत.

पावसाळा संपल्यावर कालकाचार्यानें त्या सर्व साही राजांना सांगितलें कीं, " तुम्ही अवंती देशावर चालून जा आणि अवंतीचा राजा गर्दभिल्ल याचा पराभव करून त्याचें राज्य आपल्यामध्यें वांटून घ्या. " यावर त्या सगळ्यांनीं "आमच्याजवळ पैसा नाहीं " असें सांगितलें. त्याबरोबर कालकाचार्यानें आपल्या मंत्रसामर्थ्यानें सोन्याच्या विटा ( gold-bricks ) उत्पन्न करून त्या राजांस दिल्या. नंतर ते राजे आपलीं रणवाद्यें ( drums ) वाजवीत वाजवीत लाट देशांत ( Broach ) आले. आणि ते तिकडील बालमित्र व भानुमित्र या राजांना बरोबर घेऊन अवंती देशाच्या हद्दीवर येऊन थडकले. अवंतीचा राजा आपलें सैन्य घेऊन बाहेर पडला, व दोहोंबाजूंचीं सैन्यें धनुष्यें व भाले घेऊन लढले. पण अवंतीचा राजा, आपल्या सैन्याचा पराभव झालेला पाहतांच गुप्त झाला आणि एकदम उज्जयनीस निघून आला. मग शत्रूच्या सैन्यानें येऊन त्या शहरास वेढा दिला. एके दिवशीं असें झालें कीं, उज्जयनीशहरांतून कोणीच लढाईस आला नाहीं ! तेव्हां साहीराजांनीं गुरुजींना ( कालकाचार्यास ) त्याचें कारण विचारलें. त्यानें उत्तर दिलें कीं, " आज शुक्ल अष्टमी आहे. तेव्हां अवंतीचा राजा गर्दभी विद्या

संपादन करण्याचा प्रयत्न करीत असेल." त्या राजांनीं जाऊन गांवांत तपास केला, तों खरोखरीच एक गाढवी–गर्दभी–बाजारांतील एका घरांत शिरतांना दिसली. लागलीच ती गोष्ट गुरुजींना कळविण्यांत आली. त्या गाढवीची शक्ति इतकी होती कीं, तिनें एकदां आवाज केल्याबरोबर एकशें आठ धनुर्धारी (archers) मारले जात असत. यावर गुरुजींनीं एक युक्ति काढली. स्वतः कालकाचार्य हाताचे चपल असत. ते तीरकमठा घेऊन त्या गाढवीजवळ गेले. आणि त्यांनीं सर्व साहीराजांस सांगितलें कीं, गर्दभीनें तोंड उघडल्याबरोबर तुम्ही सगळे मिळून एकदम तिच्या तोंडांत बाणांचा असा मारा करा कीं, ती गुदमरून जावी! साही राजांनीं तसें केलें. त्याबरोबर त्या गर्दभीनें भिऊन जाऊन कालकाचार्यांच्या मस्तकावर आपल्या मलमूत्राचा उत्सर्ग करून ( Covered his head with her solid and liquid products ) ती अदृश्य झाली. असा प्रकार होतांच गर्दभिल्ल राजाचे हातपाय मोडले व तो अगदीं नाउमेद झाला. साही राजांनीं त्याला पकडून आणून कालकाचार्यांच्या पायाजवळ उभें केलें. राजा पुरा लज्जित झालेला असल्यामुळें तो वर मान करून पाहीना ! कालकाचार्यानें त्याची निर्भत्सना करून म्हटलें कीं, "तूं एका यति वेषांतल्या स्त्रीला व्रतभ्रष्ट केल्यामुळें जें तूं महत्पाप केलेंस त्याचें हें तुला फळ मिळालें आहे. आतां तरी तो दुर्मार्ग सोडून तूं सन्मार्गानें वाग." राजाच्या मनाला हें बोलणें फार बोंचलें. परंतु काय करणार? लागलीच त्याला उदार मनानें बंधमुक्त करून सोडून देण्यांत आलें. सरस्वतीनें मग पुन्हा यतिवेष धारण केला व ती व्रतस्थ रीतीनें राहूं लागली. ज्या साही राजाच्या घरीं कालकाचार्य राहिले होते त्याला त्या सर्व राजांचा अधिपति करून उज्जयनी शहर त्याच्या ताब्यांत देण्यांत आलें. बाकीच्या साही राजांनीं त्या देशाचे निरनिराळे भाग करून आपआपसांत वांटून घेतले. हाच "शक वंश" (Scythian race) होय. कालकाचार्यानें मग प्रायश्चित्त घेतलें व आपल्या सर्व संघास संतुष्ट केलें.

भडोचचे ( मागें सांगितलेले ) बालमित्र व भानुमित्र हे कालिकाचार्यांचेच भाचे होते. त्यांच्या आग्रहामुळें गुरुजी चातुर्मास्याकरितां तिकडे गेले. गुरुजींचीं प्रवचनें ऐकून राजे संतुष्ट झाले; व जिन नायकाचाच ( जैन ) धर्म उत्तम आहे असें ते म्हणाले. पुढें गुरुजी महाराष्ट्रांतील पैठण येथें आले. तिकडे ह्या वेळीं सद्गुणी व प्रभावशाली राजा सात्यायन राज्य करीत होता. असो. नंतर कांहीं दिवसांनीं ब्राह्मण वेषानें आलेल्या इंद्राला गुरुजींनीं उपदेश केला व राहिलेलें आयुष्य धार्मिक वृत्तीनें घालवून ते अखेर स्वर्गास गेले.

ही कथा डॉ. भाऊ दाजींजवळच्या एका पुस्तकांत दिल्याप्रमाणें आहे. दुसऱ्या निरनिराळ्या पुस्तकांतही थोड्या थोड्या फरकानें हीच कथा देण्यांत आली आहे. एकांत असें लिहिलें आहे कीं, महावीराच्या निर्वाणानंतर ४५३ वर्षांनीं गर्दभिल्लाचा नाश झाला. कालकाचार्यही अनेक झाले असें म्हणतात. तिसरा कालकाचार्य ख्रि.श. ९९३ च्या सुमारास झाला असेंही म्हणतात.

कांहीं पाश्चात्य लेखक म्हणतात कीं, महाभारतांत ज्या शकांचा उल्लेख आहे तेच हे शक असावेत. " Scy *thae* " याचाच समानार्थक शब्द पर्शियनमध्यें "Sakae" हा आहे. स्ट्रेबो म्हणतो कीं ज्या फिरस्त्या रानटी ( nomad ) जातीच्या लोकांनीं ग्रीक लोकांपासून " Bactria " घेतलें, त्यांत शकरावली ( Sakaravli ) हे होते.

पुराणांत जे भविष्यकाळीं राजे होतील असें सांगितलें आहे त्यांत १६ शक राजे, ८ यवन राजे, ७ आभीर राजे, व १० गर्द भिल्ल राजे समाविष्ट झालेले आहेत. नाशिकच्या शिलालेखांत उषवदात (नहपानचा जांवई) यास शक म्हटलें आहे. कान्हेरीच्या लेण्यांत एका शकसेनचा उल्लेख आहे.

गोतमीपुत्र—पदुमावीचा मुलगा व दक्षिणापथचा राजा—आपण शक, यवन व पल्वव यांना जिंकल्याचें सांगतो. भाऊ दाजीच्या मतें गोतमीपुत्र हा राजा ख्रिस्ती शकाच्या दुसऱ्या शतकांत शेवटीं झाला. असो.

शालिवाहन शकाविषयीं विद्वान् लोकांत मतभेद आहे. डॉ.भाऊ दाजी म्हणतात कीं, नहपान यानें तो शक इ. स. ७८ मध्यें सुरू केला. दत्त म्हणतात कीं, तो कनिष्क राजानें सुरू केला. पण तो कोणीही सुरू केलेला असो, जुने संस्कृत ग्रंथ, ताम्रपट, दानपत्रें वगैरे सर्व लेख त्याच शकांत लिहिलेले आढळतात इतकें मात्र खरें. विक्रमशक हा मुळीं दहाव्या शतकापर्यंत उपयोगांतच नव्हता. तो फक्त जैन लोक वापरीत असत. मग तो गुजराथेंतील पाटनच्या (अनहिल्लपुर) राजांनीं प्रथम उपयोगांत आणला.

जैन ग्रंथांमध्यें डॉ. भाऊ दाजींना एक " मेरु तुंग याची थेरावली " म्हणजे मेरु तुंग या जैन पंडितानें लिहून ठेविलेली राजवंशावळ ( Geneological succession tables ) मिळाली. मेरु तुंग हा एक मोठा जैन पंडित होता. तो पंधराव्या शतकांत होऊन गेला. त्यानें चार ग्रंथ लिहिले आहेत. त्यांच्या

प्रति डॉ. भाऊ दाजींच्या संग्रहांत होत्या. १ प्रबंधचिंतामणि ( Annals of Gujarath ); २ महापुरुष चरित्र—अनेक जैन साधूंचीं चरित्रें; ३ षड्दर्शन विचार–म्हणजे सहा दर्शनांचा संक्षिप्त इतिहास; ( जैन, बौद्ध, सांख्य, जैमिनीय ( मीमांसा ), औलुक्य ( कणाद आणि ' गौतमी'य ) व ४ था–थेरावली, म्हणजे कांहीं जुन्या ऐतिहासिक ग्रंथावरील भाष्य. हे सर्व ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिलेले आहेत. पण त्यांत गाथेंतील कांहीं उतारेही आहेत. डॉ. भाऊ दाजींच्याजवळ आणखी कांहीं पटावल्या होत्या, पण त्यांत मेरुतुंग याचीच ऐतिहासिक दृष्टीनें महत्वाची होती. मेरुतुंग यानें आपला ग्रंथ प्रबंधचिंतामणि हा इसवी सन १४२३ मध्यें लिहिला असें त्या ग्रंथांतच शेवटीं लिहिलें आहे.

मेरुतुंगच्या पटावलींवरून प्राचीन राजवंशावळी ठरविल्या आहेत ही गोष्ट खरी. परंतु या बाबतींत इतर पंडितांनीं पुढें आणखी शोध केल्यामुळें त्या वंशावळींतल्या राजांच्या कालांमध्यें फरक पडला आहे. तरी कोणत्या वंशांतले राजे कोणत्या राज्यानंतर झाले ह्याचा दोन्ही ठिकाणचा अनुक्रम मात्र कांहींसा जुळतो. तो असाः महावीरानंतर पालक राजे झाले; त्यानंतर नंद राजे; त्यांच्या नंतर मौर्य राजे; त्यानंतर पुष्पमित्र; नंतर नभोवाहन; व त्याच्या मागून गर्दभिल्ल असा थेरावलींत अनुक्रम दिला आहे. विष्णु पुराणाच्या आधारावर रमेश दत्त यांनीं आपल्या प्राचीन इतिहासांत असा अनुक्रम दिला आहे. पुष्पमित्रानंतर " काण्व " वंशांतले राजे झाले; त्यांच्या मागून आंध्र झाले. आंध्रांच्या नंतर ७ आभीर; १० गर्दभील; १६ शक; ८ यवन; १४ तुषार; १३ मुंड; ११ मौन; असे राजे झाले. तात्पर्य, पुष्पमित्रापर्यंतच्या वंशावळी ह्या जैन पटावलींतल्या व नंतरच्या संशोधकांनीं ठरविलेल्या अशा जुळतात.

डॉ. भाऊ दाजींनीं त्यांवर कांहीं शेरे मारले आहेत ते मात्र लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. एक महावीराविषयीं आहे. तो असाः महावीर हाच शेवटचा जैन तीर्थंकर होता. बौद्ध लोक हे गौतम बुद्धास "महावीर" म्हणून महाकाश्यपास ( जैनास ) त्याचा शिष्य म्हणतात. उलट, जैनलोक हे कश्यपास " महावीर " समजून गौतमास त्याचा शिष्य म्हणतात. पण जैन व बौद्ध असे दोन्ही पंथ "महावीर" हा राजगृहाच्या श्रेणिक भंभासार ( बौद्ध–बिंबीसार ) याचा गुरु होता असें मानतात.

दुसरा डॉ. भाऊंचा शेरा नंदांच्या उत्पत्तीसंबंधाचा आहे. पुराणांत नंदांना "शूद्र" म्हटलेलें आहे. पण थेरावलींत त्याला न्हाव्याच्या कुलांतला असें म्हटलें आहे.

डिऑडोरस सिसुलस ( Diodorus Siculus ) व क्विंटस कर्टिअस (Quintus Curtius ) या लेखकांनींही अलेग्झँडरच्या स्वारीच्या वेळीं पाटलीपुत्र येथील राजाच्या उत्पत्तीविषयीं असेंच–म्हणजे तो न्हाव्याच्या कुळांतला होता असें–लिहून ठेविलें आहे. नंदराजेच चंद्रगुप्ताच्या पूर्वीचे राजे होते.

तिसरा डॉ. भाऊंचा शेरा शालिवाहन व विक्रमशक याविषयींचा आहे. प्राकृत ग्रंथांत शक अगर सिदियन यांस "सग" ( Sagas ) म्हटलें आहे. शकांचा विक्रमानें पराभव केला तेव्हां संवतशक सुरू झाला. व नंतर माळव्यावर शकांनीं जय मिळविला, तेव्हां शालिवाहन शक सुरू झाला. भडोच येथील जैन लायब्ररींतील एका पटावलींत असें लिहिलेलें आढळतें:—

"After explaining briefly why Kalakacharya introduced the Sakas, how Vikramaditya expelled them and established his own era, adds—one hundred and thirty-five years having passed, again the Sakas expelled Vikramputra ( son or descendant ) and conquered the Kingdom."

डॉ. भाऊ दाजींनीं जशा जैन पदावलींवरून राजांच्या वंशावळी ठरविण्याचा प्रयत्न केला तसेंच त्यांनीं शत्रूंजयमहात्म्याच्या आधारानें जैन धर्माध्यक्ष कसे कसे होऊन गेले हेंही ठरविलें. परंतु या बाबतींत पुढें पुष्कळ शोध झालेले आहेत. त्यांसंबंधीं इकडे विस्तार करीत नाहीं. याविषयीं एका चरित्रकर्त्यानें असें लिहिलें आहे. "He (Dr. Bhau Daji) *first* brought to the notice of scholars the succession of pontiffs according to the *Satrunjaya* and tried to settle the chronology of the Jain Pattavalis. A great deal of advance has since been made in this subject by other scholars among whom the late Dr. Hoernle deserves prominent mention."

डॉ. भाऊ दाजींची जुने लेख, जुनी माहिती यांविषयींची भूक इतकी प्रखर असे कीं, ते लेख व माहिती मिळविण्याकरितां ते वाटेल तेवढा खर्च करण्यास तयार असत. त्यांची हौस नुसते संस्कृत किंवा मराठी हस्तलेख संपादन करूनच तृप्त होत नसे, तर त्यांनीं आरबी, पर्शियन, ब्रह्मी वगैरे भाषांतले देखील लेख मिळविले होते. ही डॉ. भाऊंची जुने शोध, जुने लेख, जुनी माहिती मिळविण्याविषयींची आकांक्षा–वेड म्हटलें तरी चालेल !–इतकी विलक्षण असे कीं, तिच्या

भरांत ते शेवटीं शेवटीं आपला आजारही विसरत असत! ते अखेर सतरा महिने आजारी होते, पण त्या मुदतींत त्यांचे विचार याच विषयीं चालत असत! यासंबंधानें एक "Haji Baba" या गृहस्थांचें ता. ९-६-७४ च्या "टाइम्स ऑफ इंडिया" मध्यें अत्यंत हृदयद्रावक पत्र प्रसिद्ध झालें होतें. त्यांत त्यांनीं असें म्हटलें आहे:—"डॉ. भाऊंचा आपल्या विषयाबद्दलचा उत्साह दांडगा असे. मी त्यांना दोन महिन्यांपूर्वी भेटण्याकरितां गेलों होतों. गृहस्थ बिछान्यावर आजारी पडलेला, डोकें थोडेंसें गोंधळलेलें, जीभ अडखळत असलेली, पण तशाही स्थितींत ते मजबरोबर एक तास बोलत होते! पण विषय काय? त्यांचा आजार नव्हे; तर आपण चालविलेले शोध; मोठ्या शिकस्तीनें मिळविलेले व विकत घेतलेले अत्यंत दुर्मिळ असे हस्तलेख; व इतर कांहीं पंडितांनीं पुढें आणलेलीं मतें कशीं चुकीचीं आहेत हें सिद्ध करण्याबद्दलचा आपणांजवळ असलेला भरभक्कम पुरावा! आणि यासंबंधानें बोलतांना ते इतके आनंदाच्या भरांत आलेले दिसले कीं, ते आपलें दुखणें व त्यामुळें होत असलेला त्रास ह्या गोष्टी ते पार विसरून गेले होते!! ( He seemed altogether to forget his serious malady and his troubles. )"

आपल्या देशांत पूर्वी अनेक ज्योतिषशास्त्रज्ञ होऊन गेले आहेत. त्यांपैकीं बहुतेकांचे काल डॉ. भाऊ दाजींनीं ठरविले आहेत, व त्यांच्या ग्रंथांचे त्यांनीं शक्य तितके हस्तलेख मिळविले होते. त्यांपैकीं पहिला ज्योतिर्विद म्हणजे आर्यभट्ट होय. हा इसवी सन ४७६ मध्यें जन्मला. सूर्य फिरत नसून पृथ्वी त्याच्या भोंवतीं फिरते हा आर्यभट्टानें शोध लावला. त्याच्या नंतर झाला वराहमिहिर. तो सन ५८७ मध्यें मरण पावला. हा भाऊ दाजींनींच शोध लावला. यासंबंधानें रमेशचंद्र दत्त आपल्या इतिहासांत म्हणतात:—"It has been ascertained by Dr. Bhau Daji that the astronomer ( वराहमिहिर ) died in 587 A. D."

वराहमिहिरानंतर ब्रह्मगुप्त झाला. त्यानें आपला "ब्रह्म स्फुट सिद्धांत" हा ग्रंथ ६२८ मध्यें लिहिला. मध्यंतरीं भट्टोत्पल यानें वराहमिहिराच्या कांहीं ग्रंथांवर सन ९५६ मध्यें टीका लिहिल्या. ब्रह्मगुप्तानंतर भास्कराचार्य ( हा सन १११४ मध्यें जन्मला ) झाला. त्यानें "सिद्धांतशिरोमणि" हा ग्रंथ सन ११५० मध्यें लिहिला.

डॉ. भाऊ दाजींनीं या विषयांवरील ग्रंथांचे बरेच हस्तलेख मिळविले होते. त्यांचीं नावें:—१ बृहत् आर्यसिद्धांत; २ लघु आर्यसिद्धांत; ३ महा आर्य-सिद्धांत; ४ ब्रह्म स्फुट सिद्धांत; ५ ब्रह्मगुप्ताचा–खंडखाद्यकरण; ६ वराहसंहिता ( भट्टोत्पलच्या टीकेसहित ); ७ वराहमिहिर याचें गृहज्जातक; ८ वराहमिहिराचें लघु जातक; ९ वराहसिद्धांत; १० व्याससिद्धांत; ११ ब्रह्मसिद्धांत; १२ रोमक सिद्धांत; १३ सूर्यसिद्धांत; १४ सार्वभौम सिद्धांत; १५ तत्त्वविवेक सिद्धांत; १६ वाचस्पतिकृत सिद्धांतशिरोमणीवरील टीका; १७ सुंदर सिद्धांत.

सदर्हू यादीवरून डॉ. भाऊ दाजींनीं एकाच विषयावरील किती ग्रंथांचे हस्त-लेख मिळविले होते हें स्पष्ट रीतीनें समजतें. असो. त्यांनीं मीमांसाविषयक दोन ग्रंथांचा शोध लावल्याचा न्या. तेलंगांनीं देखील एके ठिकाणीं उल्लेख केला आहे. तो असा:—"Dr. Bhau Daji speaks of two works—जैमिनीय-न्यायरत्नाधिकरणमाला and वेदांताधिकरणरत्नमाला." ( Indian Antiquary, Vol. V, Oct. 1876 ). पण डॉ. भाऊंचें लक्ष केवळ प्राचीन वाङ्मयात्मकच ग्रंथ मिळविण्याकडे होतें असें नाहीं. त्यांनीं रक्तपीतीवरील ( leprosy ) देखील कांहीं इंग्लिश ग्रंथ मिळविले होते. याशिवाय त्यांनीं १. हुयेनत्सँगचा प्रवास; २ स्वतः शाक्यमुनींच्या मुखांतून बाहेर पडलेलीं व टिपून घेतलेलीं धर्मतत्त्वें; ३. बुद्धधर्म; ४. बुद्धचरित्र अशा अनेक विषयांवरील ग्रंथांचे हस्तलेख मिळविले होते. हुयेनत्सँगच्या प्रवासाचें वर्णन करतांना डॉ. भाऊ दाजींनीं त्याचा मार्ग दाखविण्याकरितां १७ फूट लांबीचा एक नकाशा तयार केला होता !

दुसऱ्या एका पुस्तकाच्या बाबतींत डॉ. भाऊ दाजींचा प्रत्यक्ष संबंध होता हें हल्लींच आमच्या नजरेस आलें. तें पुस्तक म्हणजे बरोबर ७० वर्षांपूर्वी मुंबईस प्रसिद्ध झालेलीं " हिंदु ग्रंथकर्त्यांचीं चरित्रें " होत ! हें पुस्तक डॉ. भाऊ दाजींना अर्पण केलें होतें. त्यासंबंधाची अगदीं थोडक्यांत पुस्तकाच्या पहिल्याच एक दोन पृष्ठांवर दिलेली माहिती मिळते ती अशी आहे:—

" Biographical sketches of " Eminent Hindu Authors," being memoirs of the lives of both prose and poetical writers, ancient and modern, who flourished in different provinces of India, compiled from various Sanskrit, Marathi and English works by *Janardan Ramchandraji*, Bombay, printed at Gan-

pat Krishnaji Press, in 1860; Dedicated to Dr. Bhawoo Daji, G. G. M. C."

या पुस्तकांत अनेक ग्रंथकर्त्यांचीं त्रोटक चरित्रें आलीं आहेत. त्यांचा इकडे विस्तार करीत नाहीं. त्यांत भट्टोजी दीक्षित व महेश्वर भट्ट यांचीं चरित्रें आलीं आहेत. त्यांसंबंधीं मात्र अल्पसा उल्लेख करतों. दोघेही गौड सारस्वत ब्राह्मण जातीचे असून दोघेही सर्वमान्य ग्रंथकार होते. भट्टोजी दीक्षित याचे सिद्धांत-कौमुदी, प्रौढ मनोरमा वगैरे सर्वमान्य व्याकरणविषयक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. महेश्वर भट्ट याचें आड नांव सुखठणकर असें असून त्याचे विश्वकोश, द्विरूपकोश, अमरकोशावरील "अमरविवेक" नांवाची टीका हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. भट्टोजी दीक्षित हा महाराष्ट्रीय असून तो एका देवालयांतील पूजारी होता. पण त्याला पुढें आपल्या ( दीक्षित ) नांवाप्रमाणें आपल्या हातून कांहीं तरी कृति झाली पाहिजे असें वाटून तो काशीस गेला व तेथें शास्त्राध्ययन करून तो प्रसिद्धीस आला. त्याची बुद्धि फार सूक्ष्म होती. त्यानें उतार वयांत न्यायशास्त्राचा अभ्यास करून सर्व काळ विचारांत घालविला. तो वयाच्या छपन्नाव्या वर्षी काशीक्षेत्रीं मृत्यु पावला. त्याला एक मुलगा होता. त्याचें नांव भानु दीक्षित. असो. भट्टोजी दीक्षित याच्या जातीविषयीं वगैरे महाराष्ट्रांत असावी तशी माहिती नाहीं. सबब डॉ. भाऊ दाजींचा ज्यांत प्रत्यक्ष संबंध होता अशा पुस्तकाच्या आधारानें त्याच्या संबंधाची इकडे थोडी माहिती दिली आहे. भट्टोजी दीक्षिताचा सन १५७८ ( शके १५०० ) सालीं जन्म झाला होता.

महेश्वरभट्ट सुखठणकर हा गोमांतक प्रांतींचा रहाणारा असून त्याचा सन १७१९ मध्यें जन्म झाला. त्यानें अनेक शिष्य तयार केले आहेत. तो वयाच्या ९८ व्या वर्षी ( सन १९१७ मध्यें ) निधन पावला. त्याचे वंशज प्रस्तुत गोमांतक प्रांतांत आहेत. असो.

डॉ. भाऊ दाजींच्या हातून अशीं अनेक शोधाचीं कामें झालीं आहेत. त्यासंबंधानें आणखी पुष्कळ गोष्टी सांगतां येतील. पण त्यांच्या अचाट उद्योगासंबंधीं साधारण कल्पना करून देण्यास वर सांगितलेल्या गोष्टी पुरेत. असो. आपण मिळविलेल्या सर्व माहितीचा उपयोग करून एक हिंदुस्थानचा इतिहास लिहिण्याची त्यांची फार इच्छा होती. पण तसा योग जुळून आला नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. बाकी त्या माहितीचा उपयोग करून त्यांनीं कांहीं निबंध, टिपणें तयार

करून वाचलीं आहेत, इतकें खरें. पण याहीपेक्षां त्या माहितीचा अधिक विस्तृत प्रमाणावर उपयोग व्हावयाला पाहिजे होता. पण तो तसा झाला नाहीं. असो. डॉ. भाऊंच्या मनांतून आणखी पुष्कळ गोष्टी करावयाच्या होत्या असें त्या वेळच्या "नेटिव्ह ओपिनियन"वरून दिसतें; पण मृत्यु आड आला व त्या गोष्टी जिकडच्या तिकडेच राहिल्या हें देशाचें दुर्दैव होय.

---

## प्रकरण बारावें.

# लोकशिक्षण.

डॉ. भाऊ दाजी यांनीं आपला वैद्यकीचा धंदा उत्तम रीतीनें चालवून त्या मार्गानें त्यांनीं असंख्य गोरगरीबांवर उपकार केल्याचें मागें सांगितलेंच आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं वाङ्मयात्मक क्षेत्रांतही उत्कृष्ट प्रकारची कामगिरी करून या देशांतील व युरोप-अमेरिका खंडांतील विद्वान् लोकांमध्यें देखील कस उच्चस्थान मिळविलें याचाही मागें उल्लेख आलेलाच आहे. आतां त्यांच्या लोकशिक्षणाच्या बाबतींतील कामगिरीविषयीं लिहावयाचें आहे. वस्तुतः डॉ. भाऊ यांचें वैद्यकीय क्षेत्रांतील संशोधनकार्य किंवा वाङ्मयक्षेत्रांत त्यांनीं लावलेले कांहीं अपूर्ण शोध हीं लोकशिक्षणाचींच उपांगें होतीं. पण लोकशिक्षणाच्या बाबतींत त्यांनीं प्रत्यक्ष रीतीनें महत्वाचा भाग घेऊन ज्याअर्थी जनतेस ज्ञानमार्गावर आणून सोडण्याचें काम केलें होतें त्याअर्थी त्यासंबंधाचें थोडेंसें विस्तारानें दिग्दर्शन करणें जरूर आहे.

लोकशिक्षणाच्या बाबतींत डॉ. भाऊ दाजींचा प्रत्यक्ष संबंध येण्यास ते विद्यार्थि-दशेंत होते तेव्हांपासूनच सुरवात झाली होती. त्यांचा कॉलेजांतील शिक्षणक्रम पुरा होतांच सन १८४३ सालीं त्यांची एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशनमध्यें शिक्षकाच्या जागीं नेमणूक झाल्याचें मागें सांगितलेंच आहे. तदनंतर पुढें ते जेव्हां सन १८५१ मध्यें जी. जी. एम्. सी. झाले तेव्हां त्यांची सब असिस्टंट सर्जनच्या एका जागीं नेमणूक केली जाऊन त्यांना ग्रँट मेडिकल कॉलेजांत शिकविण्याचें काम करावें लागत असे; तें काम त्यांनीं कांहीं दिवस केलें. याशिवाय वैद्यकीय शिक्षण घेण्याकरितां तत्कालीन तरुण मंडळींनीं पुढें यावें याकरितां डॉ. भाऊ दाजी व त्यांच्या वेळचे इतर पदवीधर यांनीं कशी शिकस्तीची खटपट केली होती याचा मागें एकवार उल्लेख आल्यामुळें त्याची इकडे पुनरुक्ति करीत नाहीं.

डॉ. भाऊ दाजींच्या आयुष्यांत सन १८५१-५२ हा काल फार महत्त्वाचा होता. कारण त्याच सुमारास त्यांच्या वैद्यकीय धंद्याचा व सार्वजनिक कारकीर्दीचा एकाच काळीं आरंभ झाला होता. सन १८५१ मध्यें ते पदवीधर झाले. पुढें थोड्याच दिवसांनीं त्यांनीं आपली सरकारी नोकरी सोडून स्वतंत्र धंदा सुरू केला. सन १८५२ मध्येंच ते रॉयल एशियाटिक सोसायटीचे ( मुंबई शाखेचे ) सभासद झाले. सन १८५१ सालीं डॉ. भाऊ हे स्टुडंट्स लिटररी सोसायटीचे सभासद झाले. सन १८५२ मध्येंच ते बोर्ड ऑफ एजुकेशनचे सभासद झाले. व त्याच सालीं त्यांनीं कांहीं मित्रांच्या सहाय्यानें "बॉंबे असोसियेशन"ची स्थापना केली. यावरून सन १८५१-५२ हें साल त्यांच्या बाबतींत फार महत्वाचें होतें, हें उघड आहे.

युनिव्हर्सिटीची स्थापना होण्यापूर्वी मुंबई इलाख्यांतील शिक्षणाबाबतची सर्व व्यवस्था "बोर्ड ऑफ् एजुकेशन" या संस्थेकडेच असे. या बोर्डाची सन १८४० सालीं स्थापना झाली होती. तिजकडे ज्या शिक्षणसंस्थांची देखरेख ठेवणें, अभ्यासक्रम ठरविणें, शिक्षकांच्या नेमणुका करणें वगैरे सर्व प्रकारची व्यवस्था असे, त्यांचीं नांवें पुढें दिलीं आहेतः—

१. एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशन; २. पुण्याचें कॉलेज; ३. सुरत, रत्नागिरी, अहमदाबाद, अहमदनगर, धारवाड, भडोच, ठाणा, सातारा, धुळें, राजकोट आणि सोलापूर येथील इंग्रजी शाळा व ४. इलाख्यांतील सर्व प्राथमिक शाळा; आणि ५. ग्रँट मेडिकल कॉलेज.

यावरून बोर्डाच्या कामाच्या महत्वाविषयीं कल्पना सहज होऊं शकते. या बोर्डावर सन १८५२ मध्यें डॉ. भाऊ दाजी यांची नेमणूक झाली. त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजचे प्रतिनिधि या नात्यानें नेमणूक झाली होती. व बोर्डावर त्या कॉलेजचे असे प्रतिनिधि डॉ. भाऊ हेच पहिले होते. पुढें सन १८५७ सालीं मुंबई यूनिव्हर्सिटीची स्थापना झाली. त्यावेळीं खुद्द त्यासंबंधाच्या कायद्यांत ज्या पहिल्या फेलोचीं ( सदस्यांचीं ) नांवें दाखल झालीं आहेत, त्यांत डॉ. भाऊंचेंही नांव आहे. ते यूनिव्हर्सिटींतील "आर्टस्" व "मेडिसिन" या दोन फॅकल्टिजचे सभासद होते. पुढें कांहीं दिवसांनीं ते सिंडिक झाले. त्या जागेवर ते शेवटपर्यंत होते. यूनिव्हर्सिटीच्या कामांत डॉ. भाऊ दाजी हे फार लक्ष घालीत असत. या सर्व प्रकाराविषयीं त्या वेळचे व्हाइस चान्सेलर नामदार मिस्टर गिब्ज यांनीं एकदां असे उद्गार काढले होतेः—

"He (Dr. Bhau Daji) was the first representative of the Elphinstone Institution, that was appointed a member of the late Board of Education and remained so until its abolition and the establishment of the University, of which he was one of the Fellows mentioned in the Act of Incorporation and up to the time of his death took a leading part in its proceedings."

मुंबई शहरांतील त्या वेळची दुसरी महत्वाची शिक्षणसंस्था किंबहुना स्त्रीशिक्षणाची जबाबदारी जिनें आपल्यावर घेतली होती अशी संस्था म्हणजे स्टु. लि. अँड सा. सोसायटी ही होय. वास्तविक ही संस्था प्रथम सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशानें सन १८४८ मध्यें स्थापन करण्यांत आली होती. तिचे डॉ. भाऊ दाजी हे सन १८५१ मध्यें सभासद झाले. पुढें ते सन १८५३ सालीं त्या संस्थेंतील व्यवस्थापक मंडळीचे सभासद झाले. व सन १८६१ मध्यें ते तिचे अध्यक्ष झाले. डॉ. भाऊ दाजी हेच त्या संस्थेचे पहिले हिंदी अध्यक्ष होत. त्यांच्या पूर्वी त्या मानाच्या जागेवर नेहमीं कोणी तरी युरोपीयन गृहस्थ असे. असो. सदरील संस्थेच्या ताब्यांत त्या वेळीं एकंदर पांच मुलींच्या शाळा होत्या व त्यांतून सुमारें ५०० मुली शिकत होत्या. त्यांपैकीं जास्तींत जास्त मुली, लोहार चाळींतील शाळेंत शिकत होत्या. ती शाळा प्रथम डॉ. भाऊ दाजींनीं कित्येक वर्षें आपल्या स्वतःच्या खर्चानें चालविली होती ! इतकी सार्वजनिक हिताची कळकळ आमच्या देशांत तरी निदान अगदीं विरळा !! तो आधुनिक काळांतील स्त्रीशिक्षणाच्या कल्पनेचा आरंभ होता. अर्थात् अशा कामाला लोकांचा आश्रय फारच स्वल्प असे. त्यामुळें तशा प्रकारचें खऱ्या लोकहिताचें व म्हणूनच खर्चाचें काम शिरावर घेऊन तें मार्गाला लावणारा कोणी तरी पुरुष धैर्यानें पुढें यावयास पाहिजे होता. तेवढें काम सदरील शाळेपुरतें डॉ. भाऊ दाजींनीं करून तें कांहीं वर्षें चालविलें. असो. ही एक स्त्रीशिक्षणाची गोष्ट झाली. पण अशीं लोकहिताचीं व खर्चाचीं कामें डॉ. भाऊ दाजींचीं अन्य क्षेत्रांतून नेहमीं चालतच असत. कै० जव्हेरीलाल याज्ञिक यांनीं एके ठिकाणीं डॉ. भाऊ दाजींचें जें चारच शब्दांत वर्णन केलें आहे—The active spirit of many an important movement, which had the social, moral and political advancement of the people for its object—तें अक्षरशः खरें आहे. असो. याप्रमाणें डॉ. भाऊ दाजी हे स्तुत्य अशीं सार्वजनिक कामें करीत असलेले दिसले म्हणजे मंडलिकांच्या

चरित्रकर्त्यानें म्हटल्याप्रमाणें त्यांच्या मित्रांच्या प्रेमास केव्हां केव्हां ऊत येत असे व त्यांचा कांहीं तरी सन्मान करावा अशी त्या मित्रांस उत्कट इच्छा होत असे. अशा कांहीं मित्रांच्या जेव्हां लक्षांत आलें कीं, डॉ. भाऊंनीं लोहार चाळींतील मुलींची शाळा स्वतःच्या खर्चानें चालविली आहे, तेव्हां त्यांनीं सन १८६० ( १४ जून ) मध्यें एक प्रास्ताविक सभा भरून सर अॅलेग्झँडर ग्रँट यांच्या सहीनें एक विनंतिपत्र काढविलें. हेतु इतकाच कीं, स्टु. लि. अँड सा. सोसायटींतील सभासदांच्या व इतर सर्व जातींच्या व धर्मांच्या मित्रांच्या अनुमोदनानें वर्गणी जमवावी व जमलेली रक्कम सोसायटीच्या स्वाधीन करून सदरील शाळेच्या खर्चाची कायमची व्यवस्था करावी आणि डॉ. भाऊंवरचें ओझें कमी करावें ! हा फंड गोळा करणाऱ्यांमध्यें मोठमोठे लोक होते. रा. सा. मंडलीक होते. पुण्याचे प्रो. रा. गो. भांडारकर होते. कृष्णशास्त्री तळेकर होते. माधवराव बर्वे होते. बहिरामजी जीजीभाईनीं तर एक हजार रुपये दिले. मंचरजी पंथकी यांनीं स्वतः मोठी रकम दिली व स्नेह्यांकडून देवविली. याप्रमाणें १४००० रुपये जमतांच ती रकम सोसायटीच्या कमिटीजवळ देण्यांत आली व तेव्हांपासून पुढें लोहारचाळींतील शाळेचा खर्च सोसायटीकडून करण्यांत येऊं लागला. शाळेचें नांव मात्र " भाऊ दाजी गर्ल्स स्कूल " हेंच चालू राहिलें. यासंबंधानें गव्हर्नर सर बार्टल फ्रेअर यांचे असे उद्गार नमूद आहेतः—

" In recognition of Dr. Bhau Daji's services to the cause of education and of his generous support to the Girls' school at Loharchawl for three years, the Students' Literary and Scientific Society in 1862, permanently endowed the said school in his name with funds ( upwards of Rs. 14,000 ) which were subscribed for the purpose by the European and Native inhabitants of Bombay and the Mofussil."

याप्रमाणें डॉ. भाऊ दाजी हे सामान्यतः शिक्षणप्रसाराचे व विशेषेंकरून स्त्रीशिक्षणाचे निःसीम पुरस्कर्ते होते. स्टुडंट्स लि. सोसायटीच्या शाळांतील मुलींचा एकदां सन १८६२ मध्यें बक्षिससमारंभ होता. त्या वेळीं अध्यक्षस्थानीं सर बार्टल फ्रेअर गव्हर्नरसाहेब हे होते. त्यांनीं आपल्या भाषणांत स्त्रीशिक्षणासारख्या महत्वाच्या बाबतींत डॉ. भाऊ दाजी व त्यांचे सहकारी मित्र यांनीं चालविलेल्या यत्नांचें कौतुक करून त्यांची अंतःकरणपूर्वक प्रशंसा केली. सोसाय-

जाने ९२६
७५ ८८२६४
च ९६३



टीच्या चालकांच्या प्रयत्नांतला विशेष हा कीं, परिस्थिति अनुकूल नसतांना व सरकारचीही असावी तितकी सहानुभूति नसतांना स्त्रीशिक्षणासारखें महत्वाचें कार्य डॉ. भाऊ दाजी आदि मंडळींनीं धैर्यानें चालविलेलें होतें. याबद्दल गव्हर्नरसाहेबांनीं त्यांना अत्यंत शूर व देशहितकर्ते म्हटलें होतें. त्यांचे उद्गार असे होतेः—

"But the chief value of the successful exertions of the Society was to be found in the high and pure motives which had actuated those who took the leading part in this important work. They had been moved by no desire to secure the approval of Government, for Government was necessarily passive in the matter; they had been actuated by no desire for popular applause, for they had too often met with apathy, misrepresentation, and even active opposition. He believed, they had been successful, mainly owing to the purity of their motives, a single hearted desire to extend to the daughters of their race the same advantages of education, which they themselves had enjoyed and so highly valued. Whether we look to the difficulties they have overcome or the progress they have achieved, His Excellency felt assured that Dr. Bhau Daji and his associates had established their title to be enrolled among the real heroes and benefactors of their race."

इकडे आणखी एक दोन समारंभांसंबंधानें चार शब्द लिहावेत हें इष्ट दिसतें. त्यांवरून डॉ. भाऊ दाजी आदि मंडळींचें "स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत कोणत्या सुधारणा करतां येण्यासारख्या आहेत" या गोष्टीकडे किती लक्ष होतें हें स्पष्ट दिसून येईल. व त्याचप्रमाणें ज्यांचा आपल्या कामांत सदैव योग्य सल्ला व उत्तेजन मिळत असे अशा उदारमनस्क व योग्य माणसांचा रीतसर सन्मान करण्याविषयीं सदरील मंडळी किती दक्ष असे हेंही स्पष्ट होईल.

पहिला समारंभ मिस मेरी कार्पेंटर यांना स्टु. लि. सोसायटीकडून सन १८६६ च्या सुमारास एक मानपत्र देण्यांत आलें त्यासंबंधाचा; व दुसरा सन १८६७ मध्यें त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर सर बार्टल फ्रेअर हे आपली मुदत संपल्यावर विलायतेस जाण्यास निघाले त्यावेळीं त्यांना स्टु. लि. सा. सोसायटीकडून मानपत्र देण्यांत आलें त्यासंबंधाचा. मिस मेरी कार्पेंटर यांचे वडील विलायतेंत लोक-

हिताच्या चळवळींत नेहमीं पुढाकार घेणारे गृहस्थ म्हणून प्रसिद्धीस आलेले असून त्यांनीं बंगाल प्रांतांतील गेल्या शतकांतील आद्य सुधारक व पुढारी राजा राम मोहनराय यांचें इंग्रजींत एक सुंदर चरित्र लिहिलेलें होतें. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ही कीं, अशा उदारधी गृहस्थांच्या विद्वान् कन्या मिस् मेरी कार्पेंटर यांनीं देखील आपल्यापुढें वडिलांचेंच परोपकारार्थ आयुष्य घालविण्याबाबतचें उदाहरण ठेवून आपणांस स्त्रियांची उन्नति करण्याच्या कार्यास वाहून घेतलें होतें. या बाई वर सांगितल्याप्रमाणें सन १८६६ च्या सुमारास मुंबईस आल्या वेळीं स्टु. लि. सा. सोसायटीनें डॉ. भाऊ दाजींच्या अध्यक्षतेखालीं एक सभा बोलावून त्या बाईंना मानपत्र दिलें. त्यांत त्या वेळेपर्यंत मुंबईंत स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत झालेली प्रगति, त्याच्या मार्गांत बालविवाहादि चालींच्या येणाऱ्या अडचणी व त्या दूर करण्याबाबतची उपाययोजना इतक्या गोष्टींचा उल्लेख करण्यांत आला असून मिस् मेरी कार्पेंटरच्या सूचनेप्रमाणें मुंबईस एक "शिक्षकिणी" तयार करण्याकरितां "नॉर्मल स्कूल" स्थापन करण्यासाठीं सरकारला अर्ज केल्याचेंही सांगितलें होतें. कार्पेंटर बाईंनीं मानपत्रास उत्तर देतांना दोन तीन महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख केला. त्यांनीं प्रथम स्त्रीशिक्षणासारख्या महत्वाच्या बाबतींत बरीच प्रगति केल्याबद्दल डॉ. भाऊ दाजी व त्यांचे सहाय्यक या सर्वांचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन केलें व म्हटलें कीं, बंगाल प्रांताच्या मानानें स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत मुंबईच्या लोकांत जास्त उत्साह दिसून येत होता व ते शिकस्तीची खटपट करीत होते. दुसरी गोष्ट अशी कीं, प्रस्तुत सुधारणेच्या बाबतींत मुंबईकरांनीं चालविलेल्या प्रयत्नांची विलायतेंत फारशी माहिती नाहीं! सबब आपण आपल्या देशांत परत गेल्यावर यासंबंधानें लोकांस खरा प्रकार काय आहे हें जरूर कळवीन असें बाईंनीं आश्वासन दिलें. कार्पेंटर बाईंनीं तिसरी गोष्ट सांगितली ती ही कीं, युरोपियन विद्यार्थिनी व हिंदी विद्यार्थिनी यांची राहण्याची स्वतंत्र व्यवस्था केली पाहिजे. ( The native students must live separate from the European students. ) चवथी गोष्ट सदहू बाईंनीं सांगितली ती ही कीं, "नॉर्मल स्कूल"च्या सुपरिंटेंडेंट जरी प्रथम कांहीं कालपर्यंत युरोपियन असणें जरूर आहे तरी युरोपियन शिक्षकिणींना देशी भाषांचें–उदाहरणार्थ, मराठी भाषेचें–ज्ञान असणें अगदीं अवश्य आहे; आणि स्त्रियांचें शिक्षण केवळ व्यावहारिक स्वरूपाचें असलें पाहिजे व त्यांत धर्माचा संबंध मुळींच येतां कामा नये. अशा अर्थाचें मिस् कार्पेंटर यांचें भाषण झाल्यावर डॉ. भाऊ दाजींनीं त्यांचे

त्यांच्या उपदेशपर उद्गारांबद्दल मनापासून आभार मानले व बाईनीं जनसेवेच्या कार्यास स्वतःस वाहून घेतल्याबद्दल सोसायटीतर्फे त्यांचें कौतुक केलें.

"The Society felt deeply thankful to her for her excellent advice and assistance, and for her useful labours as a disinterested benefactor of mankind."

सन १८६७ च्या मार्च महिन्यांतच स्टु. लि. सा. सोसायटीच्या शाळांतील मुलींना बक्षिसें वांटण्याचा समारंभ झाला व त्याच वेळीं सर बार्टल फ्रेअर यांना त्यांचें विलायतेस प्रयाण व्हावयाच्या थोडे दिवसांपूर्वी सोसायटीतर्फे मानपत्र देण्यांत आलें. मानपत्र अध्यक्ष या नात्यानें डॉ. भाऊ दाजींनींच वाचलें. त्यांत त्यांनीं फ्रेअर साहेबांनीं लोकशिक्षणाला व त्याबरोबरच स्त्रीशिक्षणालाही आपल्या कारकीर्दीत महत्वाची मदत केल्याबद्दल त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानले. त्यांच्या कारकीर्दीत मुंबई इलाख्यांतील शाळांची संख्या द्विगुणित झाली होती.

"So general has been the spread of education during your Excellency's administration that the educational institutions of the presidency have doubled in that period, a fact which speaks for itself."

त्याचप्रमाणें स्त्रीशिक्षणासंबंधाचाही प्रकार. डॉ. भाऊ म्हणाले कीं, स्त्रीशिक्षणाची कल्पना हिंदुस्थानांत नवी नव्हती. परंतु दीर्घ कालाच्या उपेक्षेमुळें ती लुप्तप्राय झाली होती. पण तिचें प्रस्तुत काळीं पुनर्जीवन करावयाचें होतें व त्या कामीं फ्रेअरसाहेबांचें उत्तम सहाय झालें.

(Although indigenous to the country, female education had by long neglect become so nearly extinct as to demand for its restoration the care, the anxiety and the patronage needful for an exotic.)

मानपत्रास उत्तर देतांना सर बार्टल फ्रेअर यांनीं स्टु. लि. सा. सोसायटीच्या मंडळींना सुरवातीस शिक्षणाकरितां निरनिराळ्या जातींत जाऊन मुली कशा आणाव्या लागत असत याचा उल्लेख करून सोसायटीला सध्यांचें स्वरूप प्राप्त झाल्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें व त्या मार्गानें ते—वाटेंतल्या अडचणींना न जुमानतां—देशाची केवढी मोठी कामगिरी करीत आहेत असे प्रशंसोद्गार काढले.

(In the discouragements and difficulties you have met with, you have been sustained by the feeling that in educating

your young women—though that class may not be a large and numerous one in the great nation to which you belong—you are still doing your best towards a great national service.) असो.

डॉ. भाऊ दाजी हे एल्फिन्स्टन फंडाचे एक ट्रस्टी होते; "ग्रँट मेडिकल कॉलेज" सोसायटीचे उपाध्यक्ष होते. मुंबईतील नेटिव्ह जनरल लायब्ररीचे तर ते प्रथमपासूनच सभासद होते. पुढें ते तिचे अध्यक्ष झाले, ते शेवटपर्यंत त्या जागेवर होते.

लोकांना उपयुक्त ज्ञान करून देण्याच्या कामीं किंवा त्यांचें मनरंजन करणाऱ्या गोष्टींना इष्ट दिशा लावण्याच्या कामीं नाट्यकलेचा चांगला उपयोग होण्यासारखा असतो. ही गोष्ट डॉ. भाऊ दाजींच्या लक्षांत येऊन त्यांनीं त्या दिशेनें कांहीं उपक्रम चालविला होता. इंग्लंडांत शेक्स्पीयरच्या नाटकांनीं कशी लोकजागृति करून मोठी खळबळ उडवून दिली होती हें डॉ. भाऊंना माहीत होतें. तसें इकडे लोकमनरंजन करण्यासारखीं आमच्या कालिदासकृत "शाकुंतल" नाटकासारखीं अमूप साधनें तयार होतीं हेंही डॉ. भाऊंना अवगत होतें. त्याप्रमाणें त्यांनीं मुंबईस "Kalidas Elphinstone Society" नांवाची एक नाट्य संस्था काढून त्या मार्गानें "शाकुंतल" नाटकाचे ( इंग्लिशमध्यें ) प्रयोग करविले व युरोपीयन व नेटिव्ह अशा दोन्ही समाजांतील नाट्यलोलुप लोकांना कांहीं कालपर्यंत तल्लीन करून सोडलें. प्रो. मॉनीयर विल्यम्स या पंडितानें शाकुंतल नाटकाचें इंग्रजींत सुंदर भाषांतर केलें आहे हें सर्वश्रुत आहे. त्याचेच डॉ. भाऊंनीं मुंबईंत प्रयोग करविले. नाटयकलेचें महत्व डॉ. भाऊंच्या मनावर इतकें बिंबलें होतें कीं, त्यांनीं सांगलीकर नाटक मंडळीला आपला आश्रय देऊन त्यांच्याकडून लोकप्रिय अशीं नाटकें पुढें आणविलीं. या कामीं डॉ. भाऊंचा उत्साह इतका दांडगा असे कीं, सदरील नाटक मंडळीची सव व्यवस्था प्रथम कांहीं दिवस भाऊंनीं आपल्या घरीं चालविली होती. फार काय, पण त्या मंडळीच्या नाटकाचीं तिकिटेंदेखील कित्येक वेळां डॉ. भाऊ दाजी यांच्या घरींच मिळत असत ! अशा एका प्रसंगीं इंदूरचे त्यावेळचे महाराज तुकोजीराव होळकर—हे त्या वेळीं साध्या पोषाखांत सर्व हिंदुस्थानभर फिरत असत असें म्हणतात— आणि डॉ. भाऊ दाजी यांचें सहज नाटकाच्या माहितीसंबंधानें कांहीं वेळपर्यंत संभाषण झालें. तेवढयावरून डॉ. भाऊंच्या मोकळेपणाविषयीं व सौजन्याविषयीं महाराजांची खात्री झाली व त्यांनीं घरीं गेल्याबरोबर डॉ. भाऊंना एक लहानच

पण अर्थपूर्ण पत्र पाठविलें. त्यांत असा मजकूर होताः—" आजपर्यंत जो आपला लौकिक ऐकत होतों, त्याचें आज प्रत्यक्ष प्रत्यंतर मला मिळालें. संतोष वाटला.

आपला नम्र सेवक,
**तुकोजी होळकर."**

डॉ. भाऊंनीं हें पत्र अखेरपर्यंत आपल्याजवळ जपून ठेवलें होतें. असो. सदर्हू महाराज हे फार उदारमनस्क होते हें उघडच आहे. त्यामुळें त्यांची वरील एका लहानशा प्रसंगामुळें डॉ. भाऊ दाजींसंबंधानें जी भावना झाली ती पुढें कायम राहिली. आणि नंतर डॉ. भाऊंच्या मरणकालपर्यंत त्यांच्या कोणत्याही—बऱ्या वाईट—प्रसंगीं महाराज स्वतः येऊन त्यांचा समाचार घेण्यास विसरत नसत.

एकंदरींत डॉ. भाऊ दाजी यांनीं लोकशिक्षणाच्या बाबतींत अनेक दिशांनीं महत्त्वाची कामगिरी केली आहे.

---

## प्रकरण तेरावें.

# राजकीय चळवळ.

डॉ. भाऊ दाजींचें नांव अजरामर होण्यासारखी त्यांच्या हातून वैद्यकीय धंद्याच्या बाबतींत व वाङ्मयात्मक संशोधनकार्यांत कोणती कामगिरी झाली याचें मागील कांहीं प्रकरणांतून विवेचन झालेलेंच आहे. आतां त्यांनीं राजकीय क्षेत्रांतून चिरसंस्मरणीय अशी काय कामगिरी केली याचें अल्पसें दिग्दर्शन करतों.

डॉ. भाऊ हे शेट दादाभाई नवरोजींपेक्षां तीन वर्षांनीं वडील होते. त्या वेळीं देशांत राजकीय चळवळीला वास्तविक वाव फारच थोडा असे. याचें मुख्य कारण म्हणजे लोकांचीं मनें इतकीं तयार झालीं नव्हतीं. शिवाय मॉउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन, सर जॉन मालकम, सर बार्टल फ्रेअर सारखे मुख्य अधिकारी फार सहानुभूतीनें राज्याधिकार चालवीत असत. तरी तशाही वेळीं मुंबईंत डॉ. भाऊ दाजी व नवरोजी फर्दुनजी यांनीं राजकीय चळवळीचा पाया घातला असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या पुढें बंगालप्रांताचें उदाहरण होतेंच. गेल्या शतकाच्या पूर्वार्धात बंगाली लोकांची मनःप्रवृत्ति सामान्यतः अगदींच नेभळटपणाची—Sla-

vish tendencies झालेली असून त्यांच्या हातून सार्वजनिक कामें यशस्वी रीतीनें पार पडण्याचा संभव नव्हता. परंतु पुढें तें सर्व बदललें. कलकत्त्याचे त्या वेळचे प्रसिद्ध पुढारी ख्रिस्तोदास पाल यांनीं सन १८५२ सालीं "ब्रिटिश इंडियन असोसियेशन" ही संस्था स्थापन केली, व तेव्हांपासून तिकडे राजकीय चळवळ रीतसर सुरू झाली. त्याच दिशेनें आपल्या मुंबई शहरांत राजकीय चळवळ करण्यास एक साधन असणें जरूर आहे असें आमच्या कांहीं पुढाऱ्यांस वाटून त्यांपैकीं डॉ. भाऊ दाजी व नवरोजी फर्दुनजी यांच्या खटपटीनें मुंबईस "बॉंबे असोसियेशन" या संस्थेची सन १८५२ मध्येंच स्थापना झाली. तिचे जगन्नाथ शंकरशेट हे अध्यक्ष होते व डॉ. भाऊ दाजी हे चिटणीस होते; त्या संस्थेतर्फे सरकारला किंवा विलायतेंत पार्लमेंटला अनेक प्रचलित अशा महत्वाच्या प्रकरणांवर लोकमत दर्शविणारीं पत्रकें व अर्ज लिहून पाठविण्याचे डॉ. भाऊ दाजी यांना अनेक प्रसंग आले. या सर्व प्रसंगीं डॉ. भाऊ यांच्या विषयमांडणीसंबंधानें व भाषेसंबंधानें बऱ्या बऱ्या लोकांनीं प्रशंसोद्गार काढले होते. खुद्द त्या वेळचे सेक्रेटरी ऑफ् स्टेट यांनीं देखील डॉ. भाऊंच्या राजकीय कामगिरीसंबंधानें एक दोन वेळां स्तुति केली होती. विलायतेंतील "लॅन्सेट" ( Lancet ) मासिकांत (१८५५) असें नमूद झालेलें आढळतें:—

"Dr. Bhau Dajee has always been one of the most active citizens and zealous promoters of public improvement and native welfare. He was the Secretary, and in a great measure the founder of the Bombay (Reform) Association, the good sense, the good taste and moderation of whose petitions elicited the universal approval of members of Parliament, even when declining to assent to the views they expressed."

पुढें कांहीं वर्षांनीं दादाभाई नवरोजी यांच्या खटपटीनें लंडन येथील "ईस्ट इंडिया असोसिएशन"ची एक शाखा मुंबईस स्थापन झाली. त्या संस्थेंतही डॉ. भाऊ दाजी काम करीत असत. डॉ. भाऊ दाजी यांचें त्यांच्या संशोधनात्मक कार्यांमुळें व इतर कारणांमुळें युरोपियन लोकांमध्यें फार वजन असे. परंतु त्यांच्या राजकीय चळवळीमुळें, कांहीं युरोपीयन लोक त्यांच्या विरुद्ध झाले. डॉ. भाऊ दाजींचा नेहमीं निःस्पृहपणाचा बाणा असे. त्यामुळें कांहीं युरोपीयन विरुद्ध झाल्याचें त्यांना कांहीं एक वाटलें नाहीं. पण आपल्या मुंबई शहरांतच त्या वेळीं

कांहीं घरभेदी आमचेच लोक होते. असे लोक बहुधा सर्वकाळीं व सर्व देशांत कमी अधिक प्रमाणांत असतात, व ते देशहिताला विघातक असा केव्हां केव्हां वर्तनक्रम ठेवीत असतात. तसेच कांहीं लोक डॉ. भाऊ दाजींच्या वेळींही होते. या ठिकाणीं अत्यंत समर्पक असा रामायणकाळचा एक दृष्टांत दिल्यास केवळ अस्थानीं होईल असें वाटत नाहीं. बिभीषण हा रामाला जाऊन मिळाल्यावर रावणानें पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेतः—

" श्रूयते हस्तिभिर्गीतः श्लोकः पद्मवनेपुरा ॥
नाग्निर्नान्यानि शस्त्राणि न नः पाशा भयावहाः ।
घोराः स्वार्थप्रयुक्ताश्च ज्ञातयो नो भयावहाः ॥ "

रानटी हत्ती माणसाळविण्याकरितां त्यांच्या कळपांत कांहीं पूर्वींच माणसाळलेले हत्ती सोडावे लागतात हें प्रसिद्ध आहे. म्हणजे हे त्या रानटी हत्तींना माणसाळवून आणतात व मग ते पाशबद्ध केले जातात. असे पाशबद्ध झालेले हत्ती मग एक-मेकांशीं बोलतांना आपल्या स्थितीविषयीं काय म्हणाले हें वरील श्लोकांत दिलेलें आहे. ते आपआपसांत म्हणाले—आम्हांस अग्नीचें भय वाटत नाहीं; शस्त्रांचें वाटत नाहीं आणि दोरखंडांचेंही वाटत नाहीं. पण आपला स्वार्थ साधण्याकरितां वाटेल तें करण्यास प्रवृत्त होणाऱ्या आमच्या ( जातीच्या ) लोकांचीच आम्हांस भीति वाटते. असो.

असे कांहीं घरभेदी आमचेच लोक डॉ. भाऊ दाजींच्या वेळीं मुंबईत होते. ते कांहीं युरोपीयन लोकांच्या कानाला जाऊन लागत असत ! व अशा रीतीनें ते आपल्या देशाचें मोठें नुकसान करण्यास प्रवृत्त होत असत. डॉ. भाऊ दाजींचे एक मित्र त्या वेळीं गव्हर्नरच्या कौन्सिलांत होते. त्यांनीं वरील घरभेदी लोकांना अनुलक्षून डॉ. भाऊंना इशारत दिली कीं, तुम्ही आपल्याच लोकांना संभाळा. त्यांचे असे शब्द होतेः—" ( 'नेटिव्ह ओपिनियन' म्हणतें ७-६-७४)

"One of the members of Council in those days told Dr. Bhau that he and his young friends were not half so troublesome as an equal number of English-men, similarly circumstanced, would have been ; but he warned him against his own people, who were doing as much mischief to them-selves and to their country as they could."

पण पुढें डॉ. भाऊ दाजींच्या सार्वजनिक कामांतल्या खऱ्या कळकळीच्या परीक्षेची वेळ आली ! आणि ते त्यांत उत्तम रीतीनें पार पडले. डॉ. भाऊ दाजी यांना अन्यायाची भारी चीड असे. आणि तो उघडकीस आणण्यास लागणारें धैर्य व त्या कामीं येणारा खर्च करण्याची मनाची तयारी हे अमोलिक गुण डॉ. भाऊंच्या ठिकाणीं होते. हे त्यांचे गुण " विठोबा मल्हारी " याच्या खटल्यावरून लोकांच्या निदर्शनास आले. ह्या खटल्याची हकीकत थोडक्यांत अशी आहे, मुंबईस ह्या वेळीं " Courier " ( कुरीयर ) नांवाचें इंग्रजी वर्तमानपत्र होतें. त्याचेंच पुढें रूपांतर होऊन हल्लींचें " टाईम्स ऑफ इंडिया " झालें. शंभर वर्षांपूर्वीची माहिती म्हणून " Courier " मधले कांहीं उतारे हल्लीं टाइम्स-मध्यें वेळोवेळ प्रसिद्ध होत असलेले पुष्कळांच्या वाचण्यांत आलेच असतील. असो. मिस्टर मीसन ( Mr. Meason ) नांवाचा मनुष्य त्या "Courier" पत्राचा संपादक होता. विठोबा मल्हारी हा एक दर्जी ( शिंपी ) असून सदरील साहेबाकडे तो नोकरीस होता. तो एके दिवशीं आपले येणें असलेले पैसे मागण्याकरितां त्या साहेबाकडे गेला असतां, यानें त्याला मारहारण करण्याचा प्रयत्न करून त्याला ( विठोबाला ) नोकरीवरून काढून टाकलें. विठोबानें लागलींच थोड्या दिवसांनीं आपल्या येणें असलेल्या पैशाबद्दल मुंबईच्या स्मॉलकॉज कोर्टांत दावा मांडला. पण त्याचा निकाल लागण्यापूर्वींच मीसन साहेबाच्या मडमेनें त्या वेळचे मुंबईचे एक पोलिस सुपरिंटेंडेंट मिस्तर बेन्स ( Mr. Baynes ) यांस एक पत्र लिहिलें. तेवढयावरून बेन्ससाहेबांनीं विठोबाला त्या वेळचे सीनियर म्हणजे हल्लींचे चीफ प्रेसीडेन्सी—मॅजिस्ट्रेट मिस्तर कॉर्फील्ड (Mr. Corfield) यांजपुढें उभें केलें. मध्यंतरीं मिस्टर मीसन साहेबांनींही एक कॉर्फील्डसाहेबांस पत्र लिहिलें होतें ! या सगळ्याचा परिणाम असा झाला कीं, मॅजिस्ट्रेट साहेबांनीं (कॉर्फील्ड यांनीं ) विठोबाला अगदीं अन्यायानें तीन आठवड्यांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावली ! ही गोष्ट सन १८५४ मध्यें घडली. शिक्षा भोगल्यावर बिचारा विठोबा कोल्हापुरास–आपल्या गांवीं–निघून गेला. वर सांगितलेलीं दोन्ही पत्रें पुढें कशीं तरी डॉ. भाऊ दाजींच्या हातास लागलीं. त्यांवरून विठोबाच्या बाबतींत अन्याय झाला आहे याबद्दल त्यांची खात्री झाली व त्यांना थोडी चीडही आली. डॉ. भाऊ दाजी यांनीं मग लागलींच कोल्हापुराहून विठोबाला आणविलें आणि त्याजकडून त्या वेळच्या सुप्रीम ( हल्लींच्या हाय ) कोर्टांत अपील करविलें. त्याचें म्हणणें इतकेंच कीं, कॉर्फील्डसाहेबांनीं केवळ अन्यायानें मला शिक्षा फर्मावून

माझें अब्रुनुकसान केलें आहे. तरी त्याबद्दल त्यांचेकडून मला ६०० रुपये नुकसानभरपाई मिळावी. खटला बरेंच दिवस चालला. विठोबातर्फें वेस्ट्राप व रीड हे दोन बॅरिस्टर काम चालवीत होते. अखेर चीफ जस्टिस यार्डले व जस्टिस जॅक्सन यांनीं विठोबा मल्हारी याच्या तर्फें निकाल देऊन त्याला ५०१ रुपये नुकसानभरपाई देवविली! डॉ. भाऊंची अन्याय उघडकीस आणण्याबाबतची इच्छा तृप्त झाली. त्यामुळें त्यांचा आनंद गगनांत माईना! पण ह्या निकालानें मात्र सर्व मुंबई शहरांत मोठी खळबळ उडवून दिली. डॉ. भाऊंनीं एका यःकश्चित् मनुष्यास हाताशीं धरून त्याला न्याय मिळवून दिला खरा, पण त्या कामांत त्यांचे १०,००० रुपये खर्च झाले! इतकी सार्वजनिक हिताबद्दलची कळकळ व तिच्यापायीं इतकी मोठी रक्कम खर्च करण्याची तयारी–या गोष्टी अगदींच विरळा! हिंदुस्थानच्या इतिहासांत असें दुसरें उदाहरण आधुनिक काळांत घडलेलें आम्हांस माहीत नाहीं. सदर्हू विठोबातर्फें काम करणारे वेस्ट्रापसाहेब पुढें हायकोर्टाचे जज्ज झाले. सन १८७४ सालीं डॉ. भाऊ दाजींच्या स्मारकाकरितां मुंबईच्या टाउन हॉलमध्यें भरलेल्या सभेंत मिस्टर जस्टिस वेस्ट्राप ( वर सांगितलेले पूर्वींचे बॅरिस्टर ) यांचें एक भाषण झालें. त्यांत त्यांनीं डॉ. भाऊंच्या सार्वजनिक कामांतील धैर्याचें ( public spirit ) एक उदाहरण म्हणून वरील खटल्याचा उल्लेख करून त्यांचा मोठा गौरव केला. त्यांचे शब्द असे होतेः—

"Nor ought I to pass over an instance of his (Dr. Bhau Daji's) public spirit. Believing one of his poorest and most humble fellow country-men to have been wronged by one of the local authorities, he warmly espoused his cause and never deserted him until he obtained compensation for his wrongs in the chief tribunal of this island at the time."

सदर्हू खटल्यानें हाय ( सुप्रीम ) कोर्टाची न्यायप्रियता तर सिद्ध झालीच; पण ह्यायोगानें बऱ्याच युरोपीयन लोकांस दहशत बसली व तशा कांहीं लोकांच्या स्वैर वर्तनास आळा बसला. दुसऱ्या दृष्टीनें ह्या खटल्यापासून डॉ. भाऊ दाजींना बराच त्रास झाला. वर सांगितल्याप्रमाणें कांहीं युरोपियन भाऊंच्या विरुद्ध झाले. युरोपियन कां? कांहीं आमचेच लोक विरुद्ध झाले. पण अशा प्रकारानें डॉ. भाऊ डगमगणारे नव्हते! त्यांनीं आपल्या हिंदी मित्रांना उद्देशून स्पष्ट सांगितलें कीं, तुम्ही सत्पक्षाकरितां धैर्यानें व आत्मविश्वासानें वागाल तर आमच्या

(राजकीय) स्थितींत थोड्याच दिवसांनीं सुधारणा झाल्याशिवाय राहणार नाहीं. यासंबंधांत त्या वेळच्या "नेटिव्ह ओपिनियन" पत्रानें (७-६-७४) काढलेले उद्गार पाहिले म्हणजे त्या वेळच्या परिस्थितीचें चित्र चटकन् दृष्टीपुढें येऊन उभें राहतें. ते उद्गार असेः—

"Vilified by partizan writers—some of whom were rewarded with appointments created on purpose and deserted by some of his own country men, Dr. Bhau Daji fought out the great "Darji" case in the late Supreme Court and the contrast between those times and the present does not speak much in favour of our vaunted progress and advancement. His cause, which was that of justice, succeeded, and that case became at once a bulwark of British justice and independence. We have the best authority to say that the Doctor pointed out to that case as an example to his Parsi friends, and advised them to remain firm and true to themselves and matters would right themselves in the end."

"नेटिव्ह ओपिनियन" हें रा. सा. मंडलिक यांचें पत्र होतें व मंडलीक व डॉ. भाऊ दाजी यांचा अत्यंत निकट संबंध असे. त्यामुळें मंडलीकांना डॉ. भाऊविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि वाटत असे; इतकेंच नसून ते त्यांचें अंतरंग जाणत असत. त्या दृष्टीनें वर दिलेल्या ने. ओ. मधल्या उताऱ्याचें महत्व फार मोठें आहे. त्यावरून डॉ. भाऊ दाजींना विठोबाच्या खटल्याच्या वेळीं किती त्रास झाला असेल याची सहज कल्पना होऊं शकते. एका बाजूस "Courier" (कुरीयर) पत्राचा संपादक व त्याच्या गोतावळ्यांतले अरेरावी करण्यास सोकावलेले लोक आणि दुसऱ्या बाजूस स्वार्थप्रेरित पण भयंकर असे आमच्यांतलेच घरभेदी लोक अशा दोन्ही बाजूंकडील मंडळीच्या जाचणुकीमुळें खटला चालू असतां डॉ. भाऊ दाजींचें जीवित अत्यंत कष्टमय झालें असलें पाहिजे यांत शंकाच राहात नाहीं. परंतु डॉ. भाऊ दाजी हे खंबीर हृदयाचे होते व जस्टिस वेस्ट्रापच्याच भाषेंत सांगावयाचें म्हणजे हातांत धरलेल्या माणसाला न्याय मिळेपर्यंत त्याला सोडावयाचें नाहीं, हा भाऊंचा कृतनिश्चय झालेला होता. शिवाय खटल्याची हकीकत अथपासून इतीपर्यंत खरीखुरी होती. त्यामुळें डॉ. भाऊ दाजींच्या खटपटीला यश आलें तें रास्तच झालें. या एकाच उदाहरणावरून डॉ. भाऊ यांची गरीब

नूपुर वाचनालय सांगली
संगणकीकृत


लोकांविषयींची कळकळ व त्यांचा देशाभिमान कोणत्या दर्जाचा होता हें चांगल्या रीतीनें व्यक्त होतें.

पण वरील खटल्याच्या हकीकतीवरून दुसरे एक दोन विचार सुचतात. त्यांसंबंधानें चार शब्द लिहिणें जरूर आहे. त्या खटल्यांत वास्तविक एका अगदीं क्षुल्लक माणसामध्यें व कॉफील्डसारख्या बड्या गोऱ्या अधिकाऱ्यामध्यें सुप्रीम कोर्टास न्याय करावयाचा होता व यार्डले आणि जॅक्सन या दोन निष्पक्षपाती न्यायमूर्तींनीं तो न्याय केला. ही सन १८५५ सालीं गोष्ट घडली. प्रश्न इतकाच कीं, असे खटले नेटिव्ह व युरोपियन यांमध्यें गेल्या पाऊण शतकांत झाले नाहींत काय? झाले असल्यास इकडील ब्रिटिश कोर्टांनीं त्या खटल्यांत कोणत्या प्रकारें न्याय केला? पाऊणशें वर्षांपूर्वी ब्रिटिश कोर्टांच्या न्यायदानाची कसोटी पाहणारा डॉ. भाऊ दाजींसारखा खराखुरा राजनिष्ठ पुरुष निघाला, ही गोष्ट सोडून द्या. पण न्यायकोर्टांना न्याय करतांना असा पुरुष पुढें यावयालाच कशास पाहिजे? विठोबा मल्हारीच्या खटल्यानंतर फक्त तीसच वर्षांनीं–म्हणजे सन १८८५ मध्यें–मिस्तर चंदावरकरांनीं–जे नंतर सर नारायण चंदावरकर झाले त्यांनीं–खुद्द इंग्लंडमध्येंच तिकडील लोकांपुढें हिंदुस्थानांतील न्यायदानपद्धतीविषयीं काय सांगितलें तें पहाः—

"Alluding to the administration of justice in India, the lecturer (Mr. Chandavarkar) observed that as between native and native the system was as good as perfect, but when it was a matter as between a European and a native, then he regretted to state that serious miscarriages of justice very often resulted, in proof of which he instanced one very flagrant case of injustice."

म्हणजे नेटिव्ह आणि नेटिव्ह यांमध्यें आमचीं कोर्टें बरोबर रीतीनें न्याय करतात; पण युरोपियन व नेटिव्ह यांमध्यें न्याय करावयाचा असला म्हणजे मात्र पुष्कळ वेळां न्यायाचा कांटा गोऱ्या मनुष्याच्या बाजूस झुकतो! अशा स्थितींत दुसरा एकादा राजनिष्ठ पुरुष पुढें आला तरी न्यायदानाच्या पद्धतींत फरक तो काय पडणार आहे? या सगळ्याचें तात्पर्य एवढेंच कीं, डॉ. भाऊ दाजींना, तत्कालीन परिस्थितींत, ब्रिटिश लोकांच्या न्यायप्रियतेविषयीं विश्वास वाटावा यांत आश्चर्य नाहीं. पण पुढें पुढें त्या न्यायप्रियतेचें तेंच मान कोठें

राहिलें? आमच्या समजुतीप्रमाणें, गेल्या सुमारें पन्नास वर्षांत मुंबई हायकोर्टांत होऊन गेलेल्या मुख्य न्यायाधिशांत फक्त सर मायकेल वेस्ट्राप, सर चार्लस सार्जंत व सर लॉरेन्स जेंकिन्स हे तीनच जज्ज यार्डले-जॅक्सन यांजप्रमाणें निस्पृह व स्वतंत्र बाण्याचे निघतील! अशा स्थितींत ब्रिटिश न्यायप्रियतेच्या दृष्टीनें पाऊणशें वर्षांपूर्वीप्रमाणें राजनिष्ठा आज राहणार कशी?

हाच नियम इतर बाबींना लागू आहे. डॉ. भाऊ दाजींच्या वेळीं कलकत्त्यास लॉर्ड नार्थब्रुकसारखे उदारमनस्क व्हाइसरॉय व मुंबईस सर बार्टल फ्रेअर-सारखे गव्हर्नर होते. लॉर्ड नॉर्थब्रुक यांना डॉ. भाऊंच्या विद्वत्तेविषयीं व त्यांनीं चालविलेल्या संशोधनकार्याविषयीं फार आदर वाटत असे. व सर बार्टल फ्रेअर हे तर डॉ. भाऊ दाजी यांचे मित्र होते. डॉ. भाऊंनीं फ्रेअरसाहेबांची अनेकदां एल्फिन्स्टन व मालकम या दोन गव्हर्नरांशीं तुलना केली होती. एकदां सन १८६७ च्या फेब्रुवारींत मुंबईच्या टाउन हॉलमध्यें सर बार्टल फ्रेअर यांना त्यांचें विलायतेस प्रयाण होण्यापूर्वीं मानपत्र (testimonial) देऊन प्रेमाचा निरोप देण्याकरितां सर्व नागरिकांची सभा भरली होती. सर अलेक्झँडर हंटर हे अध्यक्षस्थानीं होते. त्या वेळीं पुष्कळ लोकांचीं फ्रेअरसाहेबांच्या गुणवर्णनपर भाषणें झालीं. त्यांत एक डॉ. भाऊ दाजींचें झालें. भाऊंचें भाषण बरेंच विस्तृत होतें. पण तें सगळें किंवा संक्षेपानें इकडे देण्याचें कारण नाहीं. तथापि इतकें सांगितल्यास बस्स आहे कीं, भाऊंनीं आपल्या भाषणांत हिंदुस्थानांतील गव्हर्नरचा उत्तम नमुना म्हणजे एल्फिन्स्टन होते, असें सांगून त्यांच्याच बरो-बरीचे सर बार्टल फ्रेअर होते असें स्पष्ट रीतीनें जाहीर केलें.

"Sir Bartle Frere bade fare to rival Mountstuart Elphinstone in all that was great and good." "Sir B. Frere is like Elphinstone, my *beau ideal* of a British Governor."

खुद्द एल्फिन्स्टन साहेबांनीं अनेकदां जाहीर रीतीनें म्हटलें होतें कीं, "आमचें राज्य या देशांत कायमचें राहणें शक्य नाहीं. तर या लोकांस इंग्रजी शिक्षण देऊन ते आपला राज्यकारभार चालविण्यास तयार होतील, अशी आम्ही एव्हां-पासूनच तजवीज केली पाहिजे." हे एक शतकापूर्वीं एल्फिन्स्टनसाहेबांनीं काढलेले उद्गार! अशा उदार भावनेनें वागणाऱ्या इंग्लिश अधिकाऱ्यांच्या निर्मल हेतूंविषयीं मनांत पूर्ण विश्वास बाळगून डॉ. भाऊ दाजींनीं ब्रिटिश राज्यासंबंधानें

आपली राजनिष्ठा वेळोवेळ व्यक्त केली तर त्यांत नवल काय? पण पुढें ब्रिटिश अधिकाऱ्यांची ही भावना राहिली काय? आमच्या मतें गेल्या पन्नास वर्षांत लॉर्ड नॉर्थब्रुकनंतर लॉर्ड रिपन व कांहींसे लॉर्ड हार्डिंज हे दोघे सोडून थोर विचाराचे व्हाइसरॉय झाले नाहींत व लॉर्ड रे सोडून तसे मुंबईस गव्हर्नर झाले नाहींत? प्रस्तुतचे व्हाइसरॉय लॉड अर्विन व मुंबईचे गव्हर्नर सर फ्रेड्रिक साइक्स यांच्या कारकीर्दीसंबंधानें लोकांनीं मत देण्याची वेळ अद्यापि पुढेंच यावयाची आहे. असो. लॉर्ड रिपनसाहेबांचें हिंदी राजकारणासंबंधानें किती थोरपणाचें धोरण होतें, हें एकाच त्यांच्या भाषणांतील उताऱ्यावरून स्पष्ट होतें. तो उतारा हाः—

"It seems to me, I must confess, that it is little short of folly that we should throw open to increasing numbers the rich stores of Western learning; that we should inspire them with European ideas and bring them into the closest contact with English thought, and that then we should, as it were pay no heed to the growth of those aspirations which we have ourselves created and the pride of those ambitions we have ourselves called forth. To my mind, one of the most important, if it be also one of the most difficult, problems of the Indian Government in these days is how to afford such satisfaction to those aspirations and to those ambitions as to render the men who are animated by them the hearty advocates and the loyal supporters of the British Government."

याचें तात्पर्य इतकेंच कीं, इंग्लिश लोकांनीं नवीन शिक्षण देऊन हिंदी लोकांच्या मनांत ज्या रास्त आकांक्षा उत्पन्न केल्या आहेत, त्या त्यांनीं पूर्ण केल्या पाहिजेत. म्हणजे ते हिंदी लोक साहजिकच आमच्याशीं राजनिष्ठ राहतील. असो. या धोरणाप्रमाणें लॉर्ड रिपन यांनीं वागण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं इकडे स्थानिक स्वराज्य सुरू केलें. शिक्षणास उत्तेजन दिलें व "गोरा व काळा" यांमध्यें जो उघड उघड राज्यकारभारांत विषमभाव दिसत होता, तो इलबर्ट बिलाच्या योगानें दूर करण्याचा प्रयत्न केला! पण त्याबद्दल त्यांना त्यांच्याच जातभाईनीं इकडे इतकें छळलें कीं, तशा प्रकारचा यत्न मग कोणत्याच व्हाइसरॉयसाहेबांनीं केला नाहीं! इतकेंच नव्हे, तर पुढें कांहीं दिवसांनीं या देशांत चक्र पिछेहाटीचें धोरण

सुरू झालें! सन १९०५ मध्यें कै. गोखले ह्यांनीं इंग्लंडांतील लोकांना असें सांगितलें कीं,

" During the last four years a reactionary policy has been pursued towards the educated classes of the country and this reaction has taken the form of active repression during the last three years of Lord Curzon's administration."

म्हणजे त्या पिच्छेहाटी धोरणाचा लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीत अगदीं कडेलोट झाला! अशा स्थितींत पाऊणशें वर्षांपूर्वीच्या लोकांस वाटणारी राजनिष्ठा आज राहणार कशी?

तात्पर्य, डॉ. भाऊ दाजींच्या वेळच्या राजनिष्ठेच्या दृष्टीनें हल्लींच्या स्थितीचा विचार करणें बरोबर नाहीं. तसेंच, त्या वेळच्या कोणत्याही गोष्टीचा हल्लींच्या परिस्थितीच्या दृष्टीनें विचार करणें बरोबर नाहीं.

असो. पुढें लायसेन्स टॅक्स बसविण्याच्या वेळीं देखील आमच्यापैकींच कांहीं सधन लोक सरकारच्या बाजूस वळले. त्या वेळींही डॉ. भाऊ दाजींनीं त्यांना प्रतिबंध केल्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत असें "नेटिव्ह ओपिनियन" पत्रानें म्हटलें होतें. असो. एकंदरींत डॉ. भाऊ दाजींनीं राजकीय दृष्टीनें—त्यांच्या वेळेच्या मानानें—केवढी महत्त्वाची कामगिरी केली याविषयीं आतां इकडे जास्त विस्तार करण्याचें कारण नाहीं.

---

## प्रकरण चवदावें.

# इतर चळवळी.

डॉ. भाऊ दाजी हे आपल्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें राजकीय चळवळींत महत्त्वाचा भाग घेत असत हें मागील प्रकरणांत सांगितलेंच. सामाजिक बाबतींत देखील त्यांचे विचार फार पुढें गेलेले होते. इंग्लिश वैद्यकीय शिक्षणाची या देशांत सुरवात करण्याच्या कामीं डॉ. भाऊ दाजींची केवढी महत्त्वाची कामगिरी झालेली आहे, याचा मागें उल्लेख आलाच आहे. तसेंच सामाजिक सुधारणेची जी मुख्य बाब "स्त्रीशिक्षण" त्याचा भाऊ दाजींनींच धैर्यानें पुढें येऊन पुरस्कार

केलेला होता. मूळ सन१८४८ च्या सुमारास आमच्या नवीन शिकलेल्या मंडळीस आपल्या सामाजिक स्थितींतील जें पहिलें व्यंग आढळून आलें तें आमच्या स्त्रियांची दुःस्थिति हें होय. ती स्थिति सुधारण्याकरितांच मंडळींनीं मुलांची शाळा काढून प्रथम स्त्रीशिक्षणास सुरवात केली. त्या वेळच्या खऱ्या स्थितीचे द्योतक असे डॉ. सर रामकृष्ण भांडारकरांचे असे उद्गार आहेतः–

"In the year 1848 was established the first girls' school in Bombay by the members of the Students' Literary and Scientific Society............and the object of the social reformers was to endeavour to elevate the condition and the degraded position of women."

डॉ. भाऊ दाजी हे स्टु. लि. आणि सा. सोसायटीचे प्रथम सभासद होते. ते मग तिचे अध्यक्ष झाले. ह्या गोष्टी मागें आल्याच आहेत. त्याच मुदतींत त्यांनीं लोहारचाळींतील मुलींची शाळा कित्येक वर्षेपर्यंत आपल्या खर्चानें चालविली होती. असो.

स्त्रीशिक्षणाची कल्पना पूर्वी हिंदू लोकांना नव्हती असें नव्हे. प्राचीन काळीं हिंदुस्थानांतील स्त्रिया विदुषीच नव्हेत, तर कांहीं ब्रह्मवादिनीही होत्या! परंतु पुढें कालचक्रामुळें व अनेक राज्यक्रांत्यांच्या वावटळीमुळें हिंदुलोकांमधील स्त्रियांसंबंधाच्या उदार भावना नष्ट होऊन त्या ठिकाणीं परकीयांच्या–विशेषेंकरून मुसलमान लोकांच्या अनुदार कल्पना शिरल्यामुळें एकंदरींत स्त्रीवर्गाची वर सांगितल्याप्रमाणें एक शतकापूर्वी अत्यंत शोचनीय स्थिति झाली होती. सबब ती स्थिति सुधारणें हेंच आपल्यामधील पहिल्या सुशिक्षित मंडळीला आपलें पहिलें कर्तव्य वाटलें व त्याप्रमाणें त्यांनीं उपक्रम केला. या गोष्टीलाच अनुलक्षून सर बार्टल फ्रेअर यांनीं एकदां ( १८६२ ) पुढील प्रकारचे उद्गार काढलेले होतेः—

"Sir Bartle appealed to Dr. Bhau Daji's antiquarian researches to confirm his assention that the non-education of females was a modern innovation totally repugnant to the ancient traditions of the Hindus; and he instanced Ahalya-Bai Holkar and the present Begam of Bhopal as proving that the native ladies of modern days are in no respect inferior to those of ancient days in capacity for filling with distinction the highest and most difficult positions in life."

असो. डॉ. भाऊ दाजी आदि मंडळींनीं प्रथम स्त्रीशिक्षणासच हात घातला, हें उत्तमच केलें. पण त्यावेळीं त्यांनीं जें बीं पेरलें त्याचा पुढें मोठा वृक्ष–वटवृक्ष–होऊन त्याची छाया महाराष्ट्रांत कशी दूरवर पसरली व प्रस्तुत काळीं त्याचीं स्वादु फळें कशीं आपण पाहत आहों याचा अनुभव प्रत्येकास आहे.

डॉ. भाऊ दाजींचें जें उदार धोरण स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत दिसून येत असे तेंच इतर सामाजिक बाबतींतही दृष्टीस पडत असे. ते हिंदु सोशल रिफार्म असोसिएशनचे सभासद होते. तसेच ते पुनर्विवाहोत्तेजक मंडळीचेही सभासद होते. सन १८६९ सालीं जो मुंबईस विष्णुपंत करमरकरांचा पुनर्विवाह झाला, तो मुंबईतील पहिला पुनर्विवाह होय. त्या प्रसंगीं डॉ. भाऊ दाजी हजर होते. रा. सा. मंडलीक होते. भांडारकर, रानडे वगैरे मंडळी तर हजर होतीच होती. यावरून डॉ. भाऊ हे सामाजिक सुधारणेला अनुकूल होते हें स्पष्ट रीतीनें सिद्ध होतें.

डॉ. भाऊ दाजींचें आपल्या जातींत–मुंबईच्या सारस्वत ब्राह्मणांत—फार वजन होतें. त्या वेळचे सारस्वत ज्ञातींतील पुढारी म्हणजे डॉ. भाऊ दाजी, नामदार नारायण वासुदेव दाभोळकर, रा. रघुनाथ नारायण खोटे, शांताराम नारायण पाटकर, डॉ. शांताराम विठल संझगिरी हेच होत. त्यांतही विद्वत्ता, संशोधनकार्य, परोपकारबुद्धि इत्यादि गुणांमुळें डॉ. भाऊंची प्रसिद्धि व वजन फार मोठें होतें. सारस्वत ब्राह्मण जातींत अनेक पोटभेद आहेत हें प्रसिद्ध आहे. त्या पोटभेदांना केव्हां केव्हां "तट" म्हणतात. डॉ. भाऊ दाजींच्या वेळीं जातींत असे चार तट होते. पण नंतरच्या लोकसंख्येच्या वाढीमुळें ही संख्या वाढली व सुमारें पसतीस वर्षांपूर्वी मुंबईतील गौ. सा. ब्राह्मणजातीच्या देवळासंबंधाच्या खटल्याच्या वेळीं ती पोटजातींची संख्या आठदहा आहे असें ठरलें. असो. आतां त्या पोटजातींचें निदान–अन्य व्यवहाराच्या दृष्टीनें तरी महत्व राहिलें नाहीं. पण डॉ. भाऊ दाजींच्या वेळीं तें होतें. त्या वेळीं चार तटांतील लोक एकमेकांच्या घरीं शुभकार्यांच्या वेळीं वगैरे जेवणखाणाकरितां उघडपणें जात नसत. इतका त्यांच्यामध्यें भेदभाव होता. पण तो डॉ. भाऊ दाजींनीं काढून टाकण्याचा प्रयत्न केला. ते आपल्या घरीं वारंवार कोणत्याही निमित्तानें भोजनसमारंभ घडवून आणीत असत व त्या वेळीं सर्व तटांतील लोकांना बोलावणें करून एके ठिकाणीं जमवीत असत. या रीतीनें त्यांनीं त्या वेळच्या चार पोटजातींचें एकीकरण केलें. या सुधारणेचें कित्येकांस प्रस्तुत काळीं महत्त्व वाटणार नाहीं, पण

त्या वेळच्या परिस्थितीच्या दृष्टीनें विचार केल्यास तिचें महत्त्व कोणाच्याही लक्षांत येईल.

डॉ. भाऊ दाजी हे अशा सामाजिक बाबतींत केवळ आपल्या जातीकडेच लक्ष पुरवीत असत असें नाहीं. इतर जातींत—ज्या ठिकाणीं आपल्या वजनाचा उपयोग होण्यासारखा असेल अशा ज़ातींत—देखील ते सुधारणा घडवून आणण्याचा यत्न करीत असत. गुजराथी लोकांमधील त्या वेळचे प्रसिद्ध समाजसुधारक कर्सनदास मुळजी हे विलायतेस जाऊन आले होते. त्यांनीं "विलायतचा प्रवास" हें सुंदर पुस्तक लिहिल्याचें प्रसिद्धच आहे. त्या प्रवासाबद्दल त्यांच्या जातीनें त्यांस वाळींत टाकलें होतें. त्या वेळीं त्यांना पंक्तिपावन करून जातींत घ्यावें अशाबद्दल बरीच खटपट झाली. त्यांत मुख्य अंग डॉ. भाऊ दाजी यांचेंच होतें. पण त्यांत त्यांना अखेर यश आलें नाहीं.

डॉ. भाऊ दाजींवर सामाजिक बाबतींत एक दोन आरोप करण्यांत येत असतात. ते आरोप म्हणजे हेः—भाऊंनीं एका विशिष्ट प्रसंगीं प्रायश्चित्त घेतलें आणि ते केव्हां केव्हां लोकांस खुष करण्याकरितां तसे वागत असत. या दोन्ही आरोपांसंबंधानें इकडे जास्त विस्तार करण्याची आमची इच्छा नाहीं; पण मृत माणसाच्या दोषांसंबंधानें बोलतांना अगर लिहितांना आम्ही जरा उदार दृष्टीनें विचार करून मग काय तें बोलावें उगर लिहावें हें बरें, असें आम्हांस वाटतें. त्यांतूनही वरील प्रायश्चित्ताच्या दोषारोपासंबंधानें जर रावसाहेब गोपाळ वेंकटेश पाणंदीकर—जे त्या वेळीं झालेल्या सभेंत आपण हजर होतों व त्या प्रसंगीं डॉ. भाऊंचें भाषण झालेलें आपण स्वतः ऐकलें असें म्हणतात ते—जर भाऊंनीं प्रायश्चित्त घेतलें नाहीं असें स्पष्ट सांगतात तर त्यांचें म्हणणें आम्हांस मान्य केलें पाहिजे. दुसऱ्या कित्येकांची त्या वेळीं कांहीं गैरसमजूत झाली असेल किंवा डॉ. भाऊंना चिडविण्याकरितां कित्येकांनीं त्यांनीं प्रायश्चित्त घेतल्याचा अवास्तव बोभाटा केला असेल. असे गैरसमजुतीचे प्रकार अशा प्रसंगीं होत असतात हें सर्वश्रुत आहे. अन्य पक्षीं, डॉ. भाऊंनीं प्रायश्चित्त घेतलें असें क्षणभर मानलें तरी त्याच्या योगानें त्यांची योग्यता कमी होते असे थोडेंच आहे! तो काळ सामाजिक सुधारणेच्या अगदीं सुरवातीचा होता. अशा काळांत समाजाची जुनी घडी मोडून नवी बसविणें हें सोपें काम नव्हतें. तशांतून जुन्या मताच्या लोकांना शक्य तेवढें बरोबर घेऊन सुधारणा केली पाहिजे अशा मताचेच डॉ. भाऊ हे होते. व

त्या धोरणानेंच त्यांचे प्रयत्न चालत असत. अशा काळांत जरी कोणी—डॉ. भाऊंनीं तर प्रायश्चित्त घेतलेंच नाहीं असें रा. सा. पाणंदीकर निक्षून सांगत आहेत—वडील माणसांच्या मुर्वतीखातर अगर दुसऱ्या अशाच कारणाकरितां प्रायश्चित्त घेतलें तर त्यांत आश्चर्य नाहीं. अगदीं धारवाडी कांट्यानें पाहिल्यास कदाचित् हें वर्तन पहिल्या नंबरचें ठरणार नाहीं. त्याच्या खालचें ठरेल. परंतु त्याचा त्या काळाकडे पाहून, क्षम्य दृष्टीनें विचार केला पाहिजे, इतकेंच आमचें म्हणणें आहे. पुढें कांहीं वर्षांनंतर सामाजिक सुधारणेची चळवळ जरा अधिक जोरांत आली. अशा वेळीं देखील न्या. रानडे यांनीं एकदां प्रायश्चित्त घेतल्याचें प्रसिद्ध आहे. त्या वेळीं देखील सुधारणापक्षांतील लोकांनीं त्यांजवर कडक टीका केली. पण त्यांनीं ती निमूटपणें सोसली. त्यायोगानें रानड्यांची योग्यता यत्किंचित् तरी कमी झाली काय ? नाहीं. सबब याचा तात्पर्यार्थ इतकाच कीं, अशा गोष्टीचा विचार करतांना आम्ही जरा दृष्टि उदार ठेविली तर बरें. असो.

तोच प्रकार डॉ. भाऊ दाजींवरच्या दुसऱ्या दोषारोपासंबंधानें. डॉ. भाऊ हे लोकांस खुष करण्याचा प्रयत्न करीत असत, असें कांहीं गृहस्थ बोलतांना आम्ही ऐकलें आहे. विषय सामाजिक सुधारणेचाच होता. पण हें बोलणें आम्हांस अनुदार मनाचें द्योतक वाटलें. त्याचा अर्थ, डॉ. भाऊ हे लोकांची खुशामत करीत असत असा असेल तर ते बोलणें निराधार होतें. ज्या डॉ. भाऊंनीं यदुमहाराजांच्या ( याचा विस्तार पुढें येईल ) विरुद्ध खरी साक्ष देऊन आपलें धंद्याच्या दृष्टीनें भयंकर नुकसान करून घेतलें व ज्यांनीं जातींतील असंख्य कुटुंबांवर—त्यांच्या अडचणींच्या वेळीं उपयोगीं पडून—उपकार केले होते त्यांना ( डॉ. भाऊंना ) जातीच्या लोकांची सामाजिक बाबतींत खुशामत करून काय मिळवावयाचें होतें ? बरें, वरील बोलण्याचा अर्थ डॉ. भाऊ हे लोकांस कधीं आपल्या वर्तनानें दुखवीत नसत असा असेल तर त्यांत भाऊंचा गौरवच होतो. दोषाविष्करण होत नाहीं. मग अशी गोष्ट बोलावयाची तरी कशाला ? तात्पर्य, एकाद्या मनुष्याशीं एका बाबतींत न पटलें तर त्याविषयीं अन्य बाबतींत समंजस मनुष्यानें चित्तौदार्य राखलें पाहिजे. तरच व्यवहार सुरळीत चालेल.

धर्मसंबंधीं सुधारणेच्या बाबतींतदेखील डॉ. भाऊ दाजींचे उदार विचार असत. त्यांच्या वेळीं सामाजिक व धार्मिक बाबतींत लोकांमध्यें बरीच चर्चा चालत असे. व अनेक संस्था उत्पन्न झाल्या व विलय पावल्या. परमहंससभा,

प्रार्थनासमाज ह्या संस्था त्याच काळांत स्थापिल्या गेल्या. त्यांपैकीं परमहंस सभा ही पुढें कांहीं वर्षांनीं बंद झाली. प्रार्थनासमाजाचें काम मात्र अद्याप चालू आहे. डॉ. भाऊ दाजींचा परमहंससभेस प्रथम मिळण्याचा विचार होता. परंतु ते अखेर तिचे सभासद झाले नाहींत. त्याचप्रमाणें ते प्रार्थनासमाजाचेही सभासद झाले नाहींत. तथापि त्यांनीं धर्मसंबंधीं सुधारणेविषयीं अगदींच विचार केला नव्हता असें नाहीं. सन १८६४ सालीं बंगालकडचे प्रसिद्ध बाबू केशवचंद्रसेन हे लोकजागृति करण्याच्या उद्देशानें मुंबईस आले होते व त्यांचीं तेथें बरींच व्याख्यानें झालीं. पण त्यांच्या त्या वक्तृत्वपूर्ण व्याख्यानांचा मुंबईकरांच्या मनावर कांहीं एक परिणाम झाला नाहीं. मुंबईचे बरेचसे लोक त्या वेळीं पैसे मिळविण्याच्या नादांत इतके गढून गेले होते कीं, त्यांचें केशवचंद्र यांच्या धर्मविषयक व्याख्यानांकडे लक्ष लागणें शक्यच नव्हतें. त्यामुळें केशवचंद्र यांना आपल्या कामांत त्या वेळीं यश आलें नाहीं. वरीलपैकीं केशवचंद्र यांच्या एका व्याख्यानाच्या वेळीं डॉ. भाऊ दाजी हे अध्यक्षस्थानीं होते. पण व्याख्यानाचे शेवटीं त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें कीं, धर्माची सुधारणा करण्याच्या कामांत आपण पूर्ण विचारांतीं व सावधगिरीनें वागलें पाहिजे. असें होतें तरी प्रचलित हिंदुधर्मांतील कांहीं कांहीं गोष्टींबद्दल त्यांचा प्रतिकूल ग्रह झाला होता. हें व्यक्त करण्याची त्यांना एकदां सन १८५४ मध्यें संधि मिळाली होती. त्या वेळीं पूर्वोक्त गुजराथी समाजसुधारक प्रसिद्ध कर्सनदास मुलजी यांनीं वल्लभाचार्यांच्या अनुयायांनीं धर्माच्या नांवाखालीं चालविलेल्या कांहीं अनीतीच्या प्रकारासंबंधानें "रास्त गोफ्तार" या वर्तमानपत्रांतून प्रसिद्धपणें टीका केली. त्याबरोबर वल्लभाचार्यांच्या त्या वेळीं गादीवर असलेले यदुनाथ महाराज यांनीं कर्सनदास यांजविरुद्ध हायकोर्टांत अब्रूनुकसानीचा दावा मांडला. यदुनाथ महाराज हे–त्यांचें इतर कांहींही असलें तरी–कांहीं गुजराथी समाजांमध्यें अत्यंत पूज्य मानले जात असत व त्यांचा शिष्यसमुदाय बराच मोठा व सधन होता. अशा वजनदार धर्माध्यक्षांविरुद्ध जाणें म्हणजे मोठ्या धैर्याचें काम होतें. शिवाय खुद्द यदुनाथ महाराज हे डॉ. भाऊ दाजी यांच्या गिऱ्हाइकांपैकीं एक होते. अर्थात् त्यांच्याकडे यांना वारंवार औषधोपचाराच्या अगर सल्ला देण्याच्या निमित्तानें जावें लागत असे. त्यामुळें सदरहु दाव्याच्या वेळीं डॉ. भाऊ दाजींवर एक मोठें संकट येऊन पडलें. गिऱ्हाइकाच्या अगर अशीलाच्या विरुद्ध साक्ष देणें हें धंद्याच्या नीतिमत्तेच्या दृष्टीनें बरोबर नव्हतें. व खोटी साक्ष देणें हें त्याहीपेक्षां दूषणीय होतें. अशा स्थितींत डॉ. भाऊ

यांनीं पुढें येऊन खरी तीच साक्ष दिली व आपला नेहमींचा निःस्पृह बाणा राखला! इतकेंच नव्हे, तर गुजराथी हिंदुसमाजांत धर्माच्या नांवाखालीं चालू असलेल्या अनाचाराचें दोषाविष्करण करून त्यांनीं शुद्ध हिंदुधर्माची एका दृष्टीनें उत्तम कामगिरी केली. त्यायोगानें डॉ. भाऊ यांचें भयंकर आर्थिक नुकसान झालें. परतु त्याचें त्यांना कांहीं वाटलें नाहीं. पण वर सांगितल्याप्रमाणें डॉ. भाऊ दाजींनीं धैर्याचें व अगदीं निःस्पृहपणाचें वर्तन केल्यामुळें मात्र त्यांची सर्वत्र वाहवा झाली. यासंबंधांत प्रसिद्ध डॉक्टर विल्सन यांचे असे उद्गार आहेत.

"They (the public) recognize his (Dr. Bhau Daji's) genuine philanthropy in fearlessly supporting the cause of truth and purity on the occasion of the prosecution in the Supreme Court in 1854, of a public journalist for his exposure of the immoral tenets and practices of the professed heads of a sect denominating themselves the followers of Vallabha-charya."

धर्माच्या बाबतींत डॉ. भाऊ दाजी हे उदारमतवादी होते.

धर्माची जी एक परोपकाराची बाजू असते त्यांत तर डॉ. भाऊ दाजींची प्रसिद्धि होती. कोणतेंही परोपकाराचें किंवा सार्वजनिक हिताचें काम निघालें कीं त्यांत डॉ. भाऊ दाजींचें प्रमुखत्वानें अंग असावयाचें हें बहुतेक ठरलेलेंच असे. दुष्काळपीडितास मदत करणें किंवा अशाच निमित्तानें गरीबांस साहाय्य करण्या-करितां देशांत कोणतीही चळवळ उत्पन्न झाल्यास त्यांत डॉ. भाऊंचा महत्वाचा भाग असे. एकदां लँकेशायरमधील लोकांस मदत करण्याकरितां इकडे खटपट झाली, त्यांत डॉ. भाऊंचें अंग होतेंच. नामदार मिस्टर गिब्स यांनीं यासंबंधानें आपल्या एका भाषणांत उल्लेख केला होता.

"He (Dr. Bhau Daji) took a prominent part in the matter of Lancashire Relief fund."

एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे डॉ. भाऊ दाजींची धर्मबुद्धि दांडगी होती. धर्माच्या बाबतींत डॉ. भाऊंचे विचार किती प्रगल्भ व उदार होते, किंबहुना ते किती मनाची उन्नति दाखविणारे होते, हें मिस्टर जस्टिस वेस्ट्राप यांच्या पुढील उद्गारांवरून दिसून येईल. ते एकदां म्हणाले,

"I shall never forget a speech which it was my good fortune to hear him deliver in this hall (Town Hall), when

speaking of a religious faith to which he did not belong, he expressed himself with, I shall not say a toleration, but with an intelligent appreciation and sympathy which manifested that liberality of sentiment, which is the result of high mental culture."

आपल्या हिंदुसमाजाची सामाजिक व धार्मिक दृष्टीनें झालेली दुःस्थिति सुधारण्याच्या बाबतींत डॉ. भाऊ दाजींची कळकळ व आत्मविश्वास इतका मोठा असे कीं, त्या कामाकरितां इतर देशांतील अनुभव पहावा या हेतूनें त्यांचा एकदां विलायतेस जाण्याचा विचारही ठरला होता. यासंबंधानें त्यांनीं सन १८६० मध्यें एक रा. सा. मंडलीकांना पत्र लिहिलें होतें. त्यांत असा मजकूर होताः—"सामाजिक व धार्मिक क्रांति घडून येईल अशी कांहीं तरी तजवीज करण्याकरितां विलायतेस जाण्याचा विचार माझ्या मनांत येऊन तो दिवसेंदिवस बळावत चालला आहे. व तो माझा हेतु सिद्धीस जाई तोंपर्यंत मी जगावें, अशी मी रोज परमेश्वरापाशीं मनांत एकनिष्ठेनें प्रार्थना करीत असतों. जसजसा हा विचार माझ्या मनांत घोळत राहतो तसतसा माझ्या देशबांधवांच्या अगाध अज्ञानाबद्दल मला अधिकाधिक खेद वाटूं लागतो. एका व्यक्तीच्या अगर एका मंडळाच्या हातून हें अज्ञान अंशतःसुद्धां नष्ट करतां यावयाचें नाहीं असें कोणी म्हणेल तर तें मला खरें वाटत नाहीं."

आपल्या हिंदुस्थान देशाची औद्योगिक दृष्टीनेंही उन्नति झाली पाहिजे, या गोष्टीकडे डॉ. भाऊ दाजींचें लक्ष होतेंच. सन १८६०–६५ सुमारास मुंबईस ज्या एकदम कापसाच्या गिरण्या निघाल्या, त्यांत डॉ. भाऊ दाजींचें प्रमुखत्वानें अंग होतें.

डॉ. भाऊ दाजी यांना अनेक प्रकारच्या वनस्पति किंवा इतर वस्तु यांचा संग्रह करण्याचा एक नादच होता. त्याच्या पायीं त्यांनीं हजारों रुपये खर्च केले व तशा असंख्य वस्तूंचा संग्रह केला. त्यांच्या मधला हा गुण ते मेडिकल कॉलेजांत विद्यार्थी होते तेव्हांपासूनच दृष्टोत्पत्तीस पडूं लागला होता. ते कॉलेजांत होते तेव्हां तेथेंच कांहीं शारीरिक शास्त्राचे नमुने व इतर वस्तु यांचा संग्रह करण्याचें काम होतें. त्यांत ज्या विद्यार्थ्यांचें साहाय्य झालें त्यांत भाऊ दाजी होते. याचा सन १८४७–४८ सालच्या कॉलेजच्या रिपोर्टांत असा उल्लेख आहेः—

"It has been a subiect of gratification that during the past session some of the students have shown a praiseworthy zeal in making additions to the preparations in the Anatomical museum. As contributors of specimens, some of which are prepared in a creditable manner, the names of Bhau Dajee, Atmaram Pandurang, Mr. Carvalho and Burjorji Dorabjee are the most conspicuous."

त्याचप्रमाणें डॉ. भाऊंनीं अनेक चमत्कारिक वनस्पतींचा संग्रह करून त्यांनीं आपल्या घराभोंवतीं एक बाग तयार केली होती. पण पुढें असा वनस्पतींचा, निरनिराळ्या प्राण्यांचा व वस्तूंचा संग्रह सार्वजनिक उपयोगाकरितां झाला पाहिजे, अशी कल्पना निघून मुंबईतील "व्हिक्टोरिया गार्डन व आल्बर्ट म्युझियम" ची योजना झाली. त्यांत डॉ. भाऊ दाजींचेंच मुख्य अंग होतें. सन १८५८ या वर्षाचें हिंदुस्थानच्या आधुनिक इतिहासांत फार महत्व आहे. त्या सालीं या देशाचीं राज्यसूत्रें महाराणी साहेबांनीं कंपनीसरकाच्या हातांतून काढून आपल्या हातांत घेतलीं. यासंबंधाचा राणीसरकारचा जाहीरनामा त्या सालच्या नोव्हेंबर १ लीला प्रसिद्ध करण्यांत आला. पुढें त्या विजयोत्सवार्थ हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं सभा झाल्या. तशीच एक डिसेंबर १५ रोजीं मुंबईच्या टाऊन हॉलमध्यें झाली. त्या प्रसंगीं प्रसिद्ध जगन्नाथ शंकरशेट हे अध्यक्षस्थानीं विराजमान झाले होते. सभेंत मंगळदास नथूभाई, वरजीवनदास, पटेल, कामा, ई. हेकॉक (Heycock), डब्ल्यू. एफ्. हंटर वगैरे सर्व जातींचे व धर्मांचे पुढारी हजर होते. अखेर त्या मंगल प्रसंगाचें स्मारक म्हणून एक व्हिक्टोरिया राणीच्या नांवाची मोठी बाग व सर्ववस्तुसंग्रहालय स्थापन करण्याचें ठरलें. त्या ठरावाच्या पुष्ट्यर्थ पुष्कळ भाषणें झालीं. दादाभाई नवरोजी, बमनजी होर्मसजी, डॉ. विल्सन इत्यादि गृहस्थांचीं भाषणें झालीं. पण त्या सर्वांत डॉ. भाऊ दाजी यांचेंच भाषण फार उत्तम झालें. डॉ. भाऊंचें भाषण बरेंच विस्तृत होतें. तें सगळें—भाषांतररूपानें-इकडे देतां येणें शक्य नाहीं. त्यांतून फक्त कांहीं उतारे देतों. त्यावरून तें किती विद्वत्वपूर्ण व उच्च दर्जाचें होतें हें सहज दिसून येईल.

डॉ. भाऊ दाजींनीं आपल्या भाषणांत आमच्या देशांतील विद्या, कला, कौशल्य, वाङ्मय इत्यादि भांडार व्यक्त करणाऱ्या वस्तूंचा सर्व लोकांच्या फायद्या-करितां एके ठिकाणीं संग्रह करून ठेवल्यापासून भावी पिढ्यांच्या मनांत देशा-

भिमानाची ज्योत कशी प्रदीप्त होण्याचा संभव आहे, हें सांगून इतर राष्ट्रांनीं या बाबतींत कशी उत्तम व्यवस्था करून आपल्या कलादिकांचें संरक्षण केलें होतें, हें दाखविलें. व त्या दिशेनें मुंबईंत कांहींतरी तजवीज होणें अत्यंत जरूर आहे असें सांगितलें. त्या कामासाठीं डॉ. भाऊ दाजींनीं सुचविलें कीं, सर्व लोकांनीं मिळून त्या उत्सवाच्या निमित्तानें एक मोठी इमारत बांधून त्यांत सर्व दुर्मिळ व संग्राह्य अशा वस्तूंचा संग्रह करावा व त्याच्याच नजीक एक सुंदर पण विस्तीर्ण अशी बाग तयार करून त्यांत निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पति व निरनिराळ्या जातीचे पशु, पक्षी यांचें संरक्षण करावें. अशा योजनेपासून लोकांस कसा उपयुक्त शिक्षणाचा लाभ होण्याचा संभव असतो, हें दाखवितांना डॉ. भाऊ दाजी म्हणालेः—

" In the present day when the study of nature in every form and for every mood is known to be desirable for the improvement of the mind and necessary for the advancement of society, a well-conducted Museum and Natural History Gardens are acknowledged to be powerful instruments of education, and accordingly not only the capitals, but the minor cities of civilized Europe are graced by their museums and Gardens."

सदरहू प्रकारचीं संग्रहालयें व बागा हीं लोकशिक्षणाचींच अत्यंत उपयुक्त अशीं साधनें असल्यामुळें तशीं संग्रहालयें व बागा युरोपखंडांतील सर्व लहानमोठ्या शहरांतून स्थापन करण्यांत आल्या आहेत, व त्यायोगानें तिकडील लोकसमाजाची झपाट्यानें सुधारणा होत आहे.

लॉर्ड ब्रोहॅम (Lord Brougham) यांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजेः–

" to diffuse useful information, to further intellectual improvement, a sure forerunner of moral improvement, to hasten the coming of the broad day, when the dawn of general knowledge will chase away the lazy, lingering mists, even from the base of the Great Social pyramid, this indeed is a high calling in which the most splendid talents and consummate virtue may well press onward eager to take a part."

लोकांमध्यें उपयुक्त ज्ञानाचा प्रसार करून त्यांचें अज्ञान नष्ट करणें व त्यांच्यांत हरएक दृष्टीनें सुधारणा घडवून आणणें हें अत्यंत पवित्र कार्य आहे, व तें प्रत्येक बुद्धिमान् व सधन मनुष्यानें पुढें सरून केलें पाहिजे.

पण अशीं लोकशिक्षणाचीं नवीं नवीं साधनें निर्माण करणें किंवा लोकोपयोगीं कृत्यें करणें ही गोष्ट हिंदुस्तान देशांतील लोकांस केवळ अपरिचित नाहीं. त्यांच्या पूर्वजांनीं तशीं कामें केल्याचे देशभर कायमचे दाखले उपलब्ध आहेत. या संबंधानें डॉ. भाऊ दाजी आपल्या भाषणांत म्हणाले:—

"Our ancestors, inspired by religious zeal, constructed the beautiful caves spread over the face of India. The inscriptions now reveal to us that they were the work of private individuals rather than of Kings. That a pillar was the *dân* or gift of one sect, a compartment that of another. The tanks, the water-works, the temples, the dhurumsalas, the wells, the anna-satras spread over the length and breadth of India, indicate the natural liberality of the people of this country in former days."

आमच्या पूज्य पूर्वजांनीं लेणीं व गुंफा वगैरेंच्या रूपानें देशभर कशीं इतिहासाचीं अगर ज्ञानार्जनाचीं साधनें उत्पन्न केलीं आहेत व तसेंच त्यांनीं तळीं, विहिरी, देवळें, धर्मशाळा, अन्नसत्रें वगैरे कशीं लोकोपयोगी कृत्यें केलीं आहेत·हेंच डॉ. भाऊ दाजींनीं आपल्या भाषणांत दाखविलें आहे. त्याच आमच्या परंपरेला अनुसरून प्रस्तुत उत्सवाच्या निमित्तानें एकादें लोकांच्या उपयोगाकरितां ज्ञानार्जनाचें साधन उत्पन्न कारण्याची संधि आली आहे. तिचा उपयोग करून सर्ववस्तुसंग्रहालयापेक्षां महाराणी साहेबांच्या नांवानें दुसरें कोणतेंही स्मारक उभारणें शक्य नाहीं; असें डॉ. भाऊ दाजी म्हणाले. त्यांचे उद्गार असे होते:—

"No fitter monument, no better *nazzur*, could I conceive be resolved upon.........than the construction of a temple of science containing the wonders of ages, of literature, science and art—a museum with Natural History and pleasure Gardens, where all classes of Her Majesty's subjects, high and low, rich and poor could meet in the pursuit of common objects, in the enjoyment of innocent and ennobling pleasures, producing

a community of view, a mutual respect and general sympathy, with regard to the business of national, social and individual life, which clings to men ever after and tends to raise all to the level of the best."

अशा प्रकारचें संग्रहालय व बाग तयार झाल्यास त्यांचा सर्व लहान थोर, गरीब श्रीमंत लोक आपापल्यापरी फायदा घेतील व त्या निमित्तानें तिकडे सर्व जातीचे व धर्माचे लोक एके ठिकाणीं जमून एकमेकांमध्यें प्रेमसंवर्धन करूं शकतील. असो. पण वरील राणीची बाग व सर्वसंग्रहालय यासंबंधाच्या सर्व योजनेंत डॉ. विल्सन यांनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें "as one of the originators of our Public Museum" डॉ. भाऊ दाजींचाच मुख्य भाग होता.

अशा प्रकारचा वस्तुसंग्रह करण्याचा डॉ. भाऊ दाजींना एक नादच होता, हें वर सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें त्यांनीं सन १८६५ मध्यें नागपूर येथें भरविण्यांत येणाऱ्या प्रदर्शनाकरितां अनेक अमोलिक वस्तूंचा संग्रह केला होता. याविषयीं "टाइम्स ऑफ इंडिया"च्या (४ डिसेंबर १८६५) अंकांत असा उल्लेख सांपडतो.

"We hear that Dr. Bhau Daji is preparing for the Nagpur Exhibition, a large collection of valuable curiosities."

वाङ्मय, कला, जुन्या इमारती यांचें अवलोकनपूर्वक वर्णन करणें किंवा त्यापासून कोणता बोध घ्यावा हें दाखविणें यांत डॉ. भाऊ दाजींचें मन इतकें रमे कीं, त्यापुढें त्यांना तेवढ्या वेळेपुरतें दुसरें कांहीं सुचत नसे व त्याच्या पायीं ते वाटेल तो खर्च करण्यास तयार असत. डॉ. भाऊ हे वारंवार आपल्या घरीं कांहीं मित्रांना भोजनाकरितां बोलावीत असत. एका प्रसंगीं कै. रामभाऊ गुंजीकर व रा. सा. पाणंदीकर असे दोघेही भोजनास होते. त्या दिवशीं डॉ. भाऊ दाजींनीं ५००० रुपये खर्चून मुद्दाम तयार करवून आणलेल्या संगमरवरी दगडाच्या सहाय्यानें आग्र्याच्या प्रसिद्ध "ताजमहाल" इमारतीचें अत्यंत सुबोध रीतीनें वर्णन केलें. त्यांत प्रत्येक भागाचें त्याच्या लांबीरुंदीचेंसुद्धां भाऊंनीं इतकें हुबेहुब चित्र काढलें कीं, हजर असलेल्या मंडळींना आपण प्रत्यक्ष ती इमारतच पहात असल्याचा क्षणभर भास झाला! असो. डॉ. भाऊ दाजींच्या संगीत कलेच्या आवडीसंबंधानें मागें उल्लेख आलेलाच आहे. एकंदरींत डॉ. विल्सन यांनीं मुंबईच्या "रॉयल एशियाटिक सोसायटी"च्या एका सभेंत ( ९-१-७५ ) डॉ. भाऊ

दाजींच्या सबंध कामगिरीसंबंधानें जें अगदीं थोडक्यांत सांगितलें तें अक्षरशः खरें होतें. ते उद्गार असेः—

"The Society cannot but express their appreciation and tender regard for his memory founded on his high character, distinguished talents and acquisitions, and his consecration of them to objects of public utility not only as connected with his own profession as a medical practitioner, but as bearing on general literature and science, especially on the antiquities, civil and religious history, authorship, and productive resources of India in all its extent."

डॉ. भाऊ दाजींच्यामधील अनेक गुणांमुळें व ते त्यांनीं सार्वजनिक कार्यास वाहिलेले असल्यामुळें त्यांची सर्व ठिकाणीं व सर्व समाजांत मानमान्यता वाढली होती. मुंबईतील हिंदुसमाजाचे तर ते एक पुढारी होते. कलकत्त्याचे त्या वेळचे प्रसिद्ध ख्रिस्तोदास पाल हे तर डॉ. भाऊ दाजींना "मुंबईकरांपैकीं सर्वांत अत्यंत तेजस्वी पुरुष," असें म्हणत असत! असो. डॉ. भाऊंपेक्षां वास्तविक जगन्नाथ शंकरशेट हे वयानें मोठे होते, पण तेदेखील कोणत्याही कामांत डॉ. भाऊ दाजींचाच वारंवार सल्ला घेत असत. डॉ. भाऊंचा बहुतेक सर्व संस्थांशीं कोठें सभासद, तर कोठें सेक्रेटरी किंवा अध्यक्ष असा संबंध असे. युरोपीयन लोकांत, सरकारदरबारांत देखील त्यांचें फार वजन असे. त्यांना सन १८६८ व १८६९ या दोन सालांत हायकोर्टाचे शेरिफ नेमण्यांत आलें होतें. त्यापासून त्यांना बरेच पैसे मिळाले. पण ते त्यांनीं आपले आवडीचे वाङ्मयात्मक, बौद्धिक व्यवसाय ( Intellectual pursuits ) चालविण्याकडे खर्च केले. असो. देशांतील कांहीं लेणीं पाहण्याकरितां ड्यूक ऑफ एडिंबरो व लॉर्ड नॉर्थ ब्रुक यांच्या बरोबर जाण्यासाठीं डॉ. भाऊ दाजींना बोलावण्यांत आलें होतें हें मागें सांगितलेंच आहे. दुसऱ्या एका प्रसंगीं असें झालें. लॉर्ड नॉर्थब्रुक हे फार उदारमनस्क व लोकप्रिय व्हाइसरॉय होते. त्यांचें एक मुंबईस स्मारक असावें अशी कल्पना निघून त्यांसंबंधानें मरीनलाइन्समध्यें एक जंगी सभा भरली होती. त्यांत न्या. गिब्स, बर्डवुड, वेस्ट यांजसारखे मोठमोठे अंमलदार हजर होते. परंतु इतरांच्या स्मारकाविषयींच्या सूचना मागें पडून डॉ. भाऊ दाजींची पास झाली. त्यांनीं सांगितलें कीं "कामाठीपुरा" हा मुंबई शहरांतील

पाने १२६
८८२६४
च ९६२
कि. ५५५१

एक मुख्य व भर वस्तीचा रस्ता आहे. तर तेथें एक सुंदर सार्वजनिक बाग तयार करून त्यास " Northbrook Gardens " असें नांव द्यावें ! बाग तयार झाल्यावर लोक तिकडे फिरावयास जात असत. पण हल्लीं त्या बागेची व्यवस्था बरोबर नाहीं असें म्हणतात ! असो.

सर बार्टल फ्रेअर हे गव्हर्नर तर डॉ. भाऊ दाजी यांचे मित्र होते व ते वारंवार भाऊंच्या श्रमाची व कामगिरीची प्रशंसा करीत असत. दुसऱ्या एका प्रसंगीं असें झालें कीं, त्या वेळचे प्रसिद्ध क्रॉफर्ड साहेब हे मुंबई म्युनिसिपालिटीचे कमिशनर असतांना सार्वजनिक पैशाची त्यांनीं मनस्वी उधळपट्टी चालविली होती. त्याला आळा घालण्याकरितां खटपट करण्याच्या कामीं मोठमोठ्यांनीं कंबरा बांधल्या होत्या. त्यांत नवरोजी फर्दुनजी, मंडलीक, सोराबजी बंगाली, रघुनाथ नारायण खोटे वगैरे मंडळी होती. ही चळवळ चाललेली पहातांच त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर सर सेमोर फिड्झिराल्ड हे जरा घाबरले आणि त्यांनीं डॉ. भाऊ दाजींना बोलावूं पाठविलें. व मग ते भाऊंच्या सल्ल्याप्रमाणें वागूं लागले. असो.

असा जरी खरा प्रकार होता तरी डॉ. भाऊ दाजी यांच्या गुणांचें व कामगिरीचें सरकारकडून व्हावें तितकें चीज करण्यांत आलें नाहीं अशी पुष्कळ लोकांची तक्रार होती ! डॉ. भाऊ यांनीं इतक्या संस्था चालविल्या, इतकी विद्या संपादन केली, इतकी या देशांत व इतरत्र कीर्ति मिळविली, इतकीं सार्वजनिक कामें करून सरकारला अनेक प्रसंगीं महत्वाचें सहाय्य केलें आणि सरकाराकडून त्यांचें चीज होऊं नये, त्यांचेकडून डॉ. भाऊंना एकादी पदवी देण्यांत येऊं नये ही जशी आश्चर्याची तशीच खेदाची गोष्ट आहे ! स्वतः डॉ. भाऊ दाजींना त्याचें महत्व नव्हतें व तशी त्यांची अपेक्षा नव्हती. कारण न्या. वेस्ट यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे—

"Dr. Bhau Daji served learning with true devotion, regardless of all outward honours and rewards."

डॉ. भाऊ हे सरस्वती देवीचे निःसीम भक्त होते व तिची आपण अनन्यभावें सेवा करावी एवढाच त्यांचा हेतु होता. पण ज्यांना डॉ. भाऊ दाजींबद्दल पूज्यबुद्धि वाटत असे त्यांना मात्र सरकारानें योग्य माणसाचा गौरव न केल्याबद्दल वाईट वाटल्यावांचून राहिलें नाहीं ! अशी तक्रार पुष्कळांनींच केली. परंतु या

बाबतींत " टाइम्स ऑफ इंडिया " पत्रानें जें लिहिलें तें खरोखर लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्या पत्राच्या ( ८–८–७४ ) अग्रलेखांत असे उद्गार होतेः—

"Had Dr. Bhau Daji lived under another European Government, say France or Germany, it is highly probable that his rare acquirements and his labour in the cause of suffering humanity would have been rewarded by some honorary decorations. It is a pity that while under our own system of government, we bestow honours upon those who have distinguished themselves in the battle-field and at the desk, and substantial rewards on others who have annexed territories to our Empire, we seem to regard as unworthy of equally high appreciation those triumphs achieved in a silent and unostentatious manner which lessen the sufferings of humanity or connect the present with the distant past. That literature and science should go unrewarded under an enlightened liberal and paternal government as the Government of India claim to be, must remain a matter of regret to all who are interested in the progress and civilization of India."

याचा तात्पर्यार्थ असा कीं, इकडे इंग्लंडशिवाय दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राचा—फ्रान्स किंवा जर्मनीचा–अंमल असता तरी डॉ. भाऊ दाजींनीं केलेल्या कामगिरीबद्दल व त्यांनीं अशेष मनुष्यजातीपैकीं पीडित जनांची व्यथा कमी करण्याच्या कामीं चालविलेल्या स्तुत्य परिश्रमांबद्दल त्यांचा खचित गौरव करण्यांत आला असता. आम्ही समरांगणावर शौर्य गाजविणाऱ्या मनुष्याचें कौतुक करतों; टेबलाशीं बसून राजकारणाचे खलिते लिहिणाऱ्यांना पदव्या देतों, आणि कांहीं गाजा वाजा न करतां महत्वाचें संशोधनकार्य करणाऱ्या व व्यथित जनांची पीडा कमी करण्याकरितां अहर्निश खपणाऱ्या बिचाऱ्या माणसाकडे आम्ही नुसतें पाहत नाहीं हें हिंदुस्थान सरकारसारख्या सुधारलेल्या व मायबाप म्हणवून घेणाऱ्या सरकारला शोभतें काय ? तें कांहींही असलें तरी, हिंदुस्थान देशाची प्रगति व्हावी–त्याचें पाऊल नेहमीं पुढें पुढेंच पडत जावें असें ज्यांना मनापासून वाटतें त्यांना मात्र, या गुणग्राहकतेच्या दृष्टीनें सरकारच्या कर्तव्यपराङ्मुखतेपासून दुःख झाल्याशिवाय राहत नाहीं. असो. असा खरा प्रकार असला तरी, एकंदरींत

" नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता॥ " हा मान डॉ. भाऊ दाजींना मिळाला होता यांत मात्र संशय नाहीं. त्या वेळच्या गव्हर्नराच्या कार्यकारी कौन्सिलापैकींच एक नामदार मिस्टर गिब्सं यांनीं म्हटल्याप्रमाणें—

"In all this, he showed himself, not only a good citizen of the world, but more than that—the helper and defender of the poor, and the sick and the distressed."

डॉ. भाऊ दाजी हे नुसते उत्तम नागरिक होते, इतकेंच नव्हे, तर ते दीनांचे व पीडितांचे कैवारी होते.

---

## प्रकरण पंधरावें

# अखेर.

—*—

अशा सज्जन माणसावर पुढें अति बिकट प्रसंग आला याचें फार वाईट वाटतें. सृष्टीच्या योजनेंत परमेश्वराची जी अगाध लीला म्हणतात ती ही ! डॉ. भाऊ दाजींसारखा मनुष्य कीं, जो नेहमीं आपल्या विद्याव्यासंगांत गढून गेलेला, सार्वजनिक हिताची सदैव काळजी वाहणारा व तें साधावें म्हणून अहर्निश झटणारा व जो परोपकाररत असा, परंतु अशाही पुरुषावर संकट ओढवून त्यालाच लोकांच्या सहाय्याची जरूर वाटावी याला परमेश्वराची अगाध लीला म्हणावयाचें नाहीं तर काय ? याबद्दल डॉ. भाऊंच्याकडेच दोष म्हणावें तर तसेंही नव्हतें. वस्तुतः त्यांत मनुष्यदोषच नव्हता. फक्त दैविक दोष किंवा " दुर्दैव " होतें, एवढेंच म्हणावयाचें ! डॉ. भाऊ दाजींची सचोटी इतकी दांडगी होती कीं, एकदां एका पक्षकारानें रा. सा. मंडलीकांजवळ डॉ. भाऊंच्या प्रामाणिकपणाबद्दल संशय उत्पन्न करण्यासारखें कांहीं बोलतांच रावसाहेबांनीं त्याबद्दल लागलींच आपली खात्री देऊन त्याचें तोंड बंद केलें ! त्याचप्रमाणें न्या. न्यूटन यांनीं सन १८७७ ( १० मे ) मध्यें रा. सा. मंडलीकांस लिहिलेल्या पत्रांत डॉ. भाऊ दाजीविषयीं असा मजकूर होताः—" मनुष्याचा प्रामाणिकपणा पूर्णपणें कसास लावण्याचा मला एकदां प्रसंग आला होता. त्या प्रसंगीं त्यांनीं ( डॉ. भाऊंनीं ) जें वर्तन केलें त्यायोगानें माझा त्यांच्याविषयींचा आदर फारच वाढला. "

डॉ. भाऊ दाजींचा धर्मादाय दांडगा होता. कोणत्याही चांगल्या गुणाचा अतिरेक झाला म्हणजे त्याला लोक केव्हां केव्हां दुर्गुण म्हणतात. उदारपणाचा

कळस झाला म्हणजे त्याला उधळेपणा म्हणतात. डॉ. भाऊ दाजी यांचा पैसा सार्वजनिक कल्याणाच्या कामांत इतका खर्च होई कीं, आपल्या मागें संसार आहे ही गोष्ट तरी त्यांच्या ध्यानांत येत असे कीं नाहीं, याचीच शंका वाटत असे. ही स्थिति पाहिली म्हणजे कित्येकांस तुकारामाच्याच संसारपराङ्मुखतेची आठवण होई!

डॉ. भाऊ यांचें उत्पन्न—नेटिव्ह ओपिनियन पत्रानें (७-६-७४) म्हटल्याप्रमाणें—दांडगें होतें. पण त्यांचा खर्चही अचाट होता. तो राजाच्या खर्चाप्रमाणें होता. पण राजाच्या खर्चांत व डॉ. भाऊ दाजींच्या खर्चांत महदंतर असे. राजांचे खर्च केव्हां केव्हां ढंगाखातर होत असतात. डॉ. भाऊंचा खर्च त्यांना ज्या ज्या चांगल्या गोष्टींचा नाद होता त्यांत होत असे. शास्त्री, पंडित किंवा इतर गुणीजन डॉ. भाऊ दाजींपासून विमुख जात नसे. कै. जव्हेरीलाल याज्ञिक यांनीं म्हटल्याप्रमाणें—

A patron of learning and of learned Shastris who never turned their backs from him without feeling that he had the liberality of the Bhoja of Avanti.

डॉ. भाऊ दाजींना अवंतीच्या भोज राजाचीच उपमा साजत असे. स्वतः डॉ. भाऊ हे प्रथम गरीब स्थितींतच होते. परंतु धर्मादाय करण्याच्या कामांत त्यांना पैसा मृत्तिकेप्रमाणें वाटत असे. या गोष्टीचा विचार केला म्हणजे डॉ. भाऊ दाजी यांच्यामध्यें व भर्तृहरीनें वर्णन केलेल्या

* **मणिः शाणोल्लीढः समरविजयी हेतिनिहतः ।**
**मदक्षीणो नागः शरदि सरितः श्यानपुलिनाः ॥**
**कलाशेषश्चंद्रः सुरतमृदिता बालवनिता ।**
**तनिम्ना शोभंते गलितविभवाश्चार्थिषु जनाः ॥**

दान धर्म करून ऐश्वर्यशून्य झालेल्या लोकांमध्यें अंतर कितीसें उरतें ?

* पैलु पाडल्यामुळें आकारानें उतरलेला हिरा, तरवारीचे वार अंगावर घेतलेला पण विजयी होऊन आलेला योद्धा; मदस्राव होऊन क्षीण झालेला हत्ती; शरत्कालांतील शुष्क कांठ झालेल्या नद्या; एकच कलायुक्त चंद्र; व धर्म करून वैभवहीन झालेले दाते—हीं सर्व आपापल्या रोडावलेल्या स्थितींत देखील शोभायमानच दिसतात.

डॉ. भाऊ दाजींना व्यसन असें कोणतेंच नव्हतें. त्यांची दिनचर्या किंवा व्यवसाय पाहिले म्हणजे ते एक धर्मात्मेच वाटत असत. अशा उदारात्म्यावर " कफल्लक " होण्याची पाळी आलेली पाहिल्यावर कोणाचें बरें अंतःकरण विदीर्ण होणार नाहीं ? सन १८६४–६५ च्या सुमारास " Back Bay Reclamation " ( बॅकबे रिक्लेमेशन ) कंपनींच्या भागांचें ( शेअर्सचें ) एक खूळ निघालें व त्यानें आपलें मोहजाल सर्व धनिक लोकांवर टाकलें ! त्यापासून अतोनात फायदा होणार आहे या भ्रमावर पुष्कळ लोकांनीं आपले होते नव्हते तेवढे पैसे त्यांत घातले, त्याप्रमाणें डॉ. भाऊ दाजी देखील एका मित्रास ( प्रेमचंद रामचंद यांस ) " शेअर्स घेतों " म्हणून वचनबद्ध झालेले असल्यामुळें ते त्या जाळ्यांत अडकले व त्यांनीं आपले सर्व पैसे त्या शेअर्समध्यें घातले ! पैसे भरण्याची वेळ आली तेव्हां पुष्कळ मित्रांनीं भाऊंना सांगितलें कीं, "तुम्ही कायद्यानें बांधलेले नाहीं आहां आणि तुम्ही पैसे भरूं नका." पण भाऊंना आपण मित्राला दिलेल्या वचनाची किंमत जास्त वाटली व त्यांनीं पैसे भरले ! म्हणजे भाऊ हे आपल्या वचनाला जागले खरे, पण ते शेवटीं स्वतः "कफल्लक" झाले !! एकच वर्षाच्या आंत तो सर्व डोलारा खालीं आला आणि असंख्य लोक रावाचे रंक झाले ! त्यांत भाऊ दाजी होते. डॉ. भाऊ दाजींवर हा प्रसंग आल्यामुळें सर्व लोक हळहळले ! जनरल जेकब यांचें ( ता. १८–५–६७ ) रा. रा. मंडलिकांना पत्र आलें होतें त्यांत असा मजकूर होताः–" डॉ. भाऊंसारख्या उदार मनुष्यावर अशी आपत्ति यावी आणि कंजुष मनुष्याकडे संपत्ति असावी हें पाहिलें म्हणजे मनास फार खेद होतो." असो. याप्रमाणें देणें पुष्कळ होऊन डॉ. भाऊ दाजींचें दिवाळें निघण्याची वेळ आली, तेव्हां त्यांनीं आपलें सर्वस्व ट्रस्टींच्या स्वाधीन केलें. त्यांत रा. सा. मंडलीक हे एक ट्रस्टी होते. त्या वेळची डॉ. भाऊ दाजींची स्थिति " नेटिव्ह ओपिनियन " पत्रानें ( ७–६–७४ ) अगदीं थोडक्यांत अशी वर्णिली आहेः–

"One mistake of the deceased in 1864–65 gave an unfortunate turn to his affairs and his own habits adding to his difficulties, Dr. Bhau Daji was never himself again. His house and library and other effects were all sold and both repurchased with the assistance of some friends. But crisis of 1865 marred his progress and gave a shock from which he never recovered."

म्हणजे १८६५ सालच्या प्रसंगाच्या योगानें डॉ. भाऊ दाजींची प्रगति जी थांबली ती थांबली ! त्यांचे व्यवसाय चालू होते. त्यांचा वैद्यकीचा धंदा चालू होता. त्यांचा जीवितक्रम जवळ जवळ जशाचा तसा चालू होता. त्या प्रसंगानंतरच त्यांना दोन वर्षें शेरिफ नेमण्यांत आलें होतें. ड्यूक ऑफ एडिंबरो व लॉर्ड नॉर्थब्रुक यांच्याशीं डॉ. भाऊंचा संबंध तदनंतरच्या कालांतच आला होता. सारांश, डॉ. भाऊ दाजी यांचे सर्व व्यवसाय पूर्वींप्रमाणेंच चालू होते. पण त्यांची सांपत्तिक स्थिति जी सुधारावयाची ती मात्र सुधारली नाहीं. असो.

अशा स्थितींतच डॉ. भाऊ दाजींना सन १८७३ च्या जानेवारींत अर्धांग वायूचा झटका आला व त्यांनीं अंथरूण धरलें. डॉ. भाऊ हे जे तेव्हां आजारी पडले तें पुढें १७ महिने आजारी होते. औषधोपचाराची उत्तम व्यवस्था होती. स्वतः भाऊंचे बंधुच डॉ. नारायण दाजी हे औषधोपचार करीत होते. तेव्हां अशा वेळीं जो नियमितपणा, जी काळजी असावी लागते त्याविषयीं प्रश्नच नव्हता. डॉ. भाऊ दाजींचे जुने सहाध्यायी डॉ. आत्माराम पांडुरंग हेही मधून मधून पाहून जात असत. मध्यंतरीं ते जरा बरे होण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं होतीं, पण तो नुसता भ्रमच ठरला.

डॉ. भाऊ दाजींच्या आजरीपणाच्या मुदतींत भेटण्याकरितां मोठमोठे लोक येऊन त्यांचा समाचार घेऊन जात असत. त्यांत स्वतः गव्हर्नरसाहेब असत. हायकोर्टाचे जज्ज असत. एकदांतर इंदूरचे त्या वेळचे महाराज तुकोजीराव होळकर हे डॉ. भाऊंच्या समाचाराकरितां आले होते. तुकोजीरावांना भाऊ दाजींबद्दल अत्यंत आदर वाटत असे हें मागें सांगितलेंच आहे. सदहू महाराजांनीं या वेळीं मुद्दाम डॉ. भाऊंच्या नुकत्याच झालेल्या नातीला पाहावयाला म्हणून बाहेर आणवून तिच्या हातांत बऱ्याच किंमतीच्या नोटा दिल्या ! असो. याप्रमाणें डॉ. भाऊ दाजी हे बरेच दिवस आजारी पडले होते तरी त्यांच्या डोक्यांत नेहमीं आपल्या आवडीच्या विषयांसंबंधानेंच विचार चालले असत, व कोणीं त्यांना भेटण्याकरितां आल्यास त्यांच्याजवळ त्याच गोष्टींविषयीं ते बहुतकरून बोलत असत. यासंबंधानें एक "हाजी बाबा" या सहीच्या गृहस्थांनीं आपला अनुभव त्या वेळीं टाइम्समध्यें प्रसिद्ध केल्याचें मागें सांगितलेंच आहे. दुसरी गोष्ट डॉ. भाऊ आजारी असतांनाच त्यांचे शिष्य पंडित भगवानलाल इंद्रजी हे नेपाळ संस्थानांत कांहीं जुने हस्तलेख मिळविण्याच्या खटपटींत होते. त्यांत त्यांना कांहीं

अगदीं नवीन आणि अश्रुतपूर्व असे हस्तलेख मिळाले असल्याचें त्यांनीं डॉ. भाऊ दाजींना कळविलें होतें. तें ऐकून भाऊंना जो अत्यानंद झाला तो कांहीं पुसूं नका. त्याच प्रवासांत असतांना भगवानलाल हे "तेराई" (Terai) जातीच्या तापानें आजारी पडल्याचें डॉ. भाऊ दाजींना समजलें. त्याबरोबर त्यांच्या जीवाची जी धांदल उडाली तिचें काय वर्णन करावें ? त्या तापाच्या तडाख्यांतून मनुष्य सहसा वांचत नाहीं ही गोष्ट डॉ. भाऊंना—ते स्वतःच भिषग्वर असल्यामुळें—माहित होती. त्यामुळें डॉ. भाऊंच्या अस्वस्थतेंत आणखी भर पडली ! मिस्टर डब्ल्यू. एम्. वुड ( Mr. W. M. Wood ) हे ह्या वेळीं 'टाइम्स'चे संपादक होते. ते डॉ. भाऊ दाजींचे एक मित्र होते. त्यांना डॉ. भाऊंनीं आपण बिछान्यावर पडलेले असतांनाच "जरूरीचें काम आहे, जरा येऊन चला," असा निरोप पाठविला. मिस्टर वुड येतांच डॉ. भाऊंनीं भगवानलाल नेपाळ प्रांतांत आजारी पडल्याचें त्यांना कळविलें ! त्याबरोबरच वुडसाहेबांना काय वाटलें हें त्यांनींच एका प्रसंगीं जाहीर रीतीनें सांगितलेल्या हकीकतीवरूनच इकडे निवेदन करतों:—

"He could not describe the strong feeling, he might almost say the love, with which Bhau Daji spoke of this man (Bhagwanlal), and how keen was the anxiety which he expressed because of this assistant being exposed to mortal danger on his account. The paralyzed doctor said he would do anything he could to rescue him, and he tossed with restlessness in his anxiety to do something."

डॉ. भाऊ दाजी हे पंडित भगवानलालविषयीं अत्यंत प्रेमानें—आपल्या घरच्याच एकाद्या माणसासंबंधानें जसे—बोलत होते व तो गृहस्थ आपल्यामुळें त्या दुष्ट तापाच्या तडाख्यांत सांपडला म्हणूनच त्यांच्या जीवाला जास्त हळहळ वाटत होती ! डॉ. भाऊ हे स्वतः अर्धांगवायूनें पीडित होते तरी "भगवानलाल यांचा त्या तापांतून बचाव करण्याकरितां आपण वाटेल तें करण्यास तयार आहें" असें ते म्हणाले, आणि "आतां काय करावें ?" अशा विवंचनेंत ते अति अस्वस्थ झालेले दिसले ! वस्तुतः पंडित भगवानलालपासून डॉ. भाऊ हे शेंकडों मैल अंतरावर असल्यामुळें त्यांना नेपाळच्या पोलिटिकल रेसिडेंटला पत्र लिहून किंवा तार करून चौकशी करण्याच्या पलीकडे काय करतां येणें शक्य होतें ? सबब रेसिडेंटला तावडतोब तार पाठवून चौकशी करण्यांत आली. वुडसाहेबाच्या विनंतीवरून रेसिडेंट

( Mr. Girdlestone ) गर्डल्स्टन यांनीं भगवानलालची चौकशी करविली. त्यांना औषधोपचार करण्याची तजवीज केली आणि " त्यांची काळजीची वेळ निघून गेली; औषधोपचार चालू आहे; ते थोड्याच दिवसांत बरे होतील, " असें आश्वासनदायक उलट टपालानें उत्तर पाठविलें ! मिस्टर वुड म्हणतात कीं, ही आनंदाची बातमी डॉ. भाऊंना कळवितांच त्यांना फार आनंद झाला आणि त्यांचा जीव खालीं पडला असें दिसून आलें !

याप्रमाणें डॉ. भाऊ दाजींचे सतरा महिने आजारीपणांत गेल्यावर ता. ३१ मे सन १८७४ रोजीं त्यांचें देहावसान झालें ! ही दुःखद वार्ता बाहेर पडतांच सर्व मुंबईशहरभर हाहाःकार उडाला. वर्तमानपत्रांतून दुखवट्याचे अग्रलेख प्रसिद्ध झाले. मुंबईंतील एक मोहरा गेला, एक धर्मात्मा गेला असे उद्गार निघूं लागले. इंदुप्रकाशनें तर म्हटलें कीं, डॉ. भाऊ दाजींची जागा भरून काढण्याला मुंबईंत कोणी राहिला नाहीं. " Taking all in all, it will be difficult to find a substitute for him."

डॉ. भाऊ दाजींचे व्यवसाय इतके दांडगे व इतके विविध प्रकारचे होते कीं, त्या त्या संबंधांत मग बरेच दिवस त्यांची उणीव तीव्रतेनें भासल्याशिवाय राहिली नाहीं. त्यांच्या कार्यव्याप्तृत्वाचें क्षेत्र इतकें विस्तृत होतें कीं, ज्या ज्या संस्थांना त्यांच्या आश्रयाचा, त्यांच्या सल्ल्याचा किंवा त्यांच्या मार्गदर्शकत्वाचा कित्येक वर्षें लाभ मिळाला होता, त्या त्या संस्था त्यांच्या पश्चात् बरेच दिवस पोरक्या दिसल्या ! डॉ. भाऊ दाजी गेले त्याच सुमारास मिस्टर गंपर्ट ( Mr. A. C. Gumpart ) या नांवाचा मुंबईस ऑस्ट्रिआ–हंगेरीचा वकील होता. त्यानें त्या वेळीं मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या एका सभेंत (ता. १५–६–७४ डॉ. भाऊ दाजींसंबंधानें पुढीलप्रमाणें आदरपूर्ण उद्गार काढलेः—

" This portion of the late Dr. Bhau Daji's services being well-known to him as one of the foreign representatives in Bombay, he should not have liked this occasion to pass without bearing his personal testimony to the loss, the Society and the scientific world had suffered, which he felt assured would be greatly deplored in Germany and Austria and wherever the name of the learned Brahman was known."

यावरून डॉ. भाऊंच्या कामगिरीचें युरोप-अमेरिका खंडांतील देशांत देखील केवढें महत्त्व मानण्यांत येत असे, हें स्पष्ट रीतीनें सिद्ध होतें. असो. अशा विद्वान्, अशा थोर व इतकी देशाची कळकळ बाळगणाऱ्या माणसाचें मरण म्हणजे एक राष्ट्रीय आपत्ति होय. इंदुप्रकाशनें ( १-६-७४ ) यासंबंधानें जें म्हटलें होतें तें अक्षरशः खरें होतेंः—

"It is really and truly a national calamity, for which the whole country will feel deeply grieved. From a humble beginning he ( Dr. Bhau Daji ) rose to a position, to the dignity of which men of wealth have no passport. He has been the instrument of a great deal of good to his fellow-creatures."

डॉ. भाऊ दाजी हे प्रथम अगदीं गरीब स्थितींत होते हें मागें आलेंच आहे. पण अशाही स्थितींतून वर येऊन त्यांनीं आपल्या आंगच्या गुणांच्या आणि भरींव कामगिरीच्या जोरावर सरस्वतीमंदिरांत व जगांत इतकें श्रेष्ठ स्थान मिळविलें कीं, तसें स्थान मोठमोठ्या लक्ष्मीपुत्रांनाही मिळणें शक्य नाहीं.

अशा पुरुषाचें निदान स्मारक तरी कोणतें उभारावयाचें हा भाऊ गेल्यावर कांहीं दिवसांनीं मुंबईतील पुढारी मंडळींत विचार सुरू झाला. यासंबंधांत टाइम्स वगैरे पत्रांतून पुष्कळांनीं पत्रद्वारें सूचना केल्या. कोणी म्हणाला कीं, डॉ. भाऊ दाजींनीं रक्तपितीच्या निवारणार्थ उपाययोजना चालविली होती, त्या अर्थी सरकारनें-लोकांच्या मदतीनें-एक "Leper Hospital" काढून त्याला डॉ. भाऊंचें नांव द्यावें. दुसऱ्या कोणी सुचविलें कीं, डॉ. भाऊंनीं इतकें महत्त्वाचें संशोधनकार्य केलें आहे, तर त्यांचे तद्विषयक सर्व प्रकाशित व अप्रकाशित लेख प्रसिद्ध करावे. याविषयीं "हाजी बाबा" या गृहस्थांनीं एकदां खुद्द डॉ. भाऊ दाजींनाच विचारलें असतां भाऊंनीं आपले नुसते अप्रकाशित हस्तलेख व कांहीं दुर्मिळ संस्कृत ग्रंथ इतकेच छापून काढण्याला सुमारें ६० हजार रुपये लागतील असें सांगितल्याचें, त्यांनीं टाइम्समध्यें प्रसिद्ध केलें होतें.

"He ( Dr. Bhau Daji ) said, about 60 thousand rupees would be required to print his mss. and certain rare Sanskrit works, which he had annotated and corrected."

तात्पर्य, याप्रमाणें अनेकांनीं अनेक सूचना केल्या. तरी एकंदरींत डॉ. भाऊंचें कांहीं तरी त्यांच्या योग्यतेस शोभेल असें स्मारक झालें पाहिजे, याविषयीं सर्व मंडळीमध्यें एकवाक्यता होऊन तत्संबंधीं खटपट करण्याकरितां मोठमोठ्यांनीं कंबरा बांधल्या. त्यांत रा. सा. मंडलीकांनीं बराच पुढाकार घेतला होता. त्यांनीं एक प्रथम मित्र मंडळींची सभा बोलाविली. त्यांत गिब्स, हायकोर्टाचे सर्व जज्ज, तेलंग, सर जमशेटजी जीजीभाई, मंगळदास नथूभाई, वगैरे सर्व गृहस्थ हजर होते. सर्वांनींच फंड जमविण्याकरितां खटपट करण्याचें कबूल केलें. बाहेर गांवीं खटपट करण्याकरितां म्हणून कित्येकांना पत्रद्वारा विनंति करण्यांत आली होती. त्याप्रमाणें माधवराव बरवे यांनीं कोल्हापुरास व आसमंतात प्रदेशांत खटपट चालविली; पुण्यास केरुनाना छत्रे व नारायण वासुदेव यांनीं प्रयत्न चालविले. काठेवाडांत कर्नल अँडरसन व रा. ब. नूलकर यांनीं फंडाचें काम चालविलें. बडोद्यास दादाभाई व काजी शहाबुद्दीन यांनीं खटपट चालविली; वऱ्हाडांत बाळकृष्णशास्त्री बापट यांनीं खटपट चालविली. कलकत्त्याचे प्रसिद्ध ख्रिस्तोदास पाल हे डॉ. भाऊ दाजींना किती पूज्य मानीत असत याचा मागें उल्लेख आलाच आहे. त्यांच्या खटपटीनें स्मारक कमिटींत टागोर, हरेंद्रकृष्ण बहादुर, राजेंद्रलाल मित्र, वगैरे गृहस्थांचीं नांवें दाखल करण्यांत आलीं. जेकबसाहेबांनीं आपली रक्कम पाठवून दिली आणि लिहिलें कीं, “ डॉ. भाऊंनीं पुष्कळ कामास आरंभ करून उत्कृष्ट फळ मिळविलें. ” पुण्याचे चिचगर यांनीं कळविलें कीं, “ पुण्याच्या ग्यालरींत डॉ. भाऊ दाजींची तसबीर ठेवण्याचें ठरल्यास मी ५० रुपये देतों. ” याप्रमाणें वर्गणीची यादी तयार झाली. त्यांत गव्हर्नर जनरल, गव्हर्नर, हायकोर्ट जज्ज, सर सालरजंग, रोगे, टाटा, लखमीदास खिमजी, जुनागड, लिमडी, राजकोट येथील संस्थानिक वगैरे मोठमोठ्या लोकांचीं नांवें दाखल होतीं. इंदूरच्या महाराजांनीं मंडलीकांच्या मार्फत एक हजार रुपये पाठविले !

असो. याप्रमाणें सर्व पूर्ण तयारी होतांच ता. १ आगस्ट सन १८७४ रोजीं मुंबईच्या टाऊन हॉलमध्यें अशेष रहिवाशी लोकांची एक जंगी जाहीर सभा भरविण्यांत आली. त्या प्रसंगीं नामदार मिस्टर गिब्स यांनीं अध्यक्षस्थान मंडित केलें होतें. सभेंत स्वतः गिब्ससाहेबांचें अत्यंत कळवळ्याचें व भारदस्त असें भाषण झालें. त्यानंतर जस्टिस वेस्ट्रॉप, सर जमशेटजी जीजीभाई, प्रोफेसर रा. गो. भांडारकर, रेव्हरंड डॉ. विल्सन, जस्टिस वेस्ट, व मिस्टर डब्ल्यू. एम्. वुड या लोकांचीं वक्तृत्वपूर्ण भाषणें झालीं. कलकत्त्याच्या ख्रिस्तोदास पाल यांचें

आलेलें सहानुभूतीचें पत्र मंडलिकांनीं सभेंत वाचून दाखविलें. असो. सदरील वक्त्यांच्या भाषणांतून या चरित्रांत अन्य ठिकाणीं उतारे दिले गेलेले असल्यामुळें त्या सर्व भाषणांचा सारांश देऊन इकडे जागा अडविण्याचें कारण नाहीं. एवढें सांगितल्यास बस्स आहे कीं, वरील स्मारकसभेंत एक स्मारक कमिटी नेमण्यांत आली आणि तिनें जी वर्गण्यांची रक्कम जमेल त्यांतून डॉ. भाऊ दाजींच्या नांवाला शोभेल असें स्मारक उभें करण्याचें ठरावावें, असें ठरलें. जस्टिस वेस्ट्रॉप यांना त्या कमिटीचे अध्यक्ष नेमण्यांत आलें व रा. सा. मंडलीक यांस सेक्रेटरी नेमण्यांत आलें.

सगळी रक्कम पंधरा हजार रुपयांपेक्षां कांहीं जास्त इतकी जमली, व ता. १२–२–७६ रोजीं स्मारक कमिटीची सभा बोलवण्यांत येऊन तिनें असा ठराव पास केला कीं, जमलेल्या रकमेपैकीं पांच हजार रुपये—दरसाल दरशेंकडा ४ टक्के व्याजाचे सरकारी रोखे विकत घेऊन—मुंबई युनिव्हर्सिटीच्या स्वाधीन करून त्याच्या व्याजांतून दरसाल एक, "भाऊ दाजी प्राइझ" ठेवण्याची तजवीज करावी व बाकीची रक्कम भाऊ दाजींच्या कुटुंबांतील माणसांना देऊन त्यांच्या-पासून भाऊंच्या लायब्ररींतून त्यांनीं परिश्रमपूर्वक जमविलेले जुने हस्तलेख विकत घेऊन ते मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीला अर्पण करावे, म्हणजे त्यांचा संशोधन कार्य चालविणाऱ्या विद्वान् लोकांना उपयोग होईल. सदरील स्मारक-कमिटीच्या सभेंत ना. गिब्स हे अध्यक्षस्थानीं होते. डॉ. भाऊ दाजींनीं जमविलेले जुने हस्तलेख विकत घेण्यासंबंधानें गिब्ससाहेबांच्या भाषणांत असा उल्लेख होता:—

"In connection with the proposition to purchase the Oriental Mss. belonging to the library of the late Dr. Bhau Daji, he was glad to say that most of them had been secured, and they would have a collection, which had taken many years to collect and which had cost Dr. Bhau Daji a considerable sum, would now remain in one place, instead of being dispersed and thus would be made available to the learned public. The number of the Mss. amounted to over 500, but according to the mode of calculating amongst Pandits, they would exceed several lakhs of couplets."

स्मारक कमिटीनें ठरविल्याप्रमाणें दरसाल बी. ए. परिक्षेंत पास होऊन संस्कृत-मध्यें पहिला आलेल्या विद्यार्थीस "भाऊ दाजीं"च्या नांवाचें बक्षिस मिळत असतें हें सर्वांस माहीतच आहे. त्याचप्रमाणें डॉ. भाऊ दाजींच्या खासगी लायब्ररींतून विकत घेतलेले ५०० वर जुने हस्तलेख एका स्वतंत्र कपाटांत रचून मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररींत ठेवण्यांत आलेले असून कपाटाच्या वरच्या बाजूस "Bhau Daji Testimonial" असें जाड्या अक्षरांनीं लिहिलेलें आहे. याप्रमाणें डॉ. भाऊ दाजींचीं स्मारकें झालीं आहेत.

डॉ. भाऊ दाजींच्या निधनानंतर अनेक संस्थांनीं त्यांच्यासंबंधानें दुखवठ्याचे ठराव पास केले. त्याप्रमाणें रॉयल एशियाटिक सोसायटीच्याही एका सभेंत एक ठराव पास झाला. पण त्यांतील सारांश मागील एका प्रकरणांत अन्य संबंधांत येऊन गेल्यामुळें त्याची इकडे द्विरुक्ति करीत नाहीं. पण मुंबईच्या युनिव्हर्सिटीच्या सेनेटनें पास केलेला ठराव इकडे देणें इष्ट आहे. तो ठराव ता. ३१-७-७४ रोजीं भरलेल्या सभेंत पास झाला तो असाः—

"The Senate records its regret at the loss which the University has sustained by the death of Dr. Bhau Daji, G. G. M. C., Hon. Member, R. A. S., one of the Fellows mentioned in the Act of Incorporation and for a long time a Syndic in the Faculty of Arts, and in doing so, expresses the deep sense it entertains of the high moral character, the great ability and unwearying perseverance, which have made the name of Bhau Daji not only a household word in the Presidency and an honour to this Universiry, but one which is widely known as that of a man of science, an antiquarian and a scholar."

मुंबईची युनिव्हर्सिटी स्थापन झाली त्या वेळीं जे सरकारनें पहिले फेलो नेमले त्यांत डॉ. भाऊ दाजी हे एक होतेच. पण त्याही पेक्षां विशेष हें कीं, भाऊ हे आपल्या विद्वत्तेनें व कर्तबगारीनें खुद्द युनिव्हर्सिटीला भूषणभूत झाले होते!

पुढच्याच पदवीदान समारंभाचे वेळीं युनिव्हार्सिटीचे व्हाइस चान्सेलर यांनीं डॉ. भाऊ दाजींसंबंधानें गौरवयुक्त उल्लेख करून जो नवीन पदवीधरांना उपदेश केला तोही चिरसंस्मरणीय होता. त्याचा सारांश असाः—" तुम्ही ( नूतन पदवीधरांना उद्देशून ) डॉ. भाऊ दाजींचें उदाहरण घ्या. त्यांनीं आपल्या देशाचें

केवढें काम केलें तें पाहा. त्यांनीं आपल्या प्राचीन–संस्कृत, पाली वगैरे–भाषांचा अभ्यास केला; जुना इतिहास लक्षपूर्वक वाचला; अनेक नवीन शोध लावले व आपल्या देशबांधवांकरितां देशाचा प्राचीन इतिहास समजून घेण्याचा मार्ग खुला केला. तुम्ही सर्वजण–केवळ वैद्यकीय पदवीधरच नव्हेत, तर कायदा किंवा शिल्प (इंजिनीयर) पदवीधर देखील–डॉ. भाऊ दाजींचें अनुकरण करण्याचा प्रयत्न करा. तुम्हांला नवीन प्रकारचें इंग्लिश शिक्षण मिळालें म्हणून खरी विद्वत्ता व कला हीं आपल्या पूर्वजांत मुळींच नव्हतीं असें म्हणण्याचें धाडस करूं नका. डॉ. भाऊ दाजींप्रमाणेंच तुम्ही आपल्या देशाचा जुना इतिहास पाहा व त्यापासून घेण्यासारखा गुण असेल तो जरूर घ्या. आणि आपल्या या यूनिव्हर्सिटीस तुमच्याबद्दल अभिमान वाटेल असें तुम्ही वागा.

"Let it be said that they perfected what others began, and that the University of Bombay has sent out, not mere pedants—much less conceited half-educated striplings, but men, who in the state, on the bench or at the bar, as architects or as physicians, prove themselves, as Dr. Bhau Daji did, worthy of their education, beloved and respected in their lives, and in their deaths, honoured and deplored."

पूर्वीच्यांनीं आरंभिलेलें काम पुरें करा. मुंबईच्या यूनिव्हर्सिटींतून जे पदवीधर बाहेर पडतात ते नुसते शब्दपंडित अगर भारवाहक असतात असें म्हणण्याची पाळी आणूं नका ! तुम्हीं कोणीही असा–वकील, डॉक्टर, इंजिनीयर कोणीही असा —पण आपल्या शिक्षणाला अगर आपल्या विद्येला अनुरूप अशा रीतीनें, भाऊ दाजी वागले, तसे वागा म्हणजे तुमच्या सबंध आयुष्यक्रमांत लोक तुम्हांस चांगलें म्हणतील व तुमचा वियोग व्हावयाची वेळ आली म्हणजे त्यांना दुःख वाटेल."

इतर संस्थांच्या–दुखवट्याच्या–ठरावासंबंधानें विस्तार करण्याची आवश्यकता नाहीं.

---

## प्रकरण सोळावें.

# गुणदोष.

—:*:—

या प्रकरणांत डॉ. भाऊ दाजींच्या गुणदोषांसंबंधानें थोडेंसें लिहावयाचें आहे. पण त्याला सुरवात करण्यापूर्वी डॉ. भाऊंना चांगलें ओळखणाऱ्या एक दोन गृहस्थांनीं त्यांच्या चरित्रक्रमासंबंधानें एकंदरींत काय निष्कर्ष काढला होता हें सांगणें प्रशस्त दिसतें. रा. सा. मंडलीकांचा डॉ. भाऊंशीं बहुतेक सर्व बाबतींत अत्यंत निकट संबंध होता. त्यांनीं " नेटिव्ह ओपिनियन " पत्र चालविलें होतें. डॉ. भाऊ दाजी गेल्यावर नेटिव्ह ओपिनियनमध्यें त्यांच्याविषयीं जो दुखवट्याचा अग्रलेख प्रसिद्ध झाला त्यांत एके ठिकाणीं असें म्हटलेलें होतें:-" भाऊ दाजी यांच्या आद्यंत आयुष्यक्रमाचा जो कोणी कित्ता वळवील तो खचित प्रसिद्धीस आल्याशिवाय राहणार नाहीं. बहुतेकांचें होतें काय कीं, शाळा सुटल्यानंतर व जगाच्या मार्गास लागल्यानंतर विद्याव्यसन सुटतें." आणि त्यास पैसे मिळवावे व प्रपंच करावा यापलीकडे दुसरें कांहीं सुचेनासें होतें. अन्यपक्षीं थोडेंसें वाचन चालू असलें म्हणजे विचार करण्याची संवय राहते, व वारंवार डोक्यांत सत्कल्पना येऊन संबंध जीवित तत्वनिष्ठ व सुखमय होण्याचा संभव असतो. डॉ. भाऊ दाजींना अखेर अखेर दुर्दैवानें वाईट स्थिति प्राप्त झाली खरी. परंतु ज्ञानलालसा, उद्योगप्रियता, परोपकार बुद्धि व सार्वजनिक कामाची हौस या त्यांच्या मधील अस्सल आणि शंभर नंबरी गुणांचा विचार केल्यास आमच्या मतें डॉ. भाऊंच्यासारखीं उदात्त आणि अनुकरणीय चरित्रें फार फार थोडीं मिळतील ! हिंदुस्थानांत तर त्यांचें हें असलें चरित्र केवळ असामान्य होय. अशाच आशयाचे उद्गार जस्टिस वेस्ट यांनीं एका प्रसंगीं काढले होते. ते म्हणाले:-

"His versatility of talent and devotion to intellectual pursuits are somewhat rare in every country. In India, so far as I know, Dr. Bhau Daji's life and example are almost unique."

यापेक्षां डॉ. भाऊंच्या सबंध आयुष्यक्रमासंबंधानें निष्कर्षरूपानें अधिक स्पष्ट व अधिकाराचा अभिप्राय देतां येईल असें वाटत नाहीं.

डॉ. भाऊ दाजींच्या सबंध चरित्राचा नीट विचार केल्यास आम्हांस त्यांच्यामधला जो पहिला अनुकरणीय गुण वाटतो तो त्यांची स्वातंत्र्यप्रियता होय.

त्यांचा कॉलेजांतील अभ्यासक्रम पुरा झाल्यावर घरच्या सांपत्तिक अडचणीमुळें त्यांनीं एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशनमध्यें शिक्षकाची जागा पतकरली खरी, पण पुढें ग्रँट मेडिकल कॉलेज स्थापन होतांच त्यांनीं ती नोकरी सोडून आपलें नांव त्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या पटावर प्रथम दाखल केलें हें मागें सांगितलेंच आहे. मग सन १८५१ सालीं ते जी. जी. एम्. सी. झाल्यावर लागलीच सरकारनें त्यांना सब-असिस्टंट-सर्जन नेमलें. पण त्यांना तें एक प्रकारचें बंधन वाटून तें थोड्याच दिवसांनीं त्यांनीं तोडून टाकलें! हल्लीं यूनिव्हर्सिटींतून बाहेर पडतांच नोकरीकरितां पदवीधरांची जी धांवपळ सुरू होत असते तिचा विचार केला म्हणजे डॉ. भाऊंचें त्या वेळचें वर्तन अभिनंदनीयच नव्हे, तर अत्यंत प्रशंसार्ह ठरतें. कारण त्या वेळीं अशा पदवीधरांना सरकार मुद्दाम बोलावून नोकऱ्या देत असे. त्यामुळें डॉ. भाऊंची स्वातंत्र्यप्रियता किंवा ज्ञानलालसा अत्यंत उच्चप्रकारची होती असें स्पष्ट दिसतें. अर्थात् त्यांच्या चरित्रापासून आमच्या तरुण व होतकरु मित्रांनीं हाच पहिला बोध घेतला पाहिजे. जस्टिस वेस्ट्रॉप यांनीं एका प्रसंगीं असेच उद्गार काढले होते. ते असेः—

"The lesson which his (Dr. Bhau Daji's) life teaches to and illustrates for his fellow-countryman is that—that unlike too many of the young men of the present day in India, his craving for education did not limit itself to learning sufficient to obtain for him a government appointment, or other situation or a profession."

या प्रकारची ज्ञानलालसा बाळगून डॉ. भाऊ दाजींनीं स्वतंत्र बाण्यानें कसकशी अनेक क्षेत्रांतून देशाची सेवा केली याचें विवेचन मागील प्रकरणांत आलेलेंच आहे.

डॉ. भाऊ दाजींमधला दुसरा प्रशंसनीय गुण म्हणजे त्यांचा दिलदारपणा किंवा मनाचा मोठेपणा होय. या त्यांच्या गुणामुळें त्यांच्याकडून अनेक होतकरू लोकांना सहाय्य मिळून ते पुढें आले आहेत. "डॉ. भाऊ दाजी यांच्या आश्रयानें शेंकडों चित्पावन व कऱ्हाडे ब्राम्हण उदयास आलेले आज प्रत्यक्ष आहेत." असें कै. रा. भि. गुंजीकर हे एके ठिकाणीं म्हणतात. ("भ्रमनिरास" पृ. ११६, सन १८८५ पहा). डॉ. भाऊंच्या सहाय्यानें अनेक कुटुंबें उदयास आलेलीं

आपणांस माहीत असल्याचें रा. सा. पाणंदीकर सांगतात. कोल्हापुरास एका काळीं दिवाण असलेले माधवराव बरवे यांस डॉ. भाऊंचें सहाय्य होतें. त्याचप्रमाणें कै. घनश्याम नीळकंठ नाडकर्णी यांना बहुतेक प्रथमपासूनच भाऊ दाजींचें सहाय्य झालेलें असल्यामुळें ते पुढें इतके उदयास आले. तिसरे गृहस्थ मिस्टर रेहाट्सेक ( Edward Rehatsek ) हे हंगेरियन गृहस्थ असून ते डॉ. भाऊंच्या वेळीं प्रथम अगदीं विपन्नावस्थेंत होते. पुढें त्यांना डॉ. भाऊ दाजींनीं स्वतः द्रव्यसहाय्य करून डॉ. विल्सनसाहेबांकडून त्यांना आपल्या कॉलेजांत प्रोफेसर नेमवून मोठी मदत केली आणि त्यांना पुढें आणलें. रा. सा. मंडलीक हेदेखील त्यांना ( रेहाट्सेक यांना ) मग सहाय्य करूं लागले. यावरून कोणास मदत करतांना डॉ. भाऊंच्या मनांत त्याची जात, धर्म यांपैकीं कांहींच येत नसे, ही गोष्ट सिद्ध होते.

कोचीनचे प्रसिद्ध कै. रामचंद्र महादेव गावसकर हे जेव्हां वेंगुर्ल्याहून कांहीं उद्योग पाहण्याकरितां म्हणून प्रथम मुंबईस आले तेव्हां त्यांना डॉ. भाऊ दाजींनींच मदत केली. ही गोष्ट आम्हांस हल्लींच समजली. पुढें रामभाऊ हे एका युरोपीयन व्यापारी पेढीवर नोकरीला राहून ते कोचीनला गेले व नंतर त्यांनीं स्वतंत्र रीतीनें तिकडे व्यापार चालवून ते पुढें उदयास आले. प्रस्तुत त्यांची पेढी "रामचंद्र महादेव आणि कंपनी" हिचें कोचीनला काम चांगलें चाललें आहे.

रा. सा. मंडलिक व डॉ. भाऊ दाजी यांचा केवळ मित्रत्वाच्या संबंधापेक्षां अधिक निकट स्वरूपाचा संबंध होता असें स्पष्ट दिसतें. मंडलीक हे भाऊंपेक्षां अकरा वर्षांनीं लहान. त्यांचा भाऊ दाजींशीं संबंध ते "एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशन"मध्यें शिकण्याकरितां आले तेव्हांपासून सुरू झाला असें मंडलिकांचे चरित्रकर्ते सांगतात. म्हणजे डॉ. भाऊ हे सदरील शाळेंत शिक्षक (१८४३–४५) होते तेव्हां मंडलीक तेथें शिकण्याकरितां आले. त्यावेळीं त्यांचें वय अकरा बारा वर्षांचें होतें. अर्थात् त्या दोघांचें गुरु–शिष्यांचें नातें होतें असें उघड दिसतें. पुढें डॉ. भाऊ दाजी हे जी. जी. एम्. सी. झाल्यावर मंडलिकांच्या कुटुंबांतील वैद्य ( Family doctor) झाले इतकेंच नव्हे, तर ते एकदां आयुर्वेदिक संशोधनाकरितां कांहीं वनस्पति पाहण्यासाठीं म्हणून जेव्हां ठाणें जिल्ह्यांतील पुष्करणीस गेले होते तेव्हां त्यांना मंडलिकांच्या घरच्या मंडळींनीं ( हे त्या वेळीं ठाण्यास होते ) मेजवानी दिली होती व त्या वेळीं माधवराव बरवे बरोबर होते

असें मंडलिकांचे चरित्रकार सांगतात. ह्यावरून डॉ. भाऊ आणि मंडलीक यांचे खासगी संबंध किती जिव्हाळ्याचे होते हें स्पष्टच दिसतें. सार्वजनिक कार्यांत तर बहुतेक आरंभापासून डॉ. भाऊंच्या अंतकाळपर्यंत रा. सा. मंडलीक हे भाऊंशीं अत्यंत आदरानें वागून त्यांना अंतःकरणपूर्वक सहाय्य करीत असत. राजकीय बाब असो, सामाजिक असो, वाङ्मयात्मक असो, कोणतीही बाब असो, डॉ. भाऊ दाजी जिकडे अध्यक्ष तिकडे मंडलीक सेक्रेटरी किंवा जिकडे भाऊ सेक्रेटरी तिकडे मंडलीक सहाय्यक असा प्रकार झाला नाहीं असें क्वचित् घडे. रा. सा. पाणंदीकर सांगतात कीं, "रा. सा. मंडलीक हे करारी व तापट स्वभावाचे असत. आमच्या तरुण वयांत आम्ही त्यांना "जमदग्नीचा अवतारच" म्हणत असूं. परंतु अशा गृहस्थांना एक दोनदां डॉ. भाऊ दाजींच्या पुढें अगदीं आदरानें उभे राहतांना आम्ही पाहिलें तेव्हां आम्हांस फार अचंबा वाटला." कै. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनीं आपल्या एका पुस्तकांत असें नमूद केलेलें सांपडतें. "रा. सा. मंडलीक हे मोठे उद्योगी, स्पष्टवक्ते आणि शोधक गृहस्थ आहेत, यांजवर प्रख्यात डॉ. भाऊ दाजी यांचा फार लोभ असे; आणि रावसाहेबही डॉक्टरसाहेबांना पित्याप्रमाणें मान देत असत." गुंजीकरांचें पुस्तक प्रसिद्ध झालें तेव्हां व पुढें कित्येक वर्षें रा. सा. मंडलीक हे हयात होते. असो. रा. सा. मंडलीक हे अत्यंत बुद्धिमान् व उद्योगी असून फार स्वतंत्रबाण्याचे होते. त्यांनीं मग वकिलीची परीक्षा देऊन ते त्यांत पास झाले व त्यांनीं सरकारी नोकरी सोडली. डॉ. भाऊ दाजींचा रा. सा. मंडलिकांना त्यांच्या लहान वयांत किती उपयोग झाला हें नक्की सांगतां येत नाहीं. परंतु मंडलिकांनीं अत्यंत आदरपूर्ण भावनेनें डॉ. भाऊ दाजींना बहुतेक सर्व त्यांच्या व्यवसायांमध्यें महत्वाचें सहाय्य केलें यांत मात्र शंका नाहीं. एशियाटिक सोसायटींत डॉ. भाऊ हे व्हाइस प्रेसिडेंट व मंडलीक सभासद असा प्रकार होताच. परंतु स्टु. लि. अँड सा. सोसायटीचे डॉ. भाऊ हे अध्यक्ष आणि रा. सा. मंडलीक हे सेक्रेटरी अशी कैक वर्षेंपर्यंत स्थिति होती. भाऊ दाजींच्या वैद्यकीय संशोधनकार्यांत निरनिराळ्या ठिकाणाहून जातीनें व पत्रव्यवहारानें मित्राकडून मंडलिकांनीं विविध प्रकारच्या वनस्पती व माहिती पुरवून इतकें महत्वाचें सहाय्य केलें कीं त्याचें कितीही वर्णन केलें तरी पुरें व्हावयाचें नाहीं ! सन १८६०–६२ च्या सुमारास लोहार चाळींतल्या मुलींच्या शाळेच्या खर्चाकरितां मोठा फंड जमविण्यांत आला त्या वेळीं; सन १८६५ मध्यें भाऊ

" शेअरमनिआ"मध्यें बुडाले तेव्हांच्या खटपटींत; व भाऊ वारल्यानंतर त्यांच्या स्मारकाची व्यवस्था करण्याच्या बाबतींत महत्वाचा कार्यभाग रा. सा. मंडलिकांचाच होता. भाऊंच्या पश्चात् त्यांच्या इस्टेटीचे व डॉ. नारायण दाजींच्या इस्टेटीचेही रा. सा. मंडलीक हेच एक ट्रस्टी होते. असो. इकडे सांगण्यासारखी गोष्ट एवढीच कीं, मंडलिकांच्या बाबतींत डॉ. भाऊ दाजींची वागणूक जरी नेहमीं तशा गुणी माणसांत आदर उत्पन्न करण्यासारखी दिलदारपणाची होती, तरी मंडलिकांनीं अगदीं आदराच्या भावनेनें डॉ. भाऊंना सर्व बाबतींत अखेरपर्यंत महत्वाचें सहाय्य केलें हें अगदीं उघड आहे. तें इतकें कीं, तसें सहाय्य साधारण एक मित्र दुसऱ्यास करणार नाहीं.

डॉ. भाऊ दाजी व रा. सा. मंडलीक यांच्या साहचर्यापासून दुसरी एक गोष्ट निष्पन्न होते तिजविषयीं दोन शब्द लिहिले पाहिजेत. मंडलीक हे सामाजिक बाबतींत जुन्या पक्षाचे होते असें मानण्यांत येत असे. आणि पुढें शेट मलबारींच्या चळवळीच्या वेळीं तर मुंबईतील जुन्या मताच्या हिंदु लोकांचे ते पुढारी होते, या गोष्टीपासून त्या समजुतीस बळकटी येते. पण डॉ. भाऊ दाजींच्या साहचर्यांत जेव्हां रा. सा. मंडलीक होते, तेव्हां डॉ. भाऊ दाजींनीं सामाजिक किंवा धार्मिक सुधारणेच्या दृष्टीनें ज्या ज्या गोष्टी केल्या, त्यांत रा. सा. मंडलीक हे एकदांही त्यांच्याविरुद्ध गेलेले दिसले नाहींत ! स्टु. लि. सोसायटीच्या ( जिचे डॉ. भाऊ हे सन १८६१–६२ पासून पुढें त्यांच्या अंतकालपर्यंत अध्यक्ष होते ) मुलींच्या शाळा चालविण्यांत तर मंडलिकांचें सहाय्य होतेंच. परंतु सन १८६९ सालीं मुबईस झालेल्या पहिल्याच ( करमरकरांच्या ) पुनर्विवाहाच्या वेळीं डॉ. भाऊ दाजींबरोबर रा. सा. मंडलीकही हजर होते ! तसेंच गुजराथी लोकांचे धर्माध्यक्ष यदुनाथ महाराज यांनीं त्या वेळचे एक प्रसिद्ध समाजसुधार कर्संनदास मुळजी यांजवर जेव्हां अब्रुनुकसानीचा दावा मांडला, तेव्हां त्यांत डॉ. भाऊ दाजींनीं महाराजांविरुद्ध–मागें एकवार सांगितल्याप्रमाणें–साक्ष दिली, त्याप्रमाणें रा. सा. मंडलिकांनींही महाराजांविरुद्ध साक्ष दिली ! यासंबंधांत कै. सर नारायण चंदावरकर यांचे पुढीलप्रमाणें उद्गार नमूद आहेतः—

"The present generation is accustomed to think of him (R. S. Mandlik) as a man of the old and unbending school of orthodoxy ; but there was time in his career, when he fought the good fight of reform, and tried in his own way to beard

the orthodoxy in its own den. In the sixties he championed the side of the great social reformer Karsandas Mulji, when the latter was sued for defamation for boldly and fearlessly writing against the Vallabhacharya Maharajas in the columns of the *Rast Goflar and Satya Prakash* ; and he was also one of the foremost Hindus of his time who sowed the seeds of female education in this part of the country (*Vide*, 'Chandavarkar's Speeches and Writings" page 323).

सारांश, डॉ. भाऊंच्या निधनानंतर कांहीं वर्षांनीं डॉ. भांडारकर, न्या. रानडे वगैरे मंडळीनीं जी सामाजिक सुधारणेची चळवळ अधिक जोरानें चालविली, तिला विरोध करणारांचें पुढारीपण जरी रा. सा. मंडलीक यांनीं पतकरलें, तरी डॉ. भाऊंच्या हयातींत त्यांनीं स्वीकारलेल्या सामाजिक धार्मिक सुधारणेसंबंधाच्या वर्तनक्रमांत मंडलिकांनीं केव्हांही विरोध दाखविलेला नमूद नाहीं. उलट त्यांना मदतच केली असें अनेक उदाहरणांवरून सिद्ध होतें. असो.

अशाच प्रकारचा पंडित भगवानलाल इंद्रजी यांचा डॉ. भाऊ दाजींशीं संबंध होता. भगवानलाल यांच्यासंबंधानें कै. जव्हेरीलाल उमियाशंकर याज्ञिक यांनीं सन १८८७–८८ मध्यें मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीपुढें एक चरित्रात्मक निबंध वाचला. त्यांत डॉ. भाऊ दाजी व भगवानलाल या उभयतांसंबंधानें बरीच उपयुक्त माहिती आलेली आहे. पण त्याचा इकडे विशेष विस्तार न करतां ती सर्व हकीकत अगदीं थोडक्यांत देतों. पंडित भगवानलाल हे एक नागर जातीचे ब्राह्मण असून ते जुनागडचे रहिवासी होते. त्यांचें जुन्या रितीप्रमाणें वेदाध्ययन व शास्त्रपठन बालपणांतच झालेलें असून त्यांना जुनागड जवळील गिर्नार पर्वतावरील खडकावर कोरलेल्या लेखांच्या नकला करणें, त्यांचे अर्थ लावण्याचा प्रयत्न करणें हा एक नाद होता. हा अभ्यास असाच त्यांनीं चालू ठेवल्यास व त्यांना चांगला मार्गदर्शक मिळाल्यास त्यांच्या हातून महत्वाचें संशोधनकार्य होण्याचा संभव आहे असें त्या वेळचे काठेवाडांतील पोलिटिकल एजंट मिस्टर ए. के. फॉर्ब्स यांना वाटून त्यांनीं भगवानलालची मुंबईतील प्रसिद्ध डॉ. भाऊ दाजी यांजकडे शिफारस केली. डॉ. भाऊंनीं त्याला ताबडतोब आपणांजवळ बोलाविलें. डॉ. भाऊंचा वैद्यकीचा धंदा त्यावेळीं अति भरभराटींत चालला होता. आणि तो संभाळून आपल्या आवडत्या संशोधनकार्याकडे देण्यास त्यांना फुरसत अगदींच थोडी मिळे. सबब त्यांना एक तरुण व हुशार मदतनीस हवाच होता.

तो त्यांना मिस्टर फॉर्बसच्या शिफारशीनें आयताच मिळाला. डॉ. भाऊंचा निरोप समजतांच पंडित भगवानलाल हे मुंबईस ता. २४–४–६२ रोजीं आले. डॉ. भाऊंना त्यांना पाहतांच आनंद झाला आणि त्यांनीं तावडतोब आपल्या घराच्या आवारांत एक तंबू मारवून भगवानलालची तात्पुरती रहाण्याची सोय करून दिली. याप्रमाणें डॉ. भाऊ व भगवानलाल यांचा जो एकदां संबंध जुळला तो भाऊंच्या अंतकाळपर्यंत टिकला. डॉ. भाऊ हे पंडित भगवानलाल यांना कसे वागवीत असत यासंबंधानें जव्हेरिलाल भाई म्हणतातः—

"The relations in which Dr. Bhau Daji stood towards Bhagwanlal were not, those of master and servant, but rather of partners in a common concern, the object being to explore the archæological remains of the country and extend the boundaries of human knowledge with regard to the authentic history of India."

डॉ. भाऊ दाजी हे पंडित भगवानलालला पगार देत असत. तरी त्यांना नोकरांप्रमाणें वागविण्याची कल्पना त्यांच्या मनास केव्हांही शिवली नाहीं. आपण चालविलेलें ऐतिहासिक संशोधनाचें कार्य हें एक पवित्र कर्तव्य आहे तर त्यांत भगवानलाल हे एक आपले सहाय्यक किंवा भागीदार आहेत अशा भावनेनेंच ते त्यांच्याशीं वागत असत.

भगवानलाल यांनीं डॉ. भाऊ दाजींना शिलालेख, ताम्रपत्र लेख वगैरे यांच्या विशदीकरणाच्या कामांत किंवा जुने हस्तलेख शोधपूर्वक मिळविण्याच्या कामांत कसकसें सहाय्य केलें, याचा थोडासा उल्लेख मागील प्रकरणांत आलाच आहे. पंडित भगवानलाल यांच्या बाजूस एक उणीव होती. त्यांना इंग्लिश भाषेचें ज्ञान नव्हतें. पण संशोधनकार्यांतील ती उणीव डॉ. भाऊ दाजी भरून काढीत असत. त्यामुळें जुनागड, अजंटा वगैरे ठिकाणचे लेख पाहण्याकरितां डॉ. भाऊंना कित्येक खेपा कराव्या लागूनहि पूर्वीच्या संशोधकांनीं त्या लेखांसंबंधीं काय शोध लावलेले होते हें पहावें लागत असे. म्हणजे भाऊंना प्रथम कांहीं वर्षें दुप्पट काम पडत असे. पण पंडित भगवानलालसारखा तरुण, हुशार, व निरलस सहाय्यक मिळाल्यामुळें याज्ञिक यांच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे

"In Bhagwanlal, he (Dr. Bhau Daji) found a man, just after his own heart, one who possessed the ardour of youth, and

indomitable energy to work for days and months, and all for purely literary and scientific purposes."

डॉ. भाऊ दाजींचें शिलालेखांच्या बरोबर नकला घेणें वगैरे काम जरा हलकें झालें. डॉ. भाऊंनीं ठोकळ मानानें कामाची कशी वांटणी केली होती हें याज्ञिक यांच्याच भाषेंत इकडे सांगणें इष्ट दिसतें."

"Each partner in this literary firm undertook to furnish his quota to the common stock. Dr. Bhau had mastered the literature of the Indian antiquities as it then existed in the English language. He had also had translations made for him in English of works written by German and French scholars on oriental subjects. He had thus kept himself abreast of the progress made in his time by Europeans and Americans in the department of Indian antiquarian research. Pandit Bhagwanlal, on the other hand visited the very fountain sources of knowledge in different parts of India, such as caves, monasteries, rock-cut-temples, etc., where old inscriptions could be found and where knowledge could be had at first hand."

याचा सारांश थोडक्यांत वर आलाच आहे. पंडित भगवानलाल यांनीं पुढें इंग्लिश भाषेचें ज्ञान संपादन केलें आणि एकंदर संशोधनक्षेत्रांत त्यांनीं महत्वाचें काम केलें हें प्रसिद्ध आहे.

डॉ. भाऊ दाजींचें पंडित भगवानलालवर किती प्रेम होतें हें व्यक्त करणारीं अनेक उदाहरणें आहेत. भगवानलाल हे नेपाळ प्रांतांत फिरत असतां त्यांना दूषित तापानें पछाडलें आहे हें समजतांच डॉ. भाऊ दाजी–ते स्वतः आजारी असून बिछान्यावर पडलेले होते तरी—किती अस्वस्थ झाले व पंडितांच्या जीवाला धोका नसून ते बरे होण्याच्या मार्गांत आहेत असें समजे तोंपर्यंत त्यांच्या ( भाऊंच्या ) मनाची कशी तारांबळ चालली होती, ह्याचा मागील प्रकरणांत उल्लेख आलाच आहे. त्याची इकडे द्विरुक्ति करीत नाहीं. दुसरी एक गोष्ट याज्ञिक यांनीं नमूद केली आहे. भगवानलाल यांना या बाजूच्या तुरीच्या डाळीच्या वरणाची संवय होती. तशी डाळ ते फिरत होते त्या प्रांतांत मिळत नव्हती. ही भगवानलालची अडचण भाऊ दाजींना समजतांच त्यांनीं तुरीची डाळ टपालानें भगवानलालला पाठवून दिली व त्यांची अडचण दूर

केली! याविषयीं याज्ञिक म्हणतात, "The Pandit saw in this a fresh instance of the doctor's ceaseless anxiety for his health" पण त्या प्रवासावरून भगवानलाल मुंबईस परत येण्याच्या पूर्वीच डॉ. भाऊंचें देहावसान झालें होतें! भाऊ दाजींच्या मृत्यूची बातमी भगवानलाल यांना समजतांच जो त्यांच्या मनाला धक्का बसला त्यापासून पूर्व स्थिति येण्याला त्यांना किती तरी प्रयास पडले! असो. डॉ. भाऊ दाजींविषयींचा पूज्य भाव व्यक्त करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे त्यांनींच दाखविलेल्या मार्गानें जाणें व कांहीं तरी वाङ्मयसेवा करणें हाच होय असें भगवानलाल यांना वाटलें व त्याप्रमाणें ते वागले! यासंबंधानें जव्हेरिलाल म्हणतातः—

"Bhagwanlal thought that the best tribute of respect which he could pay to the memory of the deceased as patron, master, *Guru* or teacher and friend, was to work out his own teachings and follow in his own footsteps in the field of Indian research. The ideal of what constitutes a man of learning, which the Pandit had come to form, was conceived very much from what he had seen in the character of Dr. Bhau and in his love of knowledge for its own sake."

डॉ. भाऊ दाजींच्या एकंदर चारित्र्याबद्दल भगवानलाल यांना किती पूज्यभाव वाटत असे व त्यांच्याच शिकवणीप्रमाणें वागून यथाशक्ति वाङ्मयसेवा करण्यांतच कसें जीवितसाफल्य आहे असें पंडितजींचें मत ठरलेलें होतें हें वरील उताऱ्यावरून उत्तम रीतीनें सिद्ध होतें. डॉ. भाऊ व पंडित भगवानलाल यांचें खरेंखुरें गुरु-शिष्यांचें नातें होतें ही गोष्ट भगवानलाल हे मनांत बाळगूनच थांबले नाहींत. तर त्यांनीं तें नातें अंशतः तरी कायमचें दृश्य स्वरूपांत राहिलें पाहिजे अशी आपल्या मृत्युपत्रांत व्यवस्था करून ठेविली होती. भगवानलाल यांनीं आपल्या संग्रहांत असलेले सर्व हस्तलेख मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या स्वाधीन करण्याचें मृत्युपत्रानें ठरविलें होतें. त्यांत असा मजकूर होताः—

"The whole of his collection of Mss. he makes over to this (Bombay Branch Royal Asiatic Society) society for the purpose of being deposited in its Library, with a request to the Committee of management of the Society that they will kindly

permit these Mss. to be kept in the empty book-shelf side by side with the shelf which contains the Sanskrit Mss. of my *Guru* and Master 'Dr. Bhau Daji.' The top part of the shelf to bear the superscription of 'Bhagwanlal Indraji, Pupil of Dr. Bhau Daji.' "

याप्रमाणें व्यवस्था करून पंडित भगवानलाल यांचे जुने हस्तलेख सोसायटीच्या लायबरींत ठेवलेले आहेत.

डॉ. भाऊ दाजींच्या अंगचा तिसरा गुण म्हणजे त्यांची परोपकारबुद्धि होय. लॅन्सेटनें ( Lancet नें ) म्हटलें आहे कीं,

"So far from being afflicted with the native infirmity of avarice, his (Dr. Bhau Daji's) failings in pecuniary matters are on the other side. In the expenditure of his hardearned income, he has often, where public objects were in view, been lavish to a fault ; and in his personal habits he is as plain and thrifty as can be desired."

भाऊंच्या ठिकाणीं लोभ हा लेशमात्रही नव्हता. त्यांच्या स्वतःच्या गरजा अगदींच थोड्या असत. पण त्यांचा खर्च मात्र—विशेषतः लोककल्याणाचीं कामें असतील तेव्हां—दांडगा असे. त्यांनीं आपल्या वैद्यकीच्या धंद्यांत कितीजणांवर—मग ते स्वतःच्या जातीचे असोत वा नसोत–उपकार केले ह्याचा हिशोबच सांगतां यावयाचा नाहीं ! त्यांनीं आपल्या बंधूच्या सहाय्यानें चालविलेल्या "धर्मार्थ दवाखान्यां"चा हजारों गरीब लोक फायदा घेत असत असें विलायतच्या लॅन्सेट पत्रानेंच प्रसिद्ध केलें होतें.

जुन्या शास्त्री पंडितांचे ते एक आश्रयदाते असत. यवतचे डॉ. गोडबोले ह्यांनीं दिलेल्या माहितीवरून असें समजतें कीं, डॉ. भाऊ दाजी हे वारंवार मुंबईहून मेण्यांतून किंवा पालखींतून कोल्हापूर, सातारा, कऱ्हाडपर्यंत जात असत व परत येतांना बहुधा पांच सात हजार रुपये तरी बरोबर घेऊन येत असत. येतांना किंवा जातांना डॉ. भाऊंचा पुण्यास पांच चार दिवस मुक्काम होत असे. त्या मुदतींत ते भिक्षुक ब्राम्हणांना बोलावून वेदमंत्र म्हणावयास सांगत असत व प्रत्येकीं रुपया रुपया दक्षिणा देत असत. त्यांपैकींच कोणी एकादा ब्राम्हण चांगला शास्त्री किंवा वैय्याकरण अथवा नैय्यायिक आहे असें समजल्यास डॉ. भाऊ हे

त्याला एकादी शालजोडी देत असत. याप्रमाणें त्यांचा दानधर्म फार मोठा असे. डॉ. गोडबोले यांनीं लक्षांत ठेवण्यासारखी एक गोष्ट सांगितली, ती ही कीं, दान धर्माच्या कामीं डॉ. भाऊ दाजी हे कधीं ताम्‍ब्यांचें नाणें हातांत धरीत नसत! ते नेहमीं दोन बंदांचा लांब अंगरखा वापरीत असत, व ते आपले दोन्ही बाजूचे मोठे खिसे रुपये, अधेल्या, पावल्या, चवल्या अशा रुप्याच्या नाण्यांनीं भरून घेऊन बाहेर पडत असत! व जो याचक पुढें येईल; त्याला–त्याच्या नशीबानें–हातास येईल तें नाणें ते देत असत. ही डॉ. भाऊंची धर्मबुद्धि—ते स्वतः सन १८६५ सालच्या उद्भवलेल्या महाप्रसंगांत सांपडलेले होते तरी त्या वेळींही—कमी झाली नव्हती! असे धर्मात्मे विरळा!!

डॉ. भाऊ दाजींमधला चवथा संस्मरणीय गुण म्हणजे त्यांचें "public spirit," अर्थात् सार्वजनिक हिताची कळकळ व ती व्यक्त करण्याकरितां लागणारें धैर्य किंवा त्या कामीं लागेल तो खर्च करण्याची तयारी! हा गुण केव्हांही झालें तरी फारच थोड्यांच्या अंगीं असलेला दिसून येत असतो. भाऊ दाजींमधला हा गुण तीन प्रसंगीं उत्तम रीतीनें लोकांच्या कसोटीस उतरला होता. ते प्रसंग म्हणजे विठोबा मल्हारीचा खटला; यदुनाथ महाराज यांनीं कर्सनदास मुळजी यांजवर केलेला अब्रुनुकसानीचा दावा; आणि लोहार चाळींतील त्यांनीं चालविलेली मुलींची शाळा. पहिल्या प्रसंगीं डॉ. भाऊ दाजींना सुमारें दहा हजार रुपयांचा खर्च आला. दुसऱ्या प्रसंगीं त्यांनीं सत्पक्षाचें समर्थन केल्यामुळें त्यांचें भयंकर सांपत्तिक दृष्टीनें नुकसान झालें. तिसऱ्या प्रसंगीं त्यांनीं आपल्यावर घेतलेल्या जबाबदारीची जाणीव त्यांच्या मित्रमंडळीमध्यें इतक्या तीव्रतेनें उत्पन्न झाली कीं, त्यांनीं मग आपआपसामध्यें वर्गणी जमवून त्या शाळेच्या खर्चाची परभारें कायमची तजवीज केली आणि त्यासंबंधानें डॉ. भाऊ दाजींवरचें ओझें कमी केलें. यासंबंधाचा सर्व खुलासा मागील कांहीं प्रकरणांतून येऊन गेल्यामुळें त्याची पुनरुक्ति इकडे करीत नाहीं.

डॉ. भाऊ दाजींचा पांचवा अनुकरणीय गुण म्हणजे त्यांची भूतदया (philanthropy) हा होय. यासंबंधानें मिस्टर वुड यांनीं एके ठिकाणीं असे उद्गार काढले होते:—

"Dr. Bhau Daji's chief characteristic was an unstinted sympathy. Mr. Wood remembered how on one occasion he

heard Bhau Daji, with very strong feeling, quote one of the aphorisms or institutes of Asoka. The words were 'the heart of Buddha was filled with infinite pity.' Though they may find many similar texts in the Christian scriptures, this coming from Bhau Daji struck him very much. This sentiment or principle was apparent in Bhau Daji's daily life and actions."

गौतम बुद्धाच्या अंतःकरणांत अलोट भूतदया असे. अशा अर्थाचें अशोकाच्या अनुशासनांतील एक वचन नेहमीं डॉ. भाऊ दाजींच्या मुखांतून निघत असे असें मि. वुड म्हणाले, व तेंच तत्त्व भाऊंच्या नित्य वर्तनांत प्रतिबिंबित होत असे असें सांगून वुडसाहेबांनीं यासंबंधांत पंडित भगवानलाल हे नेपाळ प्रांतांत आजारी पडल्यावेळची सर्व हकीकत निवेदन केली. पण ही हकीकत मागील एका प्रकरणांत येऊन गेल्या कारणानें त्याची द्विरुक्ति इकडे करण्याचें कारण नाहीं.

डॉ. भाऊ दाजींच्या अंतःकरणांत वसत असणारी भूतदया किती उच्च कोटींतली होती हें त्यांनीं रक्तपितीच्या रोगानें पीडित झालेल्या हतभागी लोकांशीं ठेवलेल्या वर्तनावरून दिसून येत असे. त्या रोगानें व्यथित झालेल्या लोकांसारखे दैवहीन लोक क्वचितच सांपडतील. अशांपैकीं कित्येकांचे अवयव सडलेले असतात, तर कित्येकांस झालेल्या जखमांमुळें ते विद्रूप झालेले असतात. या कारणांस्तव अशा हतभागी रोग्यांच्या कोणी वाऱ्यासही सामान्यतः उभा राहात नसतो. अशा तिरस्कृत प्राण्यांचें दुःख आपल्या हातून अंशतः तरी कमी व्हावें अशा अत्यंत उदात्त हेतूनें प्रेरित होऊन जो पुरुष त्यांच्या जवळ जातो, त्यांच्याशीं ममतेनें वागतो, चार गोड शब्द बोलतो व त्यांना औषधोपचार करतो, त्याच्या अंतःकरणांत प्रत्यक्ष गौतम बुद्धाची भूतदयाच संचरली आहे असें तो प्रकार पाहणाऱ्या मनुष्यास वाटल्यास आश्चर्य नाहीं ! यासंबंधांत रा. सा. मंडलिकांच्या पत्रानें ( ७-६-७४ ) ( नेटिव्ह ओपिनियननें ) जे अत्यंत मोकळेपणानें उद्गार काढले, आहेत त्यापेक्षां डॉ. भाऊदाजींच्या या गुणाचें—भूतदयेचें—अधिक उठावदार चित्र काढतां येणार नाहीं. ते उद्गार हेः—

"In conclusion, we venture to observe that however great the accomplishments of Dr. Bhau Daji were, we rank them far beneath the gentleness, kindness and assiduity with which he attended to even the poorest and most wretched of

his patients, men ulcerated, foul and disfigured by the dreadful malady of leprosy, the very aspect of whom is apt to horrify persons not actuated by the noble motives which inspired the conduct of Dr. Bhau Daji."

याचा सारांश वर आलाच आहे. आम्हांस मात्र हें चित्र मनश्चक्षूंपुढें उभें राहिलें म्हणजे संस्कृत कवींच्या पुढील उक्तींचें—

परोपकाराय सतां विभूतयः ।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम् ।

व साधु तुकोबांच्या खालीं दिलेल्या ओळींचें—

जे कां रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥

स्मरण होतें.

डॉ. भाऊ दाजी यांच्यामध्यें जे आमच्या मतें मुख्य व अनुकरणीय गुण वाटले त्यांचें येथपर्यंत विवरण केलें. त्या सर्व गुणांतून " मनाचा मोठेपणा " हें एकच सूत्र खेळत असलेलें स्पष्ट दिसत असल्यामुळें ते कांहींसे परस्परावलंबी गुण आहेत असें म्हणण्यासही हरकत नाहीं.

कित्येक चिकित्सक लोकांस डॉ. भाऊ दाजींमध्यें कांहीं दोषही दिसत होते. भाऊ दाजी हे आमच्यातुमच्या सारखे मनुष्यच होते. त्यांच्यांत दोष मुळींच नव्हते असें कोण कसें म्हणूं शकेल ? आम्हांस जे एक दोन दोष लोकांनीं काढलेले समजले, त्यासंबंधाचा खुलासा मागील प्रकरणांत आलाच आहे. डॉ. भाऊमधला एक मोठा दोष म्हणून जो कांहीं लोक दाखवीत असत कीं, त्यांनीं रक्तपितीवरील आपलें औषध गुप्त ठेवलें आणि तें त्यांनीं प्रसिद्ध केलें नाहीं—तो कसा निराधार व अज्ञानमूलक होता हें एका प्रकरणांत दाखविलेंच आहे. त्यामुळें त्यासंबंधीं इकडे फिरून कांहीं लिहिण्याचें कारण नाहीं.

---

पाने १२६
८८२६४
९६३
भवानी